**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्यातील विणकर सहकारी संस्था व हातमाग धारकांचे २४५ कोटी रूपयांचे कर्ज माफ करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१) * ३११२५ श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६८८ विणकर सहकारी संस्था व ७००० हातमाग धारकांचे २४५ कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १७ मे, २०१२ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कर्ज माफ करण्याच्या निर्णयानुसार राज्यातील किती संस्थांना व हातमाग धारकांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे,
(३) नसल्यास, उपरोक्त कर्जमाफी योजना त्वरीत व योग्य पध्दतीने राबविण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान यांच्याकरिता** : (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत "पुनर्जीवन सुधारणा आणि पुनर्रचना" पॅकेजची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याचा निर्णय दिनांक १६ मे, २०१२ च्या मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. याचा लाभ राज्यामधील २ हातमाग शिखर संस्था, ६८८ प्राथमिक संस्था आणि जवळपास ६ ते ७ हजार वैयक्तिक हातमाग विणकरांना होणे अपेक्षित आहे.

या हातमाग पॅकेजची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) हातमाग पॅकेज राज्यामध्ये राबविण्यासाठी राजी असल्याचे सहमती पत्र दिनांक १२ जानेवारी, २०१२ रोजी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहे.
२) यासंबंधीचा त्रिपक्षीय करार स्वाक्षरीत करून दिनांक ६ जून, २०१२ रोजी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे.
३) संस्थाच्या दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंतच्या लेख्यांच्या तपासणीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
४) पॅकेज अंमलबजावणी/देखरेख/पुनर्विलोकन यासंदर्भातील राज्य व जिल्हा स्तरीय समित्या गठीत करून बैठका घेण्यात येत आहेत.
५) राज्यातील हातमाग व्यवसायाला जास्तीत जास्त लाभ व्हावा यासाठी पॅकेजमधील वर्धन क्षमतेच्या निकषामध्ये सूट/ सवलत देणे तसेच सहकारी बँकाचा पॅकेज मध्ये अंतर्भाव करणे या बाबीसंदर्भात केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्रं. 31125**

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने अपने उत्तर में बताया है कि राज्य में करीब 688 बुनकर संस्थाओं तथा करीब 6-7 हजार हातमाग बुनकरों को व्यक्तिगत रुप से इस योजना का लाभ मिलेगा. लेकिन हमारी जानकारी के अनुसार भारत सरकार ने जो योजना बनायी है, लोगों को उस योजना का लाभ महाराष्ट्र सरकार के मार्फत न देकर, लोगों को इस रिव्हायवल पॅकेज का लाभ उन्होंने नाबार्ड के मार्फत देने का फैसला किया है.

मुझे पूछना है कि जिन 688 संस्थाओं तथा करीब 6-7 हजार बुनकरों को सरकार ने आयडेंटिफाय किया है, उनको डायरेक्ट मदद करने की योजना महाराष्ट्र सरकार की है या नहीं है ? इस संबंध में सरकार ने एक जीआर मई, 2012 में निकाला है. उस संबंध में लोगों को फायदा पहुंचाने की कोई योजना महाराष्ट्र सरकार के पास है या नहीं है ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि इस योजना के नार्म्स के हिसाब से सिर्फ एक या दो को-ऑपरेटिव संस्थाओं को ही इस योजना का लाभ मिल सकता है. इसलिए मुझे पूछना है कि ज्यादा सोसायटीज का कर्ज माफ करने के लिए तथा इस योजना का लाभ ज्यादा सोसायटीज को पहुंचाने के लिए सरकार इस योजना के नार्म्स में कुछ सुधार करेगी या कुछ नार्म्स स्थिर करेगी ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या माध्यमातून पुनर्जीवन आणि पुनर्रचना अशा प्रकारचे पॅकेज आलेले आहे. यामध्ये 80 टक्के केंद्र शासनाचा निधी आणि 20 टक्के राज्य शासनाचा निधी राहणार असून नाबार्ड ही नोडल एजन्सी म्हणून काम करणार आहे. 688 प्राथमिक संस्था आहेत त्यापैकी 567 संस्थांचे ऑडीट पूर्ण झालेले आहे. बाकीच्या संस्थांचे ऑडीटचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त संस्थांना ,फेडरल संस्थांना आणि हातमाग विणकरांना कसा मिळेल यासाठी शासनाचे प्रयत्न चालू आहेत. राज्य स्तरावर यासाठी सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. जिल्हा स्तरावर सुध्दा ग्राम विकास विभागाच्या अध्यक्षतेखाली समिती केलेली आहे. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त सोसायटयांना आणि जास्तीत जास्त विणकरांना या योजनेमध्ये कव्हर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या योजनेचे दोन भाग असून 2010 पर्यंतचे थकीत कर्ज माफ

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होणार आहे आणि नव्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाणार आहे. दोन्ही योजनेच्या माध्यमातून विणकरांना जास्तीत जास्त लाभ मिळावा म्हणून शासनाचे प्रयत्न चालू आहेत.

सभापती महोदय, योजना राबविताना पहिल्या टप्प्यामध्ये 3 वर्षापैकी दोन वर्षामध्ये ऑपरेटीव्ह लॉस झाला असेल तर योजनेचा फायदा मिळत होता. म्हणून निकषामध्ये सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाला कळविण्यात आले होते आणि आता निकषामध्ये सुधारणा झालेली आहे. त्यानुसार 5 वर्षापैकी 4 वर्षे जरी ऑपरेटीव्ह लॉस झाला असला तरी बेनिफिट मिळणार आहे. म्हणून जास्तीत जास्त संस्थांना या योजनेचा फायदा कसा मिळेल यादृष्टीने राज्य शासनाच्या माध्यमातून प्रयत्न चालू आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 688 प्राथमिक संस्थांची तपासणी झालेली आहे असे मंत्रीमहोदयांनी उत्तरात सांगितले आहे. या तपासणी किंवा ऑडीटमध्ये किती संस्था चालू अवस्थेत होत्या, किती संस्था बंद अवस्थेत होत्या आणि किती संस्था बोगस निघाल्या याची माहिती मिळाली काय ? त्याचप्रमाणे 6 ते 7 हजार वैयक्तिक हातमाग विणकरांना मदत मिळण्याची अपेक्षा शासनाने व्यक्त केली आहे. या मदतीचे निकष काय आहेत ?

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31125........ श्री. जयंत प्र.पाटील......

याचे निकष काय आहेत, राष्ट्रवादी पक्षाला किती, काँग्रेस पक्षाला किती असे काही निकष आहेत काय, कारण मी कालच म्हणालो होतो की, राज्य शासन म्हणजे एक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीप्रमाणे काम करीत आहे, म्हणून या विणकर सहकारी संस्था व विणकरांना फायदा देण्यासाठीचे निकष नेमके काय आहेत, किती वर्षे विणकर म्हणून काम केले असे काही ठरविले आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : साधारणपणे सहकारी संस्था या निकषांमध्ये बसतात. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे देखील सहकार क्षेत्रात काम करीत असल्याने त्यांना याची जाणीव आहेच. एखाद्या पक्षाचा यात संबंध नसतो किंवा त्या पक्षाची संस्था असतेच असेही नाही. अशा संस्थेकडे सदस्यांची सहकारी संस्था म्हणून आपण पाहत असतो. उर्वरित विणकर सहकारी संस्थांचे लेखा परीक्षण पूर्ण झाल्यानंतर किती संस्था यासाठी पात्र ठरतात हे समजू शकेल. मी आताच सांगितले की, ज्या संस्थांमध्ये ऑपरेटीव्ह लॉस असेल त्या सुध्दा यासाठी पात्र ठरणार आहेत. त्याचबरोबर किती विणकर पात्र ठरतात हे देखील ऑडिटनंतरच कळू शकेल.

श्री. जयंत पाटील : व्यक्तिगतचे निकष कोणते आहेत ?

प्रा. सुरेश नवले : प्रश्न क्र. 5 ला दिलेल्या उत्तरात वर्धनक्षमतेचे निकष म्हटले आहे. वर्धनक्षमता ही संकल्पना काय आहे आणि तिचे निकष काय आहेत ?

श्री. नसीम खान : शासनाने मागील काळात असा निर्णय घेतला होता की, ज्या विणकर सहकारी संस्थांनी कर्ज घेतले आहे त्या संस्थांचे एमडीआर पॉझिटिव्ह आहेत तसेच नेटवर्क पॉझि ाटिव्ह असेल अशा संस्था या वर्धनक्षमतेच्या निकषात बसतात.

श्री. भाई जगताप : महोदय, संस्थांची विव्हींग कॅपेसिटी किती आहे आणि त्यासंबंधीचे निकष काय आहेत ?

श्री. नसीम खान : महोदय, विव्हींग कॅपेसिटीचा प्रश्न नसतो. हातमाग संस्था लुमच्या आधारावर काम करीत असतात.

......2

ता. प्र. क्र. 31125........

श्री. भाई जगताप : महोदय, कोणतीही मशीन असली तरी तिला कॅपेसिटी असतेच. त्यामुळे मंत्री महोदयांनी कॅपेसिटीचा प्रश्न नाही असे उत्तर दिले ते अयोग्य आहे. अशा प्रकारचे उत्तर रेकॉर्डवर राहू नये यासाठी मला सांगावयाचे आहे की, कदाचित या मशिन्स क्षमतेप्रमाणे चालत नसतीलही पण त्यांना क्षमताच नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

श्री. नसीम खान : महोदय, हातमागाची क्षमता म्हणजे एखाद्या विणकरने चार तास काम केले तर त्याची त्याप्रमाणे क्षमता असते. म्हणजेच विणकर किती काम करतो त्यावर त्याची क्षमता अवलंबून असते.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 31125** ......

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, हॅन्डलूमच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कापडाचा दर्जा अप्रतिम असतो. हॅन्डलूमचे कापड एक्सपोर्ट होण्यासाठी काही पॅकेज देण्याचा शासनाचा विचार आहे काय ? हॅन्डलूम सोसायटयांच्या संदर्भात शासनाने निश्चित धोरण आखले आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हॅन्डलूमच्या एकंदर 688 संस्था असून 567 संस्थांचे ऑडिट पूर्ण झालेले आहे व उर्वरित संस्थाचे ऑडिट सुरु आहे. हातमागावर जे कापड तयार होत असते त्याची क्वॅालिटी अप्रतिम असते त्यामुळे हे कापड एक्सपोर्ट होऊ शकते. राज्यामध्ये आजच्या घडीला जे 100 टक्के हातमाग सुरु आहेत त्यातील कापड एक्सपोर्ट होत असेल अथवा देशी बाजारात विक्री होत असेल अशा सर्वच हातमाग संस्था यामध्ये पात्र असतात.

श्री. एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने यहां पर उत्तर में लिखा है कि "याचा लाभ राज्यामधील 2 हातमाग शिखर संस्था" को भी मिलेगा. इसलिए मुझे पूछना है कि ये दो शिखर संस्थाएं कौन सी हैं ? कृपया इनका नाम बताइए.

मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्या महाराष्ट्र हैंडलूम कॅारपोरशन के सिक फंड को भी इस योजना का आर्थिक लाभ मिलेगा ? वर्तमान निकषों के हिसाब से यदि उनको इस योजना का लाभ नहीं मिल पाता है तो क्या महाराष्ट्र शासन इस विषय पर केंद्र सरकार से बात करेगी ताकि हैंडलूम कॅारपोरेशन रिव्हायवल हो सके.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यात ज्या दोन फेडरल संस्था आहेत त्यामध्ये मराठवाडा केंद्रीय विणकर सहकारी संस्था, मर्यादित नांदेड आणि महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी संस्था मर्यादित, महाटेक्स या दोन शिखर संस्थांचा समावेश आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

**ता.प्र.क्र. 29959 व 30003 एकत्रित चर्चेला घेण्याबाबत**

**उप सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 29959 व तारांकित प्रश्न क्रमांक 30003 या दोन्ही तारांकित प्रश्नांचा विषय एकच असल्यामुळे या दोन्ही प्रश्नांवर एकत्रित चर्चा करण्यात येईल.

**राज्यातील अनुदानित शाळांना मिळणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाबाबत**

**(2) *29959 श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.वसंतराव खोटरे, श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक 25586 ला दिनांक 9 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनुदानित शाळांना देण्यात येणारे वेतनेत्तर अनुदान सुरु करण्याबाबत मंत्री मंडळाच्या उपसमितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता** : (1), (2) व (3) नाही. तथापि, वेतनेतर अनुदानाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

----------

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांना वेतनेत्तर अनुदान व इमारत भाडे मिळणेबाबत**

**(6) * 30003 श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी दिनांक 22 जानेवारी, 2008 रोजी मंत्रीमंडळाची उपसमिती घटीत करण्यात आली त्या उपसमितीने 4 टक्के वेतनेतर अनुदान, 1 टक्का इमारत भाडे देण्याचे सुचविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमीत केला आहे काय,

(3) नसल्यास, उपरोक्त बाबतीत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान , श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) होय,

(2) व (3) वेतनेतर अनुदानाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

तारांकित प्रश्न क्रमांक 29959 च्या संदर्भात सुधारीत उत्तर वितरित करण्यात आलेले आहे.

.....3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या उत्तराच्या संदर्भात मला एवढीच सूचना करावयाची आहे की, वेतनेतर बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे उत्तर इतक्या वेळेस आलेले आहे की, सरकारचे नाव आता गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जाईल. अशा प्रकारचे उत्तर जगातील कोणत्याही पार्लमेंटमध्ये आलेले नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमातून मंत्री महोदया प्रा. फौजिया खान यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये जावे यासाठी सभागृहाने एकमताने ठराव करावा, अशी विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : या सभागृहाची एक वेगळी प्रतिष्ठा आहे. या सभागृहाला विचारवंतांचे सभागृह मानले जाते. हा प्रश्न आम्ही किती वेळा मांडला हे आम्ही वांरवार सांगत असतो. आम्ही हा प्रश्न सभागृहात किती वेळा उपस्थित केला हे सांगणे बरोबर वाटणार नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी सुधारित ऊत्तर सांगितल्यामुळे आम्ही सुधारित उत्तर बघितले तेव्हा सुधारित उत्तरामध्ये आम्हाला काहीच आढळून आले नाही. उत्तरामध्ये एकच "नाही" असे उत्तर देण्यात आले होते परंतु सुधारित उत्तरामध्ये अजून एकदा "नाही" अशा प्रकारच्या उत्तराची भर पडलेली आहे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न सन 2004 पासून या सभागृहात सातत्याने उपस्थित होत आहे. पुरोगामी राज्य म्हणून आपण शाहू, फुले व आंबेडकरांचे नाव घेऊन आपण राज्य चालवित आहोत. शाळांना वेतनेतर अनुदान मिळावे यासाठी संस्थाचालक महामंडळाने एक दिवस शाळा बंद ठेवून आंदोलन केले होते. एवढेच नव्हेतर 15 तारखेपासून कायमस्वरुपी शाळा बंद ठेवण्याचे आंदोलन पुकारले गेले होते. परंतु आम्ही सर्व शिक्षक आमदारांनी त्यांना विनंती केली की, मंत्रालयाला आग लागलेली असल्यामुळे शासन अडचणीत सापडलेले आहे, त्यामुळे शासनाला थोडा अवधी द्यावा लागणार आहे. ज्या दिवशी आग लागली त्या दिवशी संबंधित संस्था चालक महामंडळाबरोबर माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्य मंत्री व माननीय शिक्षण मंत्र्यांनी चर्चा केली त्या चर्चेचे स्वरुप काय आहे ? यासाठी मंत्री मंडळाची उप समिती नेमण्यात आली होती काय ? असल्यास त्या समितीने कोणत्या शिफारसी केल्या होत्या ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29959 व 30003 .....

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेतले पाहिजे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे आपण म्हटलेले आहे. त्यामुळे शासन याचा कधी विचार करणार आहे ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रिमंडळाच्या उप समितीने केलेल्या शिफारशी नुसार शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासंबंधीचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाच्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या संबंधी मी सांगू इच्छिते की, दिनांक 21 जून 2012 रोजी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय शिक्षण मंत्री यांची शिक्षक संघटनां समवेत बैठक झाली होती. या बैठकीमध्ये वेतनेतर अनुदान देणे आवश्यक आहे, अशा प्रकारची चर्चा झाली होती. ती बैठक संपवून आम्ही परत मंत्रालयात येत असताना दुर्भाग्याने मंत्रालयाला आग लागली. त्या आगीत नुकसान झाले. त्या आगीत शेवटच्या निर्णयासाठी ठेवलेली ती फाईल जळली. त्यामुळे ती फाईल रिक्रेएट करण्यात आली आहे. ती फाईल प्रक्रियेत आहे. त्यामुळे येथे सर्व प्रक्रिया पूर्ण करून विचाराधीन असे लिहिलेले आहे. याबाबत शासन सकारात्मक आहे. 4 टक्के वेतनेतर अनुदान आणि 1 टक्का इमारत भाडे पाचव्या वेतन आयोगानुसार द्यावे अशी सचिव समितीने शिफारस केली आहे. लवकरच हा विषय मंत्रिमंडळा पुढे घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता जे उत्तर दिले आहे ते मागच्या वेळी म्हणजे दिनांक 22.3.2011 रोजी देखील दिलेले आहे. ते उत्तर मी वाचून दाखविण्यास तयार आहे. त्या आधी असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात शाळा चालवायच्या असतील तर प्रत्येक शाळांना वेतनेतर अनुदान देणे आवश्यक आहे. कारण एकच शाळा असलेल्या अनेक संस्था आहेत. त्यांची स्थिती अतिशय दयनीय झालेली आहे. टेलिफोन, इलेक्ट्रीक बिल भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. त्यांच्याकडे शाईसाठी, दप्तरासाठी पैसे नाहीत. हा सर्व खर्च शिक्षकांच्या पगारातून जात आहे. आपण शिक्षकांच्या वेदना लक्षात घ्याव्यात. त्यामुळेच हे वेतन देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य सैनिक श्री.गोविंदभाई श्रॉफ यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकडे एक बैठक घेतली होती.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29959 व 30003 .....

श्री.वसंतराव खोटरे...

ते गरिबांसाठी चांगली संस्था चालवितात. "At the outset the Hon'ble Chief Minister unequivocally stated that Non-salary Grant being a committed expenditure shall have to be paid in full." यासंबंधी मागच्या वेळी म्हणजे दिनांक 22 जानेवारी 2008 रोजी माननीय शिक्षण मंत्र्यांनी जे उत्तर दिले होते ते देखील मी आपल्या निदर्शनास आणून देतो. पाचव्या वेतन आयोगानुसार 4 टक्के वेतन अनुदान, 1 टक्के इन्फ्रास्ट्रक्चर अनुदान असावे अशी उप समितीची सूचना आहे. प्रश्न एकच आहे की, हे सभागृह स्थगित होण्यापूर्वी तातडीने आपण माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या सोबत बैठक घेऊन त्या संबंधीचा निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार काय, या बाबत ठोस उत्तर द्यावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षक मतदार संघातील सन्माननीय सदस्य सर्वश्री.विक्रम काळे, कपिल पाटील,रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी हा प्रश्न लावून धरलेला आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29959....

प्रा.फौजिया खान....

त्याचबरोबर शासन देखील या प्रश्नासंबंधी सकारात्मक असल्यामुळे विभागाने हा प्रस्ताव पाठविला. परंतु मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या संबंधीचा निर्णय अंतिम टप्प्यावर आला असतांना मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये ती फाईल जळाली. आता नवीन फाईल मूव्ह करण्यात आली असून वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासन आग्रही असल्यामुळे त्या संबधीचा निर्णय लवकरच घेण्यात येईल.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "कोडग्या कोडग्या लाज नाही, कालचा गोंधळ आज नाही" या म्हणीप्रमाणे मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. त्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

(गोंधळ)

(अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**उप सभापती** : प्रथम सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे. आपण सर्व जण उभे राहून बोलणार असाल तर मी कुणालाही प्रश्न विचारण्यास परवानगी देणार नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देतांना "ती बैठक झाल्यानंतर मंत्रालयाला आग लागली" असे सांगितले. ती बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे होती, त्यामुळे ती फाईल देखील तिकडे होती. तर मग ती फाईल कशी जळाली? आपण इकडे येऊन ती फाईल त्या आगीमध्ये टाकली काय? मंत्री महोदय या ठिकाणी खोटे बोलत आहेत....

(गोंधळ)

(अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**उप सभापती** : सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नासंबंधी उत्तर देतांना स्पष्ट केले आहे की, "हा प्रश्न अनेक वेळा उपस्थित करण्यात आल्यामुळे त्यावर अंतिम निर्णय घेण्यासाठी सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक घेण्यात आली. त्या बैठकीला माननीय उप मुख्यमंत्री, माननीय शिक्षण मंत्री व आपण देखील उपस्थित होता. त्यावेळी या प्रश्नासंबंधी जवळपास निर्णय झालेला होता व पुढील प्रक्रिया करावयाची होती. परंतु त्याच दिवशी मंत्रालयाला आग लागली. मंत्री महोदय, वेतनेतर अनुदान देण्यासंबंधीचा निर्णय झाला होता आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29959....

**उप सभापती** ....
त्या फाईलवरील प्रक्रिया पूर्ण करावयाची होती. तर मग त्या फाईलवरील प्रक्रिया पूर्ण होऊन अंतिम निर्णय किती कालावधीमध्ये घेण्यात येईल?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांच्या प्रश्नासंबंधी मी खुलासा करु इच्छिते. सदरची फाईल सह्याद्री अतिथी गृह येथे होती असे मी म्हटलेले नाही. ती फाईल मंत्रालयामध्ये होती, इतर फाईलींप्रमाणे ती फाईल देखील जळाली. ती फाईल माननीय मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयामध्ये शेवटच्या सहीकरिता पाठविण्यात आली होती. माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना मी सांगू इच्छिते की, शेवटचा निर्णय एक्स्पिडाइट होण्यासाठी हे अधिवेशन संपण्यापूर्वी शिक्षक मतदार संघातील सर्व माननीय सदस्य, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्यासोबत एक बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीमध्ये चर्चा होऊन या प्रश्नाला अंतिम निर्णय देण्याचे काम करण्यात येईल.

(गोंधळ)

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तर दिले असल्यामुळे मी कुणालाही प्रश्न विचारण्यास परवानगी देत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न आपण राखून ठेवा.

**उप सभापती** : हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय खोटे बोलत आहेत.

(गोंधळ)

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी खोटे उत्तर दिले आहे, त्याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभात्याग करतात.)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील माध्यमिक शाळांतील पायाभूतपेक्षा वाढीव**
**पदांना मान्यता न मिळाल्याबद्दल**

**(3) *31312 श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 26402 ला दिनांक 02 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील माध्यमिक शाळांमधील गेल्या 10 वर्षातील पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता मिळण्याबाबतच्या मा. शिक्षण संचालकांनी दिनांक 11 फेब्रुवारी, 2010 रोजी सादर केलेल्या प्रस्तावाबाबतची आजची स्थिती काय आहे,

(2) उच्च माध्यमिक विभागाचे पायाभूतपेक्षा वाढीव पदांचे 2008-09, 2009-10 व 2010-11 चे प्रस्ताव शासनास अनुक्रमे दिनांक 30 मार्च, व 31 नोव्हेंबर, 2011 रोजी, 16 ऑक्टोबर, 2010 व 21 नोव्हेंबर, 2011 रोजी व 11 ऑक्टोबर, 2011 रोजी प्राप्त झाले असून सदर प्रस्ताव संयुक्त सचिव समिती समोर केंव्हा सादर करण्यात आले होते,

(3) संयुक्त सचिव समितीने काय निर्णय घेतला आहे,

(4) सदरचे प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समिती समोर ठेवण्यात आले होते काय,

(5) असल्यास, त्याबाबत काय निर्णय झाला आहे,

(6) 3 ते 4 वर्षे प्रस्ताव प्रलंबित न ठेवता शासन पायाभूतपेक्षा वाढीव पदांना लवकर मान्यता देण्यासंदर्भात काही सुधारणा करणार आहे काय ?

**प्रा. फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता**:(1) राज्यातील माध्यमिक शाळांमधील 1703 वाढीव पदांपैकी शिक्षक संवर्गातील 918 पदांना संयुक्त सचिव समितीने मान्यता दिली असून शिक्षकेत्तर संवर्गातील 785 पदांबाबत सुधारित आकृतीबंध लागू झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे संयुक्त सचिव समितीने कळविले आहे.

(2), (3), (4) व (5) सन 2008-09 व 2009-10 या वर्षातील प्राप्त झालेले प्रस्ताव संयुक्त सचिव समितीच्या दिनांक 5 मार्च, 2011 व दिनांक 10 मे, 2012 रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आले होते. सदरहू बैठकीत राज्यात घेण्यात आलेल्या पटपडताळणीच्या अनुषंगाने आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव सादर करण्यात यावा असे संयुक्त सचिव समितीने कळविले. त्यानुषंगाने प्रस्ताव फेरसादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. तर सन 2010-11 या वर्षातील प्राप्त झालेला प्रस्ताव पटपडताळणीच्या अनुषंगाने आढावा घेऊन त्यानुसार आवश्यक ठरणाऱ्या पदांचा प्रस्ताव फेरसादर करण्यास शिक्षण संचालकांना कळविण्यात आले आहे.

(6) वित्त विभागाच्या दिनांक 10 सप्टेंबर, 2001 च्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार वाढीव पदांना मान्यता देण्यात येते. या कार्यपध्दतीत सद्यस्थितीत बदल करण्याची आवश्यकता नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील पायाभूत पदांपेक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये जी वाढीव पदे निर्माण झाली आहेत त्या पदांना मान्यता देण्याबाबतचा हा विषय आहे.2 एप्रिल 2012 रोजी शासनाने या प्रश्नाला उत्तर दिले होते की, जे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले आहेत ते आम्ही समितीसमोर पाठविले आहेत. तसेच या बाबतीत दोन बैठका झालेल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत आणि तातडीने या पदांना मान्यता देण्याच्या संदर्भात आम्ही कार्यवाही करु.पण आता शासनाच्या वतीने मात्र सांगण्यात आले की, पुन्हा एकदा पट पडताळणीच्या अनुषंगाने आढावा मागविण्यात आला व त्याबाबतचा अहवाल आल्यानंतर आम्ही निर्णय घेऊ.मुळात माध्यमिक शाळेच्या बाबतीत सांगावयाचे तर आठ वर्षांपासूनचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. उच्च माध्यमिक शाळांचे गेल्या चार वर्षांचे प्रस्ताव देखील प्रलंबित आहेत. ही सर्व पदे अनुदानित शाळांमधील आहेत.पण आपली मान्यता मिळाल्याशिवाय शिक्षकांना मान्यता व वेतन मिळत नाही. आता मात्र शासनाकडून सांगण्यात आले की, आम्ही पट पडताळणीच्या अनुषंगाने संचालकांकडून अहवाल मागविला आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे संचालकांकडून अहवाल केव्हा मागविण्यात आला व सदरहू अहवाल प्राप्त झाला आहे काय? आपल्याकडे पट पडताळणीची माहिती उपलब्ध असल्यामुळे फक्त संचालकांच्या कार्यालयाकडून पुन्हा एकदा अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे शासनाकडे एक महिन्याच्या आत अहवाल आल्यानंतर त्याबाबतचा निर्णय घेणार काय? तसेच चार-चार, आठ-आठ वर्षे पदांना मान्यता मिळत नाही, शिक्षकांना विनावेतन काम करावे लागत आहे. कारण ते अनुदानित पदांवर काम करणारे शिक्षक आहेत. म्हणून संस्था चालक पगार देत नाहीत.यामुळे यात चार-चार, पाच-पाच वर्षांचा विलंब होत आहे.2002 पासून असेच होत आहे.शासनाकडून तीन-तीन, चार-चार वर्षाचे प्रस्ताव एकदम काढण्यात येतात. म्हणून यामध्ये सुलभता येण्यासाठी, शिक्षकांना वेळेवर मान्यता मिळण्यासाठी, वेतन मिळण्यासाठी आपण या योजनेत काही बदल करणार आहात काय? किमान त्या-त्या वर्षाचे प्रस्ताव त्याच वर्षात मंजूर होतील या दृष्टीकोनातून आपण काही सुधारणा करणार आहात काय ? तसेच शासन याबाबत विशेष उपाययोजना करणार काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, जी वाढीव पदे आहेत त्यात माध्यमिक शाळेसाठी 2001 ते 2008 पर्यंत 1703 अशी पदे निश्चित झाली आहेत. त्यात 918 शिक्षकांची पदे आणि 785 पदे शिक्षकेतर स्वरुपाची आहेत. 918 पदांसाठी संयुक्त सचिव समितीची मान्यता मिळाली आहे आणि 785 शिक्षकेतर कर्मचा-यांची मान्यता सुधारित आकृतिबंध निश्चित झाल्यानंतर देण्यात येईल. पण

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31312.......

प्रा.फौजिया खान .......

आज हा प्रस्ताव एकत्रित असून उच्चस्तरीय समितीसमोर जाणार आहे.

सभापती महोदय, या विषयाबाबत ब्रिफींग करीत असताना आम्ही आदेश दिले की, 918 शिक्षकांच्या पदांसाठी उच्चस्तरीय समितीकडे ही बाब पाठवून द्यावी. मग उच्चस्तरीय समितीची लगेच मान्यता घेऊन ही बाब मार्गी लावावी असे ठरले आहे.त्यामुळे 918 शिक्षकांची जी पदे आहेत त्यांचा प्रश्न लगेच मार्गी लागू शकेल. शिवाय 785 पदांबाबत आकृतिबंध निश्चित झाल्यानंतर निर्णय होऊ शकतो.त्यासाठी शेवटच्या टप्प्यावर उच्चस्तरीय समितीने जो अहवाल मागितला होता तसेच याबाबतचा अभ्यास करावयाचा होता तो पूर्ण झालेला आहे. आता शेवटच्या टप्प्यावर याबाबतचा निर्णय होईल. उच्चस्तरीय समितीचा निर्णय झाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर येईल. त्यानंतर ते विधान मंडळासमोर येईल.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31312.... प्रा. फौजिया खान ....

त्यानंतर तो विधिमंडळासमोर येईल. त्यानंतर मग त्याचा मार्ग खुला होईल. या 918 पदांचा मार्ग लगेच खुला होऊ शकतो. या पध्दतीचा निर्णय आज घेण्यात आलेला आहे. उच्च माध्यमिक पदांच्या बाबतीत 2001 ते 2008 पर्यंतची अशी 74 पदे आहेत. त्या बाबतीत तशाच पध्दतीची कार्यवाही करण्याचे ठरविले आहे. बाकीची जी पदे आहेत त्या बाबतीत पडताळणीच्या संदर्भात जे फाईन्डींग्स समोर आलेले आहेत त्याचा अभ्यास करुन कॅलक्युलेशन करावे लागेल. त्यात किती पदे सरप्लस आहेत, वाढीव पदे किती असणार आहेत, फंडामेंटल पदे किती असणार आहेत याचा अभ्यास करुन संचालकांचा प्रस्ताव मागविला आहे. तो प्रस्ताव लवकर पाठवावा असे संचालकांना सांगितले आहे. तो प्रस्ताव आल्यानंतर निर्णयाचा पुढचा टप्पा होईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हा शेवटचा टप्पा आहे. शेवटचा टप्पा कधीच येत नाही. शेवटच्या टप्प्यानंतर त्यांनी आणखी 4 टप्पे सांगितले. त्यांनी विधिमंडळापर्यंतचा टप्पा सांगितला. त्याची काही गरज नव्हती. यातील जी पदे अत्यंत अत्यावश्यक आहेत ती उच्चस्तरीय समितीकडे पाठविली आहेत. त्या बाबतीत निश्चित किती कालावधीत कार्यवाही पूर्ण करणार ? शिक्षकेतर संवर्गातील जी पदे आहेत, अनेक शाळांमध्ये एकाकी पदे आहेत आणि काम करण्यासाठी कर्मचारीच नाही अशी अवस्था आहे व त्या बाबतीत आकृतिबंधाचा संबंध येत नाही. ती एकाकी पदे ताबडतोब भरण्यास परवानगी देणार का ? कारण त्यासाठी उच्चस्तरीय समितीकडे जाण्याची गरज नाही. आकृतिबंध बदलल्यानंतरची गोष्ट वेगळी आहे. त्या बाबतीत आमचा काही आक्षेप नाही. त्या बाबतीत उच्चस्तरीय समितीचा रिपोर्ट ज्यावेळी येईल त्यावेळी कार्यवाही करावी पण ज्या ठिकाणी कर्मचारीच नाही, एकही शिपाई नाही, एकही क्लार्क नाही. बिल करण्यासाठी कोणीही तयार नाही त्या ठिकाणी किमान एकाकी पद देण्याच्या संदर्भात आज ताबडतोब घोषणा करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे सर्व टप्पे पूर्ण करण्याची गरज नाही. 10 सप्टेंबर, 2001 ला सर्वांचा अहवाल घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी जो शासन निर्णय घेण्यात आला त्याप्रमाणे या सर्व टप्प्यांची आवश्यकता आहे. आज त्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31312....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, 2001 पासूनच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आधीच्या उत्तरात सांगितले. 2001 नंतर आता 2012 साल आलेले आहे. म्हणजे 10 ते 11 वर्षे जर गणितासारख्या विषयाला शिक्षक नसतील तर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे मातेरेच होईल. आपण शिक्षकच देणार नसाल तर महाराष्ट्रातील मुलांना कोणत्या पध्दतीने पुढे नेणार आहोत ? उच्चस्तरीय समितीचा अहवाल येण्यास दहा वर्षे लागतात. आपण उत्तरात सांगितले की, 2001 पासूनची पदे शिल्लक आहेत. आता 12 वर्षे पूर्ण होत आहेत. 12 वर्षे शिक्षकाविना शाळा चालवावयाच्या का ? यामध्ये शिक्षकांचा प्रश्न नसून आपण मुलांचे प्रचंड नुकसान करीत आहात. विशेषकरुन गणित, सायन्स विषयाचा प्रश्न आहे. ते शिक्षक जर नसतील तर मुलांचे मातेरेच होईल. दुसरे काही होणार नाही. या बाबतीत ताबडतोब उत्तर द्यावे. शिक्षकेतर संवर्गाच्या बाबतीत ज्या ठिकाणी आकृतिबंधाचा संबंध नाही, ज्या ठिकाणी एकाकी पद आहे त्या ठिकाणी पदच ठेवावयाचे नाही असा तर अहवाल येणार नाही. ज्या ठिकाणी वाढीव पदाचा प्रश्न आहे तीच बाब उच्चस्तरीय समितीकडे जाईल पण ज्या ठिकाणी वाढीव पदाची गरज नाही ज्या ठिकाणी एकाकी पद आहे पण माणूसच नाही त्या बाबतीत आजच माननीय मंत्री महोदय निश्चित सांगणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, गणित आणि संख्याशास्त्राच्या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. तो प्रस्ताव फक्त मुंबईपुरता आहे. फक्त मुंबईपुरता प्रस्ताव सेपरेटली काढता येणार नाही. सर्व प्रस्तावांचा एकत्रित अभ्यास करुन प्रस्ताव पाठविण्याबाबत संचालकांना कळविण्यात आलेले आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. मुंबईमध्ये मुले नाहीत का ? माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आक्षेपार्ह आहे.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पटपडताळणी संपूर्ण राज्यामध्ये झालेली आहे. पटपडताळणीच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्या संदर्भात काही फाईन्डींग्ज आलेले आहेत. त्यातून काही शिक्षक सरप्लस होणार आहेत. कोर्टाने सुध्दा नवीन भरती करु नका

...3...

ता. प्र. क्र. 31312.... प्रा. फौजिया खान ...

असे आदेश दिलेले आहेत. अशा पध्दतीचे वातावरण असताना जोपर्यंत आपण सर्व अभ्यास करीत नाही तोपर्यंत त्यांवर निर्णय घ्यावयाचा नाही. त्यामुळे या बाबतीत अभ्यासपूर्ण एकत्रित प्रस्ताव येणे गरजेचे आहे. तो प्रस्ताव लवकरात लवकर येईल आणि बाकीचा जो मार्ग आहे तो सरळ केलेला आहे. जे शक्य आहे ते शिक्षकांच्या पदांच्या बाबतीत केलेले आहे

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31312.... प्रा.फौजिया खान....

व आकृतिबंधाच्या बाबतीत एक्सपिडाईट करीत आहोत. हे सर्व लवकरच होणे अपेक्षित असल्यामुळे त्या पध्दतीने संचालकांना कळविलेले आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, उच्च माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. संपूर्ण राज्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या, त्यांचे उत्तीर्ण व अनुत्तीर्णतेचे प्रमाण याबाबत मागील वर्षी वित्त विभागाने क्वेरी काढली होती. संचालकांकडून या क्वेरीची पूर्तता करण्यासाठी संपूर्ण वर्ष गेले आहे. आता पटपडताळणी बाबत मंत्री महोदयांनी शंका उपस्थित केलेली आहे. मी याबाबत संचालकांकडे चौकशी केली असता पटपडताळणीची माहिती आणखी 4-6 महिने उपलब्ध होऊ शकणार नाही असे मला उत्तर दिलेले आहे. असे असताना शासन 4-6 महिने थांबणार आहे की उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पदांना मान्यता मिळण्याचा विषय उच्चस्तरीय समितीसमोर नेणार आहे ?

प्रा.फौजिया खान : उच्चस्तरीय समितीसमोर हा विषय शासन ताबडतोब घेऊन जाणार आहे. 2001-2008 पर्यंतच्या मान्यतेचा विषय लगेच घेऊन जाणार आहोत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एकूणच या शिक्षण व्यवस्थेतील जी निरंतर प्रक्रिया आहे, दरवर्षी नवीन मुले शाळेत येत असतात. शालेय अभ्यासक्रम पुढे न्यावयाचा असेल आणि या सर्व विद्यार्थ्यांना या सोयी उपलब्ध करुन द्यावयाच्या असतील तर एकेका विषयासाठी शासन 5-6 वर्षे थांबणार असेल तर अशा उच्चस्तरीय समित्या स्थापन करण्याचा शासनाचा उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे याचे थोडेसे विकेंद्रीकरण करणे शक्य आहे काय ? काही डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स आपल्या खात्याकडून दिली जातील काय त्या योगे खालच्या पातळीवर निर्णय घेण्याची क्षमता वाढीला लागेल. त्यांनी निर्णय घेतल्यानंतर मंत्री स्तरावर मान्यतेसाठी यावे. आकृतिबंध, पटपडताळणीचे जे निष्कर्ष समोर आलेले आहेत त्यावर निर्णय घेण्यासाठी 4-6 वर्षांचा कालावधी लागत असेल तर त्यात आणखी एका वर्षाची भर पडत असते. अशा परिस्थितीत त्या विद्यार्थ्यांनी काय करावयाचे ? त्याऐवजी त्या त्या स्तरावर गाईड लाईन्स तयार करुन तो विषय कोष्टकात बसवून त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार विकेंद्रीत केले तर ही प्रक्रिया लवकर पूर्ण होऊ शकते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.हेमंत टकले...

उच्चस्तरीय समित्यांचे अहवाल विचारात घेण्यासाठी 8-10 वर्षे थांबण्यापेक्षा ही प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी काही सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. त्याबाबतीत शासन विचार करील काय ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. शालेय शिक्षण विभागाला आणखी मजबूत करण्यासाठी व त्यात बदल करण्यासाठी विभागात विचार सुरु आहे. त्याप्रमाणे प्रत्येक टप्प्यावर सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यासाठी विचार चालू आहे.

**उप सभापती** : उच्चस्तरीय समित्यांमध्ये सर्व शासकीय अधिकारी असतात. या समित्यांमध्ये शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्यांचा समावेश का केला जात नाही ? या क्षेत्रातील ही अनुभव संपन्न माणसे आहेत. ही तज्ज्ञ माणसे शासनाला निश्चितपणे मार्गदर्शन करु शकतील. अशा प्रश्नांमध्ये 12-12, 14-14 वर्षांचा प्रशासकीय विलंब होत असल्याचे दिसून येत आहे तो थांबेल. या सभागृहात शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातून निवडून आलेले सन्माननीय सदस्य आहेत. त्यांचा शासन उपयोग का करुन घेत नाही ? अशा उच्चस्तरीय समित्यांमध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचा समावेश केला जावा असे मी मंत्री महोदयांना सूचित करीत आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, पटपडताळणीमध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी व कोल्हापूर हे तिन्ही जिल्हे राज्यात आदर्श जिल्हे म्हणून समोर आलेले आहेत. शासनाने सरसकट शिक्षक भरती बंद केलेली आहे. कोकणामध्ये ज्या चांगल्या शिक्षण संस्था आहेत त्यांनी काय करावयाचे, यामध्ये त्यांचा काय दोष आहे ? शिक्षकांच्या सर्व संघटनांमध्ये अशी भीती निर्माण झालेली आहे की, पटपडताळणीमध्ये जे अतिरिक्त शिक्षक ठरले आहेत त्यांना कोकणात पाठविले जाईल. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना दुसरीकडे पाठविण्याचे शासनाचे धोरण ठरले आहे काय ? कोकणातील शाळांनी राज्यातील इतर शाळांसमोर आदर्श ठेवलेला आहे त्या शाळांना शिक्षक भरती बंदीतून सूट मिळेल काय, शिक्षण विभागातील अधिकारी विद्वान आहेत. ते अधिकारी काही संस्थांना त्रास देत असतात.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:40

ता.प्र.क्र. 31312.. श्री. राजन तेली...

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील घाटगे प्रायमरी शाळेचा गेल्या 4 वर्षापासून 100 टक्के निकाल लागत असून त्या शाळेतील शिक्षकांना गेल्या 38 महिन्यापासून पगार मिळालेला नाही. त्या शाळेच्या विरुध्द खोटी कागदपत्रे तयार करुन शिक्षण खात्यातील अधिका-यांनी घोळ केलेला आहे. या संदर्भात उप संचालककाकडे सुनावणी झाली असून अजून त्याबाबतीत निर्णय दिलेला नाही. तेव्हा अशा प्रकारे अडवणूक करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. वसंतराव खोटरे : उप सभापती महोदय, आपण माननीय राज्य मंत्री महोदयांना दिलेल्या निदेशासंबंधी त्यांनी उत्तर दिलेले नाही.

प्रा. फौजिया खान : उप सभापती महोदय, या संदर्भात ठोस काय करता येईल या बाबतीत मी आपल्याशी चर्चा करीन.

श्री. भाई जगताप : माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशासंबंधी काय चर्चा करणार ?

प्रा. फौजिया खान : उप सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशांचा मी सन्मान करते. आपण कोणत्या समितीच्या संदर्भात निदेश दिलेले आहेत त्याबाबतीत मी आपणाशी चर्चा करीन. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या जिल्ह्यातील पट पडताळणीचे निकाल अतिशय चांगले आहेत. त्या जिल्ह्यांमध्ये आदर्श शिक्षण व्यवस्था चालू असल्यामुळे ते जिल्हे अभिनंदनास पात्र आहेत. पट पडताळणी अहवालावर निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने केलेल्या शिफारशींची शंभर टक्के अंमलबजावणी करावी असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. राज्यभरातील सरप्लस शिक्षकांचे समायोजन करावे असा निर्णय घेण्यात आलेला आहे. शिक्षकांना डिसमिस करु नये आणि संस्थाचालकांवर गुन्हे दाखल करु नयेत यासंबंधी रिट दाखल करण्यात आले होते. त्यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे भरती थांबविलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

----

...2...

**पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेतील आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्याची केलेली मागणी**

**(४) * ३०७८६ श्री.अनिल भोसले , श्री.दीपकराव साळुंखे :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत गत् काही वर्षापासून आर्थिक अनियमिततेची नि:पक्षपातीपणे चौकशी करता यावी याबाबत विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक करण्याची मागणी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ मे, २०१२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (१) होय,

(२) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

(३) चौकशी चालू आहे.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था 1917 मध्ये स्थापन झाली. राज्यातील अतिशय महत्वाची अशी ही संस्था आहे. या संस्थेला व्याकरण आणि संस्कृतसाठी युरोपियन कमिशनकडून अनुदान प्राप्त झालेले आहे. केन्द्र शासनाने देखील 5 कोटीचे अनुदान दिलेले आहे. या संस्थेच्या बाबतीत चौकशी चालू आहे असे छापील उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. ही एक अतिशय चांगल्या प्रकारची संस्था असून त्या संस्थेचा दर्जा चांगला रहावा यासाठी या संस्थेची सखोल चौकशी करण्यात येईल काय ? या संस्थेचे 2 हजार सभासद असून त्यापैकी काहींचे वयोमान अधिक झालेले आहे तर काही सभासद मृत्यू पावलेले आहेत. या गोष्टी विचारात घेऊन या संस्थेचे सभासद वाढविण्याकरिता त्या संस्थेला किंवा धर्मादाय आयुक्तांना सूचना करण्यात येतील काय ? तसेच राज्यामध्ये चांगल्या प्रकारे काम करणा-या व्यक्तींना या संस्थेचे सभासद म्हणून नेमण्यात येतील काय ?

श्री. राजेश टोपे : विधानसभेतील एका सन्माननीय सभासदांच्या तक्रारीच्या अनुषंगाने राज्य शासनाने एक समिती नेमण्याबाबत संचालकांना सूचना केली होती. त्यानुसार त्या संस्थेची चौकशी झाली. चौकशीचा डिटेल रिपोर्ट आलेला नाही, परंतु प्राथमिक रिपोर्ट आलेला आहे.

...नंतर श्री. अजित...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30786....

श्री.राजेश टोपे ....

त्या रिपोर्टमध्ये फार मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे दिसत नाही. शासनाकडे जो रिपोर्ट येईल त्यावरुन जरुर उचित ती कार्यवाही केली जाईल.

सन्माननीय सदस्यांनी सभासद वाढविण्याच्या संदर्भातील प्रश्न मांडला. त्याबाबत सांगू इच्छितो की, बाय-लॉजप्रमाणे सभासद वाढविण्यासाठी आजीव सभासदांची शिफारस लागते. तसेच जनरल बॉडीची मान्यता घ्यावी लागते. त्यानंतर धर्मादाय आयुक्तांची मान्यता घेऊन सभासदांची वाढ केली जाते. बाय-लॉजप्रमाणे या संस्थेत राज्य शासनाचे पाच प्रतिनिधी असतात. शासनामार्फत दोन प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आलेली आहे. उर्वरित तीन प्रतिनिधींची नियुक्ती एक महिन्याच्या आत करण्यात येईल.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, या संस्थेवर विधानपरिषदेचे काही प्रतिनिधी पाठविणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था ही संशोधन करणारी संस्था आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भातील ज्ञान जरुर मिळवावे जेणेकरुन या संस्थेवर त्यांना पाठविण्याची शासनाला संधी मिळू शकेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विधानसभा आणि विधानपरिषदेचे सदस्य या संस्थेवर पाठविण्या पुरता हा प्रश्न मर्यादित नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,या संस्थेमध्ये काही आर्थिक गैरव्यवहार झाले म्हणून समिती नेमण्यात आली. सकृतदर्शनी समितीने केलेल्या चौकशीमध्ये कोणत्या स्वरुपाची माहिती आढळून आली ? दिनांक 2 मे रोजी लोकप्रतिनिधींनी मंत्री महोदयांकडे चौकशीची मागणी केल्यानंतर संचालक, उच्च शिक्षण यांना चौकशी करण्याचे आदेश केव्हा दिले, समितीचा अहवाल केव्हा प्राप्त होणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दिनांक 14 जुलै रोजी समिती नेमण्यात आली. त्या समितीचा प्राथमिक रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. शासनाकडे लेखी रिपोर्ट येणार आहे. या संदर्भात मी चर्चा केली आहे. या संस्थेमध्ये गंभीर स्वरुपाचा गैरप्रकार झाल्याचे दिसत नाही. परंतु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30786....

श्री.राजेश टोपे ....

समितीचा जो काही अहवाल येईल त्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. गरज पडल्यास शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या वतीने धर्मादाय आयुक्तांकडे या बाबतच्या सूचना करण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यात भांडारकर प्राच्यविद्या संशोधन करणाऱ्या संस्थांसारख्या नावाजलेल्या आणि गेली कित्येक दशके कार्यरत असलेल्या संस्था मुळातच खूप कमी आहेत. या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्ये जे काही संशोधनाचे काम चालते, ते काम अतिशय महत्वाचे आहे. आपला इतिहास पुन्हा एकदा तपासून त्यामध्ये योग्य प्रकारे संशोधन होण्याची आवश्यकता आहे. अशा संस्था चांगल्या रिताने चालल्या नाहीत तर अभ्यासकांचे पुढील सर्व मार्ग बंद होतात. या संस्थेस 60-70 वर्षे झालेली आहेत. या संस्थेने आंतरराष्ट्रीय पातळीवर दबदबा निर्माण केलेला आहे. ही संस्था धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली आहे. या संस्थेस शासनाकडून अनुदान देण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी सांगितल्याप्रमाणें त्या संस्थेमध्ये वर्षानुवर्षे तेच सभासद असतील आणि नवीन सभासद होण्यास बंदी घातलेली असेल तर संशोधनाचा विषय कुठेतरी थांबेल आणि त्या संस्थेमध्ये संशोधन न होता ती इतिहास जमा होईल. ही संस्था सुरु राहिली पाहिजे. त्या संस्थेमध्ये चांगले संशोधन होण्यासाठी आर्थिक निधीची चणचण न भासता,

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.अजित 11:50

ता.प्र.क्र.30786....

श्री.हेमंत टकले...

असे प्राथमिक उद्दिष्ठ ठेऊन यामध्ये नियामक मंडळावर असेल, कार्यकारी मंडळावर असेल, वेगवेगळे विद्वान येऊ इच्छितात, माझ्या दृष्टीने वयाची अट महत्वाची नाही. अत्यंत ज्येष्ठ वयामध्ये सुध्दा संशोधन करणारे फार मोठे प्राध्यापक किंवा इतर मंडळी या संस्थेमध्ये सहभागी होऊ इच्छितात. पण आज त्या ठिकाणी प्रवेश बंदी सारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचा कारभार त्यावेळच्या नियमानुसार चालतो आहे, त्यात काय बदल करावयास हवेत, या बाबतीत राज्य शासनाने मध्यस्थी करुन या संस्थेचा दर्जा अधिक उंच होईल, लोकशाही प्रक्रियेच्या माध्यमातून या संस्थेचे काम अधिक गतीमान करता येईल याकडे लक्ष देण्याची खूपच आवश्यकता आहे. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, या विषयाच्या बाबतीत आपल्या दालनामध्ये एक बैठक आयोजित करावी. कोणकोणत्या प्रकारचे संशोधन होणार आहे, त्या बाबतीत आराखडा तयार करावा. तसेच नियोजनाचा कार्यक्रम द्यावा अशा पध्दतीने या विषयाकडे बघणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. जे नियामक मंडळ आहे ते खऱ्या अर्थाने पॉलिसी मेकींगचे तसेच फायन्शीयल मेकींगचे काम करीत असते. या सगळया सदस्यांबरोबर जरुर बैठक घेतली जाईल. या संस्थेतील कामकाजाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाकडून जी काही मदत करण्याची आवश्यकता असेल, ती मदत त्यांना निश्चित प्रकारे करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरात थोडीशी विसंगती आहे म्हणून मी प्रश्न रुपाने निदर्शनास आणून देऊ इच्छितो. पुण्यातील भांडारकर प्राच्चविद्या संस्थेत झालेल्या आर्थिक अनियमितते बद्दलचा मूळ प्रश्न आहे. प्राथमिक अहवाल अनियमितता नाही असे सांगतो. माननीय मंत्री महोदय असे म्हणता आहेत की, पूर्ण अहवाल आल्यानंतर आम्ही कार्यवाही करु. या संस्थेतील आर्थिक अनियमितते बाबतच्या तक्रारी कोणी केल्या आहेत, त्या तक्रारी सदरहू संस्थेला छळण्यासाठी केल्या होत्या काय, त्या तक्रारी छळण्यासाठी केल्या असतील तर शासनाने संस्थेला संरक्षण दिले पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी अगोदर उत्तर दिले आहे की, प्राथमिक अहवालानुसार सदर संस्थेत कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. पुन्हा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30786.... श्री.कपिल पाटील....

माननीय मंत्री महोदयांकडून असेही सांगण्यात आले की, त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करु. माननीय मंत्री महोदयांनी पुढे दिलेले उत्तर दुरुस्त करावे अशी माझी विनंती आहे. या संस्थेस छळणारी माणसे कोण आहेत त्या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी द्यावी, अशीही या निमित्ताने माझी विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय अभ्यासू सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, "कार्यवाही करु" असे मी म्हटलेले नाही. मी असे म्हणालो की, प्राथमिक अहवाल असे सांगतो की, त्या संस्थेत फार मोठी अनियमितता झालेली नाही. या बाबतीत आठ मुद्दे मला प्राप्त झाले आहेत, त्यात अनियमितता दिसून आलेली नाही. परंतु या संदर्भातील अंतिम अहवाल आल्यानंतर त्यात काही दोष असतील तर त्या बाबतची चौकशी करण्यात येईल. या संदर्भात कार्यवाही करण्याचा अधिकार शासनास नाही.( अडथळा ) विधानसभेच्या सदस्या श्रीमती मिसाळ यांनी एक पत्र राज्य शासनास दिलेले आहे. त्या पत्रात आठ मुद्दे नमूद करण्यात आले आहेत. त्या मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली आहे. या संदर्भात लेखी अहवाल यावयाचा आहे. तोंडी जो अहवाल आलेला आहे, त्या अनुषंगाने मी या ठिकाणी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.अजित 11:50

**अमरावती मधील संत गाडगेबाबा विद्यापीठ येथील पदव्युत्तर शैक्षणिक विभागासाठी आवश्यक शिक्षकेत्तर पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(५) * ३०७४०  डॉ.रणजित पाटील , श्री.नागो पुंडलिक गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती मधील संत गाडगेबाबा अकृषी विद्यापीठ येथील पदव्युत्तर शैक्षणिक विभागासाठी आवश्यक शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव कुलसचिव, गाडगेबाबा विद्यापीठ यांनी दिनांक २ जुलै, २०११ व दिनांक ६ सप्टेंबर, २०११ रोजी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याकडे पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर किती पदे मंजूर करुन भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विंलबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे** : (१) होय.

(२) व (३) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांचा आढावा सन २००९ मध्ये घेण्यात आला असून सदर विद्यापीठासाठी दिनांक ०५.०९.२००९ च्या शासन निर्णयान्वये गट-अ-३३, गट-क-२९, गट-क-२६० व गट-ड-१५२ अशी एकूण ४७४ पदे मंजूर करण्यात आली आहेत, तथापि, सदर विद्यापीठामध्ये एकूण ५०२ पदे कार्यान्वित असल्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या २८ पदांसाठी भूतसंवर्ग / (Supernumary) मंजूर करण्यात आलेला आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, अमरावतीमधील विद्यापीठ येथील पदव्युत्तर शैक्षणिक विभागासाठी आवश्यक शिक्षकेत्तर पदे मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबतचा प्रश्न विचारण्यात आला आहे. परंतु उत्तरामध्ये प्रशासकीय शिक्षकेत्तर पदा संदर्भातील आलेले आहे. मला या बाबतीत उप प्रश्न विचारावयाचा होता. त्यामुळे त्या बाबतीत मी प्रश्न विचारु इच्छितो. शासन निर्णय २००९ अन्वये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात शिक्षकेत्तर पदांकरिता आकृतीबंध निश्चित करुन त्या बाबतीत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात आली. पदव्युत्तर शैक्षणिक विभागाकरिता शिक्षकेत्तर पदांची मंजुरी मागितली होती, त्यासाठीचा प्रस्ताव संबंधित विद्यापीठाकडून शासनास प्राप्त झालेला आहे. सदर १४७ पदांसाठी शासन मंजुरी देणार काय, ती मंजुरी किती

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कालावधीत देण्यात येणार आहे ?. विद्यापीठाच्या प्रशासकीय विभागाकरिता शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध घालून दिलेला आहे. हा आकृतीबंध विद्यार्थी संख्येच्या आधारावर निश्चित करतो. विद्यापीठाच्या सूत्रांकडून अनावधानाने ही चूक झालेली आहे. त्यांनी प्रवेशीत विद्यार्थी संख्या २००९-१० या वर्षाची दिली होती. ती प्रवेशीत संख्या केवळ हिवाळी संख्येसाठी दिली होती. शैक्षणिक सत्रासाठी प्रवेशीत विद्यार्थी संख्या यांच्यामध्ये खूप मोठी तफावत आहे. हिवाळी सत्रासाठी १ लाख ८२ हजार विद्यार्थी संख्या त्यांनी दिली होती.

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, पुरवठादाराने निविदा नाकारली त्याची कारणे आहेत ? उत्तरामध्ये माहिती देण्यात आली आहे की, "मे. पद्मावती पॉलिमर, बार्शी, जि.सोलापूर यांनी विहित मुदतीत पुरवठा करण्यास असमर्थता दर्शवल्याने कोल्हापूर, सोलापूर व पुणे येथील पुरवठादारांकडून दरपत्रके व नमुने मागविण्यात आले व तातडीची बाब म्हणून श्रीराम प्लॅस्टिक, पुणे यांचा दर सर्वात कमी असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्यात आला."

सभापती महोदय, यासंदर्भात कोणकोणते दर होते, सर्वात निम्न दर कोणाचा होता व सर्वात उच्च दर कोणाचा होता ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, महाराष्ट्र लघु मंडळाला सप्लाय करण्याबाबत प्रस्ताव देण्यात आला होता व त्यांनी त्यांच्या सप्लायरला सूचना केली होती परंतु त्यांच्या सप्लायरने असे सांगितले होते की, सप्लाय करण्यासाठी दीड, दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे मी लवकरात लवकर सप्लाय करु शकणार नाही. रोपे लावण्याचा कार्यक्रम हा जानेवारी महिन्यात सुरु केला जात असतो. सप्लाय होऊ शकत नसल्यामुळे आपण ताबडतोबीने 4 सप्लायरकडून कोटेशन व रेट मागवले होते. यामध्ये विशाल प्लॅस्टिक कोल्हापूर याचा दर 100.80 रुपयांचा होता तर श्रीराम प्लॅस्टिकचा दर 100 रुपये होता त्यामुळे आपण कमी दर असलेल्या श्रीराम प्लॅस्टिक यांना ऑर्डर देऊन प्लॅस्टिकच्या पिशव्यांची खरेदी करण्यात आलेली आहे.

**उप सभापती** :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा**

**उप सभापती** : आता औचित्याचा एक मुद्दा घेण्यात येईल.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

पुणे माथाडी मंडळाचा कारभार कामगाराभिमुख व्हावा, माथाडी मंडळात कामगार व मालक प्रतिनिधींची नियुक्ती तत्काळ करावी, राज्य सल्लागार मंडळाच्या बैठका नियमित व्हाव्यात या व इतर मागण्यांकरिता कालपासून गुलटेकडी, मार्केटयार्ड येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरु झाले आहे. हमाल, माथाडी यांच्या मागण्या मान्य न केल्यास गुरुवार दि. 19 जुलै, 2012 पासून धान्य, भाजीपाला, फळे व इतर बाजार बंद करण्यात येतील असाही इशारा कामगारांच्या नेत्यांकडून देण्यात आलेला आहे. पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी मंडळाच्या कारभाराबाबत अनेक तक्रारी आहेत. तेथील संगणक यंत्रणा सदोष असून तत्काळ निर्दोष संगणक प्रणाली सुरु करावी, नवीन मंडळाची नियुक्ती अजूनही झालेली नाही. तरी नवीन मंडळ तत्काळ नियुक्त करावे तोपर्यंत प्रशासकांनाही अधिकार प्रदान करण्यात यावे, अशा अनेक मागण्या आहेत. शासनाने त्वरित पावले उचलली नाहीत परवा पासून पुण्यातील नागरिकांना वेठीस धरले जाईल त्यामुळे या महत्वाच्या विषयावर मी औचित्याच्या मुद्यामार्फत शासनाचे लक्ष वेधत आहे.

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, पुण्याच्या माथाडी कामगारांनी मला दोन दिवसापूर्वी त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात बाजार बंद करण्याबाबत निवेदन दिले होते. माथाडी संघटनेचे अध्यक्ष श्री. बाबा आढावा यांना मी कालच पत्र दिलेले असून त्यामध्ये माथाडी कामगारांच्या मागण्या दोन आठवडयात कोणत्याही परिस्थिती मार्गी लावल्या जातील असाही उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यांच्या दोन मागण्या आम्ही लागलीच मार्गी लावलेल्या असून त्यांनी आपला संप मागे घ्यावा अशी त्यांना विनंती करण्यात आलेली आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

**पृ.शी./मु.शी.:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री. रणजित कांबळे (पाणी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक 31 मार्च, 2009 रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पस्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.:नियम 93 अन्वये सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो गाणार यांनी "उल्हासनगर शहरात सातत्याने जुन्या इमारती कोसळण्याचे प्रकार सुरु असून जीवितहानी होत असल्याने अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी कायदा मंजूर करावा" या विषया बाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील आजिवली गावातील गोदामात मूग डाळ, तूरडाळ व मसूर डाळ यांचा अवैध साठा मुंबई येथील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त करणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य कपिल पाटील यांनी "बालभारती पुस्तकांची छपाई आणि वितरण शाळा सुरु होवून एक महिना उलटूनही पूर्ण झालेले नसल्याने विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य पांडुरंग फुंडकर यांनी "महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत सी.आर.कन्स्ट्रक्शनने निकृष्ट दर्जाचे काम करुनही पूर्ण रकमेचे देयक त्यांना अदा करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, श्रीमती शोभा फडणवीस यांनी "राज्यातील मालवाहतूकदार संघटनेने पुकारलेला बंद" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.रामनाथ मोते यांनी "दिनांक 15 जुलै 2012 रोजी मुलुंड येथील शंकर टेकडी परिसरात बिबट्याने सात वर्षीय मुलीचा घेतलेला बळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार यांनी "राज्यातील कायम शब्द काढलेल्या 2374 माध्यमिक व 1900 प्राथमिक शाळांचे मूल्यांकन होऊनही निकषपात्र शाळांची यादी घोषित न केल्यामुळे हजारो शिक्षक आज दिनांक 17.7.2012 रोजी आझाद मैदान, मुंबई येथे उपस्थित राहणार असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : अकोट 84 खेडी पाणी पुरवठा योजना याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया,परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रणजीत कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, अकोट 84 खेडी पाणी पुरवठायोजना अकोला जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या भागातील ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. ही योजना दुष्काळग्रस्त, पाणी टंचाईग्रस्त भागातील आहे, खारपाणपट्टयातील आहे. लेखी उत्तरामध्ये शासनाने संपूर्ण माहिती दिलेली आहे. सदर योजनेतील काही भाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत चालविण्यात येत आहे, तर काही भाग जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतीच्या मार्फत राबविण्यात येत आहे. मागील चार महिन्या पासून सदर योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यासंबंधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रयत्न करीत आहे. आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने सदर योजना अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे. ही योजना दुष्काळग्रस्त भागातील आहे. त्यामुळे सदर योजना पूर्वी प्रमाणे चालविण्यात येत होती तशीच ती यापुढे देखील चालविण्यात येणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सदर योजना सन 2008 पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चालवित आहे. मी एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या योजनेचे रिकव्हरीचे प्रमाण अल्प आहे. आम्ही फक्त पपिंग आणि फिल्टरेशन करतो. एमबीआर पर्यंत पाणी देतो. एमबीआर पासून पाणी वितरणाचे काम ग्राम पंचायत करते. तसेच वसुली देखील ग्रामपंचायत करते. सन 2008-2009 मध्ये रिकव्हरीचे प्रमाण 2 टक्के, 7 टक्के, 6 टक्के व 5 टक्के होते. रिकव्हरी कमी असल्यामुळे उर्वरित पैसे देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. आम्ही जिल्हा परिषदेला स्पष्टपणे सांगितले आहे की, आता पर्यंत जो जादा निधी होता त्यामध्ये ही योजना चालविली होती. योजना चालविण्यासाठी किमान पैसे लागतात ते दिले तर आम्ही योजना चालविण्यास तयार आहोत असे जिल्हा परिषदेला आम्ही सांगितले आहे. जिल्हा परिषद किमान पैसे देत नसेल तर ती योजना आम्हाला बंद करावी लागेल. येथे 2 ते 5 टक्के रिकव्हरी आहे. जो पर्यंत टंचाई आहे तो पर्यंत आम्ही ही योजना चालविणार आहोत. त्यानंतर जिल्हा परिषदेने योजना चालविण्यासाठी किमान पैसे दिले तर ती आम्ही चालवू. त्यांनी तसे केले नाही तर मग आम्ही ही योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरित करू. ती त्यांनी घेतली तर ठीक आहे, नाही तर मग ती योजना आम्हाला बंद करावी लागेल.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला न्याय मिळालेला नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, निवेदनावर एकच उप प्रश्न विचारावयाचा असतो. आपण जे सांगाल तेच उत्तर मंत्रिमहोदयांकडून आपणास कसे काय मिळू शकेल ? आपल्या प्रश्नावर माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. आता मी माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना प्रश्न विचारण्यास अनुमती देत आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी पाणी पट्टी रिकव्हरीचे प्रमाण फार कमी असून ती वसूल होत नाही ही गोष्ट खरी आहे. त्या ठिकाणी संपूर्ण खारपाणपट्टा असून त्या भागाचे मी प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे लोकसभेमध्ये तीन वेळा हा प्रश्न उपस्थित केला होता. 84 गावांकरिता 100 कोटींची करण्यात आलेली योजना आपण चालविली नाही तर ती बंद होईल. आजच्या दुष्काळी परिस्थितीत त्या भागातील लोकांना एक दिवसा आड पाणी मिळत आहे. त्यामुळे जर प्राधिकरणाने ही योजना चालविली नाही तर ती बंद होणार आहे. आम्ही ती योजना चालविण्यास तयार नाही अशाप्रकारचा ठराव जिल्हा परिषदेने संमत केला आहे. ही योजना जिल्हा परिषद चालविणार नाही, प्राधिकरण देखील चालविणार नसेल तर 84 गावातील लोकांसाठी ही योजना कोण चालविणार आहे? या वर्षीची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्राधिकरणाने "जैसे थे" स्थितीत ही योजना चालवावी अशी माझी शासनाला विनंती आहे. सभागृहामध्ये माननीय कॅबिनेट मंत्री उपस्थित असल्यामुळे त्यांनी या बाबत आम्हाला आश्वासित करावे. या योजनेचा दरवर्षीचा खर्च तीन ते चार कोटी रुपये इतका असून त्यापैकी जिल्हा परिषद अडीच कोटी रुपये देते. जेवढी शक्य असेल तेवढी रक्कम जिल्हा परिषद देण्यास तयार आहे उर्वरित खर्च प्राधिकरणाने करुन दुष्काळी परिस्थितीत 84 गावांमधील जनतेला पाणी देण्याबाबत शासन विचार करणार काय?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, या योजनेवर 83 कोटी रुपये खर्च करुन 84 गावांना पाणी मिळवून देण्याची व्यवस्था शासनाकडून करण्यात आली. ही व्यवस्था झाल्यानंतर त्या गावांमधून पाणी पट्टी भरली जात नाही. जिल्हा परिषदेने 73 व्या घटना दुरुस्तीनुसार जबाबदारी स्वीकारुन ठराव संमत केला परंतु त्या प्रमाणे ते वागत नाहीत. अशा परिस्थितीत ही योजना चालवावी की काय करावे अशा प्रकारचा वाद आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तीन महिन्यामध्ये या सर्व गावांमधून मोठया प्रमाणात वर्गणी वसूल करु त्या करिता आपण आम्हाला तीन महिन्यांची संधी द्यावी अशी विनंती केली आहे.आजच्या दुष्काळी परिस्थितीचा, टंचाईसदृश परिस्थितीचा विचार करता आणि तीन महिन्यामध्ये होणाऱ्या एकूण रिकव्हरीचा विचार करता आम्ही ही योजना तीन महिने चालवू. परंतु या पुढे कंटिन्युअस परिस्थितीत दर वर्षी अडीच कोटी रुपये खर्च करुन ही योजना चालविता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये आपल्याला रिकव्हरीचा विचार करता येणार नाही. तसा विचार न करता ही योजना प्राधिकरणाने चालवावी असा आमचा आग्रह आहे. 84 गावांमधील लोकांना पिण्याच्या पाण्यापासून आपण वंचित ठेवणार काय? तो दुष्काळी भाग असून त्या परिसरामध्ये खारपाणपट्टा असून त्या ठिकाणी गोडे पाणी मिळत नाही अशा परिस्थितीत तेथील लोकांना या योजनेमधून पाणी देण्यात येईल काय?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, 84 गावांमधून लोकांनी रिकव्हरी करण्यासाठी जर आम्हाला साथ दिली तर निश्चितपणे ही योजना चालविता येईल. दुसरा प्रस्ताव असा आहे की, गावाच्या वेशीपर्यंत आम्ही बल्कली पाणी आणून दिल्यानंतर पाणी वितरण व्यवस्थेबाबत गावाने जबाबदारी घ्यावी. त्या करिता दोन क्युबिक मीटर पाणी देण्यास शासन तयार आहे.

-----

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचना क्र. 4 प्राधान्याने घेण्याबाबत

**उप सभापती** : सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये चौथ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात यावी अशी माननीय सदस्यांनी विनंती केल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिगांव प्रकल्पाच्या कामामध्ये झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार

**मु. शी.** : जिगांव प्रकल्पाच्या कामामध्ये झालेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार यासंबंधी श्री पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील सिंचनाचा अनुशेष ११ लाख हेक्टर पर्यंत वाढलेला असून अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यामध्ये सिंचनाचा अनुशेष २ लाख हेक्टरच्या दरम्यान असणे, बुलढाणा जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढण्याच्या हेतूने सन १९९० मध्ये जिगांव प्रकल्प सुरू करताना त्याची मूळ किंमत ३९४.८३ कोटी रुपये असणे, सन २००९ मध्ये ही किंमत ४०४४ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात येणे, जिगांव प्रकल्पाच्या कामाची मूळ निविदा ३९४.८३ कोटी रुपये असताना ही किंमत जाणीवपूर्वक वाढवून ती ४०४४ कोटी रुपयांपर्यंत नेण्यात येणे, जिगांव प्रकल्पाच्या निविदा ६ गटांमध्ये काढण्यात येऊन त्यासाठी केवळ ९ कंत्राटदारांनीच निविदा भरणे त्यापैकी ३ कंत्राटदार डमी असल्यामुळे केवळ सहाच कंत्राटदारांना कामे मिळणे, नियमाप्रमाणे ५ टक्क्यापेक्षा जास्त किंमतीच्या निविदा मान्यतेचा अधिकार कार्यकारी संचालकांना नसतांनाही त्यांनी स्वत:च्या अधिकाराचा वापर करुन जास्त दराने निविदा मंजूर करणे, ज्या कंत्राटदारांनी जिगांव प्रकल्पाची कामे केली आहेत त्या कामात अनेक अनियमितता असून त्यात करोडो रुपयांची भ्रष्टाचार होणे, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील जिगांव पाटबंधारे प्रकल्पाबाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे. खरे म्हणजे पाटबंधारे विभागाचे एखादे काम कमी रकमेमध्ये कंत्राटदाराला द्यावयाचे, चार-सहा महिने झाल्यानंतर कामाच्या डिझ ााईनमध्ये बदल करुन कामाची मूळ निविदा दुपटी-तिपटीने वाढवावयाची असा नवीन प्रकार पाटबंधारे विभागामध्ये सुरु झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील हा जिगांव प्रकल्प माझ्या तालुक्यातील आहे. या प्रकल्पाला 1990 साली मंजुरी देण्यात आली त्यावेळी प्रकल्पाची किंमत 396 कोटी रुपये होती. त्यानंतर सन 2006 मध्ये प्रकल्पाची सुधारित किंमत 1221 कोटी रुपये झाली. त्यानंतर सन 2010 मध्ये अवघ्या चार वर्षात प्रकल्पाची किंमत 4 हजार 44 कोटी रुपये करण्यात आली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, तिप्पटीपेक्षा किंमत वाढलेली आहे.या प्रकल्पामध्ये 12 उपसा सिंचन योजना आहेत आणि या सिंचन योजनांची पंपिंगची जी कामे आहेत त्याच्या स्टीलचे दर तिप्पट लावण्यात आले आहेत आणि ते मंजूर केले आहेत. 55 हजार रुपये मेट्रीक टन असा भाव असताना 1 लाख 65 हजार रुपये मे.टन इतका भाव लावण्यात आला आहे. पंपगृहाचे काम उर्ध्वगामी नलिका, पंपिंग मशिनरी, स्वीच यार्डचे बांधकाम, वितरण कुंड, संतुलन जलाशयाची कामे करावयाची होती. त्या साठी 263 कोटी 68 लाख रुपयांची निविदा एका कंपनीला देण्यात आली आणि मूळ निविदेमध्ये 18 टक्के वाढ झाली. त्यामुळे 311 कोटी रुपयांची निविदा 22 लाख रुपयांनी वाढली आहे. अशा प्रकारे जवळपास सहाच्यासहा उपसा सिंचन योजनांमध्ये जवळजवळ 600 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. त्यानंतर वडनेरे समिती नेमण्यात आली आणि त्यांनी सुध्दा हे मान्य करुन अहवाल दिला की, यामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. 2011 च्या तिसऱ्या महिन्यामध्ये मी माननीय मंत्री महोदयांना पत्र लिहिले आणि त्यानंतर 7-7-2012 रोजी माननीय श्री.सुनील तटकरे यांचे मला उत्तर आले आणि त्यामध्ये त्यांनी शेवटी असे म्हटले की, "उपसा सिंचन योजनेच्या उर्ध्वगामी नलिकेचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यावहन यासाठी अंदाजपत्रकीय दराच्या वाजवी पणापेक्षा शासनाने नेमलेल्या वडनेरे समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे."

सभापती महोदय, दिनांक 7-7-2012 रोजी आणि त्यापूर्वी 2011 रोजी एक पत्र लिहिले....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्न विचारावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारीत आहे. 2011 पासून 2012 पर्यंत ही चौकशी केवळ प्रस्तावित आहे.सदनामध्ये अनेक वेळा हा प्रश्न आला आहे.माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणाच्या वेळी हा विषय मांडला.यामध्ये जवळपास एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करुन सर्व मलिदा ठेकेदाराच्या घशात घालण्यात आलेला आहे. याची चौकशी वडनेरे समितीने केलेली आहे.या संबंधातील कारवाई प्रस्तावित आहे.परंतु ती दोन-दोन वर्षे प्रस्तावित रहाणार आहे काय ? त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, याबाबतीत कारवाई कधी करण्यात येणार आहे? मात्र याबाबतीत केवळ कारवाई करुन चालणार नाही तर यासंबंधात सी.बी.आय.मार्फत चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची मी येथे मागणी करतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जिगांवच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. या प्रकल्पाला फेब्रुवारी 1990 मध्ये पहिल्यांदा प्रशासकीय मान्यता देण्यात आली आणि सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही रक्कम 394 कोटी 83 लाख इतकी होती. ही प्रशासकीय मान्यता व्यपगत झाल्याने जानेवारी 1996 मध्ये 698 कोटी इतक्या रकमेला नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तद्नंतर 2005 मध्ये 1220.98 लाख रुपयांना प्रथम सुधारित मान्यता देण्यात आली. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे की, जून 2009 मध्ये दरसूचीतील वाढ, भूसंपादन व पुनर्वसनाच्या किंमती तील वाढ, धरणांच्या संकल्पनेतील बदल, उपसा सिंचन योजनेचे सविस्तर सर्वेक्षण वगैरे बाबी विचारात घेऊन प्रकल्पाला 4044 कोटी रुपयांची वित्तीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. येथे एकंदर 12 उपसा सिंचन योजना आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली ती खरी आहे. सदरहू 12 उपसा सिंचन योजनांसाठी शासनाने ठरवून दिलेल्या विहित कायद्याचा वापर करुन त्यावेळेला 2008 मध्ये हिंदुस्थान टाईम्स्, तरुण भारत, देशोन्नती, दैनिक महासागर या वर्तमानपत्रामध्ये जाहिराती देऊन खुल्या निविदा सहा गटांसाठी संबंधित विभागाच्या 2007-2008 च्या तसेच 2008-2009 च्या दरसूचीवर आधारित मागविण्यात आल्या. जेव्हा या निविदा सक्षम स्तरावर मंजूर झाल्या.त्यावेळी वाटाघाटीअंती याची अद्ययावत किंमत ही 4.97 ते 4.98 च्या आसपास या निविदा स्वीकृत झाल्या.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वाटाघाटी म्हणजे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्या स्तरावर निविदा येतात, त्या स्तरावर तेथे निगोशिएशन होत असते.

यानंतर श्री.बरवड . .. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : वाटाघाटीने 4 हजार कोटी रुपयांचे टेंडर येते का ?

श्री. सुनील तटकरे : मी सांगितले की, त्यामध्ये सहा उपगट आहेत. यामध्ये उपसा सिंचन योजना क्रमांक 1, 10, 11 आणि 12 यांची बांधकामे व इतर कामाची किंमत 263 कोटी रुपये होती. त्याला दरसूची 2008-2009 ची होती. त्याची अद्ययावत किंमत 296 कोटी रुपये झाली. एकंदरीत निविदा स्वीकृतीची रक्कम 311.26 कोटी रुपये झाली. उपसा सिंचन योजना क्र 2 ही 68 कोटी रुपयांची होती. ती योजना 80.71 कोटी रुपयांची झाली. कारण ज्यावेळी योजना केली त्यावेळी 2007-2008 ची दरसूची होती परंतु निविदा स्वीकृत करीत असताना 2008-2009 ची दरसूची असल्यामुळे 80.71 कोटी रुपये किंमत झाली. उपसा सिंचन योजना क्रमांक 3 ही योजना 31.18 कोटी रुपयांची होती. 2008-2009 च्या दरसूचीप्रमाणे स्वीकृत करीत असताना त्या योजनेची किंमत 38.48 कोटी रुपये झाली. उपसा सिंचन योजना क्रमांक 4 हा जो गट होता त्यामध्ये 4,5,6 असे असे जे गट होते ती योजना 72 कोटी रुपयांची होती. 2008-2009 च्या दरसूचीप्रमाणे त्या योजनेची किंमत 81.91 कोटी रुपये झाली. उपसा सिंचन गट क्रमांक 7 या योजनेची किंमत 86 कोटी रुपयांवरुन 97 कोटी रुपये झाली. तसेच गट क्रमांक 8 आणि 9 ची किंमत 498 कोटी रुपयांवरुन 554 कोटी रुपये झाली.

या धरणाच्या माती कामास 3.11.2008 पासून सुरुवात झालेली आहे. ही वस्तुस्थिती आहे की, यामध्ये पाईपचा जो दर धरण्यात आलेला होता तो अधिकतम होता. या पाईपच्या दरामध्ये पुरवठा आणि उभारणी या गोष्टींचा अंतर्भाव असल्यामुळे त्यांना आता जे काही पेमेंट अदा करण्यात आलेले आहे ते 77 टक्के दराऐवजी पाईप पुरवठ्यानंतर आता हा दर 82.747 रुपये प्रती मेट्रीक टन आणि प्लेट पुरविल्यानंतर 50 हजार 883 रुपये प्रती मेट्रीक टन या दराने त्यांना देयके अदा करण्यात आलेली आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या 9 कंत्राटदारांची नावे काय आहेत, जे 3 डमी कंत्राटदार आहेत ते कोण आहेत, जे कंत्राटदार त्या ठिकाणी कॉम्पिटिशनसाठी आले त्यांचे पत्ते कोठले आहेत ? सध्या हे काम कोणत्या कंपनीला दिलेले आहे आणि त्या कंपनीचे मालक कोण आहेत ? या ठिकाणी सिंचनामध्ये 16 कॉन्ट्रक्टरच वेगवेगळ्या नावाने कॉन्ट्रक्ट घेत असतात. 394

...2...

श्री. जयंत प्र. पाटील ......

कोटी रुपयांचे काम 4044 कोटी रुपयांवर जाते. यामध्ये 1 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे. ज्यांची चौकशी समिती नेमली होती त्यांनीही सांगितले की, यामध्ये भ्रष्टाचार आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यांनी या ठिकाणी ही लक्षवेधी सूचना सर्व आकडेवारीनिशी मांडलेली आहे. या ठिकाणी 5 टक्क्यापेक्षा जास्त किमतीची निविदा देण्याचा अधिकार ज्या अधिकाऱ्याला नाही त्यांची चौकशी करणार का, त्याला सस्पेंड करणार का ? जी वडनेरे समिती नेमली होती त्या समितीचा रिपोर्ट आतापर्यंत दाबण्याचे काम ज्या अधिकाऱ्यांनी केले त्यांच्यावर आतापर्यंत कोणती कारवाई झाली, जर कारवाई झाली नसेल तर शासन ती कारवाई करणार का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये निविदा भरणारे जे 9 ठेकेदार आहेत त्यामध्ये आयव्हीआरसीएल, पुणे, मे. लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरींग, कोल्हापूर, मे. दीपिका कंस्ट्रक्शन हैद्राबाद, मे. पटेल इंजिनिअरींग मुंबई, मे. बाजोरिया कंस्ट्रक्शन्स, यवतमाळ, मे. एफ.एस.फॅब्रिकेट्स नागपूर, इंडियन ज्यूट पाईप, मुंबई, महावीर अँड खरोटे जे.व्ही, जळगाव, प्रतिभा कंस्ट्रक्शन कोल्हापूर अशी नावे आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्यामध्ये निविदा स्वीकृतीचे अधिकार, अद्ययावत किमतीवर 5 टक्क्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना आहेत. 5 ते 15 टक्क्यांपर्यंतचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत. त्यामध्ये सचिव अध्यक्ष असतात तसेच इतर सदस्य, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता असतात. 15 टक्क्यापेक्षा अधिकची निविदा स्वीकृत करावयाची झाली तर शासन स्तरावर सचिव, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती असते. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर किंवा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला त्या बाबत सांगू इच्छितो की, वडनेरे समिती 22.3.2010 रोजी नियुक्त केली. त्यांनी या दराच्या वाजवीपणाच्या संदर्भात चौकशी केलेली आहे. त्यामध्ये काही नियमबाह्य तरतुदी केलेल्या आहेत ही वस्तुस्थिती त्यामध्ये लक्षात आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

त्याच्यानंतर वन अंतराची सक्षम स्तरावर तपासणी न करता किंवा प्रमाणीकरण न करता मंजुरी दिलेली आहे, अशा प्रकारचे वेगवेगळे दोष आढळून आलेले आहेत. एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट आहे की, हा अहवाल आल्यानंतर....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तरावर माझा आक्षेप आहे. एकाच मालकाच्या 16 कंपन्या आहेत. या विषयाचा मी अभ्यास केलेला आहे. या 16 ठेकेदारांची ही साखळी आहे. हजारो कोटी रुपयांच्या अधिक दराची टेंडर्स हे ठेकेदारच भरत असतात. या कामात भ्रष्टाचार झालेला आहे, गैरमार्गाने या कामांची एस्टिमेटस् वाढविल्याचे मंत्री महोदय कबूल करीत आहेत. ज्यांनी ही कामे दिलेली आहेत त्या अधिकाऱ्यांवर शासनाने गेल्या दोन वर्षात काय कारवाई केली आहे ?

श्री.सुनील तटकरे : मी मघाशी निविदाकारांची नावे वाचून दाखविलेली आहेत. निविदा भरीत असताना त्यांनी मुंबई, पुणे, कोल्हापूर, हैद्राबाद, नागपूर असे पत्ते लिहिले होते, त्याचीही माहिती मी सभागृहासमोर ठेवलेली आहे. या प्रकरणाला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्दची प्रारुप दोषारोप पत्रे मागविलेली आहेत. दिनांक 25.5.2011 रोजी या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी प्रस्तावित करण्यात आली. त्यानुसार शासनाकडे प्रारुप दोषारोप पत्रे प्राप्त झालेली आहेत. महामंडळाकडून प्राप्त झालेल्या दोषारोप पत्रामध्ये काही त्रुटी आढळून आल्या होत्या. शासनाकडून त्रुटी पूर्तता अहवाल मागविण्यात आला होता. हे अधिकारी वेगवेगळ्या पदावर काम करीत असल्यामुळे स्वतंत्र दोषारोप पत्र तयार न करता एकत्रितपणे सादर करण्याची आवश्यकता असल्याने दोषारोप पत्र तपासून सादर करण्यासाठी कळविलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती सांगितलेली आहे. या सर्व अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच येत्या महिन्याभरामध्ये या अधिकाऱ्यांविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सर्व अधिकाऱ्यांना आजच्या आज निलंबित करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. अन्यथा, ही लक्षवेधी सूचना उपस्थित करुन उपयोग होणार नाही. या कामांमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करुनही ते अधिकारी त्यांच्या पदावर आरामात काम असतील तर ते बरोबर होणार नाही. या गैरव्यवहारांची चौकशी पूर्ण झालेली आहे. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांना शासन आजच्या आज निलंबित करील काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सेवा नियमानुसार कारवाई करावी लागते. दोषारोप पत्र बजाविल्यांनतर संबंधितांकडून खुलासे प्राप्त होत असतात. एक गोष्ट नक्की आहे की, कोणत्याही अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही. या संदर्भात कठोरातील कठोर कारवाई निश्चितपणे केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केली जाईल असे मंत्री महोदयांनी आताच सांगितले आहे. परंतु विदर्भातील सिंचनाचा पैसा कंत्राटदारांच्या घरामध्ये गेला आहे. त्या पैशाच्या वसुलीसंबंधी शासनाचे धोरण काय आहे, कंत्राटदारांना अधिकचे पैसे मिळालेले आहेत. तो पैसा कोणाकडून वसूल केला जाणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : वडनेरे समितीच्या अहवालामध्ये पाईपच्या पुरवठ्यामध्ये अधिक रक्कम गृहित धरण्यात आलेली आहे असे नमूद केलेले आहे. कंत्राटदारांना सध्याच्या सरासरी किंमतीनुसार बिले अदा केली जातात. त्यामुळे अधिकची रक्कम निश्चितपणे वसूल होईलच. त्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. त्यापेक्षा अधिकच्या दराने त्यांना पैसे दिले जाणार नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वडनेरे समितीचा अहवाल आलेला आहे. त्या अहवालामध्ये या अधिकाऱ्यांना दोषी धरलेले आहे. या अहवालावर कारवाई केल्याबाबतचा अहवाल सभागृहात सादर केला जाईल काय ? तो महत्वाचा असतो. ग्रुप क्रमांक दोन चे काम यवतमाळ येथील बाजोरिया कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आल्याचे अहवालात नमूद केलेले आहे. आमच्यासमोर दोन बाजोरिया आहेत, हे दोन्ही बाजोरिया आमदार आहेत. आमदारांना कंत्राट घेता येत नाही. या दोन आमदारांचा बाजोरिया कन्स्ट्रक्शन कंपनीशी थेट संबंध आहे काय, यवतमाळ जिल्ह्यातील आमदार श्री.बाजोरिया हे त्या कंपनीचे मालक आहेत का ते आम्हाला समजले पाहिजे, ते मालक असतील तर आमदारांना काम देता येते काय ?

श्री.सुनील तटकरे : माझ्याकडे उपलब्ध असलेली माहिती मी सभागृहाला दिली आहे. बाजोरिया कन्स्ट्रक्शन कंपनीला हे काम देण्यात आलेले आहे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. सुनील तटकरे...

विधानसभा आणि विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य अशा प्रकारे ठेका घेऊ शकतात की नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. त्या बाबतीत माहिती घ्यावी लागेल. ज्यांना काम देण्यात आले त्या सर्वांची नावे मी सांगितली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारण्या केल्यानुसार सभागृहासमोर अेटीआर निश्चितपणे ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : हा गंभीर विषय आहे. सन्माननीय सदस्यांना अशा प्रकारे ठेका घेता येतो का हे माननीय मंत्री महोदयांना माहीत नाही. ते या संबंधी माहिती घेणार आहेत. ती माहिती सभागृहाला मिळेपर्यन्त ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. किरण पावसकर : या ठिकाणी बाजोरिया नावाचा उल्लेख करण्यात आला. श्री. गोपीकिशन बाजोरिया हे या सदनाचे सन्माननीय सदस्य आहेत. ते या सभागृहाचे सदस्य होण्यापूर्वी त्यांचा तो व्यवसाय असू शकेल.

श्री. विनोद तावडे : कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे अशी परिस्थिती आहे. 5 टक्के जादा दराने निविदा काढण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना आहेत. 5 ते 15 टक्के दराने जादा दराने निविदा काढण्याचे अधिकार समितीला आहेत. असे जरी असले तरी डीएसआर प्रमाणे टेंडर काढण्यात आले नाही याला कोण जबाबदार आहे ? वडनेरे समितीच्या अहवालामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे नमूद केलेले आहे. म्हणून या सहाही कंपन्यांना काळ्या यादीत टाकून त्या कंपन्यावर आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवून गुन्हे दाखल करण्यात येतील काय ?

श्री. सुनील तटकरे : निविदांमधील दर चुकीचे आहेत असे वडनेरे समितीच्या अहवालामध्ये नमूद केलेले असून त्यानुसार ठेकेदारांना बिलांची रक्कम अदा करीत असताना ती वाजवी दराने करण्याची खबरदारी घेण्यात आलेली आहे. जादा दराने पेमेंट झालेले नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसून प्रथम माननीय मंत्री महोदयांचे उत्तर शांतपणे ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये हे स्पष्ट करु इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी विचारणा केल्याप्रमाणे वडनेरे समितीच्या अहवालामध्ये ज्या विशिष्ट आयटेमच्या बाबतीत जादा दराने अंदाजपत्रकामध्ये रकमा धरलेल्या आहेत असे नमूद केलेले आहे त्याबाबतीत वाजवी दराने रकमा अदा करण्यात आल्या. त्या बाबतीत शासनाचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेतलेली आहे. वडनेरे समितीच्या अहवाला नुसार दोषी अधिका-यांवर कठोर कारवाई केली जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : यामध्ये चूक झाल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. या ठिकाणी आम्ही कशासाठी लक्षवेधी सूचना विचारायची ?

श्री. विनोद तावडे : चोराला पकडल्या नंतर त्याने मुद्देमाल परत केला तर तो गुन्हेगार ठरु शकत नाही काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकरणी कोणत्याही अधिका-याला पाठीशी घातले जाणार नाही. त्याच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच केलेल्या कारवाईचा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

...नंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उप सभापती** : आपण सर्वजण एकाचवेळी बोलत असाल तर आपण काय बोलता ते मला कसे समजेल ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी शांत बसावे. मी काय बोलतो ते आपण ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शिस्तीने वागले पाहिजे. सन्माननीय सदस्यांना मी बोलण्याची संधी देतो. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी खाली बसावे.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते वेलमध्ये येतात. )

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहेत. या प्रकरणी निश्चितपणे कारवाई केली जाईल. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या संबधीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट निश्चितपणे ठेवला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, एक हजार कोटी रुपये..

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**उप सभापती** : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे कठीण असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.38 ते दुपारी 1.00 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.गिते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधी सूचनेचे उत्तर देत असताना माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील, रामदास कदम यांना काही प्रश्न उपस्थित केले. या संदर्भात जी काही अनियमितता झाली, त्यासंदर्भातील संपूर्ण माहिती सभागृहापुढे ठेवली आहे. एवढेच नव्हे तर वडनेरे समितीचा अहवाल राज्य सरकारने स्वीकारलेला आहे व त्या बाबतीत दोषारोपपत्रे देतो आहोत. या बाबतीत अंदाजपत्रक बनविणारे अधिकारी कोण आहेत त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केली आहे. राज्य सरकारचे नुकसान होणार नाही याची पूर्णपणे खबरदारी घेत असताना ज्या वेळेला आपण केलेल्या कामाची रक्कम अदा करु, त्या वेळेला टाईपच्या किंमतीच्या संदर्भामध्ये जादा जो दर घेण्यात आलेला आहे, तो दर रेडयूस रेट करुन त्याच दराने त्यांना देयके निश्चितपणे दिली जातील. मुख्य अभियंता श्री.म.वि.पाटील, अधीक्षक अभियंता श्री.श.ग.गावंडे यांनी या बाबतची अंदाजपत्रके बनविली होती, ते सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्ती नंतर जी काही कारवाई करावयाची असते ती कारवाई त्यांचे विरुध्द केली जाईल. श्री.आर.जी.मुंदडा हे कार्यकारी अभियंता आहेत. त्यांचे विरुध्द तातडीने कारवाई केली जाईल.

श्री. रामदास कदम : कोणत्या प्रकारची कारवाई केली जाईल याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी केलेला नाही.

श्री. दिवाकर रावते : कारवाईचे स्वरुप माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे.

( गोंधळ )

श्री. सुनील तटकरे : ही बाब तपासून जे कार्यकारी अभियंता आहेत, त्यांचे बाबतीत निलंबन करण्याची कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

--------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : रस्ते अपघातांचे वाढत असलेले चिंताजनक प्रमाण

**मु. शी**. : रस्ते अपघातांचे वाढत असलेले चिंताजनक प्रमाण यासंबंधी

डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.हेमंत टकले,माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे,सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील,मोहन जोशी, अरुण गुजराथी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री दीपकराव साळुंखे,भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. राजन तेली ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास राज्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी विकास आराखड्यात दाखविण्यात आलेला ४२ कि.मी. लांबीचा रस्ता "एचसीएमटीआर" (हाय कॅपेसिटी मास ट्रॅन्झिट रूट) केवळ जागा ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेत २५ वर्षे अडकून पडल्याची धक्कादायक बाब नुकतीच निदर्शनास येणे, सदरहू मार्ग सन १९८७ च्या विकास आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेला असणे, परंतु रस्त्याची केवळ ३० ते ३५ टक्केच जागा महापालिकेच्या ताब्यात मिळविण्यात यश आलेले असणे, त्यातच १५ टक्के जागेवर अतिक्रमण झालेले असणे, रस्त्याची जागा ताब्यात घेण्यासाठी खाजगी संस्थेची मदत घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मान्य केलेला असणे, विद्यमान उपमुख्यमंत्र्यांच्या समवेत या विषयावर बैठक होवून रिंगरोड मार्गी लावण्यासाठी ज्याप्रमाणे निर्णय घेण्यात आला त्याचप्रमाणे "एचसीएमटीआर" (हाय कॅपेसिटी मास ट्रॅन्झिट रूट) च्या रस्त्याचे काम मार्गी लावण्याकरिता शासनाने व महानगरपालिका प्रशासनाने जागा ताब्यात देणाऱ्यांना काही सवलत योजना राबवण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरात वाहतुकीचा प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. हाय कॅपेसिटी मास ट्रेन्झिट रुट हा 1987 या वर्षाच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये आखला गेला होता. त्या विकास आराखडयाची मुदत संपून गेली असून त्यास जवळपास 25 वर्षे झाली आहेत. तरी या रस्त्यांच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. या रस्त्याच्या बाबतीत रेल्वेच्या एका संस्थेकडे अहवाल तयार करण्याचे काम 1990 मध्ये देण्यात आले होते. त्या संस्थेचा अहवाल नगररचना विभागाकडे येऊन जवळपास 22 वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. हा रस्ता तयार करण्याच्या बाबतीत राज्य शासनास काय अडचणी आहेत ? पुणेकरांची वाहतुकीची समस्या लवकरात लवकर सोडविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न केले नाहीत तर पुणे शहरातील लोकांमध्ये असंतोष निर्माण होईल. पुणेकरांचा कृपया शासनाने अंत पाहू नये. या ठिकाणी 60 टक्के जागा शासकीय, निम शासकीय संस्थांची आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ........... लक्षवेधी सूचना क्र. 1.........

42 किलोमीटर रस्त्यापैकी 34 किलोमीटरचा रस्ता हा पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतून जात असला तरी ही जागा संपूर्णपणे महानगर पालिकेच्या ताब्यात नाही. अशा प्रकारे वेगवेगळ्या विभागांची तोंड मिळवणी करणे हे काम करावयाचे आहे. तसेच या कामासाठी आपण हाय कॅपेसिटी मास ट्रॅझिट रुट ही प्रायव्हेट कंपनी टेंडर पध्दतीने नेमलेली आहे. या कामासाठी जी जमीन आवश्यक आहे त्या जमिनीचे संपादन करण्यासाठी दि. 31.5.2000 च्या महासभेत प्रशासकीय मान्यता दिली असून सन 2012-13 मध्ये महापालिकेने या कामासाठी 4 कोटीची तरतूद केली आहे. यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याचे कारण म्हणजे ही जागा महापालिकेच्या ताब्यात जोपर्यंत येत नाही तोपर्यंत यात अडचणी येऊ शकतात. या कार्यवाहीला गती देण्याचे काम महापालिका करीत आहे व त्यात शासन लक्ष घालत आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला की माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या स्तरावर एक महिन्यात बैठक आयोजित करावी व पुण्यातील सर्व लोक प्रतिनिधींना त्या बैठकीसाठी बोलाविणार काय, यासंदर्भात मी कालावधी तर सांगू शकणार नाही पण अशी बैठक आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल हे सांगू शकतो.

श्री. मोहन जोशी : महोदय, मी सांगितले की, खाजगी मालकांच्या जमिनी सुध्दा यामध्ये समाविष्ट आहेत. त्यांना टीडीआर देण्याचे शासनाने लेखी उत्तरात म्हटले आहे. पण या गोष्टीला 25 वर्षे पूर्ण झालेली असून अद्याप काहीच कार्यवाही नाही. या निमित्ताने मी असेही विचारले की, खाजगी जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही किती दिवसात करणार आणि डीपीआर ही बाब संपूर्णपणे शासनाच्याच अखत्यारितील असल्याने त्यासंबंधीचा निर्णय शासन किती दिवसात घेणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, ज्या खाजगी मालकांच्या जमिनी यामध्ये संपादित कराव्या लागतात त्यांना केवळ टीडीआरच नव्हे तर जास्तीचा मोबदला हवा असला तरी तो दिला जाईल. तसेच डीपीआर आपण आता जरी तयार केला नसला तरी त्याबाबत प्राथमिक अंदाज घेतलेला असून आपल्याला 8 लेनचा रस्ता करावयाचा म्हटला तर 42 किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी साधारणपणे 125 ते 150 कोटी रुपये एवढा खर्च येऊ शकतो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1........

श्री. मोहन जोशी : महोदय, तसेच जेएनएनयुआरएम मधून पाहिजे तेवढी रक्कम या कामासाठी मिळू शकेल याचा विचार करुन शासन डीपीआर किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, ही 34 किलोमीटर रस्त्यासाठी लागणारी जागा पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत येत असली तरी ती महापालिकेच्या ताब्यात नाही. ही जागा महानगर पालिकेच्या ताब्यात असती तर हस्तांतरणाची कार्यवाही तातडीने करता आली असती. पण तसे नसल्याने पहिल्यांदा ही जागा आपल्याला ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्यासाठीच ही खाजगी कंपनी आपण नेमलेली आहे. ती जागा प्राप्त झाल्यानंतर जेएनएनयुआरएम मधून सेकंड फेजच्या माध्यमातून आपल्याला हे काम करता येईल. पण येथे प्रश्न केवळ पैशाचा नसून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उर्वरित काम करता येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : महोदय, सन 1987 च्या विकास आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामासाठी सन 2011-12 च्या अर्थसंकल्पात 4 कोटीची तरतूद महापालिकेने केली आहे. ही तरतूद या कामासाठी पुरेशी वाटते काय, तसेच पुण्याच्या हद्दीतून हा रिंग रोड होणार आहे पण 25 वर्षे होऊन गेली तरी हे काम पूर्णत्वास गेले नाही. यापुढे या कामासाठी अजून किती वर्षे लागणे अपेक्षित आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हे 4 कोटी रुपये त्या संपूर्ण रस्त्याच्या कामासाठी नाही तर त्यामध्ये भूसंपादनाची कार्यवाही करावयाची असून त्यावरुन कम्यूनिकेशन जोडावयाचे आहे. त्याची जबाबदारी खाजगी मालक, वन विभाग, जलसंपदा विभाग या सर्वांची तोंड मिळवणी करुन, सर्वांना कम्युनिकेट करुन जमीन देण्यासाठी प्रोत्साहित करणे या सर्व कामासाठी या 4 कोटी रुपयांची रक्कम पुरेशी होणार आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती रिकाम्या करतांना आवश्यक पोलीस बंदोबस्त न मिळणे

**मु. शी.** : मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती रिकाम्या करतांना आवश्यक पोलीस बंदोबस्त न मिळणे यासंबंधी श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईत महानगरपालिका एम.एम.आर.डी.ए./कलेक्टर ह्या सरकारी खात्याच्या माध्यमातून मोडकळीस आलेल्या व पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती रिकाम्या करुन संबंधित अपघात व भविष्यात होणारी जीवितहानी टाळण्यासाठी कारवाई केली जाते. सदर कारवाईच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, मुंबई पोलीस आयुक्तांच्या आडमुठ्या धोरणामुळे मिळविणे कठीण झालेले असून, त्यामुळे मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारती व धोकादायक इमारतीचा पुनर्विकास थांबलेला असणे, सदर पोलीस बंदोबस्त पोलीस प्रशासनाकडून तातडीने मिळण्यास्तव शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीएच्या अखत्यारितील मोडकळीस आलेल्या इमारतीं तसेच पुनर्विकासाच्या इमारतींचे अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या इमारती रिकाम्या करण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त वेळेवर दिला जात नाही यासाठी मी सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, "निष्कासन कारवाई करतांना यापूर्वी कोणत्याही प्रकारचे नियोजन केल जात नव्हते." या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते कोणालाही पटणारे नाही. यापूर्वी मुंबई शहरातील असंख्य इमारतीं निष्कासित करुन त्या इमारतींचा पुनर्विकास करतांना पोलीस बंदोबस्त आतापर्यंत देण्यात येत होता. पण दि. 1.6.2012 रोजी मुंबई पोलीस आयुक्तांनी एक परिपत्रक काढलेले असून त्याची प्रत माझ्याकडे आहे. दि.1.6.2012 पूर्वी बंदोबस्तात अशा काही गोष्टी होत नव्हत्या काय ? उत्तरामध्ये असेही लिहिले आहे की, "खाजगी विकासक, एसआरए स्कीम राबविणारे विकासक इ. लोकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत व स्थानिक पातळीवर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याशी हात मिळवणी करुन गरीब झोपडपट्टीधारकांना त्रास देण्याच्या इराद्याने कारवाई करीत होते."

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, 70 टक्के लोक एकत्र आल्यानंतर विकासक करार करतो, पैशांची गुंतवणूक करतो, भाडे दिले जाते व राहिलेले जे 20 किंवा 30 टक्के लोक 72 तासामध्ये कोर्टामध्ये जाऊन स्टे आणतात, त्यामुळे संपूर्ण विकास थांबतो. परिपत्रकात म्हटले आहे की, "He should immediately inform the Senior P.Is, DCPs, DCP (Operations) and the Joint Commissioner (Law and Order)." आपल्याला पोलीस बंदोबस्त हवा असेल तर आपण म्हणता की, विकासक आणि पोलीस यांच्यामध्ये हित संबंध असतात. मी तर असे म्हणेन की, यासाठी हेड ऑफिसपर्यंत जाण्याची आवश्यकता आहे काय ? हेड ऑफिसपर्यंत जाऊन कोणत्या प्रकारचे हितसंबंध जपले जाणार आहेत ? हेड ऑफिसपर्यंत हितसंबंध पोहचण्यासाठी किती टक्के लोकांनी जावे ? खरे म्हणजे 80 टक्के लोकांनी करार करावयाचा आणि 20 टक्के लोकांनी हेडऑफिस पर्यंत जाऊन हितसंबंध जपण्याचे काम करायचे, त्यामध्ये 72 तास घालवायचे व 72 तास झाल्यानंतर स्टे घ्यावयाचा व त्या स्टे मुळे विकासाला खीळ बसतो.

.......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........ लक्षवेधी सूचना क्र. 2....

सभापती महोदय, एसआरए स्कीमची घरे कोणत्या जागेवर बांधली जातात ? एसआरएची घरे शासनाच्या जागेवर, झोपडपट्टी दादा झोपडपट्टी वसवतात आणि अशाच झोपडयांच्या जागेवर एसआरए योजना राबवली जाते. या झोपडपट्टया खाली करतांना बंदोबस्त मिळत नाही. परंतु ज्या सरकारी जागेवर अनाधिकृत झोपडपट्टया तयार होतात त्यासाठी स्थानिक पोलीस किंवा हेड ऑफिस मधून फतवे निघत नसतात. याचा अर्थ दादा लोकांनी झोपडपट्टया बांधल्या तर ते चांगले परंतु विकास करण्यासाठी कोणी जात असेल तर त्याला 72 तास? यासाठी आपण नेमका कोणता न्याय लावत आहात ? परिपत्रका प्रमाणे वॉर्ड ऑफिसर अनाधिकृत बांधकाम तोडू शकत नाही. अनाधिकृत बांधकाम तोडावयास जातांना पोलीस बंदोबस्ताची गरज असते. या सर्व गोष्टींमुळे विकासाला खीळ बसत आहे व दुसऱ्या बाजूने अनाधिकृत बांधकाम वाढत आहे. आपण केवळ 20 टक्के लोकांकडे लक्ष देऊन ही कारवाई थांबविण्यात आलेली आहे. ही गोष्ट एका आयुक्तांमुळेच होते आहे काय ? आयुक्तांमुळे होत असेल तर त्यांना सांगितले पाहिजे की, It is the doubtful integrity of the IAS Officer जर तुम्हाला बीएमसीच्या अधिकाऱ्यांनी किंवा कलेक्टरांनी सांगितल्यानंतर बंदोबस्त दिला जात नसेल व त्यासाठी जॉईंट कमिशनर व हेड ऑफिस पर्यंत जाणार असाल तर अशा प्रकारे एका आयुक्ताने दिलेल्या पत्राबाबत फेर विचार करणार आहात काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 01:20

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, काल मी श्री.अरूण जाधव, पोलीस कॉन्स्टेबल यांचा विषय सभागृहामध्ये मांडला होता. या कॉन्स्टेबलला कसाबने गोळ्या झाडून विधानभवन परिसरामध्ये सोडले होते. कसाबने विधान भवन परिसरामध्ये गाडी बदलली होती. स्कोडा गाडी घेऊन दहशतवादी गेले होते. त्याच कॉन्स्टेबलला आपण विधान भवनच्या गेट जवळ सॅल्यूट मारण्यासाठी उभे केले आहे. मी त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, सर्वसाधारण बदल्या झाल्या त्यात माझी देखील बदली नायगाव हत्यारी विभागात करण्यात आली. तेव्हा अशा आयुक्तांबाबत आपण काही विचार करणार आहात काय ? तसेच हे जे परिपत्रक निघाले आहे ते रद्द करण्यात येणार आहे काय ? कारण आम्ही या आयुक्त्यांचे भरपूर किस्से ऐकले आहेत. वृत्तपत्रात देखील वाचले आहेत. तेव्हा याबाबत काही कारवाई करणार आहात काय ?

मी दुसरा एक पैलू येथे मांडत आहे. या बांधकामावर 15 लाख कामगार काम करीत होता. पण आज विकासाला खीळ बसली आहे. ही खीळ रोजगाराच्या दृष्टीने देखील महत्त्वाची आहे. त्यामुळे सदर परिपत्रक शासन मागे घेणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. मुंबईच्या जमिनीच्या किंमत वाढत चालल्या आहेत. अतिक्रमण काढण्याची मोहीम असू दे, कोर्टाने दिलेली ऑर्डर असू दे याबाबत तफावती समोर आल्यामुळे उच्च पातळीवर निर्णय घ्यावा असे धोरण आम्ही स्वीकारले आहे. येथे पोलीस बंदोबस्त न देण्याची पार्श्वभूमी नाही. एखाद्या जागेवरील अतिक्रमण काढायचे असेल किंवा इमारतीची पुनर्बांधणी करण्यासाठी भाडेकरूनां घर रिकामे करून द्यावे असे सांगायचे असेल तर त्यासाठी पोलिसांची मदत घेतली जाते. BMC घर रिकामे करून द्यावे या संबंधातील नोटीस देते. पण भाडेकरू ऐकत नाहीत. ज्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न येतो तेव्हा पोलिसांची मदत घेतली जाते. BMC मध्ये आयुक्त पदी IAS अधिकारी असला तरी त्याची फक्त जागा रिकामी करून घेण्या पुरताच भूमिका असते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनाच उपाययोजना करावी लागते. स्थानिक पातळीवर अर्ज आल्यानंतर P.I.ताबडतोब बंदोबस्त देण्याचा प्रयत्न करतो. किती बंदोबस्त पाहिजे, तेथील सामाजिक परिस्थिती काय आहे, याचा अभ्यास करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अर्ज आल्यानंतर 72 तासांमध्ये परवानगी देण्याची सूचना गृह विभागाने दिलेली आहे. त्यामुळे बंदोबस्त देण्यामध्ये कुठेही अडचण येत नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी अतिशय गंभीर अशा प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. माननीय मंत्र्यांच्या उत्तरामुळे आणखी गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. मी आपले लक्ष लेखी उत्तरातील दुसऱ्या परिच्छेदाकडे वेधू इच्छितो. यात नमूद केले आहे की, "त्यामुळे खाजगी विकासक, एस.आर.ए.स्कीम राबविणारे विकासक इत्यादी लोक ज्यांचे यामध्ये हितसंबंध गुंतलेले आहेत व जे स्थानिक पातळीवरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याशी हातमिळवणी करून गरीब झोपडपट्टीधारक, भाडेकरू यांना त्रास देण्याच्या इराद्याने जी कारवाई करीत होते, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा व सार्वजनिक शांतता भंग होण्याचा मोठा धोका निर्माण होत होता." तेव्हा हे अधिकारी कोण होते ? कारण यात कबुली दिलेली आहे. या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणारे उच्च पदस्थ कोण आहेत, त्यांची नावे सांगावित. तसेच, या उच्चपदस्थांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, काही गोष्टी निदर्शनास आल्यानंतर आपण कारवाई करीत असतो. सकृतदर्शनी काही गोष्टी समोर आल्यामुळे त्याचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला आहे. हा निर्णय घेताना कोणती पार्श्वभूमी निर्माण झाली होती याचा उल्लेख येथे केला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणारे उच्च पदस्थ कोण आहेत, त्यांची नावे सांगावित व त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? एवढाच माझा प्रश्न आहे. मी बाकीचा तपशील विचारलेला नाही.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, येथे स्पेसिफिक अधिकाऱ्याचा विषय मांडलेला नाही. स्थानिक पोलीस अधिकाऱ्याला हाताशी धरून काही गोष्टी करण्यात येत आहे असे निदर्शनास आले आहे म्हणूनच हे परिपत्रक काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उप सभापती** : यामध्ये महत्त्वाचा भाग आपण लक्षात घ्यावा. एका परिपत्रकामुळे आपण सर्व अधिकाऱ्यांना दोषी धरत आहात काय ? ते विश्वासपात्र नाहीत काय ? संपूर्ण पोलीस दलामध्ये आपल्या अधिकाऱ्यांबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे हे पोलीस दलाला तितकेसे शोभत नाही. आम्ही देखील पोलीस दलातील मोठमोठे अधिकारी पाहिले आहेत, अभ्यासलेले आहेत. त्यामुळे अशी विषमता तयार करणे हे फारसे योग्य नाही. यावर काही गंभीर विचार करणार आहात की नाही ?

यानंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, शासकीय योजना अंमलात आणीत असतांना काही ठिकाणी अतिक्रमणे हटविण्यासाठी आपल्याला पोलीस बंदोबस्त द्यावा लागतो. परंतु काही ठिकाणी अशा घटना घडल्या आहेत, ज्या आमच्या रेकॉर्डवर आहेत. विक्रोळी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामध्ये अतिक्रमण दूर करीत असतांना एकाचा मृत्यू झाला म्हणून काहीही संबंध नसतांना जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी यांच्यावर गुन्हा नोंद करणे भाग पडले. अशाप्रकारे सायन पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामध्ये सुध्दा अतिक्रमणे हटवितांना काही अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंद करणे भाग पडले. त्याचप्रमाणे कुर्ला पोलीस स्टेशन, विक्रोळी पार्क साईट पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये सुध्दा अशा घटना घडलेल्या आहेत. एखाद्या ठिकाणी असलेले अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस स्टेशनने नियोजन केले व त्या प्रमाणे त्यांनी बंदोबस्त देण्याचा निर्णय घेतला तरी केलेल्या कारवाईची रिॲक्शन त्याच पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये उमटेल असे नाही.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये या लोकांच्या संघटना आहेत. त्या भागातील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई केली म्हणून आझाद मैदानामध्ये किंवा अन्य ठिकाणी सुध्दा आंदोलन, मोर्चे निघतात, रास्ता रोको केला जातो. म्हणजेच ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एखादी घटना घडली तरी दुसरीकडे तिची प्रतिक्रिया घडण्याची शक्यता असते. त्याबद्दल स्थानिक पोलीस स्टेशनला काहीही माहिती नसते. यामध्ये कुठेतरी सुसूत्रता असावी, वरिष्ठांना या गोष्टींची कल्पना असावी या करिता एखादे अतिक्रमण हटवितांना अन्य भागामध्ये त्याची रिॲक्शन उमटेल काय हे पाहून त्या ठिकाणी देखील बंदोबस्त ठेवला पाहिजे या सर्व गोष्टींकरिता हे परिपत्रक काढण्यात आले आहे. या परिपत्रकामध्ये कोणतेही अतिक्रमण काढण्यास विलंब होऊ नये म्हणून 72 तासांचा कालावधी ठेवण्यात आला आहे. म्हणजे अतिक्रमणे हटविण्यासाठी एखाद्या पोलीस स्टेशनकडे बंदोबस्त मागितला तर 72 तासामध्ये त्यांनी त्याबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. 72 तासांचा अवधी फार असल्यामुळे यामध्ये फार विलंब होत आहे. मधल्या काळात कुणी तरी कोर्टामध्ये जाऊन स्थगिती आदेश आणू शकतो अशातला भाग नाही.

सभापती महोदय, ही गोष्ट निश्चित झाली आहे की, एखाद्या ठिकाणी रात्री 3 वाजता जाऊन तेथील झोपडया हटविण्यासाठी बंदोबस्त देत असतांना या गोष्टी कायद्याला धरुन होत असल्या तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून कुठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारच्या काही गोष्टी माझ्या निदर्शनाला आल्या नंतर सुध्दा हे परिपत्रक काढीत असतांना अन्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

वभागांबरोबर चर्चा करणे आवश्यक होते. हे परिपत्रक काढीत असतांना त्याचा एखाद्या शासकीय योजनेच्या अंमलबजावणीवर काही परिणाम होत आहे काय हे निश्चितपणे आपण तपासून पाहू. हे परिपत्रक काढल्यानंतर मान्य केलेल्या पोलीस बंदोबस्ताचे परसेंटेज सुध्दा चांगले आहे. अशाप्रकारे पोलीस बंदोबस्त देत असतांना विकास कामांमध्ये व्यत्यय येणार नाही या दृष्टीने आपल्याला पहावे लागणार आहे. या करिता पुढील पंधरा दिवसाच्या आत आम्ही ही बाब पुन्हा एकदा तपासून पाहू, त्या करिता वरिष्ठ अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांच्याबरोबर चर्चा करु. ज्या संबंधित विभागाच्या मागणीवरुन अतिक्रमणे काढली जातात त्यांच्या अधिकाऱ्यांनाही समजावून सांगू. त्यांना काही गोष्टी अडचणीच्या वाटत असल्या तरी या परिपत्रकामुळे विकास कामांवर परिणाम होणार नाही. त्याचबरोबर पोलीस स्टेशनकडून मनमानी पध्दतीने गोरगरीबांना त्रास दिला जाणार नाही यादृष्टीने देखील समन्वय साधण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरानुसार म्हाडाच्या सेक्शन 95 प्रमाणे ज्यांना बहुमत मिळाले असेल त्यांचा विकास घडेल. जर बहुमत नसेल तर विकास करार करुन देखील त्या विकासकाला काहीही काम करता येणार नाही. ज्या बहुमतासाठी आपण 72 तासांचा कालावधी देत आहात त्या कालावधीमध्ये स्थगिती आदेश देखील दिला जातो. स्थगिती आदेश दिल्यानंतर त्या विकासाला खीळ बसते. या करिता संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन किंवा म्हाडाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन 72 तासांपेक्षा कमी वेळात करार करता येईल काय याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात यावा.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे श्री. अरुण जाधव यांच्याबाबत सभागृहामध्ये मी मुद्दा उपस्थित केला होता. परंतु आपण त्याबाबत काहीच उत्तर दिले नाही. ज्या पोलीस शिपायाला जीवंतपणी माननीय राष्ट्रपतींकडून एक शौर्यपदक मिळाले आहे.त्या बद्दल मी सभागृहामध्ये विशेष उल्लेखाची सूचना देखील मांडली आहे. पोलीस आयुक्तांनी पोलीस आणि अधिकाऱ्यांच्या ज्या सर्वसाधारण स्वरुपाच्या बदल्या केल्या त्यामध्ये श्री. अरुण जाधव यांना नेऊन बसविले आहे. त्या ऐवजी त्यांची ए.टी.एस. किंवा क्राईम ब्रँचमध्ये बदली करुन त्यांना त्यांच्या जागेवर बसविणार काय? पोलीस खात्यातील बदल्या या सर्वसाधारण स्वरुपाच्या असल्याचे सांगितले जाते. परंतु

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

शौर्यपदक मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांचा समावेश करतांना त्या कसाबला शिक्षा देण्यापूर्वीच श्री. अरुण जाधवना आपण शिक्षेला पाठवून दिले काय, त्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पोलीस दलामध्ये काम करीत असतांना विधानसभेसारख्या एखाद्या महत्वाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांना बंदोबस्तासाठी पाठविणे ही मी शिक्षा मानीत नाही. पोलीस दला अंतर्गत काम करीत असतांना एखाद्या पोलीस शिपायाने दाखविलेल्या शौर्याबद्दल सरकारला आणि मला व्यक्तिश: आनंद होतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

त्यांनी दाखविलेल्या धैर्यामुळे राज्यातील पोलीस दलाचा लौकीक वाढलेला आहे. मी स्वत: त्यांना विचारीन आणि त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे पोस्टींग दिले जाईल.

सभापती महोदय, आपल्या प्रश्नातील एक वाक्य मला कळले नाही म्हणून विचारतो. या ठिकाणी निवेदनामध्ये म्हटले आहे की,"खाजगी विकासक व त्यांचे हितसंबंधीय हे वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंधारात ठेऊन व त्यांच्या परवानगीशिवाय, तसेच नियोजन न करता व व्यवस्थित पोलीस बंदोबस्त तैनात न करता निष्कासनाची कारवाई करतात. त्यामुळे दंगलीसारखे गंभीर गुन्हे व जातीय/धार्मिक तणावासारख्या घटना घडतात." हा जो विषय आहे त्याबाबत सांगावयाचे तर जो विकासक आहे तो पोलिसांना हाताशी धरुन बेकायदेशीर कारवाई करतात. असे असताना जातीय व धार्मिक तणाव हा विषय उत्तरामध्ये कसा आला हे मला समजले नाही. सर्वसाधारण जातीय दंगल होते ते मी समजू शकतो.

**उप सभापती** : याठिकाणी शासनाने परिपत्रकाच्या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे. मी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की,आपल्याबद्दल या सभागृहातील सर्वांनाच आदर आहे. परंतु आपण आपल्या विभागातील सर्व लोकांना अत्यंत चांगल्या प्रकारे सांभाळून घेत असता. आपल्या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांबद्दल आम्हाला अतीव आदर व प्रेम आहे. ते देखील आमच्या कुटुंबातील एक आहेत. परंतु कुटुंबामध्ये एखादी व्यक्ती त्रास देणारी असते. आपण त्यांच्या सर्व कृत्यांवर पांघरुण घालण्याचे काम करु नये. त्यांना जो कायदा समजतो, तो आम्हाला कळतो आणि सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सर्वांनाही समजतो. माननीय गृह मंत्री किती जणांवर पांघरुण घालणार आहेत ? अशा वेळी एखाद्याला धडा शिकवावा की जेणेकरुन पुन्हा भविष्यामध्ये कोणी असे काही करणार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यापुढे कोणीही चुकीचे वागणार नाही यादृष्टीने योग्य ते निर्णय घेतले जातील आणि ते ठामपणे पाळले देखील जातील.

**उप सभापती** : ठीक आहे.

-----

2ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी: रायगड जिल्ह्यात साळाव येथील वेलस्पन मॅक्स स्टील कंपनीने कोळी समाजाची जागा बळकावल्याचे उघडकीस येणे.

मु.शी. रायगड जिल्ह्यात साळाव येथील वेलस्पन मॅक्स स्टील कंपनीने कोळी समाजाची जागा बळकावल्याचे उघडकीस येणे यासंबंधी श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"रायगड जिल्ह्यातील (अलिबाग) साळाव येथील रेवंडा खाडी किनारी असलेल्या वेलस्पन मॅक्स स्टील या कंपनीने येथील कोळी समाजाची जागा अतिक्रमणकरुन बळकावल्याचे नुकतेच उघडकीस येणे, यासंदर्भात स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने कोळी समाजाने सदर सुरु असलेल्या बांधकामाची तत्काळ चौकशी करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवदेनाव्दारे केलेली मागणी, सदर प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे कोळी समाजामध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तत्काळ सखोल चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्तींवर करावयाची कडक कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . .. 2 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगू इच्छितो की, आपल्या नेहमीच्या सरावातील जे मराठी शब्द आहेत ते येथे वापरण्यात आलेले नाहीत. याठिकाणी निवेदनामध्ये दुसऱ्या परिच्छेदातील पहिल्या ओळीमध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर कंपनीच्या कन्वेअर बेल्टच्या दुरुस्ती व "मेन्टेनन्ससाठी" याच्या ऐवजी "देखभालीकरता" हा आपल्या सरावातील मराठी शब्द आहे. तसेच निवेदनातील तिसऱ्या परिच्छेदातील पहिल्या ओळीमध्ये "कंपनीचे मॅनेजर" याऐवजी "कंपनीचे व्यवस्थापक" असे म्हणता आले असते. तसेच दुसऱ्या ओळी मध्ये "मिटींग" असे म्हटलेले आहे त्याऐवजी "बैठक" असे म्हणता आले असते. हे नेहमीच्या वापरातले, सरावातील मराठी शब्द आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "टेबल" वगैरे. पण जे नेहमीच्या वापरातील शब्द आहेत त्याचा वापर करावा. पण मी ज्या शब्दाबाबत सांगितले आहे ते तर आपल्या नेहमीच्या सरावातील शब्द आहेत.

सभापती महोदय, रेवंडा येथील कोळी समाजाच्याशी संबंधित असा विषय आहे. शासनाने कंपनीला जागा दिली त्याबद्दल कोणाचा प्रश्न नाही. त्यांचे तेथे काम सुरु आहे, कन्व्हेअर आहे आणि मी तेथे जाऊन सगळे पाहिलेले आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनाही सगळे माहिती आहे.तसेच विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांचा तो मतदार संघ आहे. याच्या बाजूची 66 (एक) (अ) मधील जागा कोळी समाजाच्या वापरातील जागा आहे आणि ती मासे सुकविणे वगैरे साठी वापरली जाते. पण याठिकाणी असे झाले आहे की, एकदा कंपनीला जागा देण्यात आली आहे. मग त्यांच्या कामकाजाकरता जो काही मार्ग किंवा रस्ता असेल तो त्यांनी त्यांच्या कंपनीतून काढावा हा मुद्दा आहे. ज्यावेळेला तेथे ही कंपनी नव्हती तेव्हा जाण्या-येण्यासाठी वहिवाटीचा रस्ता असेल. त्या ठिकाणी खाडीच्या बाजूला जाण्या-येण्यासाठी जागा आहे.पण सदरहू वहिवाटीच्या नावाखाली उत्तर दिलेले आहे. त्याठिकाणी सदर कंपनी ती जागा वापरत आहे आणि त्यांनी अतिक्रमण केले आहे.

सभापती महोदय, सर्व्हे नंबर 66-(1) मधील जागा तुम्ही त्यांना दिलेली नाही हे आपण मान्य करीत आहात. पण त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये सुध्दा बैठक झाली आणि तेथे ठरले. त्यामुळे याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते असत्य आहे. याठिकाणी संबंधितांची बैठक झाली आणि सामोपचाराने समजावण्यात आले हा विषय नाही, तर सर्व्हे नंबर 66 (1) मध्ये बेकायदेशीररित्या कंपनीने जे काम सुरु केलेले आहे, त्याचे मोजमाप करावे. तसेच संबंधितांकडे जर जमिनीच्या बाबतीत पुरावे असतील तर त्यांनी तसे करावे अन्यथा ते थांबविण्यात यावे असा तेथे विषय झाला.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

पोलीस ठाण्यामध्ये गावकरी आणि कारखान्याच्या व्यवस्थापकांबरोबर जे ठरले त्याप्रमाणे मोजमाप करण्यासाठी कंपनी पुढे येत नाही. माझा प्रश्न असा आहे की, कोळी समाजाचा जो हक्क सर्व्हे क्र. 66 मध्ये चालू आहे त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना सांगून ते काम ताबडतोब थांबविणार का ? जर ते पुढे येण्यास तयार नसतील तर जिल्हाधिकाऱ्यांना जो अधिकार आहे त्याप्रमाणे त्यांनी स्वत:च्या अधिकारामध्ये मोजमाप करुन जर कंपनीची जागा असेल तर गावकऱ्यांचे काही म्हणणे नाही, त्यांनी काम चालू करावे, पण जर कंपनीची जागा नसेल तर बेकायदेशीर बांधकाम काढून गावकऱ्यांची जागा पुन्हा गावकऱ्यांच्या ताब्यात देणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व्हे गट क्रमांक 66 मध्ये 48 हेक्टर जागा आहे. 1988 साली त्यातील काही जागा कोळी समाजाला देण्यात आली आणि या वेल्सपन कंपनीलाही काही जागा देण्यात आली होती. या संदर्भात 22 तारखेला पोलीस स्टेशनला एक निवेदन प्राप्त झाल्यानंतर बैठक घेऊन त्यामध्ये या जागेची मोजणी करुन घेण्याच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. ही मोजणी करण्याच्या संदर्भात 2 जुलैला टीएलआर ऑफीसला महसूल विभागाने पत्र दिलेले आहे की, ही मोजणी करुन द्यावी. मोजणी झाल्यानंतर जर अतिक्रमण असेल तर विनंती आल्यानंतर ते अतिक्रमण काढण्यासाठी निश्चितपणे गृह विभागातर्फे मदत केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, भरतीचे पाणी येणारी जमीन ही एमएनडीच्या अधिपत्याखाली असते आणि एमएनडी ती जागा महसूल खात्याकडून घेते आणि ती संबंधित विकासासाठी देते असा कायदा या राज्यामध्ये आहे. यामध्ये पोलीस स्टेशनचा संबंधच नाही. संबंधित कंपनीने एमएनडीकडे प्रस्ताव पाठविला आहे का ? जर प्रस्ताव पाठविला नसेल तर ती जागा कोळी समाजाला द्यावीच लागेल. त्या ठिकाणी कोळी समाजाचा आहे. जोपर्यंत एमएनडी कोळी समाजाला पर्यायी जागा देत नाही तोपर्यंत त्या जागेचा ताबा कोळी समाजाकडेच राहणार आहे. खरे म्हणजे हा गृह खात्याचा प्रश्न नाही. हा एमएनडी आणि महसूल खात्याचा प्रश्न आहे. या बाबतीत कंपनीने एमएनडीकडे बघावे अशा सूचना संबंधित पोलिसांना सूचना देणार का ?

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

जोपर्यंत एमएनडी या बाबतीत मान्यता देत नाही तोपर्यंत कोळी समाजाची जी वहिवाट आहे ती कायम ठेवण्याबाबत पोलिसांना सूचना देणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की त्यांना पोलीस ठाण्यामध्ये बोलवून बैठकीमध्ये मोजमाप करण्याच्या संदर्भात आदेश दिले. या ठिकाणी आपल्या अधिकाऱ्यांनी जे उत्तर दिले ते आपण बदलावयास पाहिजे होते. अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. आपण जर अभ्यास केला नसता, सकाळी व्यवस्थित ब्रिफिंग घेतले नसते तर आपणही असेच उत्तर दिले असते. म्हणजे मंत्री अडचणीत आला तरी चालतो पण अधिकारी सहीसलामत राहिला पाहिजे हे बरोबर आहे का ? पोलीस ठाण्यामध्ये मिटवामिटवी केली, दमबाजी केली, मारहाण केली. त्या ठिकाणी महिलांना सुध्दा मारहाण केलेली आहे. एवढी गंभीर बाब झालेली आहे. त्या पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी कोळी समाजाच्या बाबतीत एवढी कारवाई केली की, महिलांना सुध्दा पोलिसांनी मारलेले आहे. त्या संदर्भात शासन चौकशी करणार का ? या कंपनीच्या बाजूने पोलिसांनी तक्रार घेऊन त्यांनी कोळी बांधवांना तर मारलेच पण महिला पोलीस नसताना कोळी समाजाच्या महिलांना सुध्दा मारहाण केलेली आहे. ही यामध्ये महत्वाची तक्रार आहे. म्हणजे हक्क मिळविण्याकरिता त्या जमिनीचे जे मूळ निवासी आहत, पिढ्या न पिढ्या राहणारे जे कोळी बांधव आहेत त्यांना कोठून तरी आलेल्या एका कंपनीकरिता मार खावा लागतो ही बाब गंभीर आहे. तिकडच्या पोलिसांनी त्या ठिकाणी महिलांना मारहाण केली. या संदर्भामध्ये शासन वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उच्चस्तरीय चौकशी करणार का आणि त्या संदर्भातील अहवाल प्राप्त करुन तो सभागृहाच्या पटलावर ठेवणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, होय. त्या ठिकाणी चौकशी करण्यात येईल.

----

...3...

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : मुंबईत वृक्ष कोसळून मृत्यू होण्याच्या घडत असलेल्या घटना याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"लोअर परळ पेनिन्सुला पार्कजवळ वृक्ष कोसळून 24 वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याने मुंबईतील धोकादायक वृक्षामुळे पादचाऱ्यांचा जीव धोक्यात असल्याचे पुन्हा उघड झाले आहे. मुंबईच्या विविध भागांमध्ये अनेक जुनी झाडे आहेत. रस्त्यांच्या कामामुळे व पाणी मुळाशी न पोहचल्याने कमकुवत झालेली ही झाडे पावसाळ्यात कोसळण्याचा धोका अनेक पटीने वाढत आहे. गेल्या दहा वर्षात अशा दुर्घटनांमध्ये 25 जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पदपथावरील हे वृक्ष मृत्युचा सापळा ठरत आहेत. अशा प्रकारे दि. 5 जून, 2012 रोजी किंग्ज सर्कल जवळ वृक्ष कोसळून मोटार सायकलस्वार ठार, दि. 25 ऑगस्ट, 2011 रोजी वर्सोवा येथे प्रकाश आर्य यांचा वृक्ष कोसळून मृत्यू, दि. 18 जुलै, 2011 रोजी नरीमन पॉईन्ट येथे वृक्ष कोसळून मनिषा बन्साळी या महिलेचा व तिच्या सहा महिन्याच्या मुलीचा मृत्यू झाला, अशा प्रकारे सन 2010 पासून 1600 वृक्ष कोसळून 13 नागरिक जखमी झाले. याचप्रमाणे खाजगी जागेवर बसणारी झाडे तोडण्यासाठी महापालिकेकडून परवानगी देण्याकरिता अनेक अडचणी येत असतात. त्यामुळे अनेक इमारती व झोपड्या, घरे यांच्या आसपास असणाऱ्या झाडांपासून मोठी दुर्घटना घडू शकते. अशा घटना वारंवार घडत असल्याने अनेकांना नाहक प्राणास मुकावे लागत असल्याने याबाबत कडक उपाययोजना पालिकेकडून होणे आवश्यक आहे. या बाबत मी विशेष उल्लेखाव्दारे शासनास शिफारस करीत आहे."

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :राज्याच्या अनेक जिल्ह्यातील पाणी साठे दूषित होणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, अकोला, जळगांव, रायगड, ठाणे, अहमदनगर आणि बीड या जिल्ह्यातील पाणी साठे दूषित होण्याच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत आहे.

राज्याच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या संशोधन आणि विकास कक्षाने केलेल्या संशोधनात राज्यातील पाणी साठे दूषित होण्याचा वेग वाढल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

राज्यात गेल्या 5 वर्षात तब्बल 35 हजार 49 गावातून 2 लाख 79 हजाराहून अधिक पाण्याचे नमुने घेण्यात आले असून त्या पाण्याची रासायनिक चाचणी करताना पाण्यातील नायट्रेट, फ्लोराईड, क्लोरिन, आयरन आणि टीडीएस या 5 प्रमुख दूषित घटकांची तपासणी करण्यात आली असून यापैकी 9 हजार 854 गावातल्या पाण्याचा दर्जा पूर्णपणे बाधित झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

पुणे जिल्ह्यात मुळा, मुळा आणि इंद्रायणी नदीच्या परिसरातील 22 गावातील पाणी साठे दूषित असणे, त्यामुळे तेथील नागरिकांना अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे.

नागपूर महानगरपालिकेचे सुमारे 300 दशलक्ष लिटर पाणी शुध्दीकरण न करता नाग नदीत सोडण्यात येत आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी या महत्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आचारसंहितेच्या काळात नोकर भरतीची प्रसिध्द केलेली जाहिरात याबाबत श्री.जयवंतराव जाधव वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नाशिक विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीची आचारसंहिता सुरु असताना नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून नोकर भरतीसाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येणे, जिल्ह्यात शिक्षक मतदार संघ निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना ह्या बँकेने सुरु केलेल्या नोकर भरतीवर काही संचालकांमार्फतच आक्षेप घेण्यात येणे, शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीमुळे ही भरती मतदारांना प्रभावित करु शकते असा संचालकांनी आरोप केलेला असणे, त्यामुळे या नोकर भरती प्रक्रियेला विभागीय आयुक्तांकडून स्थगिती देण्यात येणे, मात्र नोकर भरतीची जाहिरात काढून मतदारांना प्रलोभन दाखविल्यामुळे केलेल्या आचारसंहिता भंग प्रकरणी प्रशासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात न येणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम व संशयाचे वातावरण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आचारसंहिता भंग केल्या प्रकरणी शासनाने बँकेच्या पदाधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी, अशी मागणी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे."

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी. / मु.शी.** :राज्यातील होमगार्डस्ना पोलीस अधीक्षक पदाप्रमाणे सोयी सुविधा मिळण्याबाबत श्री.चंद्रकांत पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्य शासनाने होमगार्ड दल हे संपूर्ण राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी सन 1947 सालापासून कार्यरत असणे, या दलाचे जिल्हा स्तरावरील होमगार्डचे प्रमुख जिल्हा समादेशक पदाचे मानसेवी वरिष्ठ अधिकारी हे असणे, ते कार्यालयीन वेतनीय कर्मचारी, मानसेवी अधिकारी पुरुष-महिला होमगार्ड सदस्य यांची भरती, प्रशिक्षण, कवायती, कर्तव्य, सुरक्षा सेवा, अपघात, पूर, भूकंप आणि शासकीय विकास कामे त्याचबरोबर धोरणात्मक व्यापक प्रक्रिया जिल्ह्यात पार पाडत असणे, तरीही मानसेवी जिल्हा समादेशक होमगार्ड दर्जा राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोलीस अधीक्षक पदाप्रमाणे सर्व हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या व शासकीय सोयी सुविधायुक्त नसणे, यावर शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सदर विषय महत्वाचा असल्यामुळे तो मी आज विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी. / मु.शी.** :इयत्ता 11 वी च्या प्रवेशासाठी जादा वर्ग सुरु करण्याच्या प्रस्तावांना मान्यता मिळण्याबाबत श्री.रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सध्या राज्यभर इयत्ता 11 वीची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. ग्रामीण व शहरी भागातही शालान्त परीक्षेचा निकाल अपेक्षेपेक्षा जास्त लागल्याने 11 वीची प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. अनेक विद्यार्थी आजही प्रवेशापासून वंचित राहिले आहेत. त्या त्यांच्या आवडीनुसार ज्या शाखेमध्ये प्रवेश पाहिजे त्या शाखेत प्रवेश मिळणे अपेक्षित आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 01:45

श्री. रामनाथ मोते ..

परंतु आज प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यामध्ये अनेक शाळा व्यवस्थापनाकडून नकार दिला जात आहे. त्यांच्याकडे अतिरिक्त तुकडया नसल्यामुळे ते प्रवेश देऊ शकत नाहीत. या बाबतीत माझी विनंती आहे की, शेकडो विद्यार्थी प्रतीक्षा यादीवर असल्यामुळे अकरावीच्या प्रवेशापासून ते वंचित राहू नयेत म्हणून ज्या शाळांनी किंवा व्यवस्थापनांनी जादा तुकड्या किंवा वर्ग वाढविण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांना जादा तुकडया, वर्ग देण्याची व्यवस्था शासनाने करावी आणि या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न मार्गी लावावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे व मुंबई शहरातील स्वाईन फ्ल्यू व मलेरियाची साथ अटोक्यात आणण्यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"माहे जून 2012 च्या तिस-या आठवड्यात वा त्या सुमारास पुणे शहरात माहे एप्रिल, मे व जून या तीन महिन्यात स्वाईन फ्ल्यूची लागण झालेल्या हजारो नागरिकांची करण्यात आलेली तपासणी, त्यामध्ये जून 2012 अखेर 10 ते 12 नागरिकांचा मृत्यू होणे, लॅन्सेट इन्फेक्शिअस डिसिज मासिकाच्या अहवलामध्ये नोंदणीपेक्षा स्वाईन फ्ल्यू अधिक असल्याची बाब उघडकीस येणे, पुणे, मुंबई येथे स्वाईन फ्ल्यूची लागण सुरु असून गेल्या तीन महिन्यात याचे रुग्ण खाजगी व शासकीय इस्पितळात दाखल होण्याचे प्रमाण वाढणे, तसेच मुंबई शहर, दक्षिण मुंबई विभागामध्ये दरवर्षी प्रमाणे गेल्या तीन महिन्यामध्ये मलेरियाच्या साथीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होणे, रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण येथे मलेरिया साथीचा प्रादुर्भाव गेल्या वर्षीपेक्षा दसपटीने जास्त झाल्याचे केलेल्या पाहाणीत आढळून येणे, जून 2012च्या पहिल्या पंधरवड्यात 470 व्यक्तींच्या रक्तांचे नमुने तपासले असता, त्यामध्ये सर्वात जास्त रुग्ण मलेरियाचे आढळणे, तिवडी, विरे, नांदीवसे, ओवळी, कादवड, गणेशपूर, कळकवणे इत्यादी गावात गेल्या तीन महिन्यापासून मलेरियाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊनही सदर साथ आटोक्यात आणण्याकरिता शासनातर्फे प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे."

----

...3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 01:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील महामार्गावर अपघातग्रस्तांसाठी विशेष रुग्णालय बांधण्याची आवश्यकता याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

महाराष्ट्रात पुणे, मुंबई, नागपूर, ठाणे, नवी मुंबई, नाशिक अशी 6 मोठी शहरे एकमेकांना महामार्गांनी जोडलेली असणे, या शहरालगतच राष्ट्रीय महामार्ग जात असून गेल्या 3 वर्षात महामार्गावरील 2 लाख 71 अपघातांमध्ये एकूण 34 हजार 274 जणांचा बळी जाणे, या अपघातांमध्ये निष्पाप लोकांचा बळी जात असल्याने शासनाने या महामार्गावर अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी "गोल्डन अवर योजना", महामार्गावर कंट्रोल रुमबरोबर वैद्यकीय पथक आणि पोलिसांची गस्त, रुग्णवाहिका तसेच अपघाताच्या ठिकाणी तातडीचे उपचार करण्यासाठी कर्मचारी सुविधा ठेवण्यात येण्याची शासनातर्फे करण्यात आलेली घोषणा, परंतु या योजनांची अंमलबजावणी सर्व महामार्गावर होताना दिसत नसणे, तसेच राज्यातील महामार्गावर अपघातग्रस्तांसाठी एक विशेष रुग्णालय शासनातर्फे बांधण्याची आवश्यकता, तसेच मोठ्या महामार्गावरील टोलनाक्यांनी देखील रुग्णवाहिका व काही कर्मचारी नेमण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई यासंबंधी शासनाने तत्काळ निवेदन करण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : इयत्ता 9वी पासून व्यवसाय शिक्षण हा नवीन विषय सुरु करण्याचा घेतलेला निर्णय याबाबत श्री. भगवान साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"चालू शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक स्तरावर इयत्ता 9वी पासून व्यवसाय हा नवीन विषय सुरु करण्याचा निर्णय झाला असूनही अद्याप या विषयाचा अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके, शिक्षक प्रशिक्षण इत्यादी संदर्भात कोणतेही निर्देश/आदेश खालपर्यंत पोहाचलेले नाहीत, त्यामुळे खाली गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करतो की जर व्यवसाय शिक्षण हा विषय चालू वर्षापासून सुरु करावयाचा असेल तर त्यादृष्टीने आवश्यक ती सर्व तरतूद तातडीने करुन संभ्रमावस्था संपुष्टात आणावी."

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.20 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.48 ते 2.20 पर्यंत मध्यंतर)

---

...नंतर श्री. अजित...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे )**

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 च्या खर्चाच्या पुरवणी मागण्या.

**तालिका सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आज दुसरा व शेवटच्या दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज मंगळवार,दिनांक 17 जुलै, 2012 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी या संबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा सबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रमपत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या.

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक ए-4,ए-5,ए-6,ए-7,ए-8,ए-9, बी-3,एफ-2, एफ-4, जे-1, जे-4, झेडएफ-1, झेडएफ-2

(2) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक एम-2, एम-3,एम-4,

(3) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक एस-1,एस-4

(4) जलसंपदा (कृष्णा खो्रे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक आय-5,

(5) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक टी-4, टी-5, टी-6

(6) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती...**

(7) शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक ई-4

(8) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक व्ही-2, झेडई-1, झेडई-2

(9) रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्रमांक एल-7

(10) पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक डी-4,डी-6,डी-9,

(11) महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक एक्स-1

(12) पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक झ ेडडी-2

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी भाषणास सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, आम्हाला पुरवणी मागण्यांच्या संदर्भात जे विवरणपत्र देण्यात आले आहे त्यामध्ये जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) विभागाची बाब क्रमांक आय-5, पृष्ठ क्रमांक 85 अशी एकच बाब दाखविण्यात आलेली आहे. परंतु पुरवणी मागण्यांच्या पुस्तकामध्ये बाब क्रमांक 81 ते 85 अशा एकूण पाच बाबी दाखविण्यात आलेल्या आहेत. घोटाळ्याच्या बाबी बाजूला ठेवून फक्त एकच बाब दाखविण्यात आली आहे काय ? घोटाळ्याच्या बाबींवर चर्चा होऊ नये असे काही ठरले आहे काय ? आम्ही अन्य बाबींवर आम्ही कसे बोलणार ? बाकीच्या बाबींमध्ये घोटाळे आहेत काय ? आम्हाला बाकीच्या बाबींवर बोलण्याची परवानगी आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 81 ते 85 अशा एकूण पाच बाबी असून एकूण 16 कोटी 6 लाख रुपयांच्या मागण्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बाबनिहाय बोलता येऊ शकेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला जे विवरणपत्र दिलेले आहे त्यामध्ये जलसंपदा विभागाची एकच बाब दाखविलेली आहे. आम्ही बाबनिहाय बोलणार आहोत, परंतु विवरणपत्रामध्ये ज्या बाबी वगळण्यात आलेल्या आहेत त्याबाबत आम्हाला उत्सुकता होती.

बाब क्रमांक 81,82,83, व 84,पृष्ठ क्रमांक 83ते 85 जलसंपदा विभाग - बाब क्रमांक 81 बाबत बोलताना एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भात वेळेत श्वेतपत्रिका काढण्यात येईल असे वाटले होते. कारण मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सांगितले होते की, शासन जी आकडेवारी सांगते ती आकडेवारी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दिसत नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.अजित 02:25

श्री.विनोद तावडे...

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सिंचना विषयी जी आकडेवारी दाखविण्यात आलेली आहे, त्या आकडेवारीचे वास्तव काय आहे या बाबतची माहिती सभागृहासमोर सांगण्यात यावी अशी मी पूर्वीच मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, गेल्या तीन, चार महिन्यापासून पाटबंधारे विभागात मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचाराची चर्चा सर्वदूर चालू आहे. सिंचनाच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढत असताना केवळ भ्रष्टाचाराचीच माहिती देऊ नये. आम्हाला ती माहिती हवी आहेच. परंतु सिंचन क्षेत्र ओलिताखाली आणताना काही धोरणात्मक चूका झालेल्या आहेत काय, असल्यास, त्यात काही बदल करता येतील काय, त्यात काही परिवर्तन करता येईल काय, त्या चूका कशा पध्दतीने दुरुस्त करता येतील, याची देखील माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. 2008-2009 मध्ये पाणी साठा 156 दशलक्ष घनमीटर एवढा होता. 2009-2010 मध्ये तो 356 दशलक्ष घनमीटर एवढा झ ाला आणि 2010-2011 मध्ये तो पाणी साठा 711 दशलक्ष घनमीटर पर्यंत गेला. ज्या प्रमाणे डी.एस.आर.चे दर वाढतात, त्या प्रमाणेच पाणी साठयामध्ये वाढ झालेली दिसते आहे. एकूण पाणी साठा किती टक्क्यांनी वाढला यासंबंधीची माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. या विषयाच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र पाठविलेले आहे. तिलारी हायड्रो प्रोजेक्टचे काम नोबल कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले गेले. या प्रकल्पाची मूळ किंमत 108 कोटी रुपये एवढी होती. त्या प्रकल्पाची किंमत आता 268 कोटी रुपयांपर्यंत झाली आहे. पिंजाळ नदी प्रकल्प, जव्हार याची मूळ किंमत 142 कोटी रुपये होती, ती किंमत आता 275 कोटी रुपये एवढी झाली आहे. मुंब्री प्रकल्प, शहापूर, जि.ठाणे या प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. रत्नागिरी जिल्हयातील सातर्डे प्रकल्पाचे काम देखील नोबल कन्स्ट्रक्शन कंपनीलाच देण्यात आले आहे. त्या प्रकल्पाची मूळ किंमत 163 कोटी रुपये एवढी होती. आता त्या प्रकल्पाची किंमत 721 कोटी रुपये एवढी झाली आहे.

माननीय मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात मी जल प्रकल्पांसबंधी सविस्तर माहिती नमूद केलेली आहे. मी जे पत्र माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेले आहे, ते संपूर्ण पत्र मी वाचून दाखवून सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. त्यातील काही मुद्यांचाच या ठिकाणी उल्लेख करणार आहे. श्वेतपत्रिका काढताना राज्य शासनाने सिंचनाच्या बाबतीत कोणकोणते धोरणात्मक निर्णय घेतले

श्री.विनोद तावडे....

पाहिजेत, कोणकोणत्या गोष्टींचा विचार केला पाहिजे या गोष्टींचा उल्लेख मी माझ्या पत्रात केलेला आहे. त्या पत्रात असाही उल्लेख केला आहे की, या जल प्रकल्पांवर एवढया प्रमाणात खर्च झालेला आहे. केंद्र शासनाच्या सिंचन प्रकल्पांच्या सूचीमध्ये अंतर्भाव असणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत केंद्राकडे पाठपुरावा करावा. ते जल प्रकल्प आर्थिक दृष्टया परवडणारे कसे आहेत, ते कशा पध्दतीने करावेत असे साधारणत: 9 मुद्दयांचे माझे पत्र आहे. ते सर्व मुद्दे काय आहेत, ते वाचून दाखवित नाही. ते मुद्दे मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

सभापती महोदय, गोदावरी नदीवर 11 ठिकाणी बॅरेजचे बांधकाम करण्यात आलेले आहेत. बॅरेजचे बांधकाम करण्यापूर्वी ट्रायल बोअर करण्यात आले. ज्या ठिकाणी ट्रायल बोअर घेण्यात आले तेथील जमिनीत सात आठ मीटरवर कठीण खडक होते. परंतु या कामांच्या अंदाजपत्रकामध्ये 17 ते 18 मीटरवर कठीण खडक असल्याचे दर्शविण्यात आले आणि त्या अंदाजपत्रकाप्रमाणे कंत्राटदारांना त्यांची देयके अदा करण्यात आली आहेत. कठीण खडक इतक्या खोलवर होता, तर ट्रायल बोअर करण्याची काय आवश्यकता होती या बाबतची माहिती सभागृहाला दिली गेली पाहिजे. या बॅरेजच्या कामांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असल्याने त्या कामांची चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. सदर कामांची अंदाजपत्रके वाढीव रक्कमेचे दाखविण्यात आलेली आहेत. अशा प्रकारची अंदाजपत्रके करण्यामागे वरिष्ठ पातळीवरील अधिकारी आणि राजकीय नेत्यांचा सहभाग आहे अशी माझी माहिती आहे. गोदावरी बॅरेजची एकूण किंमत 200 ते 250 कोटी रुपये एवढी होती, नंतर त्या बॅरेजच्या बांधकामाची किंमत 2 हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. या बॅरेजच्या किंमतीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली. एवढी किंमत कशामुळे वाढली याचा देखील या ठिकाणी खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, परतूर येथील निम्नदुग्ध प्रकल्पावर 140 कोटी रुपये खर्च करुन त्यात 12 टीएमसी पाणी अडविण्यात आले. गोदावरी नदीतील 7.3 टीएमसी पाणी अडविण्यासाठी 2 हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला. एकीकडे 140 कोटी रुपये खर्च करुन जास्त पाणी अडविण्यात आले. दुसरीकडे मात्र 2 हजार कोटी रुपये खर्च करुन कमी पाणी अडविण्यात आले. म्हणून गोदावरी नदीवरील 11बॅरेजच्या कामांची त्रयस्थ उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

3...



ABG/ प्रथम श्री.अजित 02:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे..

सभापती महोदय, या 11 कामां संदर्भातील निविदा मर्जीतील ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत असे माझे म्हणणे आहे. या बाबतीत सभागृहात चर्चा झाली असताना जलसंपदा सचिव श्री.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने अद्याप अहवाल दिलेला नाही असे मला वाटते. जर तो अहवाल शासनास सादर झाला असेल तर तो अहवाल आमच्यापर्यंत अजून पोहोचलेला नाही.

यानंतर श्री. कानडे....

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, या सगळया प्रकरणाची गंभीरपणे चौकशी होणे नितांत गरजेचे आहे. ज्या पध्दतीने पाटबंधारे विभाग, सिंचनाचे क्षेत्र आणि त्यासाठी खर्च केलेला पैसा या सर्वांची राज्यभर चर्चा चालू आहे ते पाहता या सर्व गोष्टींसाठी करोडो रुपयांचा चुराडा झालेला आहे. म्हणून या विषयावरील सर्व स्पष्टता राज्यातील जनतेसमोर येण्याची आवश्यकता आहे. याविषयावर अधिक खोलवर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील हे बोलतीलच. गेल्या 10 वर्षात 12.47 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आणि त्यासाठी 42 हजार कोटी रुपयांचा खर्च झाला असे सांगितले. 42 हजार कोटी रुपये खर्च हा प्लॅन मधून झालेला आहे. गेल्या 10 वर्षात 25 हजार कोटी रुपये नॉन प्लॅन मधून अतिरिक्त खर्च झालेले आहेत. गेल्या 10 वर्षात सिंचन क्षमतेवर प्रतिहेक्टर 3 लाख 36 हजार रुपये खर्च झाले. म्हणजे 1 लाख 36 हजार हे मानांकन झाले. श्वेतपत्रिकेमध्ये या सर्व गोष्टींचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. माझी शासनाला विनंती आहे की, श्वेतपत्रिका काढताना या सर्व बाबींचा खुलासा करावा.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना सरकारने आदर्श घोटाळयाची चौकशी करण्यासाठी आयोगाची स्थापना केली आहे. 8 जानेवारी,2011 रोजी आयोगाची स्थापना करण्यात आली. 3 महिन्यामध्ये आयोगाला शासनाला अहवाल सादर करावयाचा होता. प्रत्यक्षात मार्चच्या पहिल्या आठवडयात आयोगाची पहिली बैठक झाली. वारंवार आयोगाला शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. आयोगाला अहवाल सादर करण्यासाठी 31 मे 2012 अशी शेवटची मुदत देण्यात आली होती. आता पुन्हा नव्याने चार महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आतापर्यंत आदर्श घोटाळयाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या आयोगावर 4 कोटी 85 लाख इतकी तरतूद करण्यात आली होती. 18 महिन्यांचा कालावधी लोटूनही आयोगाचे कामकाज अद्याप पूर्ण झालेले नाही. आयोगावर एवढा खर्च होतो आहे की, त्या खर्चामध्ये आणखी एक आदर्श बिल्डींग उभी राहिली असती.

यासदनाचे माजी सदस्य श्री. रामदास फुटाणे यांनी आयोगाच्या संदर्भात लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये एक कविता केलेली आहे. त्या कवितेतील काही भागाचा मी याठिकाणी उल्लेख करणार आहे. त्यात आयोग चौकशीला काही प्रश्न विचारतो व चौकशी त्याचे उत्तर देते.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

" आयोग म्हणतो चौकशीला,
अग तुला सांगितले ना, घाई करु नकोस,
सारखी सारखी माझ्याकडे तू येत जाऊ नकोस."

" चौकशी म्हणते,साहेब मोठया मोठयांकडे जाताना,
त्यांच्याशी बोलताना, खूपच चीड येते,
एकतर नीट बोलत नाहीत, प्रत्येकजण दुसरेच नांव घेतो,
कधी देशमुख-चव्हाण, तर कधी चव्हाण-शिंदे,
काही कळतच नाही आणि तळपायाची आग मस्तकात जाते."

" आयोग म्हणतो, तुझ्याकडे काही साक्षीपण येतात,
तिला जरा माझ्याकडे पाठव,तू त्यांना पाहिले आहे का ?

चौकशी म्हणते, त्या साक्षी एकापेक्षा एक तयार आहेत,
एक-दोन भेटल्या होत्या, त्या मोठयामोठयांच्या बोलण्यात
रोज एक नवीन नांव येते आणि त्यांचे वर्णन ऐकल्यानंतर
त्यांना भेटण्याची इच्छा होते."

" हे झाल्यानंतर आयोग मात्र बोलतो,
आपण आपले काम करीत रहायचे,
दुसरी एक गोष्ट लक्षात ठेव,
तक्रार माझ्याकडे आहे तोपर्यंत तुला आणि मला
सरकार बंगला आणि गाडी देणार,"

" यानंतर इकडे तक्रार प्रेग्नंट राहणार नाही,
आणि निकाल जन्माला येणार नाही याची दक्षता बाळगून
आयोगाने पर्टीक्युलर शोध चालू ठेवला आहे."

नंतर श्री. खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

याची दक्षता बाळगून आयोगाने शोध चालू ठेवला असे माननीय श्री. रामदास फुटाणे म्हणतात. त्यामुळे तो आयोग, ती चौकशी, ती तक्रार, ती साक्ष या विषयाचे अतिशय सुंदर विवेचन माननीय रामदास फुटाणे यांनी त्यांची प्रतिभा शैली वापरुन मांडले आहे. बराचसा भाग असा आहे की, जो सभागृहात वाचून दाखविणे शक्य नाही पण काही महत्वाच्या गोष्टी सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

महोदय, यानंतर पृ.क्र. 4 व बाब क्र. 1-आदर्शचा विस्तार. आदर्श असा विषय आहे की ज्याने संपूर्ण देशाला गुंडाळून टाकले. यासंदर्भात नेमलेल्या चौकशी आयोगाने दिलेले आहे त्यानुसार एप्रिल, 2012 नंतर अंतरिम अहवाल सभागृहात दाखविला आणि ही जमीन राज्य शासनाची आहे असे सांगितले. पण त्याच संध्याकाळी डिफेन्सच्या वकीलांनी सांगितले की ही जमीन संरक्षण विभागाची आहे. तसेच चौकशी आयोगाला जमीन कोणाची आहे हे ठरविण्याचा अधिकार नाही तर हा अधिकार कोर्टाचा आहे. तसेच केवळ वकीलांनीच नव्हे तर खुद्द संरक्षण मंत्र्यांनी सुध्दा या जमिनीवर क्लेम केला आहे. अर्थात संरक्षण मंत्री हे वेगळ्या पक्षाचे नसून आपल्याच पक्षाचे आहेत. आयोगाने 21 महिन्यानंतर अहवाल दिला तो सुध्दा मान्य नाही, त्यामुळे संरक्षण विभागाच्या मालकीची जागा असल्याने राज्य शासनाला नुकतीच नोटीस देण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या साक्षीत आदर्श सोसायटीत बिगर लष्करी नागरिकांना सामावून घेण्याची शिफारस आपण केली नाही असे सांगितले. तर कमांडर मॅथ्यू जॉन यांनी श्री. विलासराव देशमुख व श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्यासमोर सांगितले की, या जागेवर लष्कराची परेड घेतली जात होती. जर ही जागा संरक्षण विभागाच्या ताब्यात नसती तर त्या जागेवर परेड घेण्याची गरज काय होती असा प्रश्न निर्माण होतो. अशा अनेक गोष्टींवरुन या बाबी स्पष्ट होतात. तसेच मुंबईचे जिल्हाधिकारी श्री. प्रदीप व्यास हे प्रत्येक सदस्याला "कारगिल युद्धात आपण होता का" असा प्रश्न विचारत होते. वास्तविक असा प्रश्न विचारण्याची गरज काय होती, म्हणून यातील सर्व परिस्थिती आश्चर्यकारक वाटण्यासारखी आहे.

त्यात सर्वात विशेष बाब म्हणजे माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या साक्षीत म्हटले आहे की, "मी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

स्वीकारण्याच्या अगोदर काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी हे करुन टाकले होते, त्यामुळे मला याबाबत काहीच माहीत नाही." राज्यातील मोठमोठ्या पदावरील लोक जर अशा प्रकारचे वक्तव्य करीत असतील तर ते कितपत योग्य आहे ? तसेच "गुड इन्टेन्शन मध्ये मी सही केली" असेही एका मुख्यमंत्र्यांनी आयोगासमोर सांगितले. या गुड इन्टेन्शनचा अर्थ काय होतो, एक्झॅक्टली कशासाठी हे केले हे आमच्या नवीन पिढीला जाणून घेण्याची इच्छा आहे. तसेच मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे साक्षीत असेही म्हणतात की, "मुंबई-पुणे येथील जमीन वाटपाचे अधिकार महसूल मंत्र्यांना आहेत." तर कोणी म्हणते टक्के दिले. ज्याप्रमाणे लहान असताना खेळ खेळत होतो त्याप्रमाणे हा प्रकार आहे. कोणीही यावे आणि टपली मारुन जावे अशातला हा प्रकार आहे. खऱ्या अर्थाने जे राजकीय नेतृत्व हा सर्व कारभार चालवितात तेच म्हणतात की, अधिकाऱ्यांनी मला याबाबतची माहिती दिलीच नव्हती एवढी वाईट गोष्ट कोणतीच नसेल. हे राजकीय नेते आपल्या हातातील अधिकार गमावून बसले आहेत असेच या साक्षीवरुन दिसते.

महोदय, पृ.क्र. 6, बाब क्र. 7 - सामान्य प्रशासन विभागाने यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी जाहिरात व प्रसिध्दीवरील खर्च भागविण्यासाठी 1.30 कोटीची पुरवणी मागणी मान्य करण्याची विनंती केली आहे. वास्तविक या वर्षभरात एकूण 100 कोटीची तरतूद शासनाने या जन्मशताब्दी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांसाठी केलेली असल्याने त्यातूनच हा जाहिरात व प्रसिध्दीवर होणारा खर्च सुध्दा भागला असता. याबाबत स्पष्टीकरण करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

बजेट किती लाईटली तयार होते हेच मला या निमित्ताने दाखवून द्यावयाचे आहे. बजेट सादर करण्यामध्ये सरकारचा ढिलाईचा कारभार आपल्याला पहावयास मिळतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 172, बाब क्र. 171 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे.राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी व सहायक अनुदान देण्यासाठी 51.40 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे ही तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक होते. मराठी भाषेच्या संदर्भात आपण नेहमी चर्चा करीत असतो असे असतांनाही त्यासाठी ऐनवेळी तरतूद केली जाते हे काही योग्य नाही. खरे म्हणजे ही तरतूद बजेटमध्येच करावयास पाहिजे.

सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, 22 वर्षानंतर चिपळूण येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांनी सांगितले आहे की, संमेलनासाठी शासनाने 25 लाखाची मदत जाहीर केलेली आहे परंतु ही मदत पुरेशी नाही. कलेला राजाश्रय असलाच पाहिजे. त्यामुळे चिपळूण येथील अखिल भारतीय मराठी संमेलनासाठी 25 लाख रुपयांची जी मदत दिलेली आहे त्यामध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या संमेलनासाठी सरकार 25 लाख रुपये देणार आहे परंतु त्या भागातील आमदारांना 2-4 लाख रुपये संमेलनासाठी द्यावयाचे असतील तर त्यासाठी नियोजन विभागाला जी.आर.काढावा लागेल. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने पुढाकार घेऊन जी.आर.काढावा अशी मी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने सूचना करु इच्छितो.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 105 ते 110 च्या संदर्भात विचार मांडणार आहे. राज्यामध्ये गोदामे बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पाऊस अचानक पडल्यामुळे आपल्याला गोदामे बांधावी लागतात का ? खरे म्हणजे आपल्याकडे पाऊस पडलाच नाही. हा खर्च करण्यास आपल्याला अचानकच कसे काय सुचले ?

महाराष्ट्रातील शेतकरी 2.25 लाख हेक्टर बागायती जमिनीवर पिके घेत असतात. पिकांवर रोग पडू नये, रोगाचा सामना करता यावा यासाठी शेतकऱ्यांना कीटक नाशकाची फवारणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

करावी लागत असते. परंतु अशा प्रकारची फवारणी करण्यासाठी पॉवर स्प्रे पंपाला रॉकेलची आवश्यकता असते. शेतकऱ्याला रॉकेल उपलब्ध न करुन दिल्यामुळे शेतकऱ्याला काळया बाजारातून रॉकेल घ्यावे लागते. शेतकऱ्यांच्या पॉवर स्प्रे पंपासाठी रॉकेल मिळण्यासाठी मी मंत्री महोदयांशी पत्र व्यवहारही केलेला आहे. कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनीही सांगितले आहे की, पॉवर स्प्रेला रॉकेल मिळण्यासाठी शासनाने रॉकेलची अधिकृत व्यवस्था करुन द्यावी. रॉकेलची व्यवस्था बाजार समित्या किंवा इतर सोसायटयांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. परंतु शासनाने शेतकऱ्यांच्या पॉवर स्प्रे पंपासाठी रॉकेलचा पुरवठा अद्यापपर्यंत करुन दिलेला नाही. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या पॉवर स्प्रे पंपाला रॉकेलचा पुरवठा उपलब्ध करुन द्यावा अशी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 141वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी अंतर्गत वाटप केलेल्या वन जमिनीची मोजणी करण्याकरिता शुल्काचे प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. वनातील रहिवाश्यांना वन अधिकार कायदा दि.29 डिसेंबर, 2006 पासून लागू झालेला आहे. या कायद्याच्या अंतर्गत व्यक्तिगत आणि सामूहिक स्वरुपाच्या दाव्यांना विशिष्ट कार्यपध्दती आखून दिली गेली आहे. ग्रामसभा, उपविभागीय समिती, व जिल्हा स्थरावर दाव्यांना मान्यता देण्याची यंत्रणा निर्माण केलेली आहे. केंद्र शासनाचे सचिव श्री. गौतम मुखर्जी यांनी दि. 15 जुलै, 2010 रोजी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यसचिवांना पत्र पाठवून कळवले होते की, सदर कायद्याअंतर्गत स्वीकारलेल्या दाव्यांच्या संख्येपेक्षा किती तरी अधिक दावे महाराष्ट्रात नाकारले जातात.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

हे सन 2010 मध्ये सांगितले गेले. ग्रामसभा व उप विभागीय समिती स्तरावर दावे नाकारल्याच्या कारणांची विभागणी करून कोणत्या कारणांसाठी किती दावे नाकारले गेले याची माहिती कळविण्यास सांगितले होते. राज्य शासनाकडून अद्याप पर्यंत केंद्र शासनाकडे अशी माहिती गेलेली नाही. ग्रामसभेच्या पातळीवर दावे नाकारण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे आपल्या देखील निदर्शनास आलेले आहे. ही बाब आम्ही देखील वेळोवेळी आपल्या लक्षात आणून दिलेली आहे.

जमिनीची मोजणी न झाल्याने ग्रामसभेने दावे नाकारल्याच्या घटना ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर झालेल्या आहेत. उप विभागीय स्तरावर 60.42 टक्के दावे नाकारलेले आहेत. केवळ 3 जिल्ह्यांचा अपवाद वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये नाकारलेल्या दाव्यांचे प्रमाण 40 ते 100 टक्के आहे. मग हे दावे टेबलावर बसून नाकारतात की अन्य मार्गाने नाकारतात हे काही कळत नाही. तेव्हा यातील वास्तव काय आहे ? सामूहिक दाव्यांपैकी मोठ्या जमिनींचे दावे ग्राम पंचायत स्तरावर प्रलंबित आहेत. त्यामुळे अंतिमत: स्वीकारलेल्या व्यक्तिगत दाव्यांपैकी 7383 दाव्यांचे टायटल अजून वितरित केलेले नाही.

मेळघाट संबंधी खोत संस्थेने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. एकही सामुहिक वन हक्क दावा जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. आज तेथे टायगर रिझर्व्ह करण्याची आवश्यकताच आहे. टायगर रिझर्व्ह केल्यानंतर तेथील आदिवासींचे दावे निकालात न काढता तिथल्या आदिवासींना स्थलांतरित करण्यात आले. त्यांच्या सामूहिक वन अधिकाराची माहिती न घेता त्यांना स्थलांतरित करण्यात आले. त्यामुळे त्यांचे दावे निकालात नव्हते ते निघाले. त्याचे आता काय होणार आहे ? त्यामुळे पुरावा असताना सुद्धा टायटल वितरण योग्य पद्धतीने करण्यात आले नाही, हे देखील वास्तव आहे. या कायद्या संबंधी शासनाने तातडीने आढावा घेतला पाहिजे. केंद्राचा कायदा आल्यानंतर आपल्या राज्यात वास्तव काय आहे, हे पाहिले पाहिजे. या दाव्यामध्ये पुनर्विचार करण्याची गरज आहे. ते कसे करणार आहात ?

अंतिमत: मान्य केलेल्या जमिनीचे पट्टे तात्काळ देण्यात यावे, जेणे करून दावेदारांना शासकीय योजनांचा लाभ घेऊन विकास करता येईल. हे आपण अजून केलेले नाही. याबाबत देखील मंत्रिमहोदयांनी विचार करावा. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सामूहिक वन हक्क दाव्यासंबंधी राज्यभर प्रसार आणि प्रचार करण्याची मोहीम हाती घेतली पाहिजे. यामुळे सामूहिक वन हक्क, दावे दाखल करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. अशी योजना आहे हे अजून किती तरी आदिवासींना माहिती देखील नाही. याचा प्रसार होताना कुठेच दिसत नाही. या दाव्यांचा मग बाकीचे लोक कुठे तरी गैरउपयोग करीत आहेत, हे आपल्याला त्या त्या वेळी निदर्शनास आले आहे.

मेळघाटातील सामूहिक वन हक्क दाव्यासंबंधी शासन तातडीने कोणती कारवाई करणार आहे, हे आम्हाला समजले पाहिजे. गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा येथील सामूहिक वन हक्क एप्रिल 2011मध्ये मान्य करण्यात आले व ग्रामसभांना बांबू काढण्याचे व विक्री करण्याचे अधिकार देण्यात आले. त्यातून ग्रामसभेला जवळ जवळ 1 कोटी उत्पन्न मिळाले होते. सामूहिक वन हक्क मान्य झालेली गडचिरोलीतील 400 गावे आहेत. बल्लारपूर उद्योगाला यापूर्वीच अधिकार दिलेले असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस अधिक सांगतील. राज्यातील एकूण बांबू उत्पादनापैकी गडचिरोली, चंद्रपूर येथे 66 टक्के बांबूचे उत्पादन होते. त्यातील 85 टक्के बांबू बल्लारपूर मिलकडे आहे. खाजगी कंत्राटदार प्रति टन बांबू साठी रूपये 2500 मोजत असताना बल्लारपूर मिल मात्र फक्त 650 कोटी रूपये एवढीच रॉयल्टी आपल्याला देते. या बाबत आपण काय करणार आहात ? याबाबत देखील सभागृहाला माहिती मिळावी. याबाबत केंद्र शासनाने सक्सेना समिती स्थापन केली होती. या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी राज्य शासन कधी करणार आहे ? यातून आदिवासींचा फायदा होणार आहे, तो त्यांना कधी मिळवून देणार आहात ? यासंबंधी देखील आपण माहिती द्यावी असे मला आग्रहाने सांगायचे आहे.

कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला तर ते योग्य होईल. हा कायदा फार मोठा आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण स्वतंत्र कक्ष सुरू केला पाहिजे. आपण सतत मॉनेटरींग करावे. खऱ्या अर्थाने आदिवासींना लाभ मिळवून द्यायचा असेल तर याचा सातत्याने पाठपुरावा केला पाहिजे. जनजाती क्षेत्र उपयोजनेची नीट अंमलबजावणी केली तर आदिवासींना काही तरी दिले असे होऊ शकेल. यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून आपण मॉनेटरींग केले तरच आदिवासींना फायदा होऊ शकेल.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, या विषयावर भरपूर चर्चा झाली तरी आम्हाला समजले नाही. परंतु माननीय राज्यमंत्री ब्लँकेटच्या घोटाळयाबाबत बोलले म्हणून आम्हाला माहिती मिळाली. माननीय राज्यमंत्री म्हणतात ते खरे की, माननीय मंत्री म्हणतात ते खरे की, कुणी माहेश्वरी म्हणतात ते खरे? यामध्ये खरे कुणाचे हे आम्हाला समजत नाही. परंतु नक्की जे खरे असते ते बाहेर येत असते. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री म्हणतात म्हणून नव्हे तर आदिवासी विभागातील भ्रष्टाचारासंबंधी होत असलेली वक्तव्ये आम्ही ऐकत आहोत. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री, अर्थ मंत्री श्री. अजित पवार साहेब असे म्हणतात की, "आदिवासी विकास विभागाला जेवढा निधी दिला जातो तेवढा निधी थेट आदिवासीला दिला असता तर तो माणूस आज मोटार गाडयांमधून फिरला असता, एवढा पैसा खर्च करुन देखील आदिवासी आहे तिथेच आहे." माननीय श्री.अजित पवार साहेब असे बोलल्यानंतर संत साहित्याचे महान अभ्यासक माननीय मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे हे मागे कसे राहणार? ते म्हणाले की, आश्रमशाळांना आपण पोसत आहोत, अशा आश्रमशाळेमधून तहसीलदार, जिल्हाधिकारी बाहेर पडत नाहीत तर गुंड बाहेर पडतात. ही संतवाणी नाकारणार कशी? त्यामुळे आदिवासी विभागाला जास्तीत जास्त निधी देण्यात यावा त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये जास्तीत जास्त तरतूद करावी अशी मी नेहमी या सभागृहामध्ये मागणी करीत असतो.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करु इच्छितो की, माझ्याकडे पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या 33 माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. त्याचप्रमाणे नियम 260 अन्वये प्रस्ताव, नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा, अर्धा तास चर्चा असे सभागृहापुढील सर्व कामकाज आपल्याला संपवावयाचे असल्यामुळे आपण बाबीवर बोलून आपले भाषण लवकर संपविले तर बरे होईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना वेळेचे बंधन घालण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे मी प्रत्येक बाबीवर बोलत आहे,बाब सोडून बोललो असेल तर आपण मला सांगावे.

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे)** : आणखी 33 माननीय सदस्यांना देखील बोलावयाचे आहे एवढेच मी आपल्याला सांगितले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आपण दोन दिवस न ठेवता चार दिवस कां ठेवीत नाही? एकाच दिवशी 12 विभागांच्या मागण्या चर्चेकरिता ठेवून आपण आपले म्हणणे लवकर संपविण्यास सांगत आहात....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण मला या ठिकाणी चांगले मार्गदर्शन केले आहे...

**तालिका सभापती** : मी मार्गदर्शन केले नाही.

श्री. दिवाकर रावते : मी सचिव महोदयांना विनंती करतो की, या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर किती तास चर्चा होऊ शकते या बाबत आपण सभागृहाला मार्गदर्शन करावे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये दोन दिवसांमध्ये चर्चा संपवावी असे सांगितले जाते व त्या प्रमाणे आम्ही त्या निर्णयाला मान्यता देतो. मागील वेळी आम्ही एक दिवस वाढवून मागितला होता. सभापती महोदय, मला या ठिकाणी असे नमूद करावयाचे आहे की, ज्या मागण्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होत्या त्या समाविष्ट न करता बेकायदेशीररित्या, घटनाबाह्य पध्दतीने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सभागृहापुढे आणल्या आहेत. आपण या मागण्या मोठया प्रमाणावर निर्माण केल्या नंतर त्यावर चर्चा होणे स्वाभाविक आहे की नाही? त्याच प्रमाण् सभागृहाच्या कामकाज पत्रिकेमध्ये भरपूर कामकाज दाखविण्यात आले आहे. हे एक महिन्याचे कामकाज दहा दिवसात संपवावे असे आम्ही सरकारला सांगितले नाही. आपण 100 दिवस कामकाज करावे त्यामुळे प्रत्येक प्रश्नाला न्याय मिळेल, माननीय सदस्यांनाही न्याय मिळेल. त्याचवेळी अर्थसंकल्पाबरोबर शासनाच्या निर्णयाला देखील न्याय मिळेल. परंतु ते पळून जातात त्याला आम्ही काय करणार?

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब, सर्व माननीय सदस्यांना न्याय देता यावा या करिता आपण फक्त बाबीवरच बोलावे असे मी सांगितले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गरीब आणि आदिवासी कुटुंबाला प्रत्येकी दोन ब्लँकेट आणि दोन सतरंज्या देण्यात आल्या. या करिता आदिवासी विकास विभागाने गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यामध्ये 35 कोटी रुपयांची खरेदी टेंडर न काढता पंढरपूर येथील अहिल्यादेवी सहकारी घोंगडी उत्पादक संस्थेकडून केली. आदिवासी विकास विभागाने एका ब्लँकेटसाठी 522 रुपये 10 पैसे मोजले आणि बाजारामध्ये हेच ब्लँकेट 170 रुपयांना मिळते असे आम्हाला सांगण्यात आले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

तसेच ही ब्लँकेट बाजारातून 170 रुपये किंवा 175 रुपयांना खरेदी केली आणि हे आम्ही आमच्या मनाने सांगत नाही, तर आम्हाला जे सांगण्यात आले ते तुम्हाला सांगत आहे आणि आपण प्रत्येक ब्लँकेटसाठी 347 रुपये या प्रमाणे जास्त रक्कम दिलेली आहे. पण यासाठी टेंडर का काढण्यात आले नाही असा प्रश्न उपस्थित झाल्यावर सांगण्यात येईल की, जर ही ब्लँकेट सोसायट्यांना द्यावयाची असतील तर टेंडर शिवाय देता येत नाहीत अशा प्रकारे नियमामध्ये सर्व सोयी करण्यात आल्या आहेत.परंतु याबाबतीत ज्याच्यासाठी आपण सर्व नियम धाब्यावर बसविलेले आहेत असा कंत्राटदार कोण आहे? असा प्रश्न आहे. तसेच ब्लँकेटच्या दर्जाबाबत सांगावयाचे तर काल विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांना ब्लँकेट दाखविलेले आहे. त्यामुळे मी याठिकाणी घोंगडे आणण्याची गरज नाही.

सभापती महोदय, या आश्रमशाळांमधील आहार खर्च, साधनसामुग्री, विविध बाबींचा पुरवठा इ.साठी येणाऱ्या खर्चाकरता पुरवणी मागण्यांमध्ये 75 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आश्रमशाळांच्या बाबतीत काही जबाबदार माननीय मंत्री महोदयांच्या बाबतीत मी तुम्हाला सांगितले. मात्र 35 कोटी, 75 कोटी हे कसले घोटाळे आहेत? या राज्यातील सगळया आदिवासी माणसाच्या हितासाठी काम करताना भ्रष्टाचाराच्या घटना होत असल्याचे आपलेच माननीय राज्यमंत्री सांगत आहेत.सन्माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित साहेबांचे वक्तव्य काय होते ते मी पेपरमध्ये वाचले. परंतु माझा विश्वास बसला नाही. म्हणून मी माझ्या पध्दतीने हे खरे आहे की नाही याची खात्री करुन घेत होतो. अशा वेळी मला सांगितले की, आदिवासी विभागामध्ये मनमानीपणे करोडो रुपयांची खरेदी होते, त्याबाबतीत विश्वासातच घेत नाहीत. मात्र आदिवासी विकास विभागाने खर्च करुन आजही आश्रमशाळांची जी दुरावस्था आहे त्यावरुन तेथील परिस्थिती वेगळेच कथन करते.

सभापती महोदय, आमच्या माननीय राज्यमंत्री महोदयांनी शब्द सुध्दा बरोबर निवडलेले आहेत. 35 कोटी रुपयांच्या ब्लँकेटची खरेदी करताना निविदा न मागवता सोलापूरच्या एका ठेकेदाराला कंत्राट देण्यात आले. आम्हाला सोलापूरच्या बाबतीत कसे कळणार? त्यामुळे मला असे वाटते की, याठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावितसाहेबांनी जे वक्तव्य केले आहे ते तर आहेच. मघाशी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचेही वक्तव्य आहे. त्यानंतर सन्माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे साहेबांचे सांगितले आणि त्याबाबतीत माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात देखील आपल्या खात्याबाबत बोलताना मागे नव्हते. कारण ते असे म्हणाले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

की, गेल्या दहा-पंधरा वर्षामध्ये आदिवासी आश्रमशाळांचे परफॉर्मन्स् ऑडीटच झाले नाही. त्या ठिकाणी शिक्षणाचा दर्जा नाही. निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते आणि या खात्यामध्ये अमुक-अमुक होते असे म्हणून आमचे माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांना बदलण्यात आले. काँग्रेस पक्षाच्या मागणीनुसार बदलले. काँग्रेस पक्षाकडून या विभागाची मागणी करण्यात येत होती आणि उगाच माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांना दोष देत आहात. याबाबतीत खरे सांगावे. सन्माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांच्याकडून हा विभाग का काढण्यात आला?

सभापती महोदय, माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी असे सांगितले की,"ठाणे जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये मुलींच्या बाथरुमला दरवाजे नसतात आणि जर असले तर ती मोडलेले असतात. त्याचप्रमाणे आश्रमशाळांमध्ये मिळणारे शिक्षण आणि विद्यार्थ्यांना मिळणारे अन्न हे निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामुळे हा विभाग काय काम करतो असा आम्हाला प्रश्न पडलेला आहे. तसेच या सर्व गोष्टी विरोधी पक्षाचे कोणी बोलत आहेत काय? तर त्यांच्या बरोबर बसणारेच बोलत आहेत. हे सगळे असताना ज्या गोष्टी समोर येत आहेत तर अशा वेळी या खात्यामध्ये माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांना डावलून सन्माननीय सदस्य श्री.बबनराव पाचपुते यांना आणले, ते वारकरी आहेत. अशा वेळी काही झाले काय? असा प्रश्न स्वाभाविकपणे माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांनी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांना विचारला तर त्यांचे काय चुकले? माननीय मंत्री श्री.विजयकुमार गावित यांनी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेबांना विचारले की नाही ?

सभापती महोदय, बाब क्र.150, उच्च व तंत्रशिक्षण विभागाबाबत सांगावयाचे तर कृषीतर विद्यापीठांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनाची थकबाकी प्रदान करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी मागणी करण्यात आली आहे.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी वेळोवेळी मुंबई विद्यापीठातील पेपर फुटीच्या अनुषंगाने विषय उपस्थित केलेला आहे. या पेपर फुटीमागे कोचिंग क्लासेस चालविणारे, पेपर सेट करणारे, डी.टी.पी.ऑपरेटर असून आता हे सगळे प्रकरण समोर आलेले आहे. पण या गोष्टी आपल्यासमोर आल्यानंतर आपण काय करीत आहोत हा प्रश्न आहे. पुढच्या वेळेस मुंबई विद्यापीठामध्ये परीक्षेच्या वेळी पेपर फुटणार नाहीत अशी माननीय उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री श्री.डी.पी.सावंत राज्याला खात्री देऊ शकतात काय असा प्रश्न आहे.मात्र ज्या-ज्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारची हमी दिली तेव्हा पुढच्या आठवड्यात पेपर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ 02:55

फुटलेले आहेत. जर आपण आता तशा प्रकारची हमी दिली तर पुढच्या वेळेस पेपर फुटणार नाही कारण परीक्षाच होत नाहीत. सन्माननीय मंत्री महोदय, डॉ.विजयकुमार गावित साहेबांना पटलेले आहे. याबाबतीत तुम्हाला काही वक्तव्य करावयाचे असेल तर सांगावे, मी पटकन वाचून दाखवितो.

सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, परवा माननीय राज्यपालांनी सांगितले की, आपण 9 विद्यापीठांसाठी प्र-कुलगुरु नेमले पाहिजेत. नऊ विद्यीपीठांसाठी प्र-कुलगुरु नाहीत. आता विद्यापीठांचा कारभार, व्याप एवढा वाढत आहे. त्याठिकाणी एक कुलगुरु असणे पुरेसे होत नाही. तसेच आपण आपल्या कायद्यामध्ये प्र-कुलगुरुंची नेमणूक करण्याची व्यवस्था केलेली आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पण ती व्यवस्था शासन का करीत नाही ? ती पदे आपण भरणार का या बाबतीत माननीय मत्री महोदयांनी सांगावे.

आपली इंजिनिअरींग आणि बाकीची इतर कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी इतर मागासवर्ग आणि अनुसूचित जातीच्या मुलांच्या फीचा प्रश्न आहे. आता कॉलेजेस त्या मुलांकडून फी घेतात. आपले सामाजिक न्याय विभाग 3-3 वर्षे फी देतच नाही. उच्च व तंत्रशिक्षण विभाग सांगते की, ती आमची जबाबदारी नाही, ती सामाजिक न्याय खात्याची जबाबदारी आहे. शेवटी उच्च व तंत्रशिक्षण विभाग या कॉलेजसना परवानगी देत असल्यामुळे आपण त्यांचे पालक आहात. आपल्या खात्याची ती जबाबदारी आहे. समाजकल्याण खात्याकडून जी फी त्यांच्याकडे जात नाही ती त्यांना मिळवून देण्याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. आपण सरकार म्हणून घोषणा करतो पण त्यांना फी मिळत नाही. सन 2011-2012 ची देयके संबंधित विभागाकडे सादर झालेली आहेत परंतु ती देयके पुढे पाठवित नाहीत. इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती देयकांची प्रतिपूर्ती अद्याप केलेली नाही. हा विषय अत्यंत महत्वाचा विषय आहे. एमबीए, बी.ई. पॉलिटेक्निक, ॲनिमेशन असे विविध अभ्यासक्रम आहेत. मी त्याच्या जास्त डिटेलमध्ये जात नाही.

सभापती महोदय, यानंतर मी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 144 वरील बाब क्रमांक 148 बाबत बोलणार आहे. काल मी नेमक्या पाचच बाबींवर बोललो तेव्हा सत्ताधारी बाकांवरुन असे सांगण्यात आले की, विरोधी पक्ष नेते काही बोलतच नाहीत. तुम्हाला पाहिजे तर मी आज बोलतो. सभापती महोदय, आपण सुध्दा त्यांच्या बरोबर होता. काल मी मोजक्या पाच बाबींच्या संदर्भात बोलून माझे भाषण संपविले. त्यानंतर विरोधी पक्ष नेते काहीच बोलत नाहीत असे सत्ताधारी पक्षाकडून सांगण्यात आले. त्यामुळे मी बऱ्याच बाबींवर बोलणार आहे.

**तालिका सभापती** (श्री. विनायक मेटे ) : उलट काल नेमक्या बाबींवर नेमक्या शब्दात बोलल्याबद्दल माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे कौतुक केले.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बाब क्रमांक 148 अंतर्गत एकात्मिक टेक्सटाईल पार्कसाठी 57 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हे टेक्सटाईल पार्क आपण कोठे करणार आहात, कापूस कोठे पिकतो ? कोकणामध्ये औष्णिक वीज प्रकल्प आणण्याचे कारण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. विनोद तावडे .....

असे सांगितले जाते की, समुद्रातून कोळसा येत असल्यामुळे वाहतूक भाडे स्वस्त पडते. कापूस कोठे पिकतो आणि टेक्सटाईल पार्क कोठे दिले जाते, यामध्ये वाहतुकीचा प्रश्न येत नाही का ? वाहतूक हा विषय जर एवढा महत्वाचा असेल तर टेक्सटाईल पार्क कापूस उत्पादक भागामध्ये होणे महत्वाचे आहे. जर त्या ठिकाणी टेक्सटाईल पार्क होत नसतील तर ते बरोबर नाही. 2006-2007 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये वस्त्रोद्योग धोरणाचा उल्लेख झाला होता. 2007-2008 ते 2010-2011 पर्यंत पाच वर्षे वित्त मंत्र्यांनी वस्त्रोद्योग धोरणाविषयी चकार शब्द काढला नव्हता. 2011-2012 मध्ये 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही. तरतूद केल्याचे सांगितले पण अंमलबजावणी झाली नाही. गेल्या वर्षी 41 लाख 25 हजार हेक्टर जमिनीवर कापसाची लागवड झाली. कापसाचे एवढे मोठे क्षेत्र असताना त्यातून निर्माण होणाऱ्या कापसावर योग्य प्रक्रिया उद्योग शासनाने न उभारल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडले. त्यानंतर आपण 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देतो किंवा बाकीच्या गोष्टी करतो. हे जर केले नाही तर आत्महत्या होतात. श्री. नरेंद्र जाधव यांचा अहवाल आपण मागविला होता. त्यांनी सुध्दा हेच सुचविले होते. त्यांनी आपला अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी अशा पध्दतीने केले पाहिजे असा उल्लेख केला होता. 2006-2007 पासून शासन जे म्हणत आहे ते टेक्सटाईल पार्क उभे केलेले नाहीत. हे टेक्सटाईल पार्क त्या त्या कापूस उत्पादक जिल्ह्यात उभे करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभागामध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत जे बाल गुन्हेगार आहेत त्यांना सुधारण्यासाठी बाल सुधारगृहात ठेवले जाते. बाल सुधारगृहात ठेवलेली मुले 18 वर्षाची झाल्यानंतर त्यांना तेथून बाहेर पाठविले जाते. 18 वर्षाचे होऊन बाहेर गेल्यानंतर त्यांचे पुढे काय होते याची कोणालाही काही माहिती नसते. माझा आग्रह आहे की, बाल सुधारगृहातील जी मुले 17 वर्षाची झालेली आहेत त्यांचे शेवटच्या वर्षात कौन्सिलिंग करणे, त्यांच्यामध्ये कोणते कौशल्य आहे, पुढे तो कोणती नोकरी करु शकतो हे पाहिले पाहिजे. त्यांना रेशन कार्ड मिळत नाही, त्यांना मतदार ओळखपत्र मिळत नाही. ते बाहेर समाजामध्ये गेल्यानंतर त्यांच्याकडे कोणी काही पुरावे मागितले तर ते त्यांना देत येत नाहीत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आणि अक्षरशः ते स्वत:ला अपंग समजतात. त्यांना असे वाटत असते की, माझी बाहेर काय ओळख आहे, माझे नाव दर्शविणारा माझ्याजवळ काही तरी पुरावा असावयास पाहिजे, पण तसा पुरावा त्यांच्याकडे नसतो. बाल सुधार गृहातून ते बाहेर आल्यानंतर त्यांना जे प्रमाणपत्र दिले जाते त्याच्या आधारावर बी.पी.एल.चे कार्ड दिले पाहिजे, रेसिडेन्टचा पुरावा दिला पाहिजे.

17 वर्षे बाल सुधार गृहामध्ये राहिल्यानंतर त्या कालावधीमध्ये त्यांनी जे कौशल्य प्राप्त केलेले असते. ही मुले 18 वर्षानंतर बाहेर कोणता उद्योग करु शकतात, शिक्षण घेऊ शकतात याबाबत या मुलांचे कौन्सिलिंग केले पाहिजे. सामाजिक संस्था त्यासाठी पुढाकार घेऊ शकतात काय ते पाहिले पाहिजे. सागर नावाच्या मुलाने यासंबंधी सर्व्हे केल्यानंतर दिसून आले की, या बाल सुधार गृहातून बाहेर पडलेल्या मुलांपैकी 60 टक्के मुले पुन्हा गुन्हेगारीकडे वळतात आणि मुली दुर्दैवाने वेश्याव्यवसायात जातात, त्या मुलींना पुढे कोणतेही भविष्य उरत नाही. त्यामुळे या मुलामुलींसाठी काही तरी वेगळी योजना करण्याची आवश्यकता आहे. त्यांना रेशन कार्ड व रहिवासाचा पुरावा देण्याची आवश्यकता आहे.

महिला व बालविकास विभागासंबंधी मी एकच मुद्दा मांडणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकतेच चेंबूर येथे एक नवीन बाल सुधार गृह भवनाचे उद्घाटन केले आहे. त्या ठिकाणी 4 पदे मंजूर आहेत, प्रत्यक्षात एकच पद भरलेले आहे. त्याच प्रमाणे त्या बाल सुधार गृहाची क्षमता 100 मुलींची असताना 200 मुलींना ठेवण्यात आले आहे. त्या सर्व मुली 18 ते 25 वर्षे वयोगटातील आहेत. तेथे 5 रेक्टरची आवश्यकता असताना 4 रेक्टर भरलेले आहेत. एका रेक्टरमध्ये संपूर्ण पुरुष भरलेले आहेत. आता तर तेथे पुरुष अधीक्षकाची नेमणूक केलेली आहे. महिलांसाठी हे सुधारगृह असल्यामुळे नियमानुसार महिला अधीक्षक नेमण्याची आवश्यकता आहे. एवढे चांगले भवन तेथे उभे केले असताना आवश्यक तेवढी पदे भरली जात नसतील तर ते भवन ज्या कारणासाठी उभे केले आहे त्याचा काहीही उपयोग होणार नाही. त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. मुंबईत सध्या नाईट क्लब चालू आहेत तेथे यातील काही मुली येत आहेत. त्याच्यातून वेगळ्या गोष्टी घडतात. त्यावर नियंत्रण राहू शकत नाही. या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवावयाचे असेल तर रिक्त पदे ताबडतोबीने भरण्याची आवश्यकता आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्रमांक 163 वरील सांस्कृतिक विभागाच्या बाब क्रमांक 163 वर मी माझे विचार मांडतो. मराठी चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी ही तरतूद केलेली आहे. या बाबीसाठी शासन कायमची तरतूद करु शकत नाही. हा सोहळा तर दरवर्षी होत असताना त्यासाठी बजेटमध्ये तरतूद केली जात नाही. पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद केली जाते. पुरस्कार सोहळ्यासाठी एवढे पैसे देत असताना जुन्या कलाकारांच्या मानधनासाठी तरतूद केल्याचे दिसत नाही. आजही 3-3 वर्षे या वृध्द कलाकारांना मानधन मिळत नाही. याच्या उलट नवीन नट्यांना मात्र मागील 2-4 वर्षात लगेच फ्लॅट दिल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यांची मी आता नावे सांगत नाही.

डोंबिवली येथे श्री.गंगाधरबुवा व्यास या नावाचे कीर्तनकार आहेत. शासनाकडे मानधन मिळण्यासाठी पात्र असलेल्यांची यादी तयार आहे. त्यातून अशा लोकांनाही मानधन दिले पाहिजे. म्हणजे एका बाजूला चित्रपट पुरस्कार सोहळ्यासाठी तरतूद केली जात असताना खऱ्या कलावंतांकडे दुर्लक्ष केले जात असेल तर शासन केवळ झगमगाटाच्या मागे आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरु नये. खऱ्या कलेला जोपासण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले होते त्या कलेकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. यावर मंत्री महोदयांनी आर्वजून प्रकाश टाकावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2012-2013 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथम नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 54 व 55 वर मी बोलणार आहे. दलित वस्तीमध्ये सुधारणा करण्यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एका दलित वस्तीपासून दुसऱ्या दलित वस्तीपर्यंत रस्त्याचे काम घेतले जाते. प्रत्यक्षात दलित वस्तीमध्ये ते काम होतच नाही. परंतु दलित वस्ती सुधारणा या शीर्षकाखाली रक्कम खर्च केल्याचे दाखविले जाते. जेथे दलित वस्ती आहे तेथेच ते काम करण्याची सक्ती शासनाच्या माध्यमातून झाली तर या निधीचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 03:10

श्री. अरुण गुजराथी...

नगर विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 45 वरील बाब क्रमांक 55मध्ये स्थानिक संस्थांनी जकातीचे पुन:स्थापन केल्यामुळे महानगरपालिकांना सहायक अनुदान प्रदान करण्याकरिता 45.85 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. जकात ही बुकबेस घ्यायची की ती टोल नाक्यावर वसूल करायची या संबंधीचा निर्णय शासनाने घ्यावयास पाहिजे. हा मुद्दा अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. नव्या मुंबईमध्ये बुकबेस जकात आहे. तसेच नगरपालिका, महानगरपालिकांच्या संदर्भात विशेषत: मुंबई महानगरपालिकेमध्ये अ, ब, क आणि ड असे चार विभाग केलेले आहेत. जेथे जकात घेतली जाते असे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. अन्य कोणत्याही राज्यात जकात घेतली जात नाही.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या पृष्ठ कमांक 102 वरील बाब क्रमांक 103 मध्ये सिमेंटचा बंधारा बांधण्यासाठी संबंधित असणारा खर्च भागविण्यासाठी 15 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी पाटबंधारे सुविधांची टंचाई कमी करण्याकरिता या रकमेचा विनियोग करण्यात येणार आहे. माननीय राज्यमंत्री महोदय श्री. गुलाबराव देवकर हे आमच्या जिल्ह्यातील आहेत. जळगाव जिल्ह्यातील रावेर, चोपडा, यावल हे तालुके डार्कझोन, ब्लॅक झोन म्हणून जाहीर झालेले आहेत. या तालुक्यांना देखील निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

मराठी भाषा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 171 वरील बाब क्रमांक 170 मध्ये भाषा संचालनालयासाठी दोन नवीन वाहने खरेदी करण्यासाठी व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी 12 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. या मराठी भाषा विभागाचे अस्तित्व अद्याप लक्षात आलेले नाही. हा विभाग सुरु केल्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. हा विभाग काय काम करतो हे लक्षात येणे महत्वाचे आहे. मराठी भाषा ही समृद्ध, संपन्न आणि समर्थ करण्याच्या संदर्भात या विभागाला एक नवीन दिशा द्यावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 163 वरील बाब क्रमांक 163मध्ये मराठी चित्रपट पुरस्कार वितरण सोहळयासाठी 1 कोटी 3 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. ही तरतूद कमी आहे असे वाटते. मराठी चित्रपटांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला तर

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 03:10

श्री. अरुण गुजराथी...

मराठी चित्रपट देखील इतर भाषातील चित्रपटांच्या स्पर्धेमध्ये अग्रभागी राहातील. आता मराठी चित्रपट हे हिंदी चित्रपटांच्या स्पर्धेत येत आहेत. म्हणून मराठी चित्रपटांसाठी शासनाने जास्तीत जास्त निधी देण्याचा विचार केला पाहिजे.

आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 137 वरील बाब क्रमांक 139 मध्ये मागासवर्गीय मुलांसाठी व मुलींसाठी शासकीय वसतिगृहाकरिता 30 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये आदिवासी किंवा मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह होणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारच्या वसतिगृहांसाठी शासनाने निधी वाढवून द्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 150 वरील बाब क्रमांक 154मध्ये अविकसित जिल्ह्यामध्ये नवीन शासकीय तंत्रनिकेतनांची स्थापना करण्यासाठी 8 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. या निधीचा विनियोग हिंगोली आणि मूर्तिजापूर येथील शासकीय तंत्रनिकेनांमध्ये यंत्रसामग्री व साधनसामग्री खरेदीसाठी करण्यात येणार आहे. विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे आयटीआयची मागणी भरपूर आहे. खाजगी आणि सरकारी आयटीआय कमी पडत आहेत. पहिल्या शिफ्टमध्ये, दुस-या शिफ्टमध्ये इतकेच नव्हे तर रात्री देखील मुले आयटीआयमध्ये शिकण्यासाठी येण्यास तयार आहेत. ज्या संस्था तिसरी शिफ्ट चालू करण्यास इच्छुक आहेत अशा संस्थांना तिसरी शिफ्ट चालू करण्यास परवानगी देण्याच्या विचार शासनाने करावा, एवढे बोलून आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जवळपास 4 हजार 600 कोटी रुपयांच्या मागण्या येथे सादर करण्यात आल्या आहेत. या पुरवणी मागण्या म्हणजे एक छोटे बजेट आहे.

सभापती महोदय, मी गृहनिर्माण विभागावर बोलणार आहे. सन 1993 मध्ये म्हाडाने अर्बन डेव्हपमेंट प्रोजेक्ट आणला होता. चारकोप, गोराई, मालवणी, वर्सोवा, मुलुंड, पाचपाखाडी, ठाणे या ठिकाणी 20 हजार घरे बांधण्यात येतील अशी जाहिरात देण्यात आली होती. अत्यल्प उत्पन्न गटासाठी 21 मीटर, अल्प उत्पन्न गटासाठी 25 मीटर, मध्यम उत्पन्न गटासाठी 30 मीटर, उच्च उत्पन्न गटासाठी 60 मीटर आणि अति उच्च उत्पन्न गटासाठी 100 मीटरचा प्लॉट लॉटरी पध्दतीने वितरित करण्यात येईल. ज्या लाभार्थ्यांना ही जागेची लॉटरी लागली त्यांनी म्हाडाकडे पैसे भरलेले आहेत. काही लाभार्थ्यांनी पैसे भरुन भूखंड ताब्यात घेतले तर काही लाभार्थ्यांनी पैसे भरले परंतु भूखंड ताब्यात मिळाले नाहीत. या जाहिरातीच्या माध्यमातून म्हाडाकडे जवळपास एक ते दीड हजार कोटी रुपये जमा झाले.

सभापती महोदय, सन 1993 मध्ये सीआरझेड कायदा आला त्यानुसार समुद्र किना-यापासून 500 मीटरपर्यंत घर बांधता येत नाही. त्यानंतर मॅन्ग्रोव्हजच्या ठिकाणी बांधकाम करता येणार नाही असाही कायदा आला. शासनाने जागतिक बँकेकडून 100 कोटी रुपये आणून हा प्रकल्प आणला होता. त्या ठिकाणी भराव टाकून रस्ते आणि इतर सुविधा करण्यात आल्या होत्या. परंतु गेल्या 20 वर्षात ज्यांनी पैसे भरले त्यांना भूखंड मिळालेला नाही आणि त्यांचे पैसे देखील मिळालेले नाहीत. सरकारने दिल्लीला जाऊन हे भूखंड सोडविण्यासाठी काही प्रयत्न केलेले नाहीत. मागील 20 वर्षापासून म्हाडाकडे हे पैसे पडून आहेत. म्हणजे गरिबांच्या पैशावर म्हाडाचा कारभार सुरु आहे. 20 वर्षापूर्वी जागेची किंमत किती होती, घरांची किंमत किती होती ? आज वाळू, सिमेंट, रेतीचे भाव किती आहेत ? 20 वर्षापासून गरीब माणसांचे पैसे आपल्याकडे ठेवून त्या पैशावर स्वत:साठी आदर्शसारख्या इमारती उभ्या करणार असाल तर आपण हे राज्य कोणासाठी चालवित आहोत असा माझ्यासमोर प्रश्न आहे. या संदर्भात मला माननीय मुख्यमंत्री



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

महोदयांकडून उत्तर पाहिजे. मागील 20 वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. लाभार्थ्यांचे पैसे अडकून पडले आहेत. त्यांना पैसे परत मिळालेले नाहीत आणि जागा देखील मिळालेली नाही. या जागा आपण केंद्र शासनाकडून सोडवून घेणार आहात काय , या संदर्भातील नियम बदलणार आहात काय, लोकांना त्यांचे पैसे व्याजासह परत करणार आहात काय ?

सभापती महोदय, मागे एकदा प्रश्नोत्तराच्या तासाला मी एक प्रश्न विचारला होता. परंतु प्रश्नोत्तराचा तास संपल्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांना उत्तर देता आले नव्हते. मुंबईमध्ये जे म्हाडाचे 62 प्लॉटस् आहेत. ते प्लॉटस् मागील दोन मुख्यमंत्री महोदयांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांना, आमदारांना खिरापतीसारखे वाटले. हे प्लॉटस् त्यांच्याकडून काढून 20 वर्षापूर्वी म्हाडाने ज्यांच्याकडून पैसे घेतले होते त्या भूखंडधारकांना प्लॉटस दिले तर त्यांना देखील न्याय मिळेल.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, महाराष्ट्रातील विशेषत: मुंबईतील भूखंड हे गरिबांसाठी आहेत की स्वत:साठी आहेत, या बाबतीत राज्य शासनाने आपली भूमिका या ठिकाणी स्पष्ट केली पाहिजे. या ठिकाणी गिरणी कामगारांच्या बाबतीत विचारणा केली गेली होती, त्यावेळी मी शासनाला सांगितले होते की, 100-100 एकर गिरण्यांची जागा बिल्डरांच्या घशात घातली आहे, त्यातील एक तृतीयांश जागा शासनाने ताब्यात घ्यावी आणि म्हाडाने त्या जागा विकसित कराव्यात. त्या प्रमाणे म्हाडा गिरण्यांच्या जागा विकसित करुन गिरणी कामगारांसाठी घरे उपलब्ध करुन दिली आहेत. अशा जमिनींवर घरे बांधून ती गिरणी कामगारांना मोफत देऊ शकतो. मी ज्या भूखंडाचा उल्लेख केला त्या भूखंडांचे श्रीखंड होऊन त्या जागा मोठया बिल्डरांच्या घशात घातल्या गेल्या आहेत. त्यांच्या घशात गेलेले श्रीखंड परत काढून ज्यांच्याकडून सदर भूखंडाचे आपण पैसे घेतले आहेत, त्यांना ते भूखंड परत देणार आहात काय या बाबतचा देखील खुलासा माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केला पाहिजे.

सभापती महोदय, म्हाडांच्या सदनिकांच्या किंमती मोठया प्रमाणात वाढविल्या जात आहेत. दोन वर्षापूर्वी अल्प उत्पन्न गटातील सदिनकेची किंमत 15 लाख रुपये एवढी होती, त्या सदनिकेची किंमत आता 27 लाख रुपयांपर्यंत गेली आहे. मध्यम उत्पन्न गटातील सदनिकेची किंमत 18 लाख रुपये होती, ती किंमत आता 40 लाख रुपयांपर्यंत गेली आहे. म्हाडा गरिबांसाठी घरे बांधते आहे की व्यवसाय करण्यासाठी बांधते आहे असा प्रश्न आमच्या सारख्याचा मनात उपस्थित झालेला आहे. म्हाडांच्या सदनिकांची किंमत कमी असावी या बाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे या गोष्टीचा देखील या सदनात शासनाकडून खुलासा प्राप्त झाला पाहिजे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग, पान क्रमांक 136, बाब क्रमांक 135 यावर मी माझे मत व्यक्त करणार आहे. या ठिकाणी एका गोष्टीचा जाणीवपूर्वक उल्लेख करतो की, या देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली आहेत. आजही आदिवासी समाज हा पारतंत्र्यात आहे. स्वातंत्र्याची फळे त्यांना आजही चाखता येत नाहीत असे म्हटले तर ते चुकीचे आहे असे मला वाटत नाही. केंद्र सरकारकडून मोठया प्रमाणात धान्य उपलब्ध करुन दिले जाते, ते धान्य आदिवासी, गरीब समाजापर्यंत पोहोचते काय, याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, दिनांक 13 डिसेंबर, 1946 रोजी घटना समितीमध्ये ठराव पास झाला होता की, आदिवासींसह सर्व कमकुवत घटकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी राज्य घटना कटिबध्द आहे, तर मग त्या घटनेची पायमल्ली आपणाकडून केली जाते आहे काय असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. आज देखील आदिवासी समाज आपल्या सोबत येतो आहे काय, तो आला आहे काय, येणार आहे काय या गोष्टीचे आत्मपरीक्षण सर्वांनी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आज कुपोषित बालकांसंदर्भात सांगावयाचे झाले तर सर्वसाधारण बालके 47 लाख 60 हजार 835 एवढी आहेत. मध्य कुपोषित बालके 12 लक्ष 13 हजार 701 एवढी आहेत. अति तीव्र कुपोषित बालके 1 53 हजार 63 एवढी आहेत. कदाचित आपल्याकडची संख्या वेगळी असेल. मला जी आकडेवारी उपलब्ध झाली, ती आकडेवारी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ही आकडेवारी नेमकी काय सांगते आहे? कुपोषण थांबविण्याबाबत शासनाला अनेक वेळा फटकारले आहे. ठाणे,जव्हार,मोखाडा,मेळघाट या विभागात कुपोषित बालकांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. या सभागृहात अशा प्रकारचा एखादा प्रश्न आला तर शासनाकडून तात्पुरत्या स्वरुपात उत्तर दिले जाते. शासन त्या वेळी वेळ मारुन पुढे निघून जाते. परंतु कोंबडे कितीही झाकून ठेवा ते आरवल्या शिवाय रहात नाही. ही गोष्ट शासनाने विसरता कामा नये. विशेष घटक योजना, घरकुल योजना, ठक्करबाप्पा योजना, आश्रमशाळा, वसतिगृहे, बालकगृहे, आरोग्य सुविधा देण्याच्या योजना अशा विविध योजनांचा लाभ आजही आदिवासी समाजाला मिळत नाहीत ही वस्तुस्थिती कोणी नाकारु शकत नाही. या गोष्टीचे दु:ख आणि वेदना निश्चितपणे आपणा सर्वांना असल्या पाहिजेत असे मला वाटते.

महोदय,आदिवासी प्रशिक्षण आणि संशोधन यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार 91 टक्के आदिवासी लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत ही गोष्ट आपल्यासाठी भूषणावह नाही. ज्या वेळेला दारिद्र्य रेषेखालील लोकांची यादी आम्हाला प्राप्त होते. 91 टक्के आदिवासी लोक दारिद्र्य रेषेखाली असतील तर राज्यात विकासाची कामे कोणासाठी केली जात आहेत हा खरा प्रश्न आहे.

यानंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

हा विकास कोणासाठी ? मंत्री म्हणून या राज्याचा विकास करण्याची जबाबदारी आपण घेतलेली आहे. परंतु सध्याचे चित्र पाहता " मंत्री तुपाशी आणि आदिवासी व गरीब जनता उपाशी " असेच म्हणावे लागेल. मंत्र्यांचे बंगले, पुढाऱ्यांचे बंगले अधिकाधिक वाढत आहेत. आदिवासी माणूस मात्र अधिकच गरीब होत चालला आहे. राज्यातील 91 टक्के आदिवासी जनता ही दारिद्रयरेषेखाली आहे. दर तीन किंवा सहा महिन्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांनी आदिवासींच्या विकासासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्याचा आढावा घेणे जरुरीचे आहे. प्रतिवर्षी किती टक्के आदिवासी माणूस दारिद्रय रेषेच्यावर आला याचा आढावा घेणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी यामध्ये स्वत: लक्ष घातले तर अधिक चांगले होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, या सदनात आदिवासींच्या विकासासाठी ज्या विविध वस्तू खरेदी केल्या जातात उदा.गहू,तांदूळ,कपडे,मच्छरदाण्या त्याबाबत अनेकवेळा चर्चा झालेली आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये या विविध वस्तूंची खरेदी केली जाते. या वस्तू खरेदी करताना बाहेर बाजारात या वस्तूंचे दर काय आहेत आणि शासन काय दराने या वस्तू खरेदी करीत आहे हे पाहिले जाते काय असा माझा प्रश्न आहे. या वस्तूंच्या खरेदीवर नजर टाकली तर " खरेदीच्या माध्यमातून पुढारी आणि अधिकारी यांचा विकास आणि आदिवासी मात्र भकास "असे चित्र निर्माण झाले आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. शोषित आणि पीडित असा जो आदिवासी समाज आहे त्याचा विकास करण्यासाठी शासन भविष्यात काय प्रयत्न करणार आहे हे स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, 356 आदिवासी वाडया आणि गावांमध्ये रस्त्यांचे डांबरीकरण झालेले नाही. सदनामध्ये अनेक वेळा आदिवासींच्या विकासावर चर्चा होते. आम्ही घसा फोडून विचार मांडायचे आणि मंत्र्यांनी उत्तर देऊन निघून जायचे. पुन्हा पुढील अधिवेशनात त्याच विषयावर चर्चा तेच तेच प्रश्न आणि पुन्हा मागचीच उत्तरे असे चित्र दिसते.

सभापती महोदय, स्वातंत्र्यानंतर आज जवळजवळ 60 वर्षे झाली तरीसुध्दा आदिवासी समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण 23.8 टक्के इतकेच आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रातील आणि देशातील एका प्रगतीशील राज्याचे हे चित्र आहे. 23.8 टक्के आदिवासी जनता साक्षर आणि 91 टक्के आदिवासी जनता ही दारिद्रयरेषेखाली आहे.

.....2

श्री. रामदास कदम.....

सभापती महोदय, 62.5 टक्के आदिवासी विद्यार्थी 10 वीच्या पुढे शिक्षण घेत नाहीत. 18 ते 25 वयोगटातील फक्त 5 टक्के आदिवासी मुले उच्च शिक्षणासाठी जातात. आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीमधील हे वास्तव आहे. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मागील अधिवेशनात सांगितले होते की, " जहाँ का बच्चा भूखा हो, वहाँ की जवानी क्या होगी ". सभापती महोदय, जे सर्वेक्षण केलेले आहे त्यात असे आढळून आले की, राज्यामध्ये 86 टक्के आदिवासी जनता ही कच्च्या घरामध्ये राहते. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, अनेक योजना केवळ कागदावर आहेत. आदिवासींच्या विकासासाठी अनेक वस्तूंची खरेदी केली जाते, योजना जाहीर केल्या जातात परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते आणि त्या योजना कृतीमध्ये किती उतरविल्या जातात हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, गेल्या 17 वर्षामध्ये आदिवासींच्या विकासासाठी असलेले 8239 कोटी रुपये इतर विभागांसाठी वापरण्यात आलेले आहेत. आदिवासी म्हणजे मुकी जनावरे त्यांचे कोण आहे ? हा पैसा कुठे जातो भ्रष्टाचार कोणत्या भागात होतो आणि हे पैसे कोणाच्या घशात जातात कोणाच्या खिशात जातात याचा शोध घेतला पाहिजे. आदिवासी भागामध्ये रस्त्यांची कामे केली जातात परंतु या कामासाठी पैसा सार्वजनिक बांधकाम विभागात दाखविला जाणार नाही तर तो आदिवासी विभागात खर्च झाला असे दाखविले जाते.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

याची उत्तरे यापूर्वी सभागृहात दिलेली आहेत, पहिल्यांदाच हा प्रश्न निर्माण झाला अशातला भाग नाही. याची माननीय मुख्यमंत्री दखल घेतील अशी अपेक्षा बाळगतो व जो निधी वाढवून मागितला आहे तो वाढवून द्यावा. मी अनेक आदिवासी पाडे, आश्रमशाळा व वसतिगृहांनाही भेटी दिल्या. ते वास्तव पाहिले तर अतिशय भयानक असून प्रगतीशील महाराष्ट्राला शोभनीय नाही.

महोदय, मराठी भाषेसंबंधी बाब क्र. 52, पृ.क्र. 41 च्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, यापूर्वी एक दोन बाबी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. या सभागृहात मराठीवर सविस्तर चर्चा होऊन जाऊ दे, अशी माझी माननीय विरोधी पक्षनेते व गटनेत्यांना विनंती आहे. आज मुंबईतील शिक्षणाची अवस्था अत्यंत भयावह आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, सन 2009 मध्ये मराठी शाळांमध्ये 1 लाख 7 हजार 413 एवढी मुले शिकत होती. सन 2010 मध्ये 1 लाख 2 हजार 214 इतकी मुले होती. हिंदी माध्यमातील शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांची संख्या पाहिली तर सन 2009 मध्ये 1 लाख 13 हजार 726 एवढी मुले शिकत होती आणि सन 2010 मध्ये 1 लाख 16 हजार 739 एवढी मुले शिकत होती. यावरुन मराठी मुलांपेक्षा हिंदी भाषिकांची संख्या वाढते अशी अवस्था आहे. राज्याच्या बाबतीत विचार केला तर 19 हजार शाळा आजही भाड्याच्या खोलीत भरविल्या जातात, त्यासाठी आपण निधीची तरतूद करणार की नाही याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. तसेच मुंबईत मराठी शाळा का बंद पडत आहेत याचा विचार करुन शासन त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणार आहे काय याचेही उत्तर मिळाले पाहिजे.

महोदय, जलसंधारण विभागाच्या बाब क्र. 103, पृ.क्र.102 या मागणीच्या संदर्भात मला तर असे वाटत होते की, आमच्या कोकण प्रदेशातील पाटबंधारे मंत्री झाल्याने आमच्या कोकणचा विकास नक्की होणार. सर्वात पहिल्यांदाच मीच त्यांचे फोनवरुन अभिनंदन केले होते. तेव्हा मला वाटले होते की, कोकणचे दुर्दैव आता संपले. पण परिस्थिती मात्र नेमकी त्याच्या उलट झाली. कोकणचा सिंचन विकास तर दूरच राहिला पण जी रक्कम कोकण सिंचनासाठी होती ती देखील पश्चिम महाराष्ट्रात जाऊ लागली. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या नावाने 19 हजार कोटीचा खर्च झाला पण त्यातून आमच्या कोकणात कोणताच विकास झाला नाही. त्यामुळे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

माझी मागणी अशी आहे की, उर्वरित महाराष्ट्रमध्ये आम्हाला न ठेवता स्वतंत्र करुन द्यावा. तसेच सिंचनाच्या अनुशेषाबाबत यापूर्वी दांडेकर समिती नेण्यात आली होती. पण आता मागणी नसताना देखील केळकर समितीची नियुक्ती करण्यात आली. अशा प्रकारे समित्या नेमून प्रत्यक्ष विकास न करता केवळ समाधान करण्याचा प्रयत्न हे शासन करीत आहे असे मला वाटते.

मागील दहा वर्षात कोकणातील सिंचनाबाबत केवळ उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातूनच नव्हे तर माननीय राज्यपालांनी सुध्दा निर्देश दिले होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. रामदास कदम .....

शासनाने कोकण सिंचनासाठी 500 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. त्यावेळी आपण माननीय राज्यपाल महोदयांची अनुमती घेतली होती काय ? कोणाला विचारुन ही घोषणा केली होती ? निवडणुकीच्या तोंडावर कोकणाला सिंचनासाठी 5-6 कोटी रुपयांचे गाजर दाखवावयाचे व निवडणुका संपल्यानंतर सांगावयाचे की, याचे वाटप माननीय राज्यपाल महोदय करतात. अशाने तुमच्यावर कोण विश्वास ठेवणार आहे ? कोयनेचे 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळत असते. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना सांगून सांगून आम्ही थकलो आहोत. कोकणाने या शासनाचे कोणते घोडे मारले आहे ते काही समजत नाही.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी असे फसवले की, त्यांनी कोयनेचे पाणी अडवण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना चिपळूणला माझ्याकडे पाठवले. यासंदर्भात पाच बैठका झाल्या होत्या. नंतर त्यांनी मला सांगितले की, तुम्ही प्रत्येक साईटला अधिकाऱ्यांना घेऊन भेट द्या. मी पुढे, अधिकारी सोबत, बरोबर गाड्यांचा ताफा अशा सर्व सर्कसला बरोबर घेऊन साईट पहात फिरलो त्यामुळे आमचे कोकणवासीय खुश झाले. कोकणातील जनतेला वाटले आता आम्हाला कोयनेचे पाणी मिळणार. कोकणी माणूस खुश झाला परंतु आता तो फूस झाला आहे.

सभापती महोदय, विधानसभेत कोकण सिंचनासाठी 1000 कोटी रुपये देण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले होते. असे असतांना आपल्या आश्वासनाला आपल्याच हातांनी हरताळ फासता ? संपूर्ण महाराष्ट्रापेक्षा कोकणात सर्वात जास्त पाऊस पडत असतो. राज्यात जेवढा पाऊस पडतो त्यातील 42 टक्के पाऊस एकटया कोकणात पडत असतो. सगळयात जास्त पाऊस पडत असतांना देखील सर्वात जास्त दुष्काळाचा सामना कोकणातील जनतेलाच करावा लागतो आहे. त्यामुळे कोकणाच्या सिंचनासाठी माननीय तटकरे साहेब आपण काय करणार आहात ? कोयनेचे पाणी अडवण्यासाठी कोकणाला पैसा देणार आहात की, नाही ? नाही तर एक दिवस तुमची लाल दिव्याची गाडी कोकणात येऊ दिली जाणार नाही मग काय होईल ते होवो. कोकणाच्या विकासाला पैसा का दिला जात नाही ?

सभापती महोदय, शिवशाहीच्या काळात कोकणामध्ये 35 पाटबंधारे योजना मंजूर करुन ती

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

कामे सुरु केली होती. परंतु आमचे शासन गेल्यानंतर ही 35 कामे ठप्प पडली. आपण आपल्या सासुरवाडीला आश्वासन दिले होते की, कोयना धरणासाठी मी पैसे देईन. परंतु माननीय तटकरे साहेब, कोयना धरणाचा पैसा आता कोठे गेला आहे ? आज तुमच्या सासुरवाडीला सुध्दा पाणी नाही. आम्ही नाही तर नाही, तुमची बायको पाण्याच्या संदर्भात तुम्हाला दम देत नाही काय ? सभा घ्यावयाच्या, भाषणे द्यावयाची,लोकांना गंडवायचे हे आता तरी तुम्ही करु नका. तुम्ही किमान सासऱ्याला तरी गंडवू नका. आम्हाला कोकणी माणसांकडून अशा प्रकारची अपेक्षा नव्हती.

सभापती महोदय, कोकणाच्या संदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय राहणार आहे ? कोकणाच्या सिंचनासाठी, कोकणातील पाणी अडवण्यासाठी कोकणाला पैसा दिला जाणार आहे की,नाही ? यासंदर्भात भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री बसलेले आहेत. नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 45 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. नवी मुंबई येथे शहर अभियंता श्री.इगातकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन महानगर पालिकेत ठेकेदारांना हाताशी धरुन 8 कोटी रुपयांचा ठेका मे.असोसिएट पी.एल.शिदोरे या कंपनीला दिला असून त्यांनी एकच काम तीन ठिकाणी वाटून दिलेले आहे. हे सर्व प्रकरण मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यास तयार आहे. या ठिकाणच्या सल्लागाराचा या प्रकरणात हात आहे. मीरा-भाईंदर येथे रेट कमी आहे म्हणून दाखवले व नकाशा बनवणे तसेच इतर काम मिळून 5 कोटी रुपयांचे काम असतांना त्याची 8 कोटी रुपयांची बिले काढली. स्टँडींग कमिटीचे माझ्याकडे सर्व इतिवृत्त आहे. मीरा-भाईंदर पेक्षाही कमी रेटने काम दिलेले आहे असे त्यांनी सांगितले होते परंतु मी येथे मीरा भाईंदरचे रेट सुध्दा दिलेले आहेत. खरे म्हणजे त्यांनी मीरा भाईंदरपेक्षा डबलचे रेट लावले आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

8 कोटी रूपयांचा चुना त्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेला लावला आहे. हे सगळे प्रकरण मी आपल्याकडे देत आहे. या प्रकरणाची पोलीस ठाण्यामध्ये देखील तक्रार करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये कशा प्रकारे भ्रष्टाचार होत आहे हे आपण पहावे. मुंबई महानगरपालिका शिवसेनेकडे असल्यामुळे कुठल्या ना कुठल्या प्रकारे चौकशी करण्यापेक्षा आपण थोडे तरी आजूबाजूला पहावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे. या सगळ्या बाबीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी बालकाश्रमासंबंधी बोलणार आहे. आपण 500 बालकाश्रम मंजूर केले आहेत. यात जवळ जवळ 500 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. त्या संबंधातील सगळी कागदपत्रे माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविली होती. 5-10 बालकाश्रम कमी झाले होते. त्यातील 1-2 बालकाश्रम कोकणासाठी द्यावेत अशी मी विनंती केली होती. त्याबाबत देखील अद्याप पर्यंत निर्णय झालेला नाही. यामध्ये देखील सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1वर बोलण्यासाठी उभा आहे. मी फक्त एकाच बाबीवर बोलणार आहे. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे काल पुरवणी मागण्यांवर जे बोललो होतो त्याचा पुनरूच्चार करीत आहे. याबाबत माझी माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहेत.

पुरवणी मागण्यांमध्ये किती रूपयाची तरतूद करावी हे घटनेमध्ये लिहिलेले आहे. .....(अडथळा)......श्री.मेटे साहेब आपण वकिली करण्यासाठी आहात हे माहिती आहे. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.रामदास कदम (बसून) : आपण वकिली शब्द रेकॉर्डवरून काढायला सांगावा.

श्री.जयंत प्र.पाटील : मी सुरूवातीलाच काय म्हणालो हे ऐकले नाही. राष्ट्रवादी पक्षाची बाजू घेण्यासाठीच आपल्याला सभागृहात पाठविले आहे असे मला वाटते.

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आपण एवढे ओरडू नका. मी मूळ मुद्यावर येतो. आपण काळजी करू नका.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी माननीय सदस्यांचे नाव घेऊन बोलू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्यांनी नाव घेतले तर चालते काय ? मी माननीय मुख्यमंत्र्यांना उद्देशून बोललो होतो की, मी काल जे बोललो होतो त्याची पुनरावृत्ती आपण सभागृहात उपस्थित असल्यामुळे करीत आहे. आपण मला कशाला चिडवत आहात ?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, त्यांनी पक्षाचे नाव घेतले नव्हते. कोणतेच नाव घेतले नव्हते. विनाकारण नको त्या गोष्टी येथे कशाला आणत आहात ?

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, मी बोलतो म्हणून मला कशाला चिडवत आहात ? ते राष्ट्रवादी पक्षाची वकिली करतातच. मी माझ्या पक्षाची वकिली करतो. ....(अडथळा)..... आपण काय बोलत आहात ? कशासाठी ओरडत आहात ? मी बोलत आहे. आपण मागाहून ओरडावे. मग कळेल की, आपल्यामध्ये किती दम आहेत ते. सभापती महोदय, राष्ट्रवादी हा शब्द वाईट आहे काय ? हा शब्द असंसदीय आहे काय, असल्यास, मी खाली बसतो. त्याबाबत माझे काहीही म्हणणे नाही. .....(अडथळा) ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, पक्षाची वकिली हा शब्दप्रयोग वापरणे योग्य आहे काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा शब्द आपण नेहमी वापरतो. मी कुठलाही असंसदीय शब्द वापरलेला नाही. मी कालच्या भाषणाची पुनरावृत्ती करीत आहे एवढेच म्हणालो आहे.

**उप सभापती** : राष्ट्रवादीची वकिली हा शब्द रेकॉर्डवरून काढून टाकावा.

श्री.जयंत प्र.पाटील : तो अधिकार आपला आहे. त्यावर मी काही बोलणार नाही. राष्ट्रवादीमध्ये देशभक्ती देखील आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलू दिले पाहिजे.

**उप सभापती** : बोलू दिले पाहिजे ही विनंती झाली की, दादागिरी झाली.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी बसून सन्माननीय सदस्यांना विनंती करीत होतो की, काल आपण बोलला आहात त्यामुळे पुन्हा आपण कशाला वेळ घेत आहात. यात आक्षेप घेण्यासारखे काय होते ? एवढे बोलल्यामुळे त्यांना मिरच्या झोंबण्याचे कारण काय आहे ?

यानंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे....

माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब आपण नेहमी अशापध्दतीने वागणे आणि बोलणे बरोबर नाही. आपण राजकीय हेतू मनामध्ये ठेवून अशा प्रकारे बोलणार असाल तर आम्ही देखील खपवून घेणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी सुध्दा खपवून घेणार नाही. आपण हे कुणाला सांगत आहात, आपण मला धमक्या देऊ नका. माझी देखील तयारी आहे, आपण हे कशासाठी करीत आहात? आपण मला असल्या गोष्टी सांगू नका.

(गोंधळ)

मला भरपूर कळते, मी असंसदीय शब्द वापरलेला नाही.

**उप सभापती** : मी सर्व माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया सभागृहामध्ये गोंधळ करु नये. प्रथम आपण सर्वांनी खाली बसावे व शांतता पाळावी. आपल्याला जर काही म्हणणे मांडावयाचे असेल तर आपण हात वर करुन परवानगी मागितल्यानंतर व मी आपणास परवानगी दिल्यानंतरच आपण बोलावे. इतकेच नव्हेतर सभागृहामध्ये चित्र विचित्र आवाज काढणे देखील योग्य नाही, इकडच्या बाजूने काढण्यात आलेला आवाज आक्षेपार्ह आहे असे मी आपणास सांगतो.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : आपण कृपया खाली बसावे, मी आपल्याला बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आपण आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी काल या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर माझ ो विचार मांडीत असतांना माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नव्हते, ते या राज्याचे प्रमुख आहेत. या पुरवणी मागण्यांच्या बाबतीत एक घटनात्मक गोष्ट घडली आहे असे मला वाटते. विधानसभेचे ज्येष्ठ माननीय सदस्य व आमचे नेते माननीय श्री. गणपतराव देशमुख यांच्याबरोबर मी काल चर्चा केली. त्यानंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी सभागृहामध्ये उपस्थित झालो. मी ज्या संदर्भात काल सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित केला होता त्याची पुनरावृत्ती करीत आहे. याचे कारण असे की, माननीय मुख्यमंत्र्यांकडून मला त्याचे काल उत्तर मिळावयास हवे होते ते मिळाले नाही.

सभागृहापुढे पुरवणी मागण्या मंजूर करण्यासाठी मांडीत असतांना त्या अर्थसंकल्पामधील मूळ मागणीपेक्षा दुप्पट असता कामा नयेत. आज अशी परिस्थिती आहे की, मूळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

अर्थसंकल्प बाजूला ठेवून अर्थसंकल्पातील मागण्यांपेक्षा जास्त पुरवणी मागण्या मंजूर केल्या जात आहेत. ज्या बाबीवर एकदा मागणी केली असेल त्या बाबीवर पुन्हा पुरवणी मागणी मागता येत नाही. माझे शिक्षण कमी आहे आणि मी आपल्यापेक्षा लहान आहे. परंतु माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे अभ्यासू आहेत, विधिमंडळाच्या संसदीय इतिहासामध्ये त्यांनी 50 वर्षे घालविली आहेत म्हणून मी त्यांच्याबरोबर चर्चा केली आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये बोलत असतांना मी आपला संदर्भ देतो. मी काल पासून घटनेतील पाने शोधत आहे. या ठिकाणी अर्थसंकल्प बाजूला ठेवून ठराविक लोकांचा चेहरा पाहून या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली जाते असा माझा आक्षेप आहे. हे दु:ख मला या ठिकाणी सतावीत आहे. माझे म्हणणे चुकीचे असेल तर मी माझे वक्तव्य मागे घेण्यास तयार आहे त्याबद्दल मला लाज वाटणार नाही. या ठिकाणी माझ्या अपेक्षेप्रमाणे मला उत्तर मिळू शकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी ते उत्तर पटलावर ठेवावे म्हणजे पुढील वेळी आम्ही चुकीचे काही बोलणार नाही एवढी मी या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी या ठिकाणी बाब क्रमांक 85 आणि पृष्ठ क्रमांक 86 या मागणीवर बोलणार आहे. या विषयावर बोलण्यासाठी माझे मित्र माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे त्यांचा वेळ देणार आहेत. दिनांक 28.3.2000 रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये तत्कालीन माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होते. त्यावेळी मी सिंचनाबाबत चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. सिंचन विभागासंबंधी असलेले माझे आक्षेप त्यावेळी सभागृहामध्ये मांडले. माझे काही आक्षेप हे उच्च न्यायालयामध्ये देखील खरे ठरले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

कोंडाण्याच्या बाबतीत मी मुद्दा मांडला आहे. मंत्रीमंडळाने एक निर्णय देऊन हाय कोर्ट त्याबाबत ताशेरे ओढणार म्हणून अगोदरच हाय कोर्टामध्ये कोंडाणा रद्द केला असे माननीय राज्यपालांना कळविले. नंतर कोर्टामध्ये असे सांगितले की, आता तो विषयच संपला आहे. त्यामुळे मला निर्णय देण्याची गरज नाही असे मी वर्तमानपत्रामध्ये वाचले. त्याबाबत मला अधिक काही माहिती नाही. मी जे आक्षेप घेतले आहेत ते मोठ्या प्रमाणात आहेत. या राज्यामध्ये गेली 10 वर्षे हा प्रकार सुरु आहे. मघाशी लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नोत्तरे सुरु होती. या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांनी लक्षवेधी सूचना अभ्यासपूर्ण मांडली. त्यामध्ये एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे हे त्यांनी पुराव्यानिशी मांडले आहे. आपण ते आपल्या चेंबरमध्ये ऐकले आहे की नाही हे मला माहिती नाही. मी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब आणि माजी विरोधी पक्षनेता माननीय श्री.पांडुरंग फुंडकर अशा दोन-तीन सन्माननीय सदस्यांनी याबाबत आक्षेप घेतला. मला सांगण्यास आनंद वाटतो की, याबाबत सन्माननीय मंत्री महोदयांनी आजची बाजू सत्य असल्याचे सदनामध्ये सांगितले. याठिकाणी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती आणि वडनेरे समितीने अहवालामध्ये देखील सांगितले की, या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबत एक तास चर्चा झाली. संबंधित अधिकाऱ्यांना सस्पेंड केले पाहिजे असा मूळ मुद्दा आहे. आता मी उलट जात आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उलटे जाऊ नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी लक्षवेधी सूचनेमध्ये एका एक्झीक्यटीव्ह इंजिनिअरची याबाबतीत चौकशी करुन आम्ही त्यांना सस्पेंड करु असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे.पण या फाईलचा प्रवास कसा चालला आहे? या फाईलचा प्रवास सचिवांकडून सुरु झाला आणि ती वरच्या सचिवांपर्यंत गेली. ही फाईल पुढे कशी गेली? यामध्ये एकच अधिकारी आहेत असे मला वाटत नाही. आता याठिकाणी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली असल्याने वेळेची मर्यादा येते. येथे गोंधळ झाला. पण सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी अभ्यास करुन बरेच मुद्दे मांडले. याठिकाणी सचिवांपासून सर्वांना सस्पेंड केले पाहिजे.

सभापती महोदय, या कामासाठी पाटबंधारे विभागाचे सचिव, सिंचन विभागाचे सचिव आणि पी.डब्ल्यू.डी.विभागाचे अधिकारी माननीय मुख्यमंत्र्यांना दोन-तीन वेळा भेटले.या विभागांचे सचिव हे आय.ए.एस.असावयास पाहिजेत. बाकीच्या राज्यामध्ये आय.ए.एस.अधिकारी आहेत. फक्त आपल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

राज्यात दोन खात्यांसाठी आय.ए.एस.सचिव नाहीत. मला असे वाटते की, मी आपल्याबरोबर चर्चा केली आहे. माननीय राज्यपाल यांच्याबरोबर चर्चा केली आहे. त्यावेळी त्यांनी देखील माझी भूमिका बरोबर असल्याचे सांगितले. माझी भूमिकाही तुम्हाला पटल्यासारखी वाटली. पण आघाडीचे सरकार आहे. तुम्हाला सगळयांना सांभाळून घ्यावे लागते. परंतु याठिकाणी मी जी भूमिका मांडली होती, ती का खरी आहे तर याठिकाणी आय.ए.एस.दर्जाचे सचिव असते तर हे घडले नसते. तसेच माझे चुकत नसेल तर याठिकाणी सदरहू विभागाला दोन सचिव आहेत. एक श्री.शिर्के आणि दुसरे श्री.पाटील आहेत. लोक म्हणतात की, शिर्के पेक्षा पाटील बरे आहेत अशा प्रकारची चर्चा आहे. मला यातील काही माहिती नाही. मी त्यांना कार्यालयामध्ये फोन केला. मी त्यांना सांगितले की, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील बोलत आहे. मी कधी आमदार वगैरे असे काही स्ांगत नाही. त्यांच्या पी.ए.ने फोन उचलला. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, साहेब, आल्यानंतर मला फोन करावयास सांगावे. तुमचा नंबर का आहे हे विचारले.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने सर्व अधिकाऱ्यांना आदेश दिले पाहिजेत की,कमीत कमी आमदारांचे फोन नंबर हे सचिव व अधिकारी यांच्याकडे असावयास पाहिजेत. आमचे मंत्री येथे बसतात आणि मंत्रीमंडळ जे या सदनाचे प्रतिनिधीत्व आमच्यावतीने करीत असते ते मंत्रीमंडळ आपल्याशी बांधलेले आहे.परंतु संबंधित अधिकारी जणू काही आम्ही कोणीच नाही अशा पध्दतीने आमच्याशी बोलत असतात.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यामुळे किमान आमदारांचे तरी फोन नंबर ठेवण्यास अधिकाऱ्यांना सांगावे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. मी त्यांना सांगितले पण त्यांनी आजपर्यंत मला फोन केला नाही. आता पध्दत बदललेली आहे. हे मालक झालेले आहेत. या ठिकाणी आमदार म्हणजे कोणी नाही. दोन-चार प्रतिष्ठित लोक आणि बाकीचे 10-20 मंत्री हेच या राज्याचे मालक आहेत. या पध्दतीने जर राज्यकारभार चालत असेल तर या राज्यकर्त्यांकडून जनतेने काय अपेक्षा कराव्यात ? जर या राज्यामध्ये आमदारांचा सन्मान होत नसेल तर या ठिकाणी कशा पध्दतीने काम करणार ?

सभापती महोदय, या राज्यामध्ये गेले तीन महिने ज्या पध्दतीने सिंचनाच्या बाबतीत चर्चा चालू आहे त्या बाबतीत मला दुःख होते. आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत. आम्ही शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत असे लोकांना सांगत असतो. त्या शेतकऱ्यांचे पाणी आपण सोडत आहोत. शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी नाही, शेतीसाठी पाणी नाही. त्यांचे पैसे राजरोसपणे लुटण्याचे काम ठेकेदारांकडून चालले आहे. ते थांबविण्याचे काम आपण या ठिकाणी केले पाहिजे. कारण जनतेने आपल्याला या ठिकाणी निवडून पाठविले आहे. हे योग्य व्यासपीठ आहे. या संदर्भातील वाभाडे आम्ही या ठिकाणी नाही तर कोठे काढणार ? आम्ही बोलत असताना आपण ओरडून जर आमचे बोलणे बंद करणार असाल तर ओरडून अपेक्षा पूर्ण होणार नाही. या ठिकाणी ओरडून, दबाव आणून जर कोणी आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते शक्य होणार नाही. या ठिकाणी तुम्हाला हे पाप लागेल. आज पाण्यावाचून जनता तडफडत आहे. मघाशी मी माननीय जलसंपदा मंत्र्यांबरोबर बोललो. ते म्हणाले की, कठीण परिस्थिती आहे. पंधरा दिवसांमध्ये जर पाऊस पडला नाही तर आपल्याला मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणार आहे, अशी परिस्थिती आहे.

या ठिकाणी 70 हजार कोटी रुपये सिंचनावर खर्च होत आहेत आणि आम्ही जर त्याची चर्चा करावयास लागलो या ठिकाणी तुम्ही आमच्या अंगावर येता, आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करता. आम्ही लहान आहोत म्हणून तुम्ही तसे करीत आहात. तुम्ही भरपूर मोठे आहात, तुमचा आवाज मोठा आहे. तुमची शक्ती मोठी आहे, तुमची ताकद मोठी आहे. तुमची पैशाची शक्ती मोठी

...2...

RDB/

श्री. जयंत प्र. पाटील .....

आहे. आम्हाला सगळे माहीत आहे. मी माझी प्रॉपर्टी प्रामाणिकपणे नॉमिनेशन फॉर्ममध्ये दाखविलेली आहे. श्री. माणिकराव ठाकरे यांना छाननीच्या वेळी मी म्हणालो की, माझी प्रॉपर्टी तुम्ही घ्या आणि तुमची प्रॉपर्टी मला द्या. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण अलिबागला आला होता. त्या ठिकाणी एकरी 20 कोटी रुपये जमिनीचा भाव आहे. सरकारी भाव एकरी 10 कोटी रुपये आहे. माझे सासरे अलिबागमधील मोठे जमीनदार होते. त्यांच्या जमिनीच्या उताऱ्यावर माझ्या पत्नीचे नाव आलेले आहे. मी म्हटले की, उगीच परत ब्याद नको. आमचे परममित्र श्री. तटकरे त्याबाबत बोलण्यासाठी आहेतच. म्हणून सगळी प्रॉपर्टी दाखविण्याचे मी ठरविले. माझ्या पत्नीला मिळालेला 20 एकर जागेचा हिस्सा ज्या जमिनीची किंमत अलिबाग शहरामध्ये 10 कोटी रुपये, तो हिस्सा आमच्याकडे आला. त्यामुळे मी 44 कोटी रुपयांची प्रॉपर्टी दाखविली. आम्हाला काही फरक पडत नाही. मी आयुष्यभर प्रामाणिकपणे राहिलो. मी प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न केला. म्हणून मला त्याची भीती वाटत नाही.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत जे वाभाडे निघालेले आहेत ते चिंताजनक आहेत. राज्यातील जनता त्याकडे चिंतेने बघत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण हे थांबवावे या अपेक्षेने राज्यातील जनता आपल्याकडे आहे. हे घोटाळे, हे सर्व प्रकार आपण थांबवावेत. प्रकल्पांची वाढणारी उंची, या वाढणाऱ्या उंचीबरोबर त्या प्रकल्पाची वाढणारी किंमत आणि त्यामधून अधिकाऱ्यांची आणि अधिकार असणाऱ्या लोकांची वाढणारी संपत्ती याकडे महाराष्ट्रातील जनता चिंतेने बघत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

धरणांची उंची किती वाढवावी, त्याचे एस्टिमेट किती असावे याला काहीच तारतम्य राहिलेले नाही.

मी नोटीस दिली नसल्यामुळे मी व्यक्तिगत बोलणार नाही. त्यामुळे माझ्या बोलण्यावर मर्यादा आहेत याची मला जाणीव आहे. मी ही सर्व कागदपत्रे माननीय राज्यपाल आणि माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिलेले आहेत. पुरवणी मागण्यांवरील चर्चा मर्यादित स्वरुपाची असते. त्यामुळे मी या विषयावर बोलणार नव्हतो. कारण पुरवणी मागण्यांवर एकूण 33 सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. सिंचन प्रकल्पाच्या अंदाजपत्रकांची चर्चा 2-3 तास चालू शकते. पण विधिमंडळाच्या परिसरामध्ये अशी चर्चा आहे की, शुक्रवारी हे अधिवेशन संपणार आहे. उर्वरित काळात अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात येईल. मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती केली होती की, सिंचन प्रकल्पांचा विषय अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये घ्यावा. परंतु त्यांनी प्रदूषण व इतर विषय सुध्दा त्यामध्ये समाविष्ट करावे लागतील असे सांगितले. त्यामुळे मी ही सर्व कागदपत्रे तातडीने घेऊन आलो. हे अधिवेशन केव्हा संपणार आहे ते मला माहीत नाही. परवा कामकाज सल्लागार समितीची बैठक होणार आहे. हा विषय चर्चेला येऊ नये याचा बंदोबस्त करण्यात आला आहे आणि त्यामुळे हे अधिवेशन लवकर गुंडाळण्यात येणार आहे अशी प्रेसमध्ये चर्चा आहे. त्यांचे ऐकल्यानंतर मी घाबरुन गेलो. माझे असे म्हणणे होते की, कमीत कमी हा विषय तरी सभागृहात उपस्थित झाला पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते मला म्हणाले की, आता चर्चेसाठी कोणतेच विषय राहिलेले नाहीत. मी 2-3 मंत्री महोदयांना विचारले असता हे अधिवेशन संपल्यासारखे आहे, सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झाली आहे. आता महत्वाचे विषय उरलेले नाहीत, असे त्यांनीही मला सांगितले आहे. परंतु माझी सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण पुरवणी मागण्यांवरील बाबीवरच बोलावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पान क्र.85 व 86 वरील जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 84 व 85 वर मी बोलत आहे. जलसंपदा विभागामध्ये प्रचंड घोटाळे झालेले आहेत, करोडो रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे. या गैरव्यवहाराबाबत विविध माध्यमांद्वारे राज्यात चर्चा चालू

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील...

आहे. ती चर्चा विधिमंडळाला शोभनीय नाही असे मला वाटते. आपण सर्वजण राज्य चालविण्याचे काम करीत असताना राज्यातील जनता आपल्याकडे वेगळ्या नजरेने बघत आहे. तुमच्याकडेही या घोटाळ्यातील हिस्सा पोहोचला काय, अशा दृष्टीकोनातून ही जनता आपल्याकडे बघत आहे. त्यामुळे या विषयावर आम्हाला चर्चा करावयाची आहे. मी जलसंपदा विभागाच्या बाबीसंबंधीच बोलत आहे.

सभापती महोदय, सिंचन प्रकल्पांच्या वाढत्या खर्चाबाबत चर्चा सुरु असतानाही मे.नोबल कंपनीला एस्टिमेट वाढवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्या संदर्भात मी मंत्री महोदयांशी फोनवरुन बोललो आहे. त्यांनी मला असे सांगितले की, असे झालेले नाही. तापरकुंड या धरणाची किंमत 32 कोटी रुपयांवरुन 190 कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. या धरणाबाबत मीडियात चर्चा झाल्यानंतरही श्री.एकनाथ पाटील आणि श्री.शिर्के यांच्यामार्फत एस्टिमेट वाढवून देण्याची फाईल मूव्ह होते. 2004 साली या धरणाची किंमत 32 कोटी रुपये इतकी होती. ती आता 190 कोटी रुपयांपर्यत पोहोचली आहे. महालक्ष्मी कंपनीला वाढीव किंमत देण्यासाठी ही तरतूद केली. त्यांना 32 कोटी रुपयाची ऑर्डर दिलेली असताना आणि त्यांनी एक इंचही काम केलेले नसताना पुन्हा त्याच पार्टीला 190 कोटी रुपयांनी एस्टिमेट वाढवून देण्याच्या फाईलचा मंत्रालयात प्रवास सुरु झ ाला आहे. मंत्रालयाला आग लागल्यामुळे तो प्रस्ताव थांबला आहे, अन्यथा या वाढीव एस्टिमेटमधून 100 कोटी रुपयांचा मलिदा खाण्याचे काम झाले असते. (अडथळा)

माझ्या बोटींची कोणीही चौकशी करु नये. माझ्या व्यवसायाची कोणीही चौकशी करावी. सिंचन प्रकल्पातून पैसे खाण्यासारखा माझा धंदा नाही. मी 25 वर्षांपासून हा व्यवसाय करीत आहे. मला ऑस्ट्रेलियातून 400 कोटी रुपयांची ऑर्डर आजच मिळालेली आहे. त्याबाबतची माहिती मी उद्या पटलावर ठेवतो. मला शासनाचे कोणतेही काम नको. एक काम करावयाचे होते म्हणून केले आहे. आम्हाला अनियमितता करावयाची असती तर रायगड जिल्ह्यातील अनेक कामांमधून करोडो रुपयांची अनियमितता केली असती. आम्ही सत्तेला लाथ मारुन बाहेर पडणारे आहोत. रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त मी आयकर भरतो. माझ्या मालकीच्या केवळ दोनच कंपन्या आहेत. त्यांची नावे मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे देतो, त्यांनी त्याची चौकशी करावी.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 04:05

श्री. जयंत प्र. पाटील...

माझे व्यवसाय या गोष्टींशी लिंकअप करु नका. सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यावर जास्त वेळ बोलत नाही. माझे भाषण मी थोडक्यात आटोपतो. माझ्या बरोबर विनाकारण वाद घालू नका.

सभापती महोदय, बोटींचा माझा धंदा आहे हे मी छातीठोकपणे सांगतो. पण तुमचा धंदा काय आहे हे मला सांगावे. माझ्या चार कंपन्या आहेत. पण तुमच्या कंपन्या कोठून आल्या ? माझ्या कंपन्यामध्ये करोडो रुपयांचा व्यवहार चालतो. पत्रकारांनी मला विचारले नाही. मी सुध्दा एक छोटा पत्रकार आहे. मी सुध्दा वर्तमानपत्रातून लिहितो. मी पत्रकारांकडे जात नाही, मीडियाकडे जात नाही. माझ्या भगिनी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे ह्या माझ्या मदतीला धावून येतील असे मला वाटले होते. मी त्यांना फोन करीत होतो. परंतु तो नॉट रिचेबल येत होता. त्या कोणत्या दौ-यावर होत्या मला माहीत नाही. प्रत्येक गोष्टीत मला साथ देणा-या माझ्या भगिनी डॉ.नीलम ताई गो-हे माझ्या मदतीला आल्या नाहीत.

सभापती महोदय, नवीन प्रकल्प न घेण्याचे बंधन माननीय राज्यपालांनी राज्य शासनावर घातलेले आहे. तरीही ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील मुंब्री प्रकल्पास फॉरेस्ट क्लिअरन्स मिळण्यासाठी 70 कोटी रुपये का भरले ? अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 5 हजार कोटी रु.ची आवश्यकता आहे. नवीन प्रकल्प आला की ॲडव्हान्स दिला जातो, जास्तीचे 10 टक्के दिले जातात, उंची वाढविण्याचे काम चालू होते आणि भरपूर निधी दिला जातो. पिंजाळ प्रकल्पाची किंमत 142 कोटी रुपये होती. ती आता वाढून 275 कोटी रुपये झालेली आहे. तिलारी प्रकल्पाची मूळ किंमत 108 कोटी रुपये होती ती आता 208 कोटी रुपये इतकी झालेली आहे. यांची ही किती डेअरिंग आहे ? एक प्रकरण चालू आहे, त्याची रोज वर्तमानपत्रातून आणि मीडियामधून चर्चा होत आहे तरी देखील किंमती वाढविण्याचे काम चालू आहे.

रत्नागिरी जिल्हयातील ओरली-सातर्डे प्रकल्पांची मूळ किंमत 163 कोटी रुपये होती ती किंमत आता 721 कोटी रुपये इतकी वाढविण्यात आलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या फाईल्स मागवून घ्याव्यात. हे काय चालले आहे ? सावंतवाडी तालुक्यातील नरवडे प्रकल्पाचे टेंडर 60 कोटी रुपयाचे असताना ठेकेदाराला 70 कोटी रुपये अदा करण्यात आले. त्या प्रकल्पाच्या कामामध्ये देखील मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. मागची प्रकरणे मी टी.व्ही.वरुन आणि वृत्तपत्राच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

माध्यमातून सांगितली. मंत्रालय जळाले. महालक्ष्मी,नोबल यांची प्रकरणे सुरु आहेत. नोबल हे शासनाचे कोणते जावई आहेत ते मला माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक हजार कोटी रुपयाचा भ्रष्टाचार असल्याचे सांगितले. मी करोडो रुपयांचा व्यवहार करतो. परंतु मी कधी एक हजार कोटी रुपयाचा आकडा पाहिला नाही. मला तो लिहिता देखील येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी एक हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची आकडेवारी दिली. माननीय मंत्री महोदयांनी या भ्रष्टाचाराची चौकशी करु, संबंधित अधिका-यांवर कारवाई करु असे लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी सांगितले. त्यावेळी त्यांनी गोंधळामध्ये काय उत्तर दिले ते मला नीटसे समजले नाही. त्यांनी दिलेले उत्तर रेकॉर्डवर आहे. सभापती महोदय, दुस-याचे पाप यांच्यावर येत आहे.

आमच्या जिल्ह्यासाठी चांगले अर्थखाते दिले होते. पण ते काढून जलसंपदा खाते देऊन सर्व घोटाळा करुन ठेवलेला आहे. मी कुणाचे नाव घेत नाही. मल्टी व्हेंचर फायनान्स कंपनी, मल्टी व्हेंचर ॲग्रो अशा अनेक कंपन्यांची नावे माझ्याकडे आहेत. मी सर्व नावे वाचून सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. ती नावे मी पटलावर ठेवतो.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

या सर्व कंपन्या कोणाच्या आहेत याची माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी केली पाहिजे. मी या सर्व कंपन्यांची नावे वाचत राहिलो तर मला आणखी अर्धा-तास लागेल आणि वाचताना माझा घसा देखील कोरडा पडेल. तेव्हा मी ही सर्व नावे पटलावर ठेवतो, ती नावे रेकॉर्डवर आली पाहिजेत. माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या कंपन्यांचे मालक कोण आहेत, या कंपन्यासाठी पैसे कोठून आले, कोणत्या मार्गाने आले याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटून मी त्यांच्याकडे या सर्व कंपन्यांची यादी दिलेली आहे. जी विनम्र कंपनी आहे..

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहात काय चालले आहे ? सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर बोलत आहेत की कंपन्यांवर बोलत आहेत हे त्यांनी स्पष्ट करावे.

**उप सभापती** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 81 ते 85 वर बोलावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण भाषण ऐकून घ्यावे..

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य ज्या बाबीवर बोलत आहेत त्याचा आणि या बाबीचा काही संबंध नाही. कंपनी ॲक्टनुसार ज्या काही कंपन्या झाल्या असतील त्याची चौकशी केंद्र सरकारच्या अखत्यारितील ॲक्टनुसार होईल. या ठिकाणी सिंचनावर चर्चा आहे. कोणी किती कंपन्या काढल्या त्याचा येथे काहीही संबंध नाही. सन्माननीय सदस्य तो विषय अन्य मार्गाने उपस्थित करु शकतात.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे पूर्ण झालेले नाही. विनम्र कंपनीमध्ये 3600 कोटी रुपये आलेले आहेत. सिंचन ठेकेदाराकडून हे 3600 कोटी रुपये आले आहेत असा मला संशय आहे म्हणून मी हे बोलत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना अनेक गोष्टींबाबत संशय वाटत असला तरी त्यांनी आपले सर्व संशय सिंचनामध्ये आणू नयेत. सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितले की, मी कोणाचे नाव घेणार नाही. मग ते या कंपन्यामध्ये जलसिंचनामधून पैसा आला असेल असे कशाला सांगत आहेत, तसा पैसा आला असेल तर जरुर त्याबाबत बोलावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे..

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना माझी विनंती आहे की, त्यांनी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 81 ते 85 वर बोलावे. अन्य मुद्यांवर बोलू नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यातील बजेट मधून सिंचनावर जवळपास 70 हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे पैसे कुठे गेले असा प्रश्न विचारण्याचा अधिकार कायद्याने मला दिलेला आहे. मी येथे कोणाचे नाव घेण्यास घाबरत नाही. परंतु नियमाने त्यासाठी अगोदर नोटीस द्यावी लागते. सन्माननीय सदस्यांनी माझे सुरुवातीचे भाषण ऐकावे. हे अधिवेशन शुक्रवारी संपेल आणि गुरुवारी अंतिम आठवडा प्रस्ताव येईल असे मला वाटले म्हणून तातडीने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून हा विषय उपस्थित करण्याची मी अपेक्षा व्यक्त केली. मी गुरुवारी सभागृहात नाही. त्या दिवशी मी अलिबागला जाणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील गरीब शेतकऱ्यांच्या सिंचनाचे पैसे कोणी लुटण्याचे काम करीत असेल तर ते प्रयत्न थांबविण्याची जिम्मेदारी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून माझी आहे असे मला वाटते. मी येथे ठामपणे सांगतो की, आपणास वाटत असेल तर मी माझे विचार येथेच थांबवितो. मी आपणास सर्व कंपन्यांची आकडेवारी देतो. ही सर्व कंपन्याची आकडेवारी पाहिल्यास आपण सर्वजण माझ्याशी सहमत व्हाल. गेली बारा वर्षे मी सदनाचा सदस्य आहे. मी कधीही चुकीचा शब्द वापरला नाही. अकारण जास्त वेळ बोललो नाही. मला सभागृहाचे नियम माहीत आहेत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते तसेच विरोधी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना विनंती केलेली आहे की, मला सिंचनाच्या बाबतीत बरेच बोलावयाचे असल्यामुळे तुमची बोलण्याची वेळ मला देण्यात यावी. त्यांनी माझी विनंती मान्य केली असल्यामुळे मी आज सभागृहात जास्त वेळ बोलतो आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. रावते साहेब यांना आपण विचारु शकता. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही जास्त वेळ बोलू शकता. त्यामुळे त्यांची परवानगी घेऊन मी या ठिकाणी जास्त वेळ बोलतो आहे. विरोधी पक्षाचे माझे सहकारी माझ्यासाठी कमी वेळेत बोलणार आहेत.

सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहात. आपली शिरुर येथे शेतजमीन आहे. आपण त्या जमिनीतून ऊसाचे पीक घेता. परंतु शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी नाही, त्यांच्या जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची जनावरे कत्तलखान्यात जात आहेत. राज्यातील शेतकरी पाण्यासाठी तडफडतो आहे आणि पाण्याच्या पैशांची लूट करण्याचे काम राज्यकर्ते करीत असतील तर आम्ही स्वस्थ बसणार नाही. आम्हाला काहीही शिक्षा होऊ द्या. आम्हाला कितीही अडविण्याचे काम करा पण ही गोष्ट महाराष्ट्रातील जनता सहन करणार नाही.

सभापती महोदय, सिंचनाच्या पैशांच्या बाबतीत हायकोर्टामध्ये एक पार्टी गेली. या बाबतीत हायकोर्टाने काय म्हटलेले आहे त्या संबंधीची माहिती या ठिकाणी मी सांगणार आहे...

**उप सभापती** : आपणास अजून किती वेळ लागेल. पुरवणी मागण्यावरील चर्चा ही आजच संपवावयाची आहे. म्हणून प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा पाळली पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : राज्याचे माजी मुख्यमंत्री व आमच्या जिल्हयाचे कॉग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माननीय बॅ.अंतुले साहेबांनी मला तीन वर्षांनी दूरध्वनी केला. ते सुरुवातीला बोलत नव्हते. ते लोकसभेच्या निवडणुकीत पडले होते, म्हणून ते आमच्यावर रागावले होते. आता त्यांचा राग दूर झालेला आहे. त्यांनी दूरध्वनीवरुन सांगितले की, श्री.जयंत पाटील, मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्ही सिंचना संबंधीचा चांगला विषय हाती घेतलेला आहे. त्यांनी मला विनंती केली की, सिंचनाच्या पैशासंबंधी हायकोर्टाने जी ऑर्डर दिलेली आहे, त्या ऑर्डरची प्रत मला पाठवा. माननीय श्री.अंतुले साहेब हे स्वत: बॅरिस्टर आहेत. त्यांनी हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात वकिली केलेली आहे. या प्रकरणाच्या बाबतीत आपले ॲडव्होकेट श्री.खंबाटा यांनी स्वत: शासनाच्या वतीने हमी दिली आहे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

की, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याचे सहकार्य आम्ही देऊ. सभापती महोदय, माझी या निमित्ताने मागणी वेगळी आहे की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी हायकोर्टाच्या न्यायाधीशांमार्फत झाली पाहिजे.

सभापती महोदय, श्री. राजेंद्र फणसे यांनी श्री. सुनील तटकरे यांचे विरुध्द फौजदारी जनहित याचिका दाखल केली....

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले आहे. त्यांनी आपणाकडे नोटीस दिली आहे काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सदरहू जनहित याचिकेचा संदर्भ वाचणार नव्हतो. परंतु माझ्या काही सहकाऱ्यांनी वाचण्यास सांगितले म्हणून मी त्यातील संदर्भ वाचून दाखविणार होतो. परंतु त्या गोष्टीचा मी या ठिकाणी पुन:श्च उल्लेख करु इच्छित नाही. सभापती महोदय, मी ज्या माननीय मंत्र्यांच्या नावाचा उल्लेख केलेला आहे तो वाटल्यास आपण रेकॉर्डमधून काढून टाकावा. त्यास माझी काही हरकत नाही. मी नोटीस न देता त्यांचे नाव घेतले त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. (अडथळा)

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अशा प्रकारची वक्तव्ये करुन सभागृहाचा वेळ घेत आहेत. सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यापेक्षा हेतूपुरस्सर वेगळीच माहिती सभागृहात देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**उप सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा करण्यासाठी काही कालमर्यादा घालून दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापली भाषणे दिलेल्या वेळेतच पूर्ण करावीत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण पाच मिनिटात संपवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी या सभागृहात एक उदाहरण देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे 1980 या वर्षी पत्रकार होते. मी जे उदाहरण सांगणार आहे त्यावेळी ते वार्ताहर दालनामध्ये बसत होते. मी देखील त्यांच्या बाजूला बसलो होतो. 1980 या वर्षी बॅ.अंतुले हे या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी सन्माननीय सदस्या श्रीमती मृणालताई गोरे यांनी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सिमेंट प्रकरण अचानकपणे बाहेर काढले. सन्माननीय श्री. कपिल पाटील यांनी "आज दिनांक" आणि "महानगर" या वृत्तपत्रात लेख लिहिले होते. ते लेख मी स्वत: वाचले आहेत.



ABG/ प्रथम श्री.अजित 04:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या राज्यातील तीन मुख्यमंत्र्यांवर आक्षेप ठेवले गेले, त्यामुळे त्यांना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला.

यानंतर श्री. कानडे...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ प्रथम श्री.गिते 04:20

श्री. जयंत प्र.पाटील .....

हायकोर्टाने आक्षेप घेतला नव्हता. हायकोर्टाने आदेश दिलेले नव्हते तरीसुध्दा या राज्याच्या तीन मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला.

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन मंत्र्यांना ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केवळ आक्षेप घेतला म्हणून राजीनामा द्यावा लागला. श्री. सुरेशदादा जैन आणि माझे मित्र श्री. नवाब मलिक या दोन मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. कोर्टाने ताशेरे नोंदविले नव्हते. अशा प्रकारे केवळ आक्षेप घेतल्यानंतर या मंत्र्यांना राजीनामे द्यावे लागले होते. ज्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहेत ते मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपण काही बोलत नाही. सभापती महोदय, मला बोलण्यासाठी मर्यादा आहेत आणि वेळेचेही बंधन आहे. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी स्वत:ची स्वच्छ अशी प्रतिमा ठेवलेली आहे. त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा आहेत. 11 कोटी जनतेच्या वतीने मी त्यांना हात जोडून विनंती करतो की, शेतकऱ्यांची जमीन, जनतेला पिण्यासाठी पाणी हे त्यांच्या तोंडात घालण्याचे काम त्यांनी करावे. त्यांच्याकडून मी हीच अपेक्षा करतो. अधिवेशनाचा कालावधी वाढला तर मी पुन्हा एकदा आपल्याला याची आठवण करुन देईन. अधिवेशनाची ठरलेली मुदत पाळली जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. 27 जुलैपर्यंत अधिवेशन चालवावे अशी मी विरोधी पक्षनेत्यांना विनंती केलेली आहे. या विषयावर चर्चा झाली पाहिजे. आमचे मंत्री स्वच्छ प्रतिमेचे निघतील आणि त्यांच्यावर असलेले आक्षेप दूर होतील तर मला त्याचा आनंदच आहे. विनाकारण कसला डाग असता कामा नये. रायगड जिल्हयातील कोणी मंत्री आला की असेच होते.

सभापती महोदय, हायकोर्टाने आक्षेप घेतला नव्हता. हायकोर्टाने आदेश दिलेले नव्हते तरीसुध्दा या राज्याच्या तीन मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला.

सभापती महोदय, मी केवळ एकाच मागणीवर याठिकाणी भाषण केलेले आहे. आपल्याकडून निश्चितपणे उत्तराची अपेक्षा व्यक्त करतो. आघाडीचे सरकार आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांचा आदर करतो. सध्या असलेले हे संशयाचे वातावरण नष्ट झाले पाहिजे आणि लोकांना वाटले पाहिजे की, आम्ही सर्व राज्यकर्ते सर्व आमदार शेतकऱ्यांचे पैसे, सिंचनाचे पैसे वाचवीत आहोत. सिंचनाच्या पैशामध्ये कुठेही गडबड घोटाळा नाही हे एकदा पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने स्पष्ट होऊ द्या अशी विनंती करतो आणि माझे विचार संपवितो.

-------

17-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3C-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना जो विषय उपस्थित केला आहे त्यातील बहुतांशी भाग हा पुरवणी मागण्यांवरील बाबीशी संबंधित नाही. त्यामुळे तो भाग तपासून कामकाजातून काढून टाकण्यात यावा असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

यानंतर श्री. खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्र. 81, पृ.क्र. 83 - जलसंपदा विभागाच्या अनुषंगाने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, महाराष्ट्र राज्याची सिंचनाची गौरवशाली परंपरा राहिली आहे. मौर्य राजवटीत मोठ्या प्रमाणात सिंचन करण्यात आले. नाशिक व धुळे जिल्ह्यातील दगडी बंधारे हे मौर्य राजवटीतीलच आहेत. त्या काळात या दगडी बंधाऱ्यांच्या माध्यमातून शेतीला सिंचीत करण्यात येत होते. ज्या खडकांना पाझर फुटतो त्या खडकांवर हे बंधारे बांधण्यात आलेले आहेत, त्यामुळे शेतीला बारमाही पाणी उपलब्ध होत होते. सामुदायिक सिंचन पध्दती ही देखील त्या काळात प्रसिध्द होती. गरीबी वाटून घेतली जायची आणि श्रीमंती सुध्दा वाटून घेतली जात होती, हा सामाजिक न्यायाचा भाग या सिंचन व्यवस्थेत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शिवशाही बंधारे आजही प्रसिध्द आहेत. या निमित्ताने मी काही पंक्ती सांगण्याचा प्रयत्न करणार आहे की, "पंगू लंघयते गिरीम् यत्कृपा तमहं वन्दे, परमानंद माधवम्." पांगळ्यांना डोंगराच्या पलिकडे नेण्याची शक्ती त्या परमात्म्यात आहे असे गृहित धरले जात होते. मी आजचा परमात्मा सरकारला गृहित धरतो. जे दूर्बल आहेत, जे पांगळे आहेत, अपंग आहेत अशा लोकांना सशक्त करण्याचे काम सरकार करील ही लोकांना अपेक्षा आहे. मला वाटते त्या दृष्टीने या गौरवशाली परंपरेला साजेसे काम हे शासन निश्चितच करेल व तशी वाटचाल सुरु आहे. पण यात जी भ्रष्टाचाराची कीड खालच्या स्तरावर लागली आहे ती शोधून तिचा बंदोबस्त करण्याचे काम शासनाचे आहे व हे काम शासन चांगल्या प्रकारे करील अशी मला खात्री आहे.

महोदय, विदर्भात मोठ्या प्रमाणात मालगुजारी तलाव आहेत. त्या माध्यमातून विदर्भात पूर्वी सिंचन केले जात होते. त्या काळात गौंड राजा हा आदिवासींचा प्रसिध्द राजा होता. त्या राजाने हे 20 हजार मालगुजारी तलाव बांधले आहेत. आज मात्र या तलावांची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यांचे पुनरुज्जीवन करुन विदर्भातील आदिवासी शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम शासनाने करावे अशी आग्रहाची विनंती मी करतो.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

महोदय, त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यात निजामाच्या काळात खजाना विहिर म्हणून प्रसिध्द होती. निजामाच्या एका सरदारने स्वत:चा खजाना रिता केला आणि ही खजाना विहिर उभी

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .......

केली. निजामाकडून आदेश आले आणि खजान्यातील पैसा कोठे गेला अशी विचारणा झाली तेव्हा सांगण्यात आले की, या शेतकऱ्यांच्या जीवनात चांगले क्षण यावेत, त्यांना चांगले व उन्नत जीवन जगता यावे म्हणून खजान्यातील सर्व पैसा रिता केला आणि ही विहिर बांधली. आजही 1500 ते 2000 एकर शेती या खजाना विहिरीच्या माध्यमातून सिंचित करण्यात येत आहे. निजामाच्या काळात शेतीची सिंचन क्षमता वाढलेली होती. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने सुध्दा ही खजाना विहिर एक मॉडेल विहिर म्हणून संपूर्ण राज्यात सिंचनात वाढ करण्यासाठी उपयोगात आणली तर नक्कीच त्याचा फायदा होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

सभापती महोदय, खजाना विहिरीचे वैशिष्ट्य असे आहे की, खजाना विहिरीचे पाणी 1972 च्या दुष्काळामध्ये सुध्दा त्याच लेव्हलवर होते. ते पाणी कधीही आटत नाही. खजाना विहिरीचे पाणी 5-7 फूटापेक्षा कधीही कमी होत नाही. खजाना विहिरीचे श्वास नगर पर्यंत गेलेले आहेत. या खजाना विहिरीचे पाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशाभाई आपल्याला प्यावे लागणार आहे. भारतीय जनता पक्षाने आपल्याला बीड मध्ये कार्यासाठी पाठविलेले आहे. भविष्यात आपल्याला पाण्याची गरज पडली तर मी खजाना विहिरीचे पाणी आपल्याला देईन व माझ्या हाताला सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांचे हात लागलेले असतील हे आपण लक्षात घ्या.

सभापती महोदय, गोदावरी नदी त्र्यंबकेश्वरला उगम पावते व 1465 कि.मी. अंतर चालून ती बंगालच्या उपसागरात मिळते. गोदावरी नदी सागराशी तादात्म पावते. गंगावाडी मार्गे शहागड, नांदेड, आंध्र प्रदेशातून ती थेट बंगालच्या महासागरात मिळते. गोदावरीचे 300 टीएमसी पाणी आंध्र प्रदेशात जात असते. पाणी तंटा लवादाने गोदावरी खोऱ्याचे 203 टीएमसी पाणी अडविता येऊ शकेल असा निवाडा दिलेला आहे. मराठवाडयातील 203 टीएमसी पाण्यापैकी किती टीएमसी पाणी आपण आतापर्यंत अडवू शकला आहात ? 203 टीएमसी पाण्यापैकी किती पाणी मराठवाडयातील शेतकऱ्यांना आपण दिले आहे ? याचे कारण असे आहे की, 38 अब्ज घन मीटर पाणी आजही गोदावरीच्या खोऱ्यात उपलब्ध आहे. त्यामुळे गोदावरीच्या खोऱ्यातील उपलब्ध पाणी आमच्या मराठवाडयातील जनतेला मिळाले पाहिजे. माननीय चव्हाण साहेबांनी गोदावरीच्या पाण्यासंदर्भात आयुष्यभर संघर्ष केलेला आहे. त्यांच्या बरोबर आमच्या मराठवाडयाच्या भूमिपुत्रांची अपेक्षा अशी आहे की, मराठवाडयाला गोदावरीचे पाणी मिळण्यासाठी न्याय दिला गेला पाहिजे. न्याय देण्याचा प्रयत्न सिंचन विभागाने केला तर निश्चितपणे गोदावरी खोरे संपन्न, समृध्द होऊ शकेल. आमचा सामान्य शेतकरी पंढरपूरला कदाचित हेलिकॉप्टरने सुध्दा जाऊ शकेल. एवढी समृध्दता गोदावरी खोऱ्याच्या पाण्यात आहे. गोदावरीचे पाणी अडविण्यासाठी शासन ठोस अशी काय उपाययोजना घेणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 110, पृष्ठ क्रमांक 107 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. जगामध्ये अन्नधान्याचा सुकाळ आहे. दुष्काळावर मात करण्याची क्षमता अन्नधान्यात आहे. 12 ते 13 हजार वर्षापूर्वी मध्याश्म युगामध्ये इराक देशात गहू आणि सातू या धान्याचा शोध लागला होता. झागरोजच्या डोंगरामध्ये त्या ठिकाणच्या भूमिपुत्रांना डोंगराच्या पायथ्याशी गहू आणि सातू पहिल्यांदा दृष्टीस पडला होता.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

पाऊस पडल्यानंतर हे धान्य येते हे त्यांच्या लक्षात आले. त्याला लोंब्या येतात. त्या लोंबतात. खाली गळतात. पाऊस पडल्यानंतर पाण्याचा स्पर्श झाल्यानंतर भूमी स्पर्श झाल्यानंतर त्यातून शेवटी कोंब बाहेर येतात. हे कोंब आल्यानंतर कालांतराने त्याला लोंब्या येतात. त्या गळल्यानंतर पुन्हा त्याला कोंब फुटतात आणि पुन्हा लोंब्या येतात. हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी लोंब्यामधील सर्व दाणे काढले आणि खायला सुरूवात केली. मग त्या झोपडीच्या परिसरामध्ये सुपातून काही दाणे पडले. ते जमिनीमध्ये रूजले. त्यातून काही अंकुरले. त्यातून पुन्हा लोंब्या निर्माण झाल्या. मग त्यांच्या लक्षात आले की, हा सगळा पावसाचा आणि जमिनीच्या स्पर्शाचा परिणाम आहे. त्यातून सातू आणि गहू जगाच्या समोर आले. ते मध्याश्म युग होते.

आज परिस्थिती काय आहे ? जगा समोर अन्नधान्याची टंचाई नाही. जगा समोर पाण्याची टंचाई आहे. महाराष्ट्रा समोर पाण्याची टंचाई आहे. या बाबीमध्ये गोदामाचा उल्लेख आहे. 18 गोदामे आपण करणार आहोत. 2 मराठवाड्यात आहेत, तर 16 पश्चिम महाराष्ट्रात आहेत. 16 वरून 160 गोदामे पश्चिम महाराष्ट्रात गेली तरी आमची काही हरकत नाही. आमच्याकडे तळवडा आणि मंठा येथे दोन गोदामे तयार करण्यात येणार आहेत. या गोदामांमध्ये किती मोठ्या घुशी आहेत ? ह्या घुशींचे काय वर्णन करावे ? या घुशींनी मांजरावर हल्ला केला तर मांजर पळून जाते. एवढी मोठी घुस आमच्या गोदामामध्ये आढळते. घुशींकडे पाहिल्यानंतर मांजरीच्या जीवाचाही थरकाप उडतो. एवढी मोठी त्या गोदामांना घुशींची लागण लागली आहे. दोन पायांच्या घुशी वेगळ्या, चार पायांच्या घुशी वेगळ्या. या घुशींचा बंदोबस्त करण्याचे काम आपण करावे व गोदामांची संख्या वाढवावी.

जे.जे.रूग्णालयात गेल्यानंतर घुशी पाहिल्या की भीती वाटते. मांजर त्या दिशेने फिरकतच नाही. एवढ्या भयानक मोठ-मोठ्या घुशी आहेत. उंदरांचे रूपांतर घुशीत, घुशीचे रूपांतर मोठ्या घुशीत आणि मोठ्या घुशीचे रूपांतर कशात हा प्रश्न पडावा. इतक्या मोठ्या घुशी ह्या गोदामाला लागलेल्या आहेत. तेव्हा ह्या घुशींचा बंदोबस्त आपल्याला करावा लागेल.

मी येथे उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडत नाही. उत्क्रांतीच्या शेवटच्या टप्प्यावर नरदेह मिळतो. त्यामुळे आमच्या नरदेहाने काय करावे ? गोदामाचे रक्षक जे नरदेह आहेत ते काळ्या बाजारामध्ये गहू विकतात, साखर विकतात. आमचे बहुतांशी अधिकारी त्यामध्ये सहभागी आहेत. याचा बंदोबस्त कोण करणार आहे ? एकीकडे ग्रामीण भागातील शेतकऱ्याला अन्नधान्य मिळत नाही. दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अधिकारी घुशींचे काम करीत आहेत. हे दुर्दैव आहे. हे बदलावे लागेल. हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बदलण्याच्या दृष्टीने विभागाने प्रयत्न करावेत आणि या गोदामांची संख्या वाढवावी. आज महाराष्ट्रामध्ये गोदामांची संख्या वाढविण्याची गरज आहे. मराठवाड्यामध्ये दोन गोदामे प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी तळवडा येथील एक गोदाम आमच्या जिल्ह्यात आहे. दुसरे गोदाम जालना जिल्ह्यात मंठा येथे आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये फक्त 16 गोदामे आहेत. तेथे जास्त गोदामे नाहीत.

सभापती महोदय, कौरवांचा मामा शकुनी हा इराण-इराक मधील आहे. पहिला गव्हाचा शोध तेथे लागला. हा शकुनी पण तेथील आहे. विज्ञान युगात महाराष्ट्रात गोदामाद्वारे महाभारत घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांचा त्या कुरूक्षेत्रावर बंदोबस्त करण्यासाठी आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा शंख फुकण्याची गरज आहे, तरच यांचा बंदोबस्त होऊ शकेल अशी खात्री मला आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

सभापती महोदय, नगर विकास विभागाची बाब क्र. 53 व पृष्ठ क्र. 45 च्या संदर्भात सांगू इच्छितो की, नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. अतिक्रमणाचे लोण मुंबई, पुणे येथून आता अ वर्ग नगरपालिका, ब वर्ग नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये घुसले आहे. शहरामध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमणे निर्माण होऊन ती शहरातील रहदारीला अडथळा निर्माण करण्याचे काम करीत आहेत. बीड शहरामध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमणे करण्यात आली, कायम स्वरुपी बांधकामे करण्यात आली. या संदर्भात मी नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्यांना पत्र लिहिले, त्यांच्याबरोबर चर्चा केली. परंतु आजतागायत माझ्या पत्राला त्यांच्याकडून उत्तर देण्यात आले नाही व कारवाई देखील करण्यात आली नाही. त्या संदर्भात मी मुख्य अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी हे सर्व अधिकार नगराध्यक्षांना असल्याचे सांगितले. तसेच, त्यांनी मला खाजगी रित्या असे सांगितले की, आमचे माजी नगराध्यक्ष व नगरसेवक आम्हाला कारवाई करु देत नाहीत, अतिक्रमणे पाडू देत नाहीत. बीड शहरामध्ये अतिक्रमणे करण्यामध्ये तेथील नगरसेवक आणि पदाधिकारी गुंतलेले आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने "हागणदारी मुक्त महाराष्ट्र" अशी घोषणा केली असतांना दुर्दैवाने आमचे बीड शहर अजूनही हागणदारी मुक्त झालेले नाही, दुर्गंधीमुक्त झालेले नाही. बीड शहरामध्ये अ दर्जाची नगरपालिका आहे. शहरातील रस्त्यावर लोक शौचाला बसतात, बाराबरी येथे लोक रस्त्यावर शौचाला बसतात. अशा या बीड शहरामध्ये अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य असून त्याला पूर्णपणे नगरपालिका जबाबदार आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण हागणदारी मुक्त महाराष्ट्राचा संकल्प सोडला आहे. तेव्हा अ वर्ग नगरपालिका, ब वर्ग नगरपालिका आणि क वर्ग नगरपालिकेच्या कार्य क्षेत्रामध्ये हागणदारी मुक्त महाराष्ट्र करण्याचा संकल्प यशस्वीपणे पूर्ण करावा. त्या दृष्टीने आपण प्रयत्न कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, पशु संवर्धन व दुग्ध विकास विभागाच्या बाब क्र. 45 व पृष्ठ क्र. 37 च्या संदर्भात सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन दशकापासून कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरु आहे. परंतु आज कुक्कुटपालन व्यवसायाची काय परिस्थिती आहे? सहकारी संस्थेच्या माध्यमातून ज्या ज्या ठिकाणी कुक्कुट पालन व्यवसाय सुरु करण्यात आले होते ते सर्व बंद पडले आहेत. या कुक्कुट पालन संस्थांची हजारो कोटींची मालमत्ता आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

या बंद पडलेल्या सर्व सहकारी कुक्कुट पालन संस्था ताब्यात घेऊन त्यांचा जाहीररित्या लिलाव करण्यात यावा. त्यामधून जे हजारो कोटी रुपये मिळतील ते शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करण्यात यावेत. त्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवन उन्नत करण्याचा आपण प्रयत्न करावा अशी मी आग्रहाची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये बहुतांशी अंडे हैद्राबाद येथून येतात. अंडयांच्या भावाचे नियंत्रण हैद्राबादमधील व्यापारी मंडळी करतात. महाराष्ट्रातील अंडे उत्पादन करणारी पोल्ट्रींची अवस्था अत्यंत वाईट आहे. हैद्राबादमधील अंडे उत्पादन खर्च अतिशय कमी आहे तर महाराष्ट्रामध्ये अंडे उत्पादन खर्च अधिक आहे. अंडे उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र इतरांच्या स्पर्धेमध्ये टिकू शकत नाही. त्यामुळे हैद्राबादमधून येणाऱ्या अंडयावर नियंत्रण आणता येऊ शकेल काय, त्यावर आपल्याला कर लावता येऊ शकेल काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 04:45

प्रा.सुरेश नवले . . . .

याचा विचार केला तर महाराष्ट्रातील अंडा उत्पादक शेतकरी नक्कीच जीवंत राहिल्याशिवाय रहाणार नाही. अन्यथा हा सगळा व्यवसाय मोडीत निधण्याची शक्यता आहे.ज्या काही सहकारी संस्था चालविल्या जात आहेत त्यामध्ये आंध्र प्रदेशमधील, कर्नाटक मधील काही व्यापारी आहेत. हे व्यापारी याठिकाणी येऊन सहकारी पोल्ट्रीज चालवितात. त्यामुळे राज्य शासनानेही या बाबीचा गंभीर विचार करावा. कारण हा पूरक व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जीवदान देणारा व्यवसाय आहे.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिक ताकद देणारा व्यवसाय आहे.त्यामुळे या व्यवसायाचे पुनरुज्जीवन करुन महाराष्ट्र राज्याला एक उत्तम प्रकारचा संदेश द्यावा अशी मी आग्रहाची विनंती करतो आणि माझे भाषण थांबवितो.

----

. . . 2 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मला अत्यंत नम्रपणे एक बाब आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणावयाची आहे. याठिकाणी आपण सर्व पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित आहोत. अशा वेळी तुम्हाला जर काही बोलणे चुकीचे वाटले तर ते विसरुन जावे. आपण या सदनामध्ये येतो, त्यात आपले कर्तृत्व किती आहे, यापेक्षाही आपल्या नेतृत्वाने जो पक्ष निर्माण केलेला असतो आणि पक्ष निर्मिती करीत असताना त्यामागे एक भावना असते आणि त्यांच्या पुण्याईमुळे आपण सदनामध्ये येतो. ज्यावेळी आपल्याला पक्षाचे नेते येथे पाठवितात त्यावेळी त्यांनी आपल्याला पक्षाचे रक्षक म्हणून पाठविलेले असते याबद्दल दुमत नाहीच. पण अशा वेळी आपले वर्तन देखील असे असावयास पाहिजे की, माझ्या पक्षाच्या नेत्यांनी मला येथे विश्वासाने पाठविलेले असेल तर माझ्या कोणत्याही कृत्तीतून माझ्या पक्षाला आणि माझ्या नेतृत्वाला मान खाली घालावी लागेल असे होता कामा नये.किंबहुना माझ्या कार्यकर्तृत्वातून आणि विधी मंडळातील कामकाजाच्या माध्यमातून माझ्या पक्षाचे नाव हे मोठेच झाले पाहिजे आणि तशी वेळ आली तर मी कठोर होईन.

सभापती महोदय, जर आपल्या घरामध्ये एखादा नादान मुलगा असेल तर शेवटी त्याचे वडील त्याला घराबाहेर काढतात. त्यावेळी त्या मुलाच्या वडिलांना यातना होत नसतील का, कुटुंबाला यातना होत नसतील काय असा प्रश्न आहे. पण ज्यावेळेला आपला मुलगा, पोटचा गोळा कुटुंबच उद्ध्वस्त करु लागतो तेव्हा त्याला देखील बाहेरचा रस्ता दाखविला जातो. म्हणून या सदनामध्ये आपल्यातीलच एखादा नासका आंबा आपल्याला निर्माण करणाऱ्या नेतृत्वाला, पक्षाला खराब करीत असेल, त्यामुळे पक्षावर टिका होत असेल तर आपण अस्वस्थ होण्यापेक्षा आत्मचिंतन केले पाहिजे.कारण हे वरिष्ठांचे सभागृह आहे.खुन्नस म्हणून, जाणीवपूर्वक, बदनामी म्हणून एखादी गोष्ट घडत असेल तर त्याचा प्रतिकार देखील केला पाहिजे. मग या सदनामध्ये जे घडत आहे त्या माध्यमातून मघाशी जे चित्र होते ते पहाताना कोणाला आनंद होत होता, कोणाला वाईट वाटत होते. पण मी मघापासून त्याकडे शांतपणे पहात होतो आणि आत्मचिंतन करीत होतो की, या महाराष्ट्रामध्ये आपण असे का वागत आहोत? आपल्या माणसाची बाजू घेतलीच पाहिजे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, आपल्या नेतृत्वाला आणि आपल्या स्वत:च्या कर्तृत्वाबरोबर पक्षाच्या कतृत्वालाही डाग लागत असेल तर त्याबाबतीत आपण आत्मचिंतन करावे. तसेच प्रत्येकाला सुधारण्याची देखील संधी द्यावयास पाहिजे आणि त्यातून काय फरक पडत आहे ते आपण पहावे आणि ही गोष्ट फार महत्वाची आहे.

सभापती महोदय, मी सगळ्याचा उहापोह करीत नाही. पण मला मघाशी जरा विचित्र वाटत



APR/ 04:45

श्री.दिवाकर रावते . . . .

होते म्हणून मी येथे नमूद केले. मी याठिकाणी आपणा सर्वांची माफी मागून येथे नमूद करतो की, या सभागृहामध्ये आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत.अशा वेळी विरोधी पक्षाच्या कर्तृत्वामध्ये काही चूक झाली तर तुम्ही आम्हाला सांगितले पाहिजे.विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षाच्या चुका कशासाठी दाखवावयाच्या तर त्यांना बदनाम करण्यासाठी, अपमान करण्यासाठी, त्यांचे चारित्र्यहनन करण्या-साठी नाही. तसे अजिबात करु नये. पण विरोधी पक्षाला सरकारकडून ज्या चुका होतात त्या त्यांना दाखवून द्याव्याच लागतात आणि ते विरोधी पक्षाचे कर्तव्य आहे आणि यासाठीच आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत. त्यामुळे सत्ताधारी पक्षाने एवढे अंगावर घेऊन वाईट वाटून घेणे हे कितपत योग्य आहे ते आपण समजून घ्यावे. पण त्यामध्ये चारित्र्यहनन करणे हा उद्देश असता कामा नये. तसेच मी मंत्री महणून काम करीत असताना म्हणजे दिवाकर रावते ही व्यक्ती मंत्री असेल तर मला माझ्या कामात सुधारणा करण्यासाठी वाव मिळत आहे अशी भावना असली पाहिजे. म्हणून या ठिकाणी करण्यात आलेली टीकाही व्यक्तीगत टीका नसते तर ती सरकारवर, मंत्र्यांवर केलेली असते. त्यामुळे आम्ही जेव्हा बोलतो तेव्हा कृपा करुन त्या अर्थाने घेऊ नका अशी मी नम्र विनंती करतो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

माझ्या सारख्या माणसाची ती पध्दतही नाही. म्हणून मी नम्रपणे एक विषय मांडतो.

सभापती महोदय, मी एक महत्वाचा विषय या ठिकाणी मांडणार आहे. आदरणीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. काल सभागृहामध्ये एक विषय उपस्थित झाला. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम सभागृहात उपस्थित असताना माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील असे म्हणाले की, वाघांची संख्या वाढली म्हणून आपण डॉ. पतंगराव कदम यांचे अभिनंदन केले पण आता माकडांची संख्या वाढली तर काय करणार ? असे आबांनी नेहमीच्या पध्दतीने सर्वांना प्रश्न विचारला. आम्ही समोर बसतो म्हणून आम्हालाही त्यांनी प्रश्न विचारला. थोडी गंमत वाटली. पण माकड हा चेष्टेचा विषय आहे का ? माणूस विचित्र वागावयास लागला की त्याला माकडचेष्टा म्हणतात. महात्मा गांधींनी माकडांना राष्ट्रीयत्व दिले. महात्मा गांधींनी निर्माण केलेली तीन माकडे सर्वांना परिचित आहेत आणि त्याचे उदाहरणही दिले जाते. माकडांचा राष्ट्रीय सन्मान महात्मा गांधींनी केला. माननीय श्री. आर.आर. पाटील बोलत असताना त्या माकडांच्या बाबतीत काय करावयाचे असे कोणालाही वाटले नाही. तेव्हा आपली कोणाचीही राष्ट्रीय भावना दुखावली नाही.

मी नावांचा उल्लेख करणार नाही. तो उल्लेख मला अप्रस्तुत वाटतो. कारण टिंगलटवाळी करणाऱ्यांनी काहीही करावे. पण काल एका लाफ्टर शो मध्ये सोनिया गांधींची तीन माकडे असा शो दाखविला. ती तीन नावे मी या ठिकाणी घेणार नाही. मला ते अप्रस्तुत वाटते. मला नाव घेणे योग्य वाटत नाही. मी बाब क्रमांक 1 च्या संदर्भात बोलत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या चौकशीच्या संदर्भातील खर्च भागविण्याकरिता पुरवणी मागणी केलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, ज्यावेळी आपण या सभागृहामध्ये आदर्श सोसायटीच्या चौकशीच्या संदर्भात घोषणा केली त्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक चोख प्रवृत्तीचा आणि राजकारणामध्ये योग्य गोष्टीचा सन्मान करणारा मुख्यमंत्री अशी आपली प्रतिमा झाली आणि ती प्रतिमा अजूनही तशीच आहे. आदर्श सोसायटीच्या चौकशीमध्ये काय चालले आहे याच्याशी आपला संबंध नाही. कारण जे कामकाज चालले आहे त्या बद्दल त्यांना पैसे देणे भाग आहे. ते काम कधी थांबवावे या बाबतीत आपण त्यांना मर्यादा घालत आहात. मी त्या बाबतीत सुध्दा टीका करणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

आणखी एक अहवाल आला त्यामध्ये सैन्याने काय म्हटले ते जगजाहीर आहे. तो न्यायालयीन विषय आहे. तो महसूल खात्याच्या संदर्भात कायद्याचा विषय आहे. जमिनीच्या वादामध्ये कोणाचा हक्क निर्माण होतो हा तात्विक आणि कायदेशीर विषय आहे. ती जमीन स्वातंत्र्यपूर्व काळापासून सैन्याच्या ताब्यात असल्याचा जेव्हा दावा होतो तेव्हा आपण असे कोणते घोडे मारले की, ज्यामुळे आपण या सभागृहामध्ये अगदी धवतपळत येऊन या ठिकाणी जोरजोरात अहवाल मांडण्याची घाई करुन ही जमीन शासनाची आहे असे सांगितले. त्याच्या मागचा उद्देश स्वच्छ होता. आदर्शचे जे प्रकरण सरकारच्या माध्यमातून झालेले आहे तो सरकारचा अधिकार आहे हे सांगण्याकरिता ती सगळी घाई केलेली होती. त्याचा जो काही पर्दाफाश व्हावयाचा तो होईल. ते आपण पाहू.

सभापती महोदय, मला एक गोष्ट अजून कळलेली नाही. आदरणीय मुख्यमंत्री या सभागृहात उपस्थित असल्यामुळे या गोष्टीचा उलगडा झाला पाहिजे. चौकशीचे अहवाल रोज येत आहेत. चौकशीच्या टिप्पण्या रोज येत आहेत. काल अशी भयानक बाब समोर आली आहे की, जो या देशाचा नागरिकच नाही तो त्या आदर्शच्या चौकशीमध्ये सांगतो की, मी फ्लॅट मागितला नाही, मी कोणताही अर्ज दिला नाही तरी माझे नाव त्या ठिकाणी आलेले आहे. आमचा एक भारतीय प्रशासकीय सेवेचा अधिकारी आहे. त्यांची मुलगी परराष्ट्र सेवेत अधिकारी पदावर आहे. याचा अर्थ ती पूर्ण सज्ञान, पूर्ण शिक्षित आणि कायद्याचे पूर्ण ज्ञान असलेली आहे. तरीही ती आदर्शच्या चौकशीमध्ये सांगते की, मी कधीही माझ्या अर्जावर सही केली नव्हती. मी कधी ब्लॉक मागितलाच नव्हता. मुंबईमध्ये माझे पाच ब्लॉक आहेत तरी सुध्दा मला हा ब्लॉक दिला गेला. अशा प्रकारची ही चौकशी चालली आहे. तुम्ही आम्ही सामान्य व्यक्ती म्हणून याचा विचार केला तर आदर्श प्रकरण संशयाच्या घेऱ्यामध्ये आहे हे कोणत्याही सामान्य माणसाला पटेल.

माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. मी राजकारण समजू शकतो पण आपल्या माध्यमातून ही बाब आपल्या पक्षाला कितपत मोठेपणा देणारी आहे हे आपण ठरवावे. पण आलेल्या प्रसंगाला निभावून नेण्याकरिता आपण काही तरी अकृत्रिम पध्दतीने मानसिक दृष्ट्या अनैतिक गोष्ट तर घडवित नाही ना हा प्रश्न माझ्यासारख्याला पडला आहे. हे पैसे कशासाठी द्यावयाचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांच्या चौकशीच्या संदर्भात जे काही घडले ते संपूर्ण राज्याने पाहिले आहे आणि देशानेही पाहिलेले आहे. दूरदर्शनच्या माध्यमातून संपूर्ण देश बातम्या पाहत असतो. हिंदी चॅनेलवाले बोटभर बातमी असेल तर हातभर बातमी सांगत असतात. आपल्या मराठी चॅनेलवाल्यांना जेवढे जमत नाही तेवढे ते मसाला लावून सांगत असतात. श्री.अशोक चव्हाण हे दोषी आहेत काय ? आदर्शच्या प्रकरणातील आयोगासमोर राज्याच्या तीन माजी मुख्यमंत्र्यांची साक्ष झालेली आहे. श्री.अशोक चव्हाण यांनी बाकीच्या दोन माजी मुख्यमंत्र्यांची साक्ष न घेता माझी प्रथम साक्ष का घेण्यात आली अशी विचारणा करणारे पत्र अधिकृतपणे आयोगाला लिहिले होते. आयोगाने त्यांचे म्हणणे मान्य करुन प्रथम त्या दोघांची साक्ष घेण्यात येईल, त्यानंतर तुमची साक्ष घेण्यात येईल असे त्यांना कळविले आहे. शर्यत कशामध्ये आहे ते बघावे. सोन्याला तावून सुलाखून बाहेर काढले जाते. त्या प्रमाणे मी त्यात सापडलो नाही हे दाखविण्यासाठी ही साक्ष होणार होती काय ? माझ्या अगोदर त्यांची साक्ष घ्या असा आयोगाकडे आग्रह धरण्यात आला होता. ते दोघे बोलल्यानंतर मी बोलीन अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांचे त्यांनाच लखलाभ होवो. तिन्ही माजी मुख्यमंत्र्यांनी या राज्याचे नेतृत्व केले होते. राज्याचे मुख्यमंत्री पद भुषविले होते. हे राज्य त्यांच्यावर विसंबून होते, या राज्याचे सरकार त्यांनी चालविले होते. राज्याचे मुख्यमंत्री आम्हाला काही माहीत नाही, आमचा काही संबंध नाही. अधिकारी कार्यवाही करतात असे सांगतात त्याचे आम्हाला वाईट वाटते.

मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे राजकीय नेतृत्वावर बोलत होते. देश पातळीवर केंद्रीय नेतृत्वावर चर्चा सुरु आहे, त्यावर मी बोलणार नाही, कारण मला तो अधिकारही नाही. पण दुर्दैवाने राजकीय नेतृत्वाच्या निर्णयात नपुंसकत्व आले आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. म्हणजे या बाजूने निर्णय घ्यावयाचा नाही आणि त्या बाजूनेही निर्णय घ्यावयाचा नाही, कोणताही निर्णय घ्यावयाचा नाही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, आदर्शच्या प्रकरणात श्री.अशोक चव्हाण हे दोषी आहेत  अशा प्रकारचे वातावरण तयार झाले होते. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे एका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. माननीय मुख्यमंत्री हे एका पक्षाचे आहेत. पण आपण आमच्या राज्याचे व आमचे मुख्यमंत्री आहात. पण पक्षाच्या पलीकडे जाऊन 10 कोटी जनतेने आपल्याकडे नेतृत्व दिलेले आहे.  असे असताना मी आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे माननीय श्री.अशोक चव्हाण यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. म्हणजे भ्रष्टाचाराला पाठिंबा देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी उभे आहात की त्यांनी निर्माण केलेल्या आदर्श घोळासाठी ? त्यांनी सांगितले मी नव्हे ते दोघे आणि ते दोघे म्हणतात की, आम्ही नाही ते दोघे.  आट्यापाट्या खेळातील खेळाडूला शाबासकी दिली जाते त्याप्रमाणे तुम्ही दोघेजण श्री.अशोक चव्हाण यांच्या पाठीशी उभे होता काय ? आदर्श प्रकरणातील चौकशीमध्ये हे तिघेजण एकमेकाला भ्रष्टाचारी ठरवित असताना त्यांना माननीय मुख्यमंत्री सहकार्य करीत असतील तर ते अत्यंत निंदनीय आहे.  महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकास असे वाटते की, आमच्या मुख्यमंत्र्यांनी असे बोलू नये. ज्यावेळी महाराष्ट्रातील जनता आपले मुख्यमंत्री म्हणते त्यावेळी तुम्ही काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री नसून संपूर्ण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असता.  हे मी तुम्हाला आवर्जून सांगतो.

माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांची इच्छा शक्ती काय आहे ते आज जाहीर करावे. आपण यापूर्वी आदर्शच्या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल असे छातीठोकपणे जाहीर केले होते. या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, भ्रष्टाचाराला पाठीशी घालणार नाही. या आयोगाचा अहवाल शासनाला सादर केला जाईल, मंत्रिमंडळात त्यावर चर्चा केली जाईल.  त्या ठिकाणी आपले कोण, तुमचे कोण याची चर्चा होईल. त्यातून कोणाला वाचवावयाचे ते ठरविले जाईल.  त्यानंतर केलेल्या कारवाईचा अहवाल सभागृहासमोर मांडला जाईल.  26/11 संबंधी नेमलेल्या प्रधान समितीच्या अहवालाचे जे झ ााले तशीच या आयोगाच्या अहवालाची लक्तरे वेशीवर टांगली जातील असे आम्हाला दिसत आहे. हा सर्वस्वी अधिकार शासनाचा आहे.  माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, आदर्श घोटाळ्याच्या प्रकरणात दूध का दूध पानी का पानी सिध्द व्हावे, ज्यांनी या प्रकरणात भ्रष्टाचार केला असेल तर त्यांना शासन व्हावे अशी प्रामाणिक इच्छा आहे का ? या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

प्रकरणाची सी.बी.आय.मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची सी.बी.आय.मार्फत चौकशी करण्याला शासनाने मान्यता दिली. असे असताना कोणाला लपविण्यासाठी हे सर्व सुरु आहे ? या प्रकरणाची चौकशी करण्याचा सी.बी.आय.ला अधिकार नाही हे सांगण्यासाठी शासनामार्फत वकील कोर्टात गेले होते. देशाच्या जनतेचा पैसा वेगळ्या मार्गाने उद्ध्वस्त करण्याचा नैतिक अधिकार या शासनाला कोणी दिला ? सी.बी.आय.ने या घोटाळ्याचे 10 हजार पानांचे आरोप पत्र तयार केले आहे. त्यासाठी किती श्रम लागले असतील, किती मनुष्य बळ लागले असेल ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 05:00

श्री. दिवाकर रावते...

किती टॅलेण्ट लागले असेल ? टॅलेण्ट शब्द वापरला की त्याला थोडी धार येते. माननीय मुख्यमंत्री महोदयांना समजण्यासाठी मी टॅलेण्ट शब्द वापरला.

भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर गुन्हेगारांना कसे पकडण्यात आले यासंबंधी "Assasination of Rajiv Gandhi" हे पुस्तक लिहिण्यात आलेले आहे. हे पुस्तक प्रत्येकाने वाचण्यासारखे आहे. कोणताही पोलीस अधिकारी माझ्या संपर्कात आला की त्याला मी हे पुस्तक गिफ्ट म्हणून देतो. चांगला पोलीस अधिकारी कसा असावा याची प्रेरणा या पुस्तकातून मिळते. स्व. राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर पोलिस यंत्रणेने किती सक्षमतेने काम केलेले आहे ते हे पुस्तक वाचल्यानंतर समजते. माझा सांगण्याचा मुद्दा असा आहे की, आदर्श प्रकरणी सीबीआयने हजार पानांचे आरोपपत्र दाखल केल्यानंतर सीबीआयची आवश्यकता नाही असे राज्य शासन सांगू शकते काय ? "आदर्श" प्रकरणाची चौकशी करण्याची तुमची इच्छा नाही काय ? या "आदर्श" प्रकरणी देश ढवळून निघालेला आहे. या प्रकरणाचा शोध लागू नये असे माननीय मुख्यमंत्री महोदयांना वाटते काय ?

मला माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे की, या प्रकरणी जो काही फार्स निर्माण केलेला आहे तो एकदाचा बरखास्त करुन टाका. कारण या बाबतीत काहीही निर्णय लागणार नाही, शासनाचे पैसे मात्र वाया जातील. म्हणून "आदर्श" प्रकरणाची चौकशी एक तर बंद करा नाही तर या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राच्या जनतेचे मुख्यमंत्री, माझे मुख्यमंत्री हे माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या पाठीशी उभे आहेत असे जाहीर करा. माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या पाठीशी उभे रहाण्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी जे अतर्क्यपणे जाहीर केले त्या बाबतीत अधिक स्पष्टता झाली तर बरे होईल. म्हणून बाब क्रमांक 1 वर बोलत असताना या बाबीला का मान्यता द्यावी असा प्रश्न माझ्या समोर निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, अकोला जिल्ह्यामध्ये माननीय राष्ट्रगीताचा अवमान झाला. त्या बाबतीत आयुक्त आणि सचिव यांच्या विरुध्द पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केल्यानंतर त्यांना अटक झाली नाही. मंत्रालयाला लागलेल्या आगीत संपूर्ण मंत्रालय जळत असताना शासनाच्या सेवेतील 8 वीरांनी आपला तिरंगा सुरक्षितपणे खाली उतरविला. सा-या देशाला या वीरांचा अभिमान आहे. आम्हाला देखील त्यांचा अभिमान आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील त्यांचे कौतुक केले. पण

..2..

अकोल्यामध्ये आयुक्त आणि सचिव यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिल्यानंतर त्यांच्यावर कारवाई होत नसेल तर त्याचा आम्ही काय अर्थ घ्यायचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला मार्गदर्शन केले तर बरे होईल.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 84 वरील बाब क्रमांक 82मध्ये जलविद्युत प्रकल्प आणि प्रशासकीय व निवासी इमारती यांच्या परिरक्षण व दुरुस्तीच्या कामाकरिता अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये केलेली तरतूद अपुरी असल्याने चालू वर्षाकरिता 15 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. या निमित्ताने माननीय जलसंपदा मंत्री महोदयांना मी काही प्रश्न विचारु इच्छितो. अशा प्रकारचे जलविद्युत प्रकल्प किती आहेत, ते कोठे कोठे आहेत, त्यापासून किती वीज निर्मिती होते, प्रत्येक वर्षाचा खर्च किती, एमएसईबीला वीज दिल्यानंतर त्यापासून किती उत्पन्न मिळते, प्रकल्प कुणाच्या मालकीचे आहेत, ते किती वर्षापासून कार्यरत आहेत आणि त्यापासून किती कार्बन क्रेडिट निर्माण झालेले आहे, या प्रश्नांची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. जेथे पाण्याची उपलब्धता झालेली आहे त्याठिकाणी स्वतःच्या कंपन्या उभ्या करुन त्या चालविण्यासाठी छोटे छोटे जलविद्युत प्रकल्प महाराष्ट्रामध्ये निर्माण केले जात आहेत. हे प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे असतील तर मला आनंद होईल. म्हणून त्या प्रकल्पांच्या बाबतीत मी या मागणीच्या निमित्ताने माहिती जाणून घेऊ इच्छित आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.शिगम.. 05:05

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, मृदसंधारण हा जलसंधारणाचा दुसरा एक भाग आहे. हा भाग आता अनुशेषांतर्गत येत नाही. कारण 15 हजार हेक्टरच्या वरील भाग माननीय राज्यपालांच्या अंतर्गत येतो. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी येथे विहिरी आणि तलावाचा उल्लेख केला तो देखील माननीय राज्यपालांच्या अनुशेषात येत नाही. सिमेंट बंधारा बांधण्यासाठी जी तरतूद केलेली आहे ती अत्यंत महत्वाची आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या भागातील ही बाब आहे. पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी सिमेंट बंधारा बांधण्यासाठी 15 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी येथे "आदर्श" प्रकरणाचा उल्लेख केला. म.वि.प.नियम 34 (2) मध्ये तरतूद आहे की, "भारताच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असेल अशा कोणत्याही बाबींचा उल्लेख करता कामा नये." तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी न्यायालयीन बाब असलेला जो उल्लेख केला तो कामकाजातून वगळण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांना सांगू इच्छितो की, न्यायालयीन चौकशी वेगळी आहे. शासनाने नेमलेली ही समिती आहे. (अडथळा) मी आपणास सांगू इच्छितो की, या ठिकाणी न्यायालयाच्या कामकाजाची बाब येत नाही. शासनाने निवृत्ती न्यायमूर्ती यांची चौकशी नेमलेली आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी तेथे स्पष्टीकरण दिले आहे. मी सुरुवातीला अत्यंत तळमळीने व मनापासून जे सांगितले ते कोणाला समजले नसेल तर माझे ते दुर्दैव आहे.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याकरिता 15 जिल्ह्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रासाठी 15 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. ज्यामध्ये जत, कवठेमहांकाळ, आटपाडी, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगाव, खटाव, माण, मंगळवेढा, सांगोला, पुरंदर, संगमनेर, पारनेर आणि मराठवाड्यातील फक्त भूम सोडून बाकी सर्व तालुके पश्चिम महाराष्ट्रातील आहेत या सर्व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती आहे त्यासाठी ही मागणी केलेली आहे आणि ती योग्य देखील आहे. दिनांक 19 मे 2012 रोजी वित्त विभागाने या मागणीला मान्यता दिली. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दुष्काळी भागांकडे सतर्कतेने लक्ष दिले याचा हा लेखाजोखा आहे. दहा दिवसांत जलसंधारण विभागाकडे वित्त विभागाचे आदेश गेले असे पहिल्यांदाच दिसले. प्रशासकीय जाणिवा अशा असल्या पाहिजेत. वर नमूद केलेल्या भागात आता जास्तच गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम येथे उपस्थित नाहीत. माननीय मुख्यमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. येथे दुष्काळा संदर्भात चर्चा झाली. त्यास आपण सर्वजण साक्षी आहोत. सांगलीचे सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील येथे उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अशा कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणीही उपस्थित नसले तरी पश्चिम महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून श्री. रमेश शेंडगे उपस्थित असतात. त्या कार्यक्रमाच्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय पुढे उभे होते, त्यांच्या बाजूला श्री.प्रकाश शेंडगे उभे होते आणि त्यांच्या मागे श्री. रमेश शेंडगे उभे होते. ती चित्रफीत माझ्या डोळयासमोरुन जात नाही. तुम्ही आमदार आहात, ते देखील आमदार आहेत.

सभापती महोदय, जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सभागृहात बरीच चर्चा झाली. जनावरांना चारा उपलब्ध होत नाही अशा प्रकारची तक्रार सभागृहातील सर्व सदस्यांनी मांडली. माननीय मंत्री महोदय हे काही प्रश्न स्वत:हून अंगावर घेतात. योजना राबविण्यात येत नसतील तर त्यात माननीय मंत्र्यांचा काहीच दोष नसतो. माननीय मंत्री आणि सरकार हे धोरण ठरविण्याचे काम करीत असते. त्या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकाऱ्यांची असते. जनावरांना चारा उपलब्ध होत नाही, त्या गोष्टीस प्रशासकीय अधिकारी जबाबदार आहेत. चाऱ्याची चोरी तहसीलदार आणि तलाठी करीत असतात. माननीय मंत्री महोदय, काही प्रश्न आपल्या अंगावर का घेतात ही गोष्ट मला कळत नाही. डॉ.पतंगराव कदम तेथे जातात आणि दोन किलो चारा चोरतात अशा प्रकारे ते त्या दिवशी सभागृहात वागले हे बरोबर नाही. माननीय मंत्री आणि शासन धोरण ठरवित असते आणि त्याची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी करावयाची असते. त्या धोरणाची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून होत नाही याची मला खंत वाटते. माननीय डॉ.पतंगराव कदम यांना सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधी मी आपणा मार्फत निरोप पाठविला आहे. परंतु सायकांळ झालेली असतानाही ते सभागृहात आलेले नाहीत.

सभापती महोदय, मनुरगड, ता.खालापूर, जिल्हा सांगली येथे चाऱ्या अभावी पाच जनावरे मृत झाली. ही गोष्ट दूरदर्शनच्या माध्यमातून प्रसारीत झाल्यामुळे या बाबतची सर्व सदस्यांना माहिती झालेली आहे. मी त्या ठिकाणी दूरध्वनी केला होता. तेथून मला सांगण्यात आले की, चाऱ्या अभावी पाच जनावरे मृत्युमुखी पडली. या सभागृहामध्ये जनावरांसाठी पूर्णपणे चारा उपलब्ध करुन देत आहोत असे सरकारकडून सांगितले जात आहे. ग्रामीण भागात चाऱ्या अभावी शेतकऱ्यांची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जनावरे मृत्युमुखी पडत असतील तर तर या मागणीच्या संदर्भात आम्ही सरकारच्या पाठीशी का म्हणून उभे रहावयाचे, या मागणीच्या बाबतीत सरकारला पाठिंबा का म्हणून द्यावयाचा असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिलेला आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, आपणाकडे पुरवणी मागण्याच्या अनुषंगाने निधी उपलब्ध झाला असेल. तर पाटबंधारे विभागाच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे, किती सिमेंट बंधारे बांधण्याचे काम हाती घेतले आहे, शेती ओलिताखाली आणण्यासाठी काय सुविधा निर्माण् केल्या आहेत, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी काय व्यवस्था केलेली आहे या बाबतची सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी मी उत्सुक आहे. सभागृहात सदरची माहिती माननीय मंत्री महोदयांकडून दिली जाईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री मघाशी सभागृहात उपस्थित होते. अतिशय तडफदार आणि तडफेने निर्णय देणारे ते राज्यमंत्री आहेत. सभागृहात ते स्वत:च निर्णय देतात. त्या निर्णयाची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांना देखील नसते. आपण अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे काय, असा कधी तरी माननीय मुख्यमंत्र्यांना देखील प्रश्न पडतो. ते आमच्या पक्षात असतानाही तेवढयात तडफेने काम करीत होते. आता ते पक्ष सोडून सत्ताधारी पक्षात गेले आहेत. कर्तबगारी जास्त झाली तर माणसाचे काय होते याची आपणा सर्वांना माहिती असेलच. सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई या सर्व गोष्टी आपण अनुभवल्या आहेत. तुम्ही कर्तृत्ववान महिला असून तुम्हाला महिला आरक्षणातून मंत्री पद कधी मिळाले नाही हे मी माझे व्यक्तीगत मत व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, मी नगरविकास विभागाची बाब क्रमांक 55 वर माझे विचार व्यक्त करीत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, माझ्याकडे नगरपालिकांसंबंधी काही कागदपत्रे आहेत ती आपणाकडे पाठवित आहे. नगरपालिका यांच्याकडे विविध माध्यमातून निधी जमा होतो. जकात, मालमत्ता कर, व्हॅट इत्यादी माध्यमातून निधी जमा होतो. या करांच्या अनुषंगाने अंदोलने होत

3...

श्री.दिवाकर रावते....

आहेत. नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्या निधीच्या विनियोगात काही भ्रष्टाचार करीत असतील, त्या निधीचा गैर उपयोग करीत असतील तर ती बाब अतिशय गंभीर आहे. माझ्याकडे पत्र उपलब्ध आहे ते प्रधान सचिव, नगरविकास यांना लिहिलेले पत्र आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद श्री.कुणालकुमार यांनी लिहिलेले ते पत्र आहे. कन्नड नगरपालिकेच्या सर्वच्या सर्व नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांनी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे, त्यामुळे त्यांची ताबडतोब बदली करावी अथवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवा म्हणून ठराव पास केला आहे. परंतु त्यांच्या बदलीच्या बाबतीत शासनाने आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. हा ठराव त्यांनी 8 मार्च, 2012 रोजी केलेला आहे. आता जुलै महिना सुरु आहे. प्रधान सचिव यांच्याकडे पाठविलेल्या पत्राची दखल घेतली जात नसेल तर ती गोष्ट बरोबर नाही. त्यांनी कशा पध्दतीने भ्रष्टाचार केला आहे याचा उहापोह मांडून सभागृहाचा वेळ घेणार नाही. या बाबतची संपूर्ण कागदपत्रे मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवितो. त्यांनी ती कागदपत्रे वाचल्यानंतर ते आजच्या आज त्यांच्या तातडीने बदली संबंधीचे आदेश देतील अशी मला अपेक्षा आहे. ही नगरपालिका राष्ट्रवादी आणि कॉग्रेस पक्षाच्या ताब्यात आहे....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 05:15

श्री. दिवाकर रावते...

प्रशासकीय यंत्रणा जर अशा पध्दतीने वागत असेल तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. आपल्या खात्याचे राज्यमंत्री सीआयडी चौकशी लावण्यामध्ये फार तत्परता दाखवितात. त्याच तत्परतेने मी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करण्यासाठी अकोला महानगरपालिकेची बाब मांडत आहे.

सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेच्या बाबतीत मी देखील महत्वाचा मुद्दा मांडणार आहे. अकोला महानगरपालिकेचा कारभार ज्या पध्दतीने चालला आहे तो अवर्णनीय आहे आणि दुर्देवी आहे. काल अकोल्यामध्ये एका कंत्राटदाराचा मृत्यू झाला. त्यांनी जाहीरपणे सांगितले की, श्री. गो.रा.वैनागडे यांनी 20 टक्के पैसे मागितले म्हणून दबाव आल्यामुळे त्या कंत्राटदाराचा मृत्यू झ ाला. शासनाकडे माहिती आली असेल. अकोला महानगरपालिकेमध्ये जलप्रदाय विभागातर्फे केवळ कागदोपत्री काम दाखवून 9 लाख 85 हजार रुपयांची बोगस बिले लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्रीडा विभागाच्या भीमयोजनेच्या कामाची चौकशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातर्फे करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. परमविरसिंग यांनी दिली आहे. भीमयोजना क्रीडा शिक्षण संस्थेकडे जलविभागाचे काम कसे काय गेले हे मला कळत नाही. हा एक संशयाचा विषय आहे. अकोल्यामध्ये क्रॅाकीटचे रस्ते बांधल्यानंतर ते 10 व्या दिवशी उखडले म्हणून महानगरपालिकेला पुन्हा डांबर टाकावे लागले. अशा पध्दतीने निधीचा दुरुपयोग चालला आहे त्याकडे माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष द्यावे. निधीचा विनियोग अशा पध्दतीने होत आहे याकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, आपल्या विभागातील म्हणजे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बाबतीत मी महत्वाचा मुद्दा मांडणार आहे. या विभागात अनधिकृत बांधकामे पाडण्याची मोहीम जोरात सुरु आहे हे आपण वृत्तपत्रातून वाचले आहे. पिंपरी-चिंचवडच्या बाबतीत माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्याशी मी चर्चा केली आहे. माझ्याकडून काही राहिले असेल तर ते त्यांनी मांडावे अशी माझी इच्छा आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये 93260 अनधिकृत बांधकामे आहेत ती तोडावीत म्हणून न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. मुदतवाढ मागितली आहे. राहती घरे आहेत, सामान्य लोक रहात आहे. ही बिल्डरांनी बांधलेली घरे नाहीत. म्हणून महानगरपालिकेने ठराव केला की,ज्याप्रमाणे तुम्ही उल्हासनगर महापालिकेअंतर्गत येणाऱ्या बांधकामांना संरक्षण दिले आहे त्याप्रमाणे येथेही द्यावे. सरकारकडे त्यांनी ठराव पाठविला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, सदनात कायदा आणून उल्हासनगरपालिकेमधील बांधकामांना संरक्षण दिले त्या पध्दतीचे संरक्षण याठिकाणी द्यावे असा ठराव केलेला आहे. हजारो कुटुंबांचा हा प्रश्न आहे. ज्या अनियमितता झाल्या आहेत त्यांना दोष देणार नाही. न्यायालयाच्या निर्णयाला दोष देणार नाही. परंतु हजारो कुटुंब उद्ध्वस्त होतात त्यावेळी जो न्याय उल्हासनगरला दिला तोच न्याय याठिकाणी राहणाऱ्या कुटुंबाना आणि भूमिपुत्रांना द्यावा अशी अत्यंत नम्रपणाने मागणी करीत आहे. जरी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका 100 टक्के राष्ट्रवादीची असली तरी जनता महाराष्ट्राची आहे आणि तुमची आहे. आपले मुख्यमंत्री यात न्याय देतील अशा अपेक्षेने मी त्यांच्याकडे पहात आहे. याबाबतीत तरी माननीय अजितदादांचा विचार न करता म्हणजे ते उपमुख्यमंत्री असले तरी त्यांच्याकडे नस्ती न पाठविता याबाबतीत कायदा करावा अशा प्रकारची विनंती करतो.

सभापती महोदय, शेवटचा विषय मराठी शाळांबाबत मांडणार आहे. सभापती महोदय, पुणेरी फेटा पाहिला की मराठी संस्कृती आठवते. मुंबईकरांकडे बघून आम्हांला मराठी म्हणून ओळखत नाही. मराठी शाळांबाबत मी अनेकवेळा मुद्दा मांडला. हा विषय केवळ तुमचा आणि आमचा नसून संपूर्ण सदनाचा हा विषय आहे. मराठी शाळा मोठया संख्येने चालू आहेत. सातारा, सांगली,पुणे कोल्हापूर याठिकाणी या शाळा मोठया प्रमाणात सुरु आहेत. मोठया संख्येने मराठी मुले शिकतात. बृहत् आराखडयात या शाळा बसत नसल्यामुळे त्यांना मान्यता देण्यात येत नाही आणि त्यांच्यावर कारवाई करण्याची पत्रे दिलेली आहेत. 1 लाख रुपये दंड करु आणि तुरुंगात पाठवू असे सांगितले आहे. मराठी शाळा काढून मराठी मुलांना शिकविणे हा महाराष्ट्रामध्ये या भूमीमध्ये गुन्हा होतो आणि तुरुंगात जावे लागते या सारखी शरमेची गोष्ट केवळ तुम्हांला आम्हांला नाही तर सदनाला असू शकेल काय ? असूच शकत नाही.

नंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

मंत्री महोदयांनी मला शब्द दिला की हे थांबविण्यात येतील. पण तशी परिस्थिती मात्र दिसत नाही. मी या निमित्ताने पुन्हा विनंती करतो की, अमुक पध्दतीचा अभ्यासक्रम असेल तरच मराठी शाळांना मान्यता देऊ असा विचार न करता या मुलांचा अधिकार अबाधित राहून त्यांना मान्यता दिली पाहिजे अशी माझी सूचना आहे. संभाजी नगरला माझ्यासोबत माननीय मुख्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. त्यावेळेस या शाळांना सांगितले की, आम्ही तुमच्या बरोबर आहोत पण या कायद्यामुळे अशा शाळा अस्वस्थ आहेत. या कायद्याची अंमल बजावणी करताना मंत्री महोदयांनी अशा प्रकारे कपाळ करंटेपणा माथ्यावर घेऊन फिरु नये अशी कळकळीची विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असताना नगरविकास विभाग, बाब क्र. 54 च्या अनुषंगाने मी काही गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहे.

गेल्या पाच वर्षात मूल नगर पालिकेला दलित वस्ती सुधारणा योजनेतून निधी मिळालाच नाही, त्यामुळे दलित वस्तीत सुधारणा झालेल्या नाहीत. मूल नगर पालिकेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात दलितांची वस्ती आहे पण या पुरवणी मागण्यांमध्ये देखील ही तरतूद केली नसल्याने शासनाने त्यासाठी विशेष तरतूद करावी अशी मी विनंती करते.

महोदय, तेराव्या वित्त आयोगाचा पैसा चंद्रपूर जिल्ह्यासाठी मंजूर झालेला नाही. हा निधी आलेला आहे पण अद्याप मंजूर झालेला नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण करण्यासाठी ब्लिचींग पावडर व तुरटीची खरेदी झालेली नाही. त्याचा परिणाम म्हणून शहरात गॅस्ट्रो व डायरियाची साथ पसरली तसेच नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठीचे टेंडर न दिल्यामुळे गटारे मोठ्या प्रमाणात तुंबलेली आहे. यासाठी तातडीने मंजुरी देऊन जनतेच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार थांबवावा.

अन्न व नागरी पुरवठा विभाग, बाब क्र. 110 च्या संदर्भात मी एक बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देणार आहे. या विभागाच्या अखत्यारित असलेली धान्याची गोदामे बांधण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. धान्याचे साठे करण्याच्या दृष्टीने मूल नगरपालिकेच्या ठिकाणी असलेले गोडावून पडायला आलेले आहे. त्या गोडावूनमध्ये पाच-पाच फुटाचे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे धान्याची नासाडी मोठ्या प्रमाणात होत आहे. या ठिकाणी नवीन गोडावूनची मागणी गेल्या चार पाच वर्षांपासून करण्यात आली, त्यासाठी प्रस्ताव देखील पाठविलेला आहे पण अद्यापही त्याला मान्यता मिळाली नाही. शासनाने या प्रस्तावाला मान्यता द्यावी.

शालेय शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा सन 2009 मध्ये लागू केल्यानंतर खाजगी शाळांपासून वंचित व आर्थिक दुर्बल घटकासाठी 25 टक्के जागा राखीव ठेवावयाच्या आहेत. त्यासाठी येणारा खर्च शासनाने करावयाचा आहे. यासाठी आवश्यक ती तरतूद मूळ अर्थसंकल्पात तसेच पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून देखील केलेली नाही. अशा शाळांमध्ये 25 टक्के मुलांना शाळेत दाखल करुन घेण्यासाठी या शाळांना निधी मंजूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

करण्यात आला नाही. असा निधी शासनाने दिला नाही तर या 25 टक्के मुलांना ॲडमिशन मिळणे शक्य होणार नाही. त्यासाठी खास तरतूद करण्याची गरज आहे. शासन वास्तविक मुलांची पुस्तके व इतर सामुग्री यासाठीचा खर्च देणार आहे. पण माझी अशी सूचना आहे की, आपण फाईव्ह स्टार शाळांमध्ये या मुलांना ॲडमिशन देण्याचा हट्ट धरला आहे त्या शाळेत इतर हाय-फाय मुले सुध्दा शिकत असतील. त्याच शाळेत ही गरिबांची व दुर्बल घटकातील मुले त्या मुलांच्या बरोबरीने बसतील, पण त्यामुळे या गरीब मुलांच्या मानसिक दुर्बलता निर्माण होऊ नये. असे झाले तर शिकण्यासाठी जी मुले आली तीच शिक्षणापासून वंचित होण्याची वेळ येऊ शकते. यासाठी फाईव्ह स्टार शाळेत हाय-फाय मुलांच्या बरोबरीने केवळ कपडेच नव्हे तर दफ्तरापासून इतर सर्व सोई-सुविधांबाबत शासन विचार करणार असेल तरच हे शक्य होईल, अन्यथा या गरीब मुलांना फ्रस्ट्रेशन आले तर ते शाळेतच जाणार नाहीत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

गरिबांच्या मुलांना नैराश्य आले तर गरिबांची मुले शिक्षण घेऊ शकणार नाहीत व ही मुले शिकण्याऐवजी शिक्षणापासून दूर जातील त्यामुळे शासनाने यासंदर्भात शांततेने विचार करावा किंवा श्रीमंताच्या मुलांच्या बरोबरीने या मुलांची व्यवस्था करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयातील मूल गावात गेल्या पाच वर्षापासून समाज कल्याण विभागाच्या मुलींचे वसतिगृह आहे. सदर मुलींचे वसतिगृह भाडयाच्या इमारतीमध्ये सुरु आहे. सदर वसतिगृह अशोका हॉटेलच्या बियर बारच्या बाजूला आहे. संध्याकाळी मुली फिरत असतात तेव्हा त्या हॉटेलमध्ये दारु किंवा बियर पिणारे लोक येत असतात. या हॉटेलमध्ये लोक मौजमजा करण्यासाठी येत असतात व अशा ठिकाणी मुलींचे वसतिगृह असणे योग्य नाही. त्यामुळे मूल येथील मुलींचे वसतिगृह ताबडतोबीने दुसरीकडक बांधून द्यावे व त्यासाठी पैसे मंजूर करावे व मुलींच्या आयुष्यांची बरबादी होणार नाही याचा विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 81, पृष्ठ क्रमांक 83 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. गोसीखुर्द प्रकल्पाला 1982 मध्ये सुरुवात झाली होती. गोसीखुर्द प्रकल्प हा विदर्भातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. गोसीखुर्द प्रकल्पातील केवळ 3 गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न जाणूनबुजून चिघळवत ठेवला गेला आहे. गोसीखुर्द प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. या धरणात पाण्याचा संपूर्ण साठा केला जात नसल्यामुळे कॅनॉल मार्फत शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचले जात नाही. शासन फॉरेस्ट मधील पुनर्वसनाचे काम तातडीने करते. गोसीखुर्द प्रकल्पामुळे 1 लक्ष हेक्टरला जमिनीला पाणी मिळणार आहे. या ठिकाणच्या 3 गावांचे पुनर्वसन केले जावे यासाठी सन्माननीय सभापती महोदयांच्या दालनात बैठक झाली, पहाणी झाली परंतु घोडे नेमके कोठे अडले आहे ते काही समजत नाही. खरे म्हणजे पुनर्वसनाच्या नावाखाली गोसी खुर्द प्रकल्पाचे काम पूर्ण केले जात नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. गोसीखुर्द प्रकल्प अजून पूर्ण झालाच नाही, कॅनॉलचे काम पूर्ण न झाल्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचलेच जात नाही तरी सुध्दा गोसीखुर्दच्या वैनगंगा नदीत एक्सेस पाणी आहे असे सांगून वैनगंगा नळ प्रकल्पाला, नद्या जोड प्रकल्पाला मंजुरी दिलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या 50 वर्षापासून उन्हाळयातील रब्बी पिकाला पाणी पुरवता येणार नाही असे स्पष्टीकरण देऊनही त्याकडे शासन हेतुपुर:सर दुर्लक्ष करीत आहे हेच यातून सिध्द होत आहे. विदर्भातील मोठा प्रकल्प पूर्ण करण्याची व विदर्भातील जनतेला पाणी देण्याची आपली मानसिकता नाही काय ? एक्सेस पाण्याच्या नावाखाली येथील पाणी दुसरीकडे नेण्याची व्यवस्था केली जात आहे. तीन गावांमुळे प्रकल्प अडवला गेला असे तुम्ही सांगता ते बरोबर आहे काय ? या तीन गावाचे अजून पर्यंत पुनर्वसन झालेले नाही, गोसीखुर्द प्रकल्पाच्या कॅनॉलचे काम पूर्ण झालेले नाही. 1982 मध्ये गोसीखुर्द प्रकल्पाला सुरुवात झालेली असतांना सुध्दा या प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही. गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण होण्यासाठी विदर्भातील जनतेला अजून किती वर्षे वाट पहावी लागणार आहे ? एक पिढी संपली व दुसरी पिढी सुरु झालेली असतांना सुध्दा गोसीखुर्द प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पाचे काम पूर्ण करुन तेथील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देण्याचे काम शासनाने करावे अशी मी अपेक्षा करते.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात पूर्ण करावे अशी विनंती आहे. आणखी 27 सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडावयाचे आहेत. पुरवणी मागण्या झाल्यानंतर सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराला सुरुवात होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे अशी सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी बोलावयास उभी राहिल्याबरोबर मला अडथळा केला जातो. सभागृहात आम्ही केवळ सहाच महिला सदस्या आहोत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपक चव्हाण : काल जे सन्माननीय सदस्य बोलले आहेत त्यांना आज आपण बोलण्यास अनुमती देऊ नये.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पुरूष सन्माननीय सदस्यांना वाटत असेल की, येथे बसलेल्या सर्व महिला सदस्य अप्रबुद्ध आहेत व आम्हीच बुद्धिमान आहोत तर ते चुकीचे आहे. आम्हीच फक्त 2-2 तास बोलू व बाकीच्यांनी लगेच बसले पाहिजे हे आम्ही खपवून घेणार नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, येथे चर्चा होणे अभिप्रेत आहे. सर्वांनी मोकळेपणाने बोलले पाहिजे. पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना बाबनिहाय चर्चा झाली पाहिजे. आज 6.00 वाजता उत्तराला संधी दिली तर येथे जे काही बोलले गेले आहे त्यास उत्तर देता येईल. येथे बाबीच्या बाहेरील देखील बरेच काही बोलले गेले आहे. येथे व्यक्तिगत बोलण्याचा प्रयत्न देखील करण्यात आला आहे. त्याची उत्तरे देणे आवश्यक असल्याने माझी आपल्याला विनंती आहे की, 6.00 वाजता माननीय मंत्र्यांच्या उत्तराला सुरूवात करावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 6.00 वाजता उत्तर देण्यास संधी द्यावी असे माननीय मंत्र्यांनी आताच सांगितले आहे. याबाबत आपण सभागृहाचे मत विचारात घ्यावे. तसेच वेळ वाढवून देण्यासंबंधी देखील आपण निर्णय घ्यावा. येथे महिला आणि पुरूष हा प्रश्न नाही. शेवटी बोलणाऱ्या माननीय सदस्यांची देखील 20 ते 25 मिनिटे बोलण्याची तयारी असते. पण त्यांना दोन ते अडीच मिनिटांमध्येच बोलावे लागते. त्यामुळे सदस्यांना अतिशय नैराश्य येते. जेथे वेळ ठराविक आहे तेथेच प्रश्न येईल. आज आपण बाकीचे प्रस्ताव बाजूला ठेवले आहेत. त्यामुळे प्रत्येक सदस्याला 10-10 मिनिटे वेळ द्यावी. वाटल्यास, उद्या पर्यंत वेळ वाढवावी अशी आमची विनंती आहे. आपण आम्हाला मार्गदर्शन करावे. 27 सन्माननीय सदस्यांना पुरवणी मागण्यांवर बोलायचे आहे. त्यांच्यासाठी सभागृहाच्या कामकाजची वेळ दोन तास वाढविली तरी त्यांना किती वेळ मिळणार आहे ? नाही तर मग आपण सांगू टाकावे प्रत्येक पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलायला मिळणार नाही. आता आपण मान्य कराल पण आमचे सन्माननीय, आदरणीय, प्रेरक, मार्गदर्शक श्री.वसंतरावजी डावखरे हे मध्येच वर येतील आणि आदेश देतील. त्यांनी आदेश दिल्या नंतर

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सर्वांना गप्प बसावे लागते. कारण ती आपली शिस्त आहे. आता पर्यंत ते आम्हाला बोलण्याची संधी देत आलेले आहेत. पण शेवटी बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना आपले बोलणे कमी वेळात आटपावे लागते व मंत्रिमहोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे लागते. येथे कोणीही स्वतःच्या बोलण्यासाठी आलेले नसते. शासनाचे देखील उत्तर आले पाहिजे.

**तालिका सभापती** : माननीय उप सभापती श्री.वसंत डावखरे यांच्यासंबंधी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केलेला उल्लेख मी रेकॉर्डवरून काढून टाकतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, 49 वर्षे आपण रब्बी हंगामामध्ये आणि उन्हाळ्यामध्ये पिकांना पाणी पुरवू शकणार नाही, याकडे लक्ष वेधून देखील दुर्लक्ष झाले आहे. त्याच बरोबर गोसीखुर्दचे सिंचनाचे पाणी, शेतकऱ्यांचे 24000 हेक्टर क्षेत्राचे पाणी आपण मौदा प्रकल्पाला देण्याचे ठरविले आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे एक एकर क्षेत्र देखील ओलिताखाली येणार नाही. 24000 हेक्टर पाण्याचा लिलाव शासनाने केलेला आहे. हे आमच्या शेतकऱ्यांवर अन्याय करण्यासारखे आहे. इरई धरणाला गोसीखुर्दचे पाणी देण्यात यावे अशा प्रकारची मागणी आहे. त्यामुळे आपण थर्मल पॉवरला पाणी पुरवू शकत नाही. या कारणामुळे अनेकदा संच देखील बंद पडतात. त्यामुळे गोसीखुर्दचे पाणी पुन्हा इरई धरणाला द्यावे अशी मी विनंती करते. जवळपास 20 हजार हेक्टरचे पाणी त्या धरणाला दिले तर मग 44 हजार हेक्टर क्षेत्राला पाणी मिळू शकणार नाही. हा प्रकल्प शेतकऱ्यांचा होणार आहे की, उद्योगांचा होणार आहे हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या उशाशी पाणी आहे. परंतु, पाण्याशिवाय त्याची शेती मरत आहे, असे जर चित्र असेल तर ते शेतकऱ्यांच्या दृष्टीने हानीकारक आहे. आता पर्यंत शेतकऱ्यांनी कर्जा पोटी आत्महत्या केली. यापुढे त्यांच्यावर सिचंनामुळे आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

विदर्भाला 41200 कोटी रूपयांची गरज आहे. सर्व प्रकल्पांतून विदर्भातील 15 लाख 47 हजार हेक्टर जमीन सिंचना खाली यायला पाहिजे होती. परंतु, आता पर्यंत केवळ 2 लाख 71 हजार 457 हेक्टर जमीनच सिंचनाखाली आली आहे. याच अर्थ केवळ 17.54 टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अजूनही विदर्भातील काही प्रकल्प पूर्ण झालेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

नाहीत. मोठ्या प्रकल्पांपैकी केवळ उमरेड निम्न वैनगंगा प्रकल्प पूर्ण होत आला आहे. धरण पूर्ण झाले असले तरी कालव्याची कामे अद्यापि व्हायची आहेत. एकीकडे आपण धरणे पूर्ण झाली असे दाखवितो. दुसरीकडे मात्र कालवेच काढले नाहीत. त्या पाण्याचा उपयोग शेतापर्यंत नेण्यासाठी होऊच शकत नाही. कालव्यांची कामे अर्धवट करायची हे बरेबरच नाही. अशीच स्थिती पेंच धरणाची आहे. उर्ध्व वर्धा प्रकल्प पूर्ण झाला आहे. कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम सुरू आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

गुरुकुंज व पाथरगाव येथील उपसा सिंचन योजनेच्या निविदेची कार्यवाही सुरु आहे, सिंचनाची कामे सुरु आहेत परंतु ती पूर्ण झाल्याचे चित्र विदर्भामध्ये दिसत नाही. हा विदर्भावर मोठया प्रमाणात झालेला अन्याय आहे. त्यामुळे विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष 50 वरुन 90 वर वाढत चालला आहे. आम्ही विदर्भाच्या अनुशेषाबाबत पोटतिडिकीने बोलू इच्छितो परंतु आम्हाला बोलू दिले जात नाही. त्यामुळे आम्हाला सभागृहामध्ये न बोलता निघून जावे लागते हा आमच्यावर अन्याय आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी वान, पेनटाकळी, अरुणावती व बेंबळा या प्रकल्पांची कामे अजूनही सुरु आहेत. काही ठिकाणी धरणाची कामे पूर्ण झाली आहेत परंतु कालव्यांची कामे पूर्ण झालेली नाहीत, पाटांची कामे पूर्ण झालेली नाही. त्यामुळे धरणातील पाण्याचा उपयोग शेतकऱ्यांना होत नाही. गोसीखूर्द प्रकल्पामधून अजूनपर्यन्त एक हेक्टर देखील ओलित होऊ शकले नाही. त्याचप्रमाणे या प्रकल्पामधील कालव्यांची कामे देखील पूर्ण झालेली नाहीत. जी कामे पूर्ण झाली आहेत त्यांची चौकशी करण्याची मागणी केली जाते. कुणीही तक्रार केल्यानंतर त्याच्या चौकशीकरिता दिल्लीहून समिती येते, मुंबईहून समिती येते, आमदारांची समिती येते, अधिकाऱ्यांची समिती येते. प्रकल्पांच्या कामांच्या सारख्या चौकशामध्ये आमचे आयुष्य निघून चालले आहे. कालव्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असतील तर त्याबाबत चौकशी करुन त्या कामांचा एकदा सोक्षमोक्ष लावण्यात यावा. केवळ चौकशीच्या नावाखाली त्या प्रकल्पाचा निधी अडवून ठेवून ती कामे पूर्ण करावयाची नाहीत, तेथील जनतेला वेठीस धरुन गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण करावयाचा नाही असे आपण करता कामा नये. याकडे शासनाने विशेष करुन लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, वन जमिनीमुळे आजनसरा, हुमन, तुलतुली, जिगाव व निम्न पैनगंगा असे पाच प्रकल्प रखडले आहेत. या प्रकल्पांच्या कामांसाठी शासनाने वन विभागाकडे पैसे भरलेले असून देखील अजून पर्यन्त त्यांची कामे सुरु झालेली नाहीत. त्यामुळे एकही प्रकल्प पूर्ण झाल्याचे चित्र पहावयास मिळत नाही. आम्ही हुमन प्रकल्पासाठी 1982 सालापासून सतत लढा दिला आहे. शासनाने या प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचे ठरविलेले असतांना नवीन कोणतीही कामे घ्यावयाची नाहीत असे शासन का ठरविते? दुसऱ्या बाजूला पश्चिम महाराष्ट्रामध्ये नवीन कामे घेतली जातात मात्र विदर्भामध्ये नवीन कामे घेतली जात नाहीत याचे कारण समजले पाहिजे. अशाप्रकारे आपण आमच्यावर अन्याय का करता, आमचे तोंड का बंद करु

श्रीमती शोभा फडणवीस....

इच्छिता? या बाबत विचार करुन आपण हुमन प्रकल्पाचे काम तत्काळ सुरु करावे यावे अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्र. 140 व पृष्ठ क्र. 138 च्या संदर्भात सांगू इच्छिते की, आपण यापूर्वी दहा आश्रमशाळांची मान्यता थांबविली होती. त्या आश्रमशाळांबाबत चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना मान्यता देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. या गोष्टीला दोन वर्षे झाली आहेत. त्या आश्रमशाळांचे संचालक कर्ज काढून तेथील मुलांना जेवू घालीत आहेत. अजूनपर्यन्त त्या आश्रमशाळांना आपण मान्यता दिलेली नाही व मेंटेनन्स ग्रँट दिली नाही. त्या बाबत मला मिळालेल्या माहितीनुसार त्या आश्रमशाळांचे रेकॉर्ड जाळून टाकण्यात आले आहे. जरी ते रेकॉर्ड जळाले असले तरी पाहणी अहवाल आपल्याकडे आलेला आहे, पाहणी अहवालात त्या आश्रमशाळांमध्ये आढळलेल्या त्रुटींची त्या संस्थेने पूर्तता केली आहे. पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी काही ठिकाणी चुकीच्या पध्दतीने त्रुटी दाखवून अहवाल तयार केलेला आहे, नसलेल्या त्रुटींचा अहवालामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. तेव्हा या आश्रमशाळांना लवकरात लवकर मान्यता देऊन व मेंटेनन्स ग्रँट देऊन त्या मुलांची जेवणाची व्यवस्था करावी. त्या मुलांना उपाशी ठेवून संस्थेच्या संचालकांना कर्जाच्या जाळयामध्ये अडकवू नये अशी मला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, आपण शासकीय वाहने खरेदी करण्याचे ठरविले आहे त्याबद्दल माझी हरकत नाही. परंतु आपल्या आदिवासी विकास विभागाचे अधिकारी मेळघाट,गडचिरोली सारख्या आदिवासी भागामध्ये जाऊन त्या वाहनांचा उपयोग करतात काय? आज खाजगी आश्रमशाळांपेक्षा शासकीय आश्रमशाळांची परिस्थिती अत्यंत खराब आहे. मी मेळघाटमधील एका आश्रमशाळेची पाहणी करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी तराजूला 2 किलोचे गोठे बांधण्यात आले होते. तशाप्रकारे गोठे बांधून त्या मुलांना वर्षभर धान्य खाऊ घातले जात होते. त्या मुलांना भाजीपाला सुध्दा खाऊ घातला जात नव्हता. अशा आश्रमशाळांना भेटी देण्यासाठी आपले अधिकारी जातात त्यावेळी ते कशाची पाहणी करतात? आमच्या सारख्या लोकप्रतिनिधींना या गोष्टी दिसतात तर मग त्यांना का दिसत नाहीत? आश्रमशाळेतील मुलांना जर जेवणामध्ये भाजी मिळत नसेल तर हा आपल्या अधिकाऱ्यांचा दोष नाही काय? आदिवासींची गरीब मुले बोलू शकत नाहीत, सांगू शकत नाहीत. अशा वेळी या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात?



DGS/ 05:35

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, मेळघाटमधील एका शाळेला मी भेट दिली त्यावेळी त्या शाळेला मागील सहा महिन्यापासून वीज पुरवठा केला जात नव्हता. त्या शाळेतील मुले अंधारामध्ये बसून कसा अभ्यास करणार आणि परीक्षेमध्ये कशी उत्तीर्ण होणार? एकीकडे आपल्याला आदिवासींचा पुळका आला असून या मुलांना आम्ही चांगल्या प्रकारचे शिक्षण देतो असे सांगितले जाते, आदिवासींची मुले इंजिनिअर झाली पाहिजेत, डॉक्टर झाली पाहिजेत असे सांगितले जाते. परंतु त्या आश्रमशाळेमध्ये मुलांना अभ्यास करण्यासाठी वीज पुरवठा करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे सायन्स आणि इंग्रजी विषय शिकविणारे शिक्षक नाहीत, प्रयोग शाळेमध्ये शिकविणारे शिक्षक शाळेमध्ये नाहीत. अशाप्रकारे आपण त्या मुलांचे शोषण करीत आहात, त्यांना आपण शैक्षणिकदृष्टया पुढे आणीत नाही असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागामार्फत वन जमिनींचे पट्टे द्यावयाचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी आपण त्यांच्या जमिनींच्या मोजणीला सुरुवात करणार आहात. 2006 सालापासून 2012 पर्यन्त आपण त्यांना जमिनीचे पट्टे दिले नाहीत. काही ठिकाणी जमिनीचे पट्टे दिले आहेत, परंतु त्यांना 7/12 चा उतारा दिला नाही. त्यांच्याकडे जर 7/12 चा उतारा नसेल तर त्यांना कर्ज कसे मिळणार आहे?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

त्याठिकाणी त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या योजना कशा मिळतील याचा आपण सहा वर्षे विचार केलेला नाही आणि तुम्ही आता मोजमाप करणार आणि मग या योजना सुरु करणार. त्यापूर्वी आमचे आजोबा कुठे रहात होते, वडील कुठे रहात होते आणि आता ते हयात आहेत की त्यांचा मृत्यू झाला आहे यासंदर्भात आमच्या पूर्वजांचा रिपोर्ट मागविणार अशा प्रकारे शासन वन जमिनीच्या बाबतीत आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत आहे. त्यामुळे याठिकाणी वन हक्क दावा ताबडतोब निकालामध्ये काढून आदिवासींना न्याय द्यावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला महिला बालविकास विभागाबाबत सांगावयाचे आहे. याठिकाणी बाब क्र.169 एकात्मिक बाल संरक्षण योजनेसाठी आपण कायदा आणला असून त्या बाबतीत आयोगाच्या पहिल्या अध्यक्षांची मुदत डिसेंबर 2011 मध्ये संपली.माझ्या भाषणाच्या अनुषंगाने कोण नोंद घेत आहे हे मला माहिती नाही.याठिकाणी मघाशी माननीय राज्यमंत्री उपस्थित होत्या. परंतु आता त्या येथे उपस्थित नाहीत. शासनाने बालहक्क आयोगाची स्थापना केली आणि मघाशी म्हटल्याप्रमाणे त्याच्या अध्यक्षांची मुदत देखील संपलेली आहे. परंतु अजूनपर्यंत त्या ठिकाणी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली नाही किंवा पहिल्या अध्यक्षांना देखील मुदतवाढ दिलेली नाही. तसेच त्यांच्या कार्यकाळामध्ये निधीच्या अभावी आणि त्यावेळच्या अध्यक्षांच्या आडमुठ्या वर्तनामुळे आयोगाने कोणतेही भरीव काम केलेले नाही. सदरहू आयोगावर डिसेंबर पासून आजपर्यंत अध्यक्ष व सदस्यच नाहीत. आयोगाकडे आलेल्या तक्रारींबाबत आयोगाचे सचिव सुनावणी घेतात पण ते त्यांच्या अधिकारातच नाही. सचिवांना सुनावणी करण्याचा अधिकार नसताना अशा पध्दतीने कामकाज सुरु आहे. वास्तविक पाहता याठिकाणी कायद्याच्या दृष्टीकोनातून संविधानाच्या 39 कलमान्वये बालकांचे संरक्षण, स्वातंत्र्य व संगापन तसेच रक्षण आणि त्यांचा जगण्याचा हक्क अनुज्ञेय असताना त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. दिल्ली येथील महिला बाल कल्याण विभागाने मुलांचे जे लैंगिक शोषण होत आहे त्याचे प्रमाण किती आहे याचा सर्व्हे करण्याचा प्रयत्न केला तेव्हा हे प्रमाण 49 टक्के इतके दिसून आलेले आहे.

सभापती महोदय, अशा पध्दतीने या देशामध्ये लहान मुलांच्या संरक्षणाचा, संगोपनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात असताना, दुसरीकडे मात्र या मुलांच्या प्रश्नांसाठी आयोग निर्माण केलेला नाही. एकीकडे याबाबतीत कायदा आहे असे सांगून दुसरीकडे जर कायद्याप्रमाणे वागत नसाल तर ते योग्य नाही. जर ते मूल लहानपणापासून अत्याचाराला बळी पडत असेल तर याठिकाणी देशाची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

स्थिती अतिशय गंभीर आहे असे सांगावेसे वाटते. मग निरीक्षण गृह असेल, बालगृह असेल त्यांची तपासणी केली पाहिजे.आदिवासी आश्रमशाळा, शासकीय आश्रमशाळा इत्यादींची तपासणी करण्यात येईल असे सांगण्यात आले पण प्रत्यक्षात तपासणी करण्यात आलेली नाही.म्हणून एक वेगळी कमिटी निर्माण करुन आश्रमशाळांची पूर्ण पहाणी करावयास पाहिजे. जेणेकरुन तेथे कोणत्या त्रुटी आहेत, अडचणी आहेत हे कळू शकेल. त्यासाठी आपण किती निधी खर्च करतो याचा विचार करुन आदिवासी मुलांना सुध्दा संरक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदय, शासकीय आश्रमशाळेसाठी प्रत्येक मुलामागे 1600 रुपये दिले जातात. पण खाजगी आश्रमशाळेला मात्र 860 रुपये दिले जातात. असे करण्याचे कारण काय आहे ? शासकीय आश्रमशाळेमध्ये येणारी मुले देखील आदिवासीच आहेत आणि खाजगी आश्रमशाळेमध्ये येणारी मुले देखील आदिवासीच आहेत. मग या दोन्हीमध्ये 800 रुपयाचा फरक का करण्यात येत आहे? हा प्रश्न आहे. अशा प्रकारे आदिवासी मुलांच्या बाबतीत खाजगी आश्रमशाळा आणि शासकीय आश्रमशाळा यामध्ये फरक करणार असाल तर शासन आतापासून मुलांमध्ये संशय आणि एकमेकांच्या बद्दल अढी निर्माण करण्याचे काम करीत आहे असे म्हणावे लागेल. शासकीय आश्रम शाळेतील मुले म्हणजे आपली मुले आणि खाजगी आश्रमशाळेतील मुले ही सवतीची मुले आहेत काय? असा प्रश्न आहे. अशा प्रकारे सध्या वेगवेगळया स्वरुपामध्ये निधी दिला जात आहे तो एकच करण्यात यावा म्हणजे खाजगी आश्रमशाळेसाठी देण्यात येणाऱ्या 860 रुपयांच्या ऐवजी 1600 रुपये देण्यात यावेत किंवा शासकीय आश्रमशाळेसाठी देण्यात येणाऱ्या 1600 रुपयांच्या ऐवजी 860 रुपये देण्यात यावेत आणि सर्वांना एका समान पातळीवर आणावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 4 वरील बाब क्रमांक 2 बाबत बोलणार आहे. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे नवीन पदांची निर्मिती करण्याच्या संदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून नवीन महाराष्ट्र सदन बांधले जात आहे. ते बांधकाम पूर्णत्वाला आल्याचे समजते. जेव्हा जेव्हा आम्ही दिल्लीला जातो तेव्हा नवीन महाराष्ट्र सदन लवकरच तयार होणार आहे असे सांगितले जात होते आणि कालपरवा असे समजले की नवीन महाराष्ट्र सदन अतिशय चांगल्या दर्जाचे आहे. साधारणपणे सप्ततारांकित हॉटेलमध्ये जशी व्यवस्था असते तशा पध्दतीचे सुंदर महाराष्ट्र सदन या खात्याचे माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या काळामध्ये झाले आहे या गोष्टीचा आम्हाला मनापासून आनंद होत आहे. आता आपण पद निर्मितीसाठी तरतूद केलेली आहे पण नवीन महाराष्ट्र सदनाचे उद्‌घाटन कधी होणार आहे हेही जाणून घेण्यासाठी मी उत्सुक आहे. ते उद्‌घाटन तातडीने झाले पाहिजे आणि ते सदन सर्वांसाठी खुले केले पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील बाब क्रमांक 4 बाबत बोलणार आहे. यामध्ये एअरक्राफ्ट सिटेशन 560 च्या दुरुस्तीकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांच्यासाठी जी विमाने आणि हेलिकॉप्टर आहेत ते सुध्दा चांगल्या स्थितीत असली पाहिजेत याबद्दल कोणाच्याही मनामध्ये शंका असता कामा नये. मध्यंतरीच्या काळात माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्यासोबत हेलिकॉप्टरमधून जाण्याचा योग आला. ते हेलिकॉप्टर एवढे जुने झाले आहे की, त्या हेलिकॉप्टरमध्ये बसल्यानंतर आता काय होईल अशी शंका आम्हाला वाटत होती. मी या निमित्ताने अशी विनंती करतो की, आपण नवीन हेलिकॉप्टर घ्यावे. शेवटी राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री ही पदे राज्याच्या लोककल्याणासाठी महत्वाची आहेत. त्यांना सुध्दा चांगली सुविधा असली पाहिजे याबद्दल कोणाच्याही मनामध्ये शंका असता कामा नये.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

सभापती महोदय, यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 7 बाबत बोलणार आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने वर्षभर करावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. शासन स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. मागच्या वेळी मुंबईमध्ये कार्यक्रम झाला त्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, अशा पध्दतीने आम्ही संपूर्ण राज्यात विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी सुध्दा कार्यक्रम घेणार आहोत. परंतु माझ्या माहितीनुसार आतापर्यंत कोणत्याही जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचा कार्यक्रम झाल्याचे दिसून येत नाही. राज्यातील जिल्ह्यांमध्ये अशा पध्दतीचे कार्यक्रम घेणे गरजेचे आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनावर जो चित्रपट काढलेला आहे तो सुध्दा आपण त्या त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दाखविला तर या निमित्ताने एक चांगला कार्यक्रम होऊ शकतो.

सभापती महोदय, यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 7 वरील बाब क्रमांक 9 बाबत बोलणार आहे. या बाबीमध्ये जनगणनेच्या कामाच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. आजही आमचे शिक्षक जनगणना करीत असतात. परंतु अनेक शिक्षकांची देयके मिळालेली नाहीत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये संबंधित खात्याचे माननीय मंत्री उपस्थित नाहीत. सभागृहात फक्त 3 मंत्री उपस्थित आहेत.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : सभागृहात उपस्थित असलेले मंत्री सन्माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे लिहून घेत आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, जनगणनेमध्ये शिक्षकांनी जे काम केलेले आहे त्याचा मोबदला त्यांना तातडीने मिळाला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 45 वरील बाब क्रमांक 54 बाबत बोलणार आहे. नगरपरिषद क्षेत्रामध्ये सुविधा पुरविण्यासाठी यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी ज्या जिल्ह्यातून आलेलो आहे त्या उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

शहराची लोकसंख्या जवळपास सव्वा लाख झालेली आहे. आज उस्मानाबाद शहरामध्ये भीषण पाणी टंचाई आहे. आज उस्मानाबाद शहरामध्ये 100 टँकर्सव्दारे पाणीपुरवठा होत आहे. या शहराला पाणी मिळावे यासाठी उजनी धरणातून महत्वाकांक्षी योजनेला माननीय श्री. राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली. त्या योजनेचे 85 टक्के काम पूर्ण झ ाालेले आहे. परंतु उर्वरित काम निधी अभावी रखडते की काय अशा प्रकारची चिंता माझ्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. त्या योजनेचे काम थांबू नये. त्या शहराचा हा महत्वाचा प्रश्न सोडविण्यासाठी जो निधी लागणार आहे तो तातडीने द्यावा अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 52 बाबत बोलणार आहे. शिक्षण विभागातील अनेक प्रश्न शिक्षक आमदार म्हणून आम्ही सातत्याने या सभागहात मांडतो. आमच्या माध्यमिक शाळांमध्ये दरवर्षी पदे वाढत असतात. त्या पदांना अजून मान्यता दिलेली नाही. त्या शाळांमधील तुकड्यांना अनुदान देण्यासंबंधीची कोणतीही बाब या पुरवणी मागण्यांच्या पुस्तकामध्ये वाचावयास मिळालेली नाही. आज प्राथमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्या विनाअनुदानित काळातील सेवा ग्राह्य धरण्याचा प्रश्न सुध्दा अजून मार्गी लागलेला नाही. कनिष्ठ महाविद्यालयांना 1.1.1996 पासून पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी या संदर्भात या सभागृहामध्ये 32 वेळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु ही बाब विचाराधीन आहे अशाच प्रकारचे उत्तर शासनाकडून मिळते. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी मागच्या काळात 42 दिवसांचा संप केलेला होता त्यांचाही प्रश्न मार्गी लावावा. कारण त्यांनी त्या संपाचा कालावधी भरुन काढलेला आहे. तोही प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

मुख्याध्यापकांना केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी द्यावी असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे. आपण जर न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणार असू तर ते योग्य होणार नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार तातडीने मुख्याध्यापकांना वेतनश्रेणी दिली पाहिजे. शासनाने कायम विना अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा कायम हा शब्द काढला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्या प्रमाणे कायम विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांचा सुध्दा कायम हा शब्द काढला पाहिजे अशी मागणी करतो.

शाळांच्या मूल्यांकन करण्याच्या पध्दतीमध्ये केवळ 54 शाळा पात्र ठरल्या आहेत. मूल्यांकन करण्यासाठी जाचक अटी आहेत. या अटी रद्द करण्यासाठी आझाद मैदानावर हजारो शिक्षक जमलेले आहेत. त्यामध्ये काही महिला शिक्षक आलेल्या आहेत. मी काही वेळापूर्वीच त्या ठिकाणी भेट देऊन आलो आहे. त्यांनी मला इशारा देऊन सांगितले आहे की, मंत्री महोदय आम्हाला भेटण्यासाठी आले नाही किंवा त्यांनी आमचे ऐकून घेतले नाही तर आम्ही रस्त्यावर येऊन आंदोलन करु. अशा प्रकारे त्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना फोन लावून या विषयी तातडीने बैठक आयोजित करण्यास सांगावे अशी मी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांना विनंती करतो. शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी 50 टक्के मुलींची अट घालण्यात आली आहे. या अटीची पूर्तता होऊ शकत नसल्यामुळे ही जाचक अट किंवा निकष बदलणे आवश्यक आहे. इयत्ता 5 वी व 7 वी चे मूल्यांकन कशा प्रकारे केले जाणार हा देखील विचार करण्यासारखा विषय आहे.

या राज्यात पटपडताळणी करण्यात आली होती. त्यावेळी बोगस विद्यार्थ्यांची संख्या आढळून आली त्या शाळा चालकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले जातील असे जाहीर केले होते. परंतु या निर्णयाला कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या राज्यात शिक्षण क्षेत्रात फौजदारी गुन्हे दाखल करणे योग्य होणार नाही. ते खटले काढून टाकले पाहिजेत. आवश्यकता भासली तर जरुर बोगस शाळा बंद कराव्यात, त्याला आमचा विरोध असणार नाही. पण जे चांगले आहे त्याला चांगले म्हटलेच पाहिजे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या बाबतीत मी सांगेन की, वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची 80 टक्के रक्कम केंद्र शासनाकडून येणे आवश्यक होती. पण तीही आलेली नाही. राज्यातील सर्व शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन

2...

श्री.विक्रम काळे....

आयोगाची रक्कम मिळाली आहे. परंतु प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू केलेला नाही ही खेदाची बाब आहे. त्यांना तातडीने पैसे मिळाले पाहिजेत अशी मी विनंती करतो.

माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री मराठवाड्यातील ज्या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतात, माझ्या मतदार संघात त्यांचा मतदार संघ आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये सह संचालकांचे कार्यालय आहे. त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वेतन 15 जुलै पर्यंत झालेले नव्हते. साधारणपणे प्रत्येक कर्मचाऱ्याचे वेतन 1 ते 5 तारखेच्या दरम्यान होते. याबाबत मी सहज चौकशी केली असता बजेट आले नाही असे मला उत्तर मिळाले आहे. त्या प्राध्यापकांचे वेतन दर महिन्याच्या 1 तारखेला झाले पाहिजे. यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे.

राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यां प्रमाणे महागाई भत्ता दिला जातो. तसा तो सगळ्यांना मिळाला पाहिजे असे अर्थ खात्याच्या जी.आर.मध्ये नमूद केलेले असते. पण काही विभाग त्यासंबंधीचा जी.आर.काढत नाहीत. त्यामुळे वित्त विभागाच्या जी.आर.ची खालच्या स्तरावर अंमलबजावणी होत नाही. नुकताच जाहीर झालेला महागाई भत्ता सर्वांना मिळाला आहे. परंतु वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना मिळालेला नाही. आमच्याकडे जी.आर.पोहोचला नाही असे सांगितले जाते. त्यामुळे राज्य स्तरावरील जी.आर. जिल्हा पातळीवर तातडीने पोहोचला पाहिजे. माननीय मंत्री महोदय कर्तबगार मंत्री आहेत. 7 टक्के महागाई भत्ता या प्राध्यापकांना कसा मिळेल या विषयामध्ये आपण तातडीने लक्ष घालावे अशी विनंती करतो.

1991-2000 हा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. हा प्रश्न आपल्याच कालावधीत सुटावा आणि ते सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे. अशा प्रकारचे काम मंत्री महोदयांनी करावे, जेणे करुन आपल्याला बढती मिळू शकेल.

सभापती महोदय, पॉलिटेक्निक शिक्षकांचा व एमसीव्हीसीच्या शिक्षकांचाही प्रश्न आहे. कंत्राटी प्राध्यापकांनाही कायम सेवेत आणण्याची मी मागणी करतो. एमसीव्हीसीची कनिष्ठ महाविद्यालये आहेत त्यांनाही शासनाने अनुदान दिले पाहिजे. याबाबत शासनाने निर्णय घ्यावा अशी मी मागणी करतो. माझे आणखी 25 विषय शिल्लक राहिले होते. पण वेळेअभावी मी माझे भाषण आवरते घेऊन येथेच थांबतो.

-----

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने सन 2012-13 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होण्यासाठी व माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पाचे आकारमान 1 लाख 70 हजार 110 कोटी रुपये इतके प्रस्तावित केले होते. जुलै, 2012 मध्ये सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांचे आकारमान रुपये 4 हजार 606 कोटी 90 लाख इतके आहे. पुरवणी मागण्यांपैकी 4 हजार 770 कोटी 29 लाखांच्या मागण्या दत्तमत्त स्वरुपाच्या व रुपये 136 कोटी 60 लाख रुपयांच्या मागण्या भारित स्वरुपाच्या आहेत. हे सर्व पाहिल्यानंतर मी केवळ तीनच मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 05:55

श्रीमती अलका देसाई...

जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 81मध्ये भावली मोठ्या प्रकल्पाचे परिरक्षण व दुरुस्ती यासाठी 6.34 लाख रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. जलसंपदा विभागाच्या संदर्भातील दोन मुद्दे मी या निमित्ताने मांडणार आहे. विदर्भामध्ये पाऊस कमी पडतो. जेथे पाऊस पडत नाही अशा ठिकाणी शेततळी करण्यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात. तेथे पाऊस न पडल्यामुळे शेततळयामध्ये पाणी साठत नाही आणि त्याचा शेतीसाठी काही उपयोग होत नाही. कोकणामध्ये 125 से.मी. पाऊस पडतो. परंतु जलसंधारणाची कोणतीही कामे केलेली नसल्यामुळे कोकणामध्ये पडलेल्या पावसाचे सर्व पाणी वशिष्ठी नदीला जाऊन मिळते. तेव्हा हे कोकणातील पाणी अडविण्यासाठी आपण किती कोटी रुपयाची तरतूद करणार आहात आणि कामे केव्हा पूर्ण करणार आहात याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यामध्ये पाऊस पडतो पण ते पाणी अडविण्यासाठी कोणते नियोजन नाही, कोणती उपाययोजना केलेली नाही. गॅलरीमध्ये बसलेल्या जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिका-यांनी माझ्या भावना लक्षात घेऊन कामाला लागावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

आदिवासी विकास विभागाच्या पान क्रमांक 138 वरील बाब क्रमांक 141मध्ये जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजनेअन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी अंतर्गत वाटप केलेल्या वन जमिनींची मोजणी करण्याकरिता शुल्काचे प्रदान करण्यासाठी 21.78 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. वनामध्ये पिढयानपिढया राहाणारे आदिवासी व इतर रहिवाशांच्या वन अधिकारांना मान्यता देण्यासाठी व त्यांची नोंदणी करण्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनरहिवासी, वन अधिकार मान्यता कायदा 19 डिसेंबर 1906 पासून लागू झालेला आहे. या कायद्यांतर्गत व्यक्तिगत आणि सामुदायिक स्वरुपाच्या दाव्यांना मान्यता मिळण्यासाठी विशिष्ट कार्यपध्दती आखून दिलेली आहे. ग्रामसभा, उपविभागीय समिती, जिल्हास्तर अशा तीन स्तरावर वन अधिकारासाठी केलेल्या दाव्यांना मान्यता देणारी यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे. पण केन्द्र शासनाच्या जनजाति कार्यालयाचे सचिव श्री. गौतम मुखर्जी यांनी 15 जुलै 2010 रोजी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना पाठविलेल्या पत्रात हे लक्षात आणून दिले आहे की, सदर कायद्यांतर्गत स्वीकारलेल्या दाव्यांच्या संख्येपेक्षा किती तरी अधिक दावे नाकारले गेलेले आहेत. हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

दावे नाकारण्याचे कारण काय हे सभागृहाला समजणे आवश्यक आहे. या बाबत चिंता व्यक्त करीत जनजाति कार्य मंत्रालयाने ग्रामसभा व उपविभागीय स्तरावर दावे नाकारलेल्या कारणांची विभागणी करुन कोणत्या कारणासाठी किती दावे नाकारले गेले याची माहिती कळविण्यास सांगितली आहे. राज्य शासनाकडून अद्याप त्याची पूर्तता झालेली नाही. ती केव्हा होईल याचा खुलासा होणे आवश्क आहे.

ग्रामसभेच्या पातळीवर दावे नाकारताना मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत. जमिनींची मोजणी न झाल्याने ग्रामसभेने दावे नाकारल्याच्या घटना ठाणे जिल्हयामध्ये घडलेल्या आहेत. उपविभागीय स्तरावर 42 ते 60 टक्के दावे नाकारण्यात आलेले असून तीन जिल्हयांचा अपवाद वगळता उर्वरीत जिल्ह्यात नाकारलेल्या दाव्यांचे प्रमाण 40 ते 100 टक्के आहे. ही बाब प्रगतिशील महाराष्ट्राला भूषणावह नाही.

महिला व बाल विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 155 वरील बाब क्रमांक 159 मध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजनेकरिता 27.06 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ कामकाज पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये याची सुरुवातीलाच का तरतूद करण्यात आली नाही हे सभागृहाला कळणे आवश्यक आहे. एकूण 27 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडून अनुदान मिळत असतानाही राज्य शासनाने स्वत:च्या वाट्याची तरतूद न करुन बालकांच्या संरक्षण प्रती अनास्था दाखविली आहे. ही अनास्था कशासाठी याचा देखील खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाल गुन्हेगारा संबंधी राज्य शासनाचे जे ॲक्ट आहेत त्याप्रमाणे शासनाने विविध यंत्रणा निर्माण करणे अपेक्षित आहे. माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या माहितीनुसार 22 जिल्ह्यांमध्ये सल्लागार मंडळे अस्तित्वात नाहीत. 16 महानगरपालिकांमध्ये 16 सल्लागार मंडळे स्थापन झालेली नाहीत. महानगरपालिकेला असे महामंडळ स्थापन करता येते याची माहिति महानगरपालिकांना नाही अशी देखील माहिती प्राप्त झालेली आहे. एकाही जिल्हापरिषदेने वा महानगरपालिकेने बालसुधार गृहांवर देखरेख ठेवण्यासाठी निरीक्षण गट स्थापन केलेला नाही. ही जबाबदारी बाल संरक्षण युनिटची आहे. तेव्हा यामध्ये केव्हा सुधारणा होणार याची माहिती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. मी या ठिकाणी जे मुद्दे मांडले त्याचा गांभीर्याने विचार व्हावा अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 137, पृष्ठ क्रमांक 137- आदिवासी विकास विभाग - आदिवासी विकास विभागावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यास माननीय मंत्री महोदय कशी उत्तरे देणार असा माझ्या समोर प्रश्न आहे. तरी देखील मी काही प्रश्न येथे उपस्थित करणार आहे.

सभापती महोदय, "गोंदिया जिल्ह्यातील आश्रमशाळेत सहा विद्यार्थ्यांना साप चावला" अशी बातमी आपण सर्वांनी वाचली असेल. या सहा विद्यार्थ्यांपैकी दोघांचा मृत्यू झाला तर चौघांची प्रकृती गंभीर आहे. एक साप सहा विद्यार्थ्यांना कसा चावू शकतो असा माझ्या समोर प्रश्न आहे. कारण सापाने एकाचा चावा घेतल्यानंतर त्याला दुसऱ्या व्यक्तीला चावा घेण्यासाठी त्याच्यामध्ये त्राण राहत नाही, तो निपचित पडून राहतो असे झुओलॉजी म्हणते. आपण आपले झुओलॉजीचे ज्ञान आम्हाला सांगावे. त्या ठिकाणी सहा सर्प होते की एकच सर्प होता याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. आपण येथे रुग्णवाहिका खरेदीसाठी मागणी करतो. ज्या आश्रमशाळेतील सहा विद्यार्थ्यांना साप चावला त्या आश्रमशाळेतील अधीक्षकांनी साप चावलेल्या विद्यार्थ्यांना सायकलवरुन रुग्णालयात नेले. त्या अधीक्षकाने सहा विद्यार्थ्यांना सायकलवरुन कसे नेले हा माझ्यासमोर प्रश्न आहे. सर्पदंशाने मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना शासनाने एक लाख रुपयांची मदत करावी अशी मी मागणी केली होती. त्यांच्या कुटुंबीयांना ही मदत देण्यात आली काय ?

बाब क्रमांक 138, पृष्ठ क्रमांक 137 आदिवासी विकास विभाग - एकात्मिक विकास कार्यक्रमांचे बळकटीकरण करण्यासाठी रिक्त पदे भरण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. आपल्याकडे प्रकल्प अधिकाऱ्यांची किती पदे मंजूर आहेत आणि त्यापैकी किती पदे भरण्यात आली ? खरे म्हणजे त्या ठिकाणी आय.ए.एस. अधिकारी असणे आवश्यक आहे. परंतु मागील सात वर्षापासून आदिवासी प्रकल्पांवर एकही आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नाही अशी माझी माहिती आहे. ही माहिती सत्य असेल तर आदिवासी प्रकल्पावर आय.ए.एस. अधिकाऱ्याची नियुक्ती शासन केव्हा करणार आहे ?

डॉ.दीपक सावंत...

बाब क्रमांक 139, पृष्ठ क्रमांक 137- आदिवासी विकास विभाग - मागासवर्गीय मुलांसाठी व मुलींसाठी वसतिगृहे बांधण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. आपल्याकडे एकूण 555 अनुदानित आश्रमशाळा आहेत.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

या आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षिका नेमण्यात आल्या आहेत काय, त्या कधीपासून नेमण्यात आल्या आहेत, नेमण्यात आल्या नसतील तर त्या कधीपर्यंत नेमल्या जातील या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदय, मी आपल्या सूचनेनुसार या ठिकाणी फक्त मुद्दे मांडतो आहे. आदिवासी विकास प्रकल्पातून 1121 घरकुले देण्यात आली अशी घोषणा करण्यात आली आहे. या घरकुलांचे लाभार्थी कोण आहेत, ती घरकुले कोणत्या भागात वितरित करण्यात आली आहेत या गोष्टीचा देखील उहापोह या ठिकाणी झाला पाहिजे.

सभापती महोदय, ब्लँकेट आणि सतरंजी खरेदीत झालेला भ्रष्टाचाराचा मुद्दा या सभागृहात मागे मी उपस्थित केला होता. या भ्रष्टाचाराची सी.आय.डी.मार्फत चौकशी व्हावी असे पत्र मी माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेले आहे. त्या पत्राबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली गेलेली नाही. ब्लँकेट आणि सतरंजी खरेदीचे कंत्राट पंढरपूर येथील अहिल्यादेवी संस्थेला द्यावयाचे की अकोला येथील दुर्गादेवी संस्थेला द्यावयाचे यावरुन माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावीत आणि माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांच्यामध्ये काही तरी वाद झाला अशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी माहिती सांगितली. 34 कोटी रुपयांची ब्लँकेट आणि सतरंजी खरेदी झालेली आहे, ती ब्लॅकेंटस् आणि सतरंज्या कोठे गेल्या याची माहिती सदनाला देण्यात यावी. ब्लँकेटची किंमत 150 रुपयांपेक्षा जास्त नाही. परंतु सदरहू ब्लँकेटस्ची खरेदी 500 रुपये दराने केली गेली आहे. ब्लँकेटस् आणि संतरज्या खरेदी संदर्भात टेंडर न काढता सदर साहित्य बाजारभावापेक्षा जास्त दराने खरेदी करण्यात आले आहे, त्या बाबतीत चौकशी करण्यात आली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 139,बाब क्रमांक 143 च्या अनुषंगाने मी माझे मत व्यक्त करीत आहे. आदिवासी आश्रमशाळेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मी गेल्या अधिवेशनामध्ये एक मुद्दा उपस्थित केला होता की, शहापूरच्या आदिवासी प्रकल्पांतर्गत वसतिगृहामध्ये 702 मुले आणि 190 मुली राहतात. त्यांना मार्च महिन्यापासून 500 रुपये निर्वाह भत्ता दिला जात नव्हता.

2...

श्री.बबनराव पाचपुते : निर्वाह भत्त्यात वाढ झालेली आहे.

डॉ.दीपक सावंत : या विद्यार्थी, विद्यार्थिनींना निर्वाह भत्ता देण्यात आला आहे काय, असल्यास तो कोणत्या तारखेस देण्यात आला आहे या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना आठवडयातून दोन वेळा मांसाहार दिला जातो काय, मांसाहार पुरवठा करण्याचे कंत्राट कोणाला देण्यात आले आहे याची देखील माहिती या सभागृहात देण्यात यावी अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभाग, पान क्रमांक 129, बाब क्रमांक 39 वैद्यकीय महाविद्यालयात 351 पदे भरण्या संदर्भातील मागणी आहे. आपल्या अंतर्गत आरोग्य विज्ञान विद्यापीठ येते. वैद्यकीय शिक्षणावर आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नियंत्रण असते असे म्हटले जाते. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुंनी इनोव्हा गाडी घेतली. या गाडीची किंमत सर्वसाधारण 11 ते 11.50 लाख रुपये एवढी आहे. त्या गाडीच्या इंटेरिअरवर 11 लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या खर्चाचे पडसाद सिनेटच्या बैठकीमध्ये उमटणार होते. परंतु काही कारणामुळे हा विषय सिनेटच्या बैठकीत उपस्थित झाला नाही. इनोव्हा गाडीच्या इंटेरिअरवर 11 लाख खर्च करणाऱ्या कुलगुरुंवर कोणती कारवाई केली जाणार आहे, या बाबतचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावे अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, अभ्यासक्रमांच्या बाबतीत मागील अधिवेशनात मी लक्षवेधी उपस्थित केली होती. आम्ही अभ्यासक्रमाच्या बाबतीत अशा प्रकारचे बदल करणार आहोत, अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करणार आहोत, अशी बातमी कुलगुरुंनी वृत्तपत्रात प्रसिध्द केली होती. त्या बाबतीत त्यांना समज देण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केले होते. या बाबतीत त्यांना समज देण्यात आली आहे काय या बाबतची देखील माहिती सभागृहात देण्यात आली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 129, बाब क्रमांक 130 च्या बाबतीत मी माझे मत व्यक्त करीत आहे. आपल्याकडे लायब्ररीयन हे पद आहे. वैद्यकीय महाविद्यालयात लायब्ररीयन असतो, त्याच्यासाठी वेतनश्रेणी वेगळी आहे आणि रुग्णालयामध्ये लायब्ररीयन म्हणून जो काम करतो त्यासाठी वेगळी वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. अशी साधारणत: महाराष्ट्रात 16 पदे आहेत. ही

3...



ABG/ प्रथम श्री.अजित 06:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

डिस्क्रीपन्शी फक्त एवढयाच पदापुरती आहे. या डिस्क्रीपन्शीचा मुद्दा मी गेल्या तीन अधिवेशनापासून सभागृहात उपस्थित करीत आहे. माननीय श्री.अजितदादा पवार, वित्त मंत्री यांच्याकडे या संदर्भात तीन वेळा पत्र दिलेले आहे. ही गोष्ट कार्यान्वित होईल असे त्यांनी मला पत्र देखील दिलेले आहे. या बाबतीत नेमका निर्णय कधी घेतला जाणार आहे याबाबतचा खुलासा देखील माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 150, बाब क्रमांक 153 ही तंत्र शिक्षण विभागाची मागणी आहे. त्याबाबतीत मी असे सांगू इच्छितो की, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.जावेद आहेत. प्रा.जावेद यांना हटवा म्हणून या सभागृहात आम्ही हंगामा देखील केलेला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंना हटवा म्हणून बराच हंगामा झाला. या मुंबई विद्यापीठाच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह उभे झालेले आहे. पेपरमधील त्रुटी असतील, परीक्षांचे निकाल असतील याबाबतीत अनेक तक्रारी झाल्या. चौकशी करु असे सांगितले जाते परंतु कारवाई होतनाही. या विषयामध्ये या सदनातील जे आमदार इंटरेस्टेड असतील त्यांच्यासोबत कुलगुरुंना घेऊन आमची एक बैठक लावावी आणि आमचे म्हणणे कुलगुरुंसमोर मांडण्याची संधी द्यावी अशी मी शिक्षणमंत्र्यांना विनंती करतो. याचे कारण असे की, वेळ घेतली तरी कुलगुरु आम्हांला भेटत नाहीत. म्हणून याबाबतीत शासनाने पुढाकार घेऊन बैठक लावावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, ऐआयसीटीई या संस्थेकडून पॉलीटेक्नीक अभ्यासक्रमाला मान्यता दिली जाते. अशा 125 संस्था आहे ज्यांच्या याद्या अस्वीकृत केलेल्या आहेत. या सर्व महाराष्ट्रातील संस्था आहेत. या 125 संस्थांची मान्यता का रद्द केली याचा खुलासा शासनाने करावा.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या बाब क्रमांक 149, पृष्ठ क्रमांक 155 बाबत मी बोलणार आहे. एकात्मिक बालसंरक्षण या विषयाबाबत पुरवणी मागणी सादर केलेली आहे. सभापती महोदय, कुपोषणाच्या परिस्थितीवर श्वेतपत्रिका काढण्याचे अजून राहिलेले आहे. याबाबतची घोषणा करण्यात आली होती. आता अधिवेशन शेवटच्या टप्प्यात आहे. शासनाकडून या विषयावर श्वेतपत्रिका केव्हा काढण्यात येणार आहे याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

......2

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अल्पसंख्यांक विभागाच्या पुरवणी मागण्यांवर मी बोलणार आहे. अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमधून 18 लाख विद्यार्थ्यांनी यासाठी अर्ज केलेला आहे. प्रत्यक्षात केवळ 4 लाख विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती दिली गेली. उर्वरित 14 लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती केव्हा मिळणार आहे याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा. या समाजातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही शिष्यवृत्तीची योजना शासनाने राबविली आहे. शिष्यवृत्ती दिली तर अल्पसंख्यांक समाजातील मुले शिकतील या भावनेने शासनाने योजना सुरु केली. योजना केल्यावर चार पोरांनी शिकावे आणि वीस पोरांनी शिकू नये असे होता कामा नये. ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केला आहे त्या प्रत्येक विद्यार्थ्याला याचा फायदा मिळाला पाहिजे. तरच शासनाचा या योजनेमागील उद्देश सफल होईल.

सभापती महोदय, इंजिनिअरींग, मेडिकल, पॉलिटेक्नीक या सर्व शाखेतील विद्यार्थ्यांसाठी 25 हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या 25 हजार रुपयांमध्ये विद्यार्थ्यांचा खर्च भागत नाही. या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांनी ही शिष्यवृत्तीची रक्कम वाढविली जाईल असे सांगितले होते. परंतु त्यांचे स्वप्न पूर्ण झालेले नाही. मंत्रीमहोदयांना माझी याबाबतीत विनंती आहे. कारण ते स्वत: अल्पसंख्यांक समाजातून आलेले आहेत. या समाजाचे दु:ख त्यांना माहीत आहे. ही शिष्यवृत्ती 25 हजार रुपयांवरुन 75 हजार रुपये केली तर या समाजातील विद्यार्थी आपल्याला दुवा देतील. मी अल्पसंख्याक समाजातील असल्यामुळे या विषयावर मी बोलणार आहे.नुकत्याच झालेल्या परिषदेच्या निवडणुकीमध्ये अल्पसंख्याक समाजाला प्रतिनिधीत्व दिलेले नाही. मी आता निवृत्त होणारच असल्यामुळे मी बोलणार आहे.

नंतर श्री. खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. कानडे .... 06:15

श्री. पाशा पटेल .......

महोदय, दुसरी बाब अशी की, 25 हजार रुपये देण्याचा आपण निर्णय घेतला ती रक्कम मागील वर्षी देणे आवश्यक होते. पण मागील वर्षी ऑगस्ट मध्ये ॲडमिशन झाल्यानंतर नंतरच्या वर्षीचा ऑगस्ट महिना उजाडला तरी अद्याप ती रक्कम मिळाली नाही. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय समाजाच्या मुलांसाठी ज्याप्रमाणे परस्पर संस्थेकडेच ही रक्कम दिली जाते तोच निर्णय या मुलांसाठी सुध्दा लागू करावा व याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहात स्पष्ट करावे.

पोलीस शिपाई पदाच्या भरतीपूर्व प्रशिक्षण देणाऱ्या संस्था राज्यात सुरु झालेल्या आहेत. या प्रशिक्षणार्थी मुलांना 2 हजार रुपये मानधन दिले पाहिजे अशी माझी सूचना आहे. तसेच पोलिसांच्या भरतीसाठी शिक्षणाची अट दहावी ठेवलेली आहे पण भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी देखील दहावी एवढीच शैक्षणिक अर्हता पात्र धरावी. तसेच ज्या संस्था असे प्रशिक्षण देण्याचे काम करते त्या संस्थांचा एखाद्या एजन्सीमार्फत सर्व्हे करावा अशीही माझी सूचना आहे.

यानंतर बाब क्र.165-अल्पसंख्यांक दलित वस्ती सुधार योजना. विशेषत: शहरांसाठी सुरु असलेल्या अल्पसंख्यांक सुधार योजनेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. आपण ज्या समाजात जन्मलो त्या समाजाच्या वस्त्यांची काय अवस्था आहे हे पाहिले तर चित्र अत्यंत विदारक दिसून येईल. भारतातील अल्पसंख्यांक विशेष करुन मुस्लीम समाजाच्या कोणत्याही वस्तीत आपण गेलो तर नाकाला रुमाल लावल्याशिवाय येऊ शकत नाही, एवढी दुर्गंधी असते. ज्या समाजाच्या मतांवर नगरपालिकेत सत्ता मिळते, आपण येथे बसलेलो आहोत त्या समाजाच्या वस्तीत असे चित्र असणे भूषणावह नाही. या वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी जी रक्कम दिली जाते ती त्यांच्या सोई-सवलतींवर खर्च न होता कंत्राटदारच ती खाऊन जाणार असतील तर हे चुकीचे आहे.

अल्पसंख्यांक आयोगाने टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स ला एक सर्व्हे करण्यास सांगितले होते. इन्स्टिटयूट फॉर क्रिमिनॉलॉजी ॲंड जस्टीस च्या डॉ. विजय राघवन् ॲंड नायर या टीमने हा सर्व्हे केला असून त्यात एकूण संख्येपैकी 10.06 टक्के इतकी मुस्लीम समाजाची संख्या आहे. यातून 35 टक्के तरुण जेलमध्ये आहेत. हे कशामुळे घडते याचा बारकाईने विचार करण्याची गरज आहे. टाटा इन्स्टिटयुटने जो सर्व्हे केला त्यात 86 टक्के

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .......

मुस्लीम कैदी आतंकवादात सापडलेले नसूनही ते जेलमध्ये आहेत. आपण या विभागाचे मंत्री असल्याने या संस्थेला सर्व्हे करण्यासाठी सांगितले याची कदाचित आपणास कल्पना असेलच. अशा प्रकारे मुस्लीम समाजाचे चित्र असेल तर याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जर याकडे लक्ष दिले नाही तर गावात समजा 100 घरे असतील आणि त्यापैकी 90 घरे खाऊन पिऊन शांतपणे झोप घेत असतील आणि 10 घरे उपाशी असतील तर हे 10 घरातील लोक 90 घरातील लोकांना सुखाने झोपू देणार नाहीत. म्हणून या 90 लोकांनी चांगले रहावे, सुखाने झोपावे असे वाटत असेल तर 10 घरांतील लोकांच्या पोटाला अन्नाचा कण मिळणे गरजेचे आहे. गेल्या 65 वर्षात आपण हे करु शकला नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तरी देखील मंत्री महोदयांनी या बाबीचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 166 च्या संदर्भात मला बोलावयाचे असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दुसरी व तिसरी शिफ्ट सुरु करण्याची योजना शासनाने सुरु केलेली आहे. या योजनेसाठी टोकन म्हणून 1000 रुपये देण्यात आलेले आहेत. (अडथळा)

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाच्या मुलींसाठी मोफत सायकलीचे वाटप योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्यामुळे अल्प संख्यांक मुलींना कृपा करुन चांगल्या कंपनीच्या सायकल्स पुरवाव्यात अशी विनंती आहे, नाही तर पहिल्याच दिवशी रिंग तुटली, पायडल तुटले असे होता कामा नये.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य ऊर्दू अकादमीसाठी शासनाने पहिल्यांदाच एक कोटी रुपये दिलेले असल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मुंबई, सोलापूर, औरंगाबाद, नांदेड व मालेगाव येथे शासकीय उर्दू घर बांधले जाणार होते परंतु या योजनेचे काय झाले त्यांची आम्हाला अद्याप पर्यंत माहिती मिळालेली नाही. यासंदर्भात जर घोषणा केली असेल तर त्याची निश्चितपणे अंमलबजावणी करा व जी गोष्ट शासनास द्यावयाची नाही त्याची कृपा करुन घोषणा करु नये असे मला या ठिकाणी कळकळीने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला 26 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मौलांना आझाद आर्थिक विकास महामंडळाला प्रत्यक्षात किती रकमेची गरज आहे याची तपासणी कधीही केली जात नाही. महामंडळास पूर्वी जो निधी दिला होता त्या निधीचे काय झाले, लेखे का पूर्ण झाले नाहीत याची तपासणी शासनाने करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनापुढे एक चिंतेचा विषय उपस्थित करणार आहे. मौलाना अबुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या एम.डी.चा ऑफिस मध्येच मृत्यू झाला होता. परंतु महामंडळाच्या एम.डी. चा मृत्यू ऑफिसमध्ये का झाला याचा कोणीही विचार करीत नाही. महामंडळाला मिळणारे पैसे कमी व वाटणेच जास्त या प्रेशरमुळे महामंडळाच्या एम.डी.चा मृत्यू झालेला आहे. एम.डी.वर कोणी प्रेशर आणले याचा तपास होण्याची आवश्यकता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

आहे. त्यांच्या मुलाबाळांचे काय होणार याचाही आपण विचार करण्याची आवश्यकता आहे. महामंडळाच्या एम.डी.यांचा मृत्यू कोणाच्या प्रेशर मुळे झाला याची चौकशी शासनाने करावी, अशी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे )** : सभागृहाला माझी विनंती आहे की, दुपारी 2.20 वाजता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करण्यात आली होती.

4 तासामध्ये केवळ 10 सन्माननीय सदस्यांनीच विचार मांडलेले असून अद्यापही 23-24 सन्माननीय सदस्यांना विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळे माझी सर्व पक्षाच्या प्रतोदांना विनंती आहे की, या चर्चेच्या निमित्ताने आपण फार फार तर एक किंवा दोन सन्माननीय सदस्यांची नावे दिली तरच आजचे कामकाज पूर्ण होऊ शकेल.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, बाब क्रमांक 153 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीसाठी शासनाच्या पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये या सर्व गोष्टी पुरविल्या जातात. परंतु आता काही खाजगी पॉलिटेक्नीक कॉलेजेस काढले जात आहेत. शिक्षणाचा दर्जा वाढवावयाचा असेल तर या संस्थांना जर बिनव्याजी कर्ज दिले तरच शिक्षणाचा दर्जा सुधारला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल ...

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 110, पान क्र.107 वर बोलणार आहे. लातूर, उस्मानाबाद येथे काम करणारे हमाल बांधव माथाडी कामगार कायद्या प्रमाणे वेतन दिले जात नाही म्हणून प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. त्यांचे उपोषण तात्काळ सोडवावे अशी नम्र विनंती करतो. जाता जाता मला आपण वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद.

...............

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आश्रमशाळेमध्ये गुंड जन्माला येणे

**मु.शी.**: आश्रमशाळेमध्ये गुंड जन्माला येणे या उल्लेखा संबंधी प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, पाणी पुरवठा मंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

प्रा.लक्ष्मण ढोबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, चुकीच्या पद्धतीने मंत्री या नात्याने माझ्या नावाचा उल्लेख सभागृहामध्ये झाला आहे. एका जबाबदार सन्माननीय नेत्यांनी असा उल्लेख केला की, आश्रमशाळेमध्ये गुंड जन्माला येतात असे सोलापूरचे विठ्ठल भक्त मंत्री म्हणाले. दर्पणकारांचा वारसा चालविणाऱ्यांनी माझ्या नावाने चुकून चुकीची बातमी दिली. कलेक्टर जन्माला येतात असे मी कॅबिनेट मध्ये बोललो होतो. परंतु, उच्च संस्काराच्या काही मंडळींनी जाणीव पूर्वक माझ्या तोंडी गुंड जन्माला येतात अशा प्रकारचे वाक्य घातले. मी असे बोललो नाही. तसे बोलण्याचा माझा विषयही नाही. माझ्या आईवडिलांच्या संस्काराशी मी प्रामाणिक आहे. माझ्या तोंडी असे वाक्य घालणे योग्य नाही. आम्ही लहान माणसे आहोत. माझ्या पिढीतील मी पहिला शिक्षित असलो तरी घरचे काही चांगले संस्कार आहेत. ते घेऊनच मी येथे आलो आहे.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणामध्ये हा उल्लेख होता. याबाबत योग्य ती सुधारणा करण्यात येईल. यानंतर आता माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे बोलतील. माझी सर्व पक्षाच्या प्रतोदांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या पक्षाच्यावतीने एक-दोन नावेच द्यावीत.

3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 च्या खर्चाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

(चर्चा पुढे सुरू....

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 52 पान क्रमांक 41 वर बोलण्यासाठी उभा आहे. मुलींच्या वसतिगृहांसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली असल्यामुळे मी शासनाचे स्वागत करीत आहे. परंतु, औरंगाबाद हायकोर्टाने 2005 च्या पूर्वीचे जे शिक्षक होते, विना अनुदान काळातील शिक्षक होते जे 2005 नंतर कायम झाले त्यांच्या पी.एफ.साठी पैसे ठेवलेले नाहीत. ते ठेवण्याची आवश्यकता आहे.

उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 149 व 150 संबंधी मी फक्त माझा मुद्दा मांडणार आहे. मुंबईमध्ये सायन्स इन्स्टिटयूट आहे. महाराष्ट्र विज्ञानामध्ये खूप मागे आहे. मंत्रालयाला आग लागल्यानंतर मंत्रालयातील विभाग कुठे कुठे हलवावे याची चर्चा सुरू आहे. सायन्स इन्स्टिटयूट दुसरीकडे हलवून मंत्रालयातील काही विभाग तेथे हलविण्याचा प्रस्ताव असेल तर त्याला विरोध केला पाहिजे. कारण ही 1917 पासूनची संस्था आहे. या संस्थेमधून संशोधनात्मक काम चालते. डॉ.उद्गावकर,डॉ.होमी भाभा व सन्माननीय मंत्री प्रा.वर्षाताई गायकवाड त्या संस्थेमध्ये शिकलेले आहेत. त्यामुळे ती संस्था राहिली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 167 वर बोलणार आहे. उर्दू अकादमीसाठी 1 कोटी रूपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. ती अपुरी आहे. अनेक उर्दू संस्था मराठीशी दुवा साधून काम करीत आहेत. त्यांच्यासाठी देखील अतिरिक्त निधी दिला पाहिजे.

बाब क्रमांक 169 वर मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी 26 कोटी रूपयांची मागणी करण्यात आली आहे. आताच माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी सांगितले की, लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद केली पाहिजे. सदर तरतूद ही अत्यंत अपूर्ण आहे. ती वाढविण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 170 वर बोलणार आहे. सदर तरतूद भाषा संचालनायासाठी करण्यात आली आहे. ती मूळातच कमी आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध उपक्रमांना मदत करण्याची आवश्यकता आहे त्यामध्ये आपण खूप मागे आहोत, याकडेच मला लक्ष वेधायचे आहे. धन्यवाद.

....

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला आपल्यासमोर अत्यंत कमी वेळामध्ये अतिशय महत्वाचा विषय मांडावयाचा आहे. तत्पूर्वी या सभागृहाच्या ज्येष्ठ माननीय सदस्यांनी या मागण्यावरील चर्चेमध्ये सहभागी होत असतांना आम्हाला जे काही मार्गदर्शन केले होते ते ध्यानात ठेवून विषयाची थोडीशी मांडणी करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या पुरवणी मागण्यांवर भाषण करीत असतांना या मागण्यांसंबंधी सभागृहाची एकत्रित भावना आणि उत्तरदायित्व सर्वांचे आहे व सभागृहातील चर्चेचा दर्जा आपण कशा पध्दतीने टिकवावा या बाबत त्यांनी आमच्याकडे निर्देश करुन व आमच्या बाकांकडे पाहून आपल्याला खेद होत असल्याचे सांगितले. या बाबत मला त्यांना असे सुचवावयाचे आहे की, आपण भाषण करण्यापूर्वी जे माननीय सदस्य भाषण करीत होते त्यांना देखील असाच निर्देश दिला असता तर मला बरे वाटले असते. त्यामुळे या संपूर्ण चर्चेचा दर्जा राखण्याचे काम आपल्याला करता आले असते. या ठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी मागण्यांवर बोलत असतांना आपल्या मनामध्ये असलेले हेतू कोणत्या तरी मार्गाने सभागृहाच्या इतिवृत्तामध्ये नमूद झालेच पाहिजेत असा हट्ट धरला व त्या हट्टापायी त्यांनी या मागण्यांमध्ये असलेल्या आर्थिक तरतुदींपेक्षा त्यामुळे होत असलेले आणि आपल्याला अनुभवयास मिळत असलेले परिणाम दिसत असल्याचे सांगून त्या माध्यमातून काही टिका टिपणी करण्याचा प्रयत्न केला. ती टिका आवश्यक होती की नव्हती हा नंतरचा भाग असला तरी हा मुद्दा सर्व माननीय सदस्यांना लागू पडणारा आहे.

सभापती महोदय, माझ्या मनामध्ये नेहमी विचार येतो की, अर्थसंकल्पामध्ये एकदा मागणी केल्यानंतर मांडण्यात येणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये करावयाची मागणी किती टक्के असावी या बाबत निश्चितपणे काही संकेत असतील, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु एकदा अर्थसंकल्प मांडल्यानंतर दोन वेळा पुरवणी मागण्या सादर केल्या जातात. त्याच प्रमाणे् या राज्याचा आर्थिक कारभार ज्या पध्दतीने चालला आहे, त्याबाबत राज्याची दररोजची आर्थिक स्थिती कशी आहे हे दाखविण्यासाठी कॅश फ्लो नावाचा फायनान्शिअल मॅनेजमेंटमधील एक प्रकार आहे. राज्याच्या तिजोरीत जमा होणारा एकूण निधी आणि त्या महिन्यात झालेल्या एकूण खर्चानंतर शिल्लक राहिलेला निधी आणि त्यामधून घेण्यात यावयाच्या नवीन योजनांबाबतची विभागनिहाय माहिती राज्य सरकारने वेब साईटवर टाकली तर त्या माध्यमातून तिचा अधिक चांगला उपयोग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

आपल्याला करुन घेता येईल. शेवटी आपल्याला राज्य चालवित असतांना येणाऱ्या समस्यांबद्दल देखील विचार करावा लागतो. आपत्कालीन स्थितीला सामोरे जात असतांना जी उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून आपण सत्तेवर येतो, राज्य करण्यासाठी जी प्रयोजने करतो त्यामध्ये To manage a State is like managing the contradictions अशाप्रकारचा विरोधाभास असलेल्या सर्व सिच्युएशन्समधून आपल्याला कसा मार्ग काढता येईल या दृष्टीने आपल्याला काम करावे लागते. आर्थिक शिस्त, आर्थिक गरज आणि उपलब्ध असलेला निधी या सर्वांचे त्रैराशिक जमवितांना आपल्याला सर्व गोष्टींचे भान ठेवावे लागते. हे भान ठेवूनच आपल्याला सर्व योजना पुढे न्याव्या लागतात.

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या पृष्ठ क्र. 45 व बाब क्रमांक 53 बाबत सांगू इच्छितो की, नाशिक येथे 1914 साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयासाठी केंद्र सरकारकडून फार मोठा निधी मिळण्याची अपेक्षा आहे. ज्यावेळी सिंहस्थ येईल त्यावेळी कामे होतील असा विचार न करता आपण त्या कामासाठी काही नॉमिनल तरतूद करुन ती कामे आता सुरु करावयास पाहिजेत. त्या करिता आपण या ठिकाणी केलेली तरतूद अतिशय तोकडी असून त्या बाबत शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या मागण्यांवर सभागृहामध्ये फार मोठी चर्चा झाली. या ठिकाणी फार मोठे भीषण स्वरुपाचे चित्र निर्माण करण्यात आले. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे, पाऊस पडत नाही, धरणामध्ये पाणी शिल्लक नाही अशी परिस्थिती असतांना काही चांगल्या गोष्टी दुर्लक्षित राहू नयेत म्हणून पान क्र. 85 व बाब क्र. 84 मध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर व नाशिक येथे पूर नियंत्रण योजनेसाठी तरतूद करण्यात आली आहे. पाऊस पडत नसल्यामुळे आता पूर येणार नाही, धरणे भरणार नाहीत, नद्या वाहणार नाहीत, गावे वाहून जाणार नाहीत अशी परिस्थिती जरी असली तरी ही योजना महत्वाची असल्यामुळे त्यासाठी निधी कमी पडणार नाही याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्र. 90 व बाब क्र. 88 च्या संदर्भात ग्राम न्यायालयासाठी तरतूद करण्यात आली आहे. सद्या राज्यामध्ये ठाणे, चंद्रपूर व नांदेड या तीन जिल्ह्यांकरिता तरतूद करण्यात आली आहे. त्या करिता फक्त एक हजार रुपयांची लाक्षणिक

श्री. हेमंत टकले....

मागणी करण्यात आली आहे. दुर्गम भागातील लोकांचा न्यायालयीन कामकाजातील सहभाग आणि निर्णय लवकर मिळण्याची प्रक्रिया या करिता या लाक्षणिक तरतुदीचा उपयोग होऊन ही योजना अधिक चांगली कशी होईल या बाबत या मागणीच्या निमित्ताने आपण विचार केला पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 06:35

श्री.हेमंत टकले . . . .

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाबाबत सांगावयाचे तर पान क्र.107, बाब क्र.110 मध्ये ग्रामीण भागामध्ये नवीन गोडाऊन्स् बांधण्यासाठी 25 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. केंद्रीय कृषी मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, देशातील शेतकरी एवढ्या मोठ्या प्रमाणात धान्य साठ्याचे उत्पादन करीत आहेत. परंतु साठवणुकीची सोय नसल्यामुळे बरेचसे धान्य वाया जात आहे. यामध्ये पाच टक्क्याप्रमाणे 25 कोटी रुपयांचा कॉम्पोनंट आहे. तसेच पाच कोटीच्या पटीत नाबार्डकडून 95 टक्के मिळणार आहेत. अशा वेळी ही योजना अधिक प्रभावी करण्यासाठी काय करता येईल हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, पान क्र.132, बाब क्र.134 औषधीद्रव्ये विभाग, प्रयोगशाळांसाठी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री यासाठी तरतूद करण्यात आली आहे. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रयोग शाळा निर्माण झाल्या पाहिजेत कारण ॲडल्ट्रेशन प्रॉडक्टचा जो बाजार मांडला जात आहे त्यावर नियंत्रण करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग पान क्र.149, बाब क्र.158 बाबत सांगावयाचे तर याठिकाणी अशासकीय महाविद्यालयाबाबत जी तरतूद करण्यात आली ती मला इतर सगळया पुरवणी मागण्यांमध्ये जास्त वाटली. येथे वेतनासाठी 252 कोटी 17 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र या ठिकाणी नियोजन करताना आपले काही राहून गेले आहे काय अशी मला शंका येते. परंतु ही मागणी का करण्यात आली आहे याचाही मी विचार करीत होतो.

सभापती महोदय, पान क्र.155, बाब क्र.159 मध्ये एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या बाबतीत पुन्हा लक्ष देण्याची गरज आहे. यानंतर जो विषय अर्थसंकल्पामध्ये किंवा पुरवणी मागण्यां मध्ये शेवटच्या पानावर, शेवटची बाब म्हणून दिला जातो त्यानुसार पान क्र.171, बाब क्र.170 या मध्ये मराठी विभागासाठी वाहन खरेदीकरता 30 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मला ही परिस्थिती फार दुर्दैवी आहे असे वाटते. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मराठी विभाग याकडे शासनाने फार गांभीर्याने पहाण्याची गरज आहे आणि हे सगळे पाहून मला ही गोष्ट अतिशय दुर्दैवाची आहे असे म्हणावे लागते. कारण आपण ज्या मराठी भाषेची, ज्या संस्कृतीच्या बाबतीत मागणी करीत आहोत आणि त्यासाठी सातत्याने बोलत आहोत. पण त्या करता जे करावयास पाहिजे ते करीत नाही. माझ्या मनामध्ये असे विचार आले होते की, या बाबतीत धाडस दाखवून कपात सूचना द्यावी काय ? पण मी तो मोह आवरत आहे. याठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

मराठी भाषा व संस्कृतीचे जतन करण्यासाठी शासनाने अधिक तरतूद करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

----

. . . .4 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्रीमती मृणाल गोरे यांच्या दु:खद निधनाबाबत**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, थोर समाजवादी नेत्या आणि महिला चळवळीच्या रणरागिणी श्रीमती मृणालताई गोरे यांचे काही मिनिटांपूर्वीच निधन झालेले आहे. ही फार धक्कादायक घटना आहे. आपण त्यांना श्रध्दांजली अर्पण केली पाहिजे.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : याची नोंद घेण्यात आली आहे.

-----

. . . .4 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(चर्चा पुढे सुरु)

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्यां बाबत सांगावयाचे तर मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतीगृहांच्या अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळेतील शिक्षण सेवकास त्याचा लाभ मिळत नाही. अशा वेळी त्यांना तो लाभ देण्याबाबत वन विभागाने त्वरित प्रस्ताव करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाबाबत सांगावयाचे तर मृद व जल संधारण यावरील भांडवली खर्चाबाबत पान क्र.102, बाब क्र.103 मध्ये मागणी करण्यात आली आहे. राज्यातील भू-गर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली आहे. आपल्याला माहिती आहे की, कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो. पण मध्यंतरीच्या काळामध्ये भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे माननीय जलसंधारण मंत्री महोदयांनी चार-पाच वेळा बैठका घेतल्या होत्या. परंतु धामापूर तलावातील पाण्याची खोली किती आहे हे समजू शकलेले नाही. जर तेथील गाळ काढला गेला तर तलावातील पाण्याची पातळी वाढेल अशी स्थिती आहे. याबाबत देखील तपासणी करावयास पाहिजे आणि त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर अल्पसंख्याक विभाग आणि सामाजिक कल्याण या विभागाबाबत सांगावयाचे आहे. सर्वप्रथम मी अल्पसंख्यांक विभागाच्या पान क्र.167, बाब क्र.165 बाबत सांगू इच्छितो. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की ज्याठिकाणी युती सरकार नंतर जेव्हा आमचे सरकार सत्तेवर आले तेव्हा अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. संपूर्ण देशामध्ये हे एकच राज्य असे आहे की, याठिकणी अल्पसंख्याक समाजाला न्याय देण्यात आलेला आहे. परंतु आयोगाची रचना अद्याप करण्यात आलेली नाही. राज्यामध्ये कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्यावतीने अनेक महामंडळे काढण्यात आली आहेत.मग त्यामध्ये मागासवर्गीय महामंडळ, अनुसूचित जातीची महामंडळे तसेच इतरही महामंडळे आहेत, लिडकॉम आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

त्यांची मुदत संपलेली आहे तरीही ती महामंडळे चालू आहेत. आता बरीच पदे रिक्त झालेली आहेत. पक्षातील बऱ्याच कार्यकर्त्यांवर अन्याय झालेला आहे. त्या महामंडळांवर सुध्दा त्वरित नियुक्त्या कराव्यात अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 163 वरील बाब क्रमांक 164 बाबत बोलणार आहे. यामध्ये वृध्द कलावंतांना मानधन देण्याच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. कोकणात दशावतारी नाटक सादर करणारे जे कलावंत आहेत त्यांचे वय आता 85-90 वर्ष झालेले आहे. त्यांचाही समावेश या मानधनामध्ये करावा आणि त्या मानधनामध्ये वाढ करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना बोलण्याची संधी द्यावी अशी माझी विनंती आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 36 वरील बाब क्रमांक 42 बाबत बोलणार आहे. गेल्या अधिवेशनामध्ये आंब्याच्या नुकसान भरपाईच्या संदर्भात अनेक वेळा मागणी झालेली आहे. आंब्याच्या संदर्भात गेल्या वर्षी आणि त्याच्या आदल्या वर्षी जी नुकसान भरपाई द्यावयाची होती ती दिली गेलेली नाही. या वर्षी मधल्या काळात माननीय राज्यमंत्री जिल्ह्यामध्ये आले होते आणि त्यांनी घोषणा केली होती की, हेक्टरी 20 हजार रुपये प्रमाणे आंब्याच्या संदर्भात नुकसान भरपाई देण्याची तजवीज करण्यात आलेली आहे. आंब्याच्या बाबतीत खरोखर हेक्टरी किती हजार रुपये नुकसान भरपाई देणार या बाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची गरज आहे. आंब्याच्या संदर्भातील नुकसान भरपाई देण्यामध्ये कोणती अडचण आहे हे सुध्दा सांगण्याची गरज आहे. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात आंबा नुकसान भरपाईबाबत उल्लेख करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 83 वरील बाब क्रमांक 81 बाबत बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांना पॅकेजमधून पैसे देण्याचे जाहीर केले होते पण त्या पॅकेजच्या संदर्भात माहिती घेतल्यानंतर गेल्या चार वर्षात त्या पॅकेजमधून काहीही निधी दिला गेलेला नाही अशा प्रकारची माहिती आपल्याच कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी आमच्याकडे दिलेली आहे. त्या पॅकेजसाठी खरोखर पैसे देऊन तेथील पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता प्रयत्न होणार आहे की नाही या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 52 बाबत बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सध्या शिक्षण विभागामध्ये शिष्यवृत्ती घोटाळा चाललेला आहे. गेली अनेक वर्षे शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळालेली नाही. त्याची चौकशी केल्यानंतर अशी माहिती मिळाली की, जवळजवळ 25 लाख रुपयांची शिष्यवृत्ती अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गायब केल्याचे, गडप गेल्याचे निदर्शनास आले आहे. त्या संदर्भात गुन्हा दाखल झालेला आहे. यामध्ये जे अधिकारी आणि कर्मचारी गुंतलेले आहेत त्यांना तत्काळ निलंबित करुन

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. परशुराम उपरकर .....

त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. पण त्या बाबतीत योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे. या बाबतीत सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 38 वरील बाब क्रमांक 50 बाबत बोलणार आहे. या सभागृहामध्ये मत्स्य उद्योगाबाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आले. पर्सनेटच्या संदर्भातील प्रश्न अनेक वेळा सभागृहात आलेला आहे. पर्सनेट धारकांचा प्रश्न सुप्रीम कोर्टामध्ये अडकलेला आहे. या बाबतीत सुप्रीम कोर्टामध्ये शासनाची भूमिका मांडण्याची आवश्यकता आहे. देशामध्ये समुद्र किनाऱ्यावर असलेल्या राज्यांमध्ये पर्सनेट बोटी 12 नॉटिकल मैलाच्या आत येत नाहीत पण महाराष्ट्र राज्यामध्ये या पर्सनेट बोटी 12 नॉटिकल मैल किंवा शून्य नॉटिकल मैलापर्यंत येतात. त्यामुळे छोट्या मच्छीमारांचे खऱ्या अर्थाने नुकसान होत आहे. त्या पर्सनेट बोटी थांबविण्याची गरज आहे. त्यासाठी सुप्रीम कोर्टात जलद गतीने निर्णय लावण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात माननीय राज्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले होते की, केरळ आणि आसाम राज्याप्रमाणे मच्छीमारांना सबसिडीचे रॉकेल दिले जाईल तसेच अर्थ मंत्र्यांकडे तातडीने तशा प्रकारचा प्रस्ताव देऊन मच्छीमारांना सबसिडीचे रॉकेल देण्याकरिता योजना आखली जाईल. ती योजना केव्हा आखली जाईल आणि मच्छीमारांना सबसिडीचे रॉकेल कधी मिळेल याचा सुध्दा उल्लेख व्हावा. त्याचप्रमाणे एनसीडीसीचे जे गट आहेत त्या गटांचे अनेक प्रस्ताव कोकण किनारपट्टीमधून आलेले आहेत. ते प्रस्ताव पुण्याच्या कार्यालयामध्ये अडकलेले आहेत. ते प्रस्ताव का अडकले आहेत ? त्यांच्यासाठी निधी नाही. तो निधी देण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा केली होती. त्याचाही उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...
त्याचप्रमाणे मत्स्य दुष्काळाचे मोजमाप करण्याची पध्दत ब्रिटिशकालीन असल्याचे अनेक मंत्री महोदयांनी सांगितले आहे. ती पध्दत बदलण्याची गरज आहे. ती पध्दत बदलण्यासाठी केव्हा उपाययोजना केली जाईल हे देखील मंत्री महोदयांनी घोषित करावे अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 52 वर मी माझे विचार मांडू इच्छितो. अनुदानाच्या संदर्भातील हा विषय आहे. ज्या शाळा किंवा तुकड्या अनुदानास पात्र ठरतात त्याची यादी शासनाकडून जाहीर केली जाते. मग आर्थिक कुवतीनुसार शासनाकडून त्यांना अनुदान दिले जाते. ज्या प्राथमिक व माध्यमिकच्या तुकड्या अनुदानास पात्र ठरल्या आहेत त्यांची संख्या 467 आहे आणि 10 तारखेला 560 तुकड्या अनुदानास पात्र ठरविल्या आहेत. तसेच माध्यमिकच्या 171 तुकड्या अनुदानास पात्र ठरविल्या आहेत. या तुकड्यांना अनुदान केव्हा पासून दिले जाईल ते आज जाहीर होणे आवश्यक आहे. हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी या तुकड्या अनुदानास पात्र ठरलेल्या असताना या पुरवणी मागण्यांमध्ये या तुकड्यांना अनुदान देण्याची तरतूद करणे आवश्यक होते, पण या मागण्यांमध्ये ती तरतूद केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा या तुकड्यांना केव्हापासून अनुदान दिले जाईल त्याचा खुलासा मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, आता राईट टू एज्युकेशन हा कायदा अस्तित्वात आलेला आहे. या कायद्यानुसार आवश्यक तेथे शाळा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. परंतु ज्या ठिकाणी मराठी माध्यमाच्या शाळा सुरु आहेत त्या शाळांना वाऱ्यावर सोडल्या सारखी परिस्थिती निर्माण झ ाली आहे. 2008 साली शासनाने प्रस्ताव मागविल्यानंतर या शाळा सुरु झाल्या होत्या. त्या शाळांना अद्याप मान्यता मिळालेली नाही. आजही त्या शाळा सुरु आहेत. नवीन कायद्याच्या निकषात या शाळा बसत नाहीत. प्रत्येक विद्यार्थ्याला प्राथमिक शिक्षण मिळणे हा अत्यावश्यक व मूलभूत विषय आहे. या शाळांची संख्या फक्त 297 इतकी आहे. मराठी माध्यमाच्या या शाळा असल्यामुळे त्यांना मान्यता देण्यासंबंधी मंत्री महोदयांनी विचार करावा.

सभापती महोदय, नगरपालिकांच्या माध्यमिकच्या शाळा आहेत. नगरपालिकांच्या प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना सुधारित वेतन संरचना 2006 पासून लागू करुन 2009 पासून वेतन देण्यास सुरुवात केली आहे. माध्यमिक शाळांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्यापही सुधारित वेतन

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामनाथ मोते....

संरचना लागू केलेली नाही. नगरविकास विभाग म्हणत आहे की, याबाबत शालेय शिक्षण विभागाने जी.आर.निर्गमित करावा. शालेय शिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, नगरविकास विभागाने जी.आर.निर्गमित करावा. त्यानंतर वित्त विभागाकडे फाईल गेली होती. त्या विभागाने पानभर त्रुटी काढल्या आहेत. त्यामुळे हा विषय प्रलंबित राहिलेला आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण स्वत: वित्त विभागाच्या सचिवांशी संपर्क साधून जो एक विभाग या लाभापासून वंचित राहिलेला आहे, त्यांना तो लवकरात लवकर मिळण्यासाठी प्रयत्न करावेत.

पृष्ठ क्रमांक 149 वरील बाब क्रमांक 151 वर मी माझे विचार मांडत आहे. महाविद्यालयांना अनुदान देण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या चांगल्या भूमिकेतून ग्रामीण व आदिवासी भागात महाविद्यालये सुरु झालेली आहेत. त्यांना 100 टक्के अनुदान दिले जात आहे. विक्रमगड महाविद्यालय हे आदिवासी तालुक्यातील अनुदानित महाविद्यालय आहे. त्या महाविद्यालयाला अनुदानाचा प्रचंड पैसा मिळाला आहे. त्या संस्था चालकाविरुध्द अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या सुध्दा तक्रारी आहेत. अनुदानाचा पैसा संस्था चालकाने खाऊन टाकला आहे. यासंबंधी विद्यापीठाकडे तक्रार करण्यात आल्यानंतर अनेकदा चौकशी करण्यात आली. हे विद्यालय खरोखर चालत नसेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळण्यासाठी हे महाविद्यालय अन्य संस्थेला देता येईल काय किंवा या महाविद्यालयात सुधारणा होण्यासाठी उपायोजना केली जाईल काय ?

यानंतर मी बाब क्रमांक 153 वर माझे विचार मांडत आहे. औद्योगिक शिक्षणासाठी तंत्र निकेतनाची तरतूद केलेली आहे. शासकीय तंत्र निकेतन किंवा खाजगी तंत्र निकेतन यामध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पदविकेसाठी प्रवेश दिला जातो. परंतु सध्याच्या तंत्र शिक्षण संचालकांनी नुकतेच एक परिपत्रक काढलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री.खंदारे 06:50

श्री. रामनाथ मोते....

गणित विषयावमध्ये विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर नापास होतात म्हणून हे नापास होणा-यांचे प्रमाण कमी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने काठीण्य पातळी कमी करण्याचा चांगला निर्णय घेतलेला आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य गणित आणि मॅथेमॅटिक्स असे दोन विषय ठेवले. एक 71 नंबरचा आणि दुसरा 74 नंबरचा विषय आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने असे परिपत्रक काढलेले आहे की सामान्य गणित धेतलेले विद्यार्थी सुध्दा पॉलिटेक्निक डिप्लोमाला प्रवेश घेण्यासाठी पात्र असतील. डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशनने अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही असे परित्रक काढले. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक असताना डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकन एज्युकेशन हे सामान्य गणित घेतलेल्या विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक डिप्लोमाला प्रवेश देऊ नका असे सांगतात हे योग्य नाही. आज जे हजारो विद्यार्थी पॉलिटेक्निक, तंत्र शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी सामान्य गणित विषय घेतलेला आहे. मॅथेमॅटिक्स आणि सामान्य गणित यामध्ये तसा कोणताही फरक नाही. तेव्हा सामान्य गणित घेतलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये जे मागासवर्गीय विद्यार्थी प्रशिक्षण घेतात त्यांना गेल्या 30 वर्षापासून केवळ 30 आणि 40 रुपये विद्यावेतन मिळते. त्यांच्या विद्यावेतनामध्ये वाढ केलेली नाही ती वाढ करावी. तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी 500 रु. विद्यावेतन करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

ॲड. उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या ) सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे. मी सुरुवातीलाच सभागृहासमोरील सर्व मागण्यांना पाठिंबा देत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राने महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासंबंधी माननीय न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये अनेक सदस्य आहेत. या समितीने शासनाला 10 डिसेंबर 2010 रोजी एक अंतरिम अहवाल सादर केला होता. या अहवालाची एक प्रत उच्च न्यायालयास हिंदुस्थान टाईम्स विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर सुमोटो जनहित याचिका क्रमांक 57/2011 या प्रलंबित केसमध्ये शासनातर्फे सादर करण्यात आलेली आहे. उच्च न्यायालयाने या संदर्भात काही मार्गदर्शन केलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "In view of the above, further affidavit shall be filed on behalf of the State Government indicating how far the recommendations made in the first interim report by the Committee have been accepted so far and if all the recommendations are not accepted, when are the other recommendations going to be accepted/ implemented." त्यानंतर अंतिम परिच्छेदात हायकोर्टाने असे म्हटले आहे की, "In view of the above, the Inspector General of RPF, Inspector General of GRP Railway Police and the Secretary of Home Department, Govt. of Maharashtra and the concerned officers shall sit together and discuss the issues raised in this petition and work out the necessary strategies and also make recommendations to the respective Governments for sanctioning more force including posts of lady constables or Head constables for providing protection to the lady passengers travelling in trains." अशा प्रकारची डायरेक्शन्स हायकोर्टाने दिलेली आहेत. त्याची अंमलबजवणी करुन काही दिवसात शासनाला हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल करायचे आहे. या संदर्भात शासनाने योग्य ते पाऊल उचलून हे शपथपत्र हायकोर्टामध्ये ताबडतोबीने दाखल करावे अशा प्रकारची मी विनंती करते.

..3..





ॲड. उषा दराडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या रिपोर्टच्या अनुषंगाने चर्चा झालेली आहे. आंध्रप्रदेश सरकारने ज्या सुधारणा केलेल्या आहेत त्या सुधारणा आयपीसीच्या सेक्शन 354मध्ये आपल्याला करावयाच्या आहेत. This offence is triable by Judicial First Class Magistrate Court in other States whereas in A.P. it is made triable by Sessions Court with minimum imprisonment of 5 years which can extend up to 7 years and also with fine" अशा प्रकारची ही सुधारणा आहे. आयपीसीच्या कलम 354 अंतर्गत विनयभंगाची केस दाखल होते. ही केस सेशन ट्रायबल नाही. या संदर्भात राज्य सरकारने कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

Cr P.C.Section 167 (2) (B) मध्ये रिमांड वाढविण्याच्या संदर्भात आंध्रप्रदेश शासनाने पुढील सुधारणा सुचविलेली आहे. "As per amendment of AP Act No. 31 of 2001 w.e.f. 6-12-2000 an amendment was made for extension of remand for the accused through the medium of Electronic Video Linkage.

...नंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या गृह विभागावर बोलत आहेत.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे )** : मी सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांना सांगू इच्छितो की, गृह विभागावर काल चर्चा झाली आहे. आज गृह विभागावर चर्चा नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, Section 509. IPC : Proposals have been submitted to make the offence non-bailable and minimum 3 years of imprisonment.

Section 326 (A) IPC (Acid Attacks) : Prososal have been submitted to cabinet to prescribe 10 years imprisonment as minimum punishment. आंध्र प्रदेश राज्याने ज्या सुधारणा केलेल्या आहेत त्या सर्व सुधारणा आपल्या राज्याने देखील कराव्यात अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, दिनांक 10 जून 2012 रोजी केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माननीय खासदार श्रीमती सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने "राष्ट्रवादी युवती परिषद" स्थापन करण्यात आली. या युवती परिषदेने महिलांच्या प्रश्नासंबंधी एक सनद तयार केली आहे. ही सनद मी महिला व बाल कल्याण मंत्री महोदयांकडे सुपूर्द करते. सनदीमधील सर्व मागण्या मला रेकॉर्डवर आणावयाच्या होत्या. परंतु वेळे अभावी मी त्या मांडू शकत नाही. "राष्ट्रवादी युवती परिषदेने" जी सनद तयार केलेली आहे ती जशीच्या तशी स्वीकारुन महिलांसाठी त्या योजना लागू कराव्यात अशी मी विनंती करते. शेवटी जाता जाता संत तुकाराम महाराजांनी महिलांच्या बाबतीत जे लिखाण केले ते मी या ठिकाणी उद्‌धृत करते

"बाईल मेली मुक्त झाली
देवे माया सोडविली,
पोर मेले बरे झाले
देवे माया विरहित केले,
माता मेली मज देखता
तुका म्हणे हरली चिंता

संत तुकाराम महाराजांनी महिलांच्या बाबतीत अशा पध्दतीचे लिखाण केले आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, मी मघाशी श्रीमती मृणाल गोरे यांच्या दु:खद निधनाची माहिती सभागृहाला दिली. माझे ते पुरवणी मागण्यांवरील भाषण होते असे कोणाला वाटत असेल तर मला त्याचा खेद वाटतो. घटनेचे गांभीर्य असावे असे अपेक्षित आहे.

बाब क्रमांक 131 व 132, पृष्ठ क्रमांक 129, वैद्यकीय शिक्षण - आयुर्वेद पोद्दार मेडिकलसाठी मागणी केलेली आहे. बाब क्रमांक 133 मध्ये देखील अनेक तरतुदी केलेल्या आहेत. त्यामध्ये ससून रुग्णालयाचा केलेला उल्लेख योग्य आहे. ससून रुग्णालयातील कार्डीॲक सर्जन डॉ.अविनाश इनामदार यांच्या कराराचे नुतनीकरण न झाल्यामुळे गेल्या दीड महिन्यापासून हृदय शस्त्रक्रिया करणे बंद होते. विधानसभा अध्यक्ष माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या निदर्शनास मी ही बाब आणून दिली. त्यानंतर माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी दिनांक 6 जुलै रोजी आदेश दिले. करार वेळेवर न झाल्यामुळे शस्त्रक्रिया थांबत असतील तर ती अतिशय गंभीर बाब आहे. तसेच सर्व शासकीय रुग्णालयातील एक्स-रे आणि एम.आर.आय मशीन्सचा आढावा घेणे गरजेचे आहे.

बाब क्रमांक 149, पृष्ठ क्रमांक 149, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - शासकीय महाविद्यालये व संस्थांचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी 2 कोटी 73लाख 4 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. गेल्या वर्षी टी.वाय.बीकॉम परीक्षेचे आणि इंजिनिअरींग परीक्षेचे पेपर फुटले होते. ही पेपरफुटी कशी रोखता येईल यासाठी एखादा विभाग असावा अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 140,143 आणि 144 पृष्ठ क्रमांक 138 व 139 - आदिवासी विकास विभाग - वसतिगृहांसाठी निधीची मागणी केलेली आहे. आदिवासी विकास विभागाचे मंत्री आताच सभागृहाच्या बाहेर गेले. आपण वसतिगृहांसाठी निधी देतो परंतु त्यांच्या देखरेखेसाठी मंडळ नाही. जसे समाजकल्याण सल्लागार मंडळ आहे तसे आदिवासी आश्रमशाळांसाठी देखरेख करण्यासाठी एक सल्लागार मंडळ असावे याकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधते.

..3..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

बाब क्रमांक 50, पृष्ठ क्रमांक 38- कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग- गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसायासाठी ठेके दिले जातात. परंतु सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील तलावांमध्ये पाणी नसल्याचे लोकांनी निदर्शनास आणून दिले. तेव्हा हे ठेके काही काळ पुढे ढकलावे अन्यथा त्यामध्ये गोरगरिबांचे पैसे अडकून राहतील.

बाब क्रमांक 159, पृष्ठ क्रमांक 155 - महिला व बाल कल्याण विभाग - एकात्मिक बाल संरक्षण योजनकरिता 27 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. नुकतीच धाराशीव येथे एका मुलीची छेडछाड केली म्हणून तिने आत्महत्या केली. महिला आयोग व बाल आयोग नसल्यामुळे महिलांवर होणारे अत्याचार आणि इतर सर्वच गुन्ह्यांच्या बाबतीत शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे. हे प्रमाण फक्त 9 टक्के आहे. तर स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण 6 टक्के आहे. तेव्हा आयोगाचे काम त्वरित होण्यासाठी या नियुक्त्या होणे गरजेचे आहे.

अन्न व नागरी पुरवठा विभाग- शासनाने गुटखा बंदीचा निर्णय घेतला त्याचे मी स्वागत करते.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...
शासनाच्या स्वागताने माझ्या भाषणास सुरुवात करणार होते, ही गोष्ट मला जाणीवपूर्वक नमूद केली पाहिजे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाकडे 2010 पासून मराठी अभ्यास केंद्रांचे प्रस्ताव दिले होते आणि राज्य मराठी विकास संस्थेला मराठीचे अधिकृत नियोजन करण्यासाठी साधन सामुग्री आणि अधिकार द्यावेत, यासाठी 300 कोटी रुपये त्यांनी मागितले होते. ही बाब अजूनही प्रलंबित आहे.

सभापती महोदय, मी नगरविकास विभागाच्या अनुषंगाने बोलू इच्छिते की, राज्यातील 22 शहरांचे नगरविकास आराखडे प्रलंबित आहेत. पिंपरी-चिंचवडच्या नवनगर विकास प्राधिकरणाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी मांडला आहे. मला त्या बाबतीत थोडेसे सांगावयाचे आहे की, ज्यांनी विकास करणे अपेक्षित आहे, ते प्राधिकरण विकासाचे काम न करता पिसाळलेल्या प्राण्याप्रमाणे भूमिका बजावते आहे. म्हणून ते प्राधिकरण बरखास्त करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करते.

सभापती महोदय, मुंबईचा नेहरु नगरचा पुनर्विकास आराखडा प्रलंबित आहे. त्यामध्ये शासनाने लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, मराठी चित्रपट सोहळयासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. ती स्वागतार्ह आहे. परंतु मराठी मालिकांसाठी चित्रनगरीत जो टॅक्स लावला जातो, त्यामुळे मराठी मालिका निर्मात्यांना खूप त्रास सहन करावा लागतो आहे. या संदर्भात त्यांनी माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यासमवेत बैठकही घेतली आहे. या बाबतीत चित्रपट सेनेने लक्ष घातले आहे. या बाबतीत सकारात्मक निर्णय माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी जाहीर करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सांस्कृतिक सोहळयाच्या वेळी श्रीमती माधुरी दीक्षित हया अनुपस्थित राहिल्या म्हणून सरकारच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली. मी काही माधुरी दीक्षित यांचे वकीलपत्र घेतलेले नाही. परंतु कोणा अभिनेत्यास अथवा अभिनेत्रीस कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबतचे निमंत्रण द्यावयाचे असेल तर व्यवस्थितपणे संपर्क साधून दिले तर ते कार्यक्रमास

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येऊ शकतात. माननीय मंत्री महोदयांनी या बाबतीत ताशेरे मारण्यापेक्षा अभिनेते आणि अभिनेत्री यांचा सन्मान ठेवून त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात यावे अशी मागणी करुन मी माझे मनोगत पूर्ण करते.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 45 या अनुषंगाने मी माझे मत व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, पुणे शहराच्या वाहतुकीच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने मेट्रो रेल्वे आणण्याचा प्रस्ताव पास केलेला आहे. परंतु या संदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारकडून लवकरात लवकर मंजूर करुन घेण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने तत्काळ पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेला पाणी पुरवठा आणि इतर योजनांचे हजारो कोटी रुपयांची अनुदाने नगरविकास विभागाकडून येणे आहेत. ती अनुदाने पुणे महानगरपालिकेला नगरविकास विभागाने लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावीत अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 5 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, पुणे शहरामध्ये आधार कार्ड काढण्याच्या कामाला सुरुवात झाली. आधार कार्ड काढण्यासाठी शासनाने फक्त तीन यंत्रे उपलब्ध करुन दिली होती. पुणे शहरातील लोकांना आधार कार्ड देण्यासाठी 300 पेक्षा जास्त यंत्रांची आवश्यकता आहे. परंतु यंत्रे उपलब्ध न झाल्याने आधार कार्डचे काम थांबलेले आहे. अजून 21 लाख नागरिक आधार कार्डापासून वंचित आहेत. सामान्य प्रशासन विभागाने पुणे शहरासाठी 300 यंत्रे तत्काळ उपलब्ध करुन द्यावीत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 104, पृष्ठ क्रमांक 105 च्या बाबतीत सांगू इच्छितो की, नवनियुक्त अन्न विश्लेषक या पदाला अन्न व प्रशासन विभागाच्या अधिसूचने व्दारे मान्यता न मिळाल्याने राज्यातील अन्न व औषध प्रयोग शाळांमधील कामकाज ठप्प झाले आहे. अन्न नमुन्याची तपासणी करणाऱ्या राज्यातील प्रयोग शाळांना गेल्या पाच ते सहा वर्षापासून कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी अर्थात लोक विश्लेषक पदे रिक्त असणे आणि अन्न व औषध प्रतिबंधक कायद्यांतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांना लोक विश्लेषक या पदाचे नामकरण अन्न विश्लेषक असे होऊनही केवळ अन्न व औषध प्रशासनाची आवश्यक असलेली अधिसूचना शासनाने न काढल्यामुळे हे काम ठप्प झाले आहे. तरी सदरहू अधिसूचना शासनाने तत्काळ निर्गमित करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, अल्पसंख्याक विभागाची बाब क्रमांक 165, पृष्ठ क्रमांक 167 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करीत आहे. सच्चर समितीच्या शिफारशी केंद्र व राज्य शासनाने स्वीकारल्या आहेत. माननीय पंतप्रधानांनी 15 कलमी कार्यक्रम मंजूर करुनही अल्पसंख्याकांच्या निवारा आणि शिक्षण या कामी आपणास अपयश आलेले आहे. अल्पसंख्याकांना न्याय देण्यासाठी अनुदानामध्ये वाढ करुन त्या समाजातील लोकांना घरे कशी देता येतील यासाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 07:05

श्री. मोहन जोशी...

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर दंतरोग विभागात कवळी बसविण्याचे साहित्य व मशीन गेल्या अनेक वर्षे धूळ खात पडले आहे .महिन्याला किमान 25 कवळया तयार करुन रु ग्णांना दिल्या जातात. परंतु त्याठिकाणी प्रतिक्षा यादी केलेली आहे स्टोनप्लॅस्टर गेल्या काही महिन्यापासून या विभागाला पुरविण्यात आलेले नसल्यामुळे हे काम ठप्प आहे.त्याचबरोबर स्लॅप उपकरण गेल्या तीन वर्षापासून खरेदी करण्यात आलेले नाही ती व्यवस्था ससून हॉस्पीटलमध्ये करावी अशी शासनाला विनंती आहे.

उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या बाबतीत मी एक मुद्दा मांडणार आहे. बाब क्रमांक 149 यामध्ये पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली पुणे,नाशिक,नगर या जिल्हयातील बहुतांशी व्यवस्थापन महाविद्यालये एमएसीएम, एमएमएम,एमटीएम कोर्सेस बेकायदेशीरपणे चालवीत असल्याची बाब उघडकीस आलेली आहे. एसआयटीची मान्यता नसल्यामुळे सदरहू पदे अनियमित असल्याचे स्पष्ट झाले आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांची फसवणूक झाली आहे आणि लाखो रुपये खर्च करुन अर्धवट राहिलेल्या या अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून शासनाने तातडीने चौकशी करुन यासंदर्भात कारवाई करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, बाब क्रमांक 152,पृष्ठ क्रमांक 150 उच्च शिक्षण विभाग याविषयावर मी बोलणार आहे. शासकीय अनुदानित तंत्रशिक्षण संस्थामधील कर्मचाऱ्यांना वेतन थकबाकी रकमेसाठी 62 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याचे मी स्वागत करतो. अनुदानित तंत्रसंस्थेची ही अवस्था असेल तर खाजगी संस्थांचा शासनाने कधी विचार केला आहे काय हा माझा प्रश्न आहे. नुकतीच यासंदर्भात एक बैठक घेण्यात आली आणि खाजगी संस्थांकडून 100 रुपयांचे बंधपत्र लिहून घेण्यात आले. 15 ऑगस्टपर्यंत याप्रमाणे कार्यवाही करा अन्यथा परत संस्थेची तपासणी होईल. अटींची पूर्तता केली नाही तर विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन होणार नाही असे सांगण्यात आले. मी विनंती करतो की, यासंबंधात निश्चित धोरण आखले पाहिजे. सरकार पगार देऊ शकत नसेल तर खाजगी तंत्रशिक्षण संस्था पगार कसे करतील याचा विचार करावा. कारण शिष्यवृत्ती ही वर्षाच्या शेवटी म्हणजे मार्च-एप्रिल महिन्यामध्ये मिळते. एक वर्षाचा कर्मचाऱ्यांचा पगार कसा करावयाचा हा प्रश्न निर्माण होतो.

शासनाची अट अशी आहे की, 60 विद्यार्थ्यांची कॅपॅसिटी असेल तर पूर्ण साहित्य ठेवा, पूर्णवेळ प्राध्यापक ठेवा, संगणक ठेवा. 5 विभाग असतील तर 300 विद्यार्थ्यांची गरज असते. शासन 150 विद्यार्थ्यांना परवानगी देते. 120 विद्यार्थ्यांना परवानगी दिली जाते. प्राध्यापकाला रिकामे बसवून ठेवायचे काय? संगणकाचे सामान तसेच ठेवायचे काय ? जेवढी कॅपॅसिटी असेल तेवढे निर्बंध आणले पाहिजेत आणि बाकीची सूट दिली पाहिजे अशी मागणी करतो. शासनाने अट घातली आहे की विद्यार्थ्यांचे नुकसान करु नका, त्यांचे रजिस्ट्रेशन थांबवू नका, त्यांना शिकू द्या. खाजगी संस्थांना अजून वेळ द्या. 3 महिन्यात सर्व अटींची पूर्तता करण्यासाठी संस्था तयार आहे. निधी ताबडतोब मिळाला पाहिजे. स्कॉलरशीपचा पैसा मिळाला पाहिजे. एस.सी.,एस.टी. कुठल्याही प्रवेशाचा पैसा मिळत नाही. अशा परिस्थितीमध्ये खाजगी तंत्रशाळा ग्रामीण भागात चालविणे फार कठीण आहे. विभागाचे संबंधित अधिकारी आहेत त्यांना याबाबतीत सूचना द्याव्यात आणि खाजगी तंत्रशिक्षण देणाऱ्या ज्या शाळा आहेत त्यांना सहकार्य करावे अशी विनंती करतो.

आदिवासी विभागाकरिता 30 लाख रुपये आणि 75 लाख रुपये एवढा निधी दिलेला आहे. गोंदिया जिल्हयातील घटना शासनाला माहीत आहे. सर्पदंशाने अनेक विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे. मराठी वाहिनीवर आजारी विद्यार्थ्यांचे दृश्य दाखविलेले आहे. ते खाली झोपलेले असतात.

..3..



SSK/ पूर्वी श्री.गिते 07:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

त्यांना अंथरुण आणि पांघरुण नाही. केवळ एका लाल कपडयावर झोपले होते. म्हणून शासनाला विनंती करतो की, या सर्व निवासी शाळा असल्यामुळे खाट आणि अंथरुणाची व्यवस्था करावी. माननीय मुख्यमंत्र्यांचे मी अभिनंदन करतो की महाराष्ट्र सदनाचे नवी दिल्लीत लवकरच उद्‌घाटन होणार आहे. त्याठिकाणी पदनिर्मितीसाठी 30 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 105 आणि पृष्ठ क्रमांक 105 ही अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित पूरक मागणी आहे. मी जेव्हा निवडून आलो आणि पहिल्यांदा सदनात भाषण केले त्यावेळी माझी लक्षवेधी सूचना होती. आदिवासी विकास मंत्री डॉ. गावीत होते. आदिवासी लोकांसाठी भंडारा, गोंदिया, गडचिरोली भागात जे धान्य खरेदी केले जाते त्याठिकाणी गोडाऊन आणि शेड बांधून देऊ असे आश्वासन दिले होते.

नंतर श्री. खर्चे....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ......

आता 27 जुलै, 2012 रोजी माझी आमदारकीची मुदत संपुष्टात येत आहे. अजूनही सभागृहात दिलेल्या आश्वासनावर कार्यवाही झालेली नाही. या निमित्ताने माझी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना विनंती आहे की, आदिवासी भागात जास्तीत जास्त गोडावून बांधण्याचा निर्णय घ्यावा. त्याच बरोबर नाबार्डकडून यासाठी किती अनुदान मिळणार आहे याचाही खुलासा व्हावा. पण त्यात नाबार्ड व राज्य शासन यांच्याकडून किती किती टक्के अनुदान मिळणर आहे याचाही खुलासा झाला पाहिजे. एवढी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री) : महोदय, जलसंपदा विभागाच्या 16.06 कोटीच्या बाब क्र. 81 ते 85 च्या माध्यमातून एकूण पाच पुरवणी मागण्या मान्यतेसाठी सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत. त्यावर बोलताना माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सर्वश्री अरुण गुजराथी, दिवाकर रावते, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, प्रा. सुरेश नवले, श्रीमती शोभा फडणवीस व अन्य सभासदांनी भाग घेऊन विविध सूचना केल्या.

महोदय, खरे तर ज्या विषयावर पुरवणी मागण्या मांडलेल्या असतात त्याच विषयाच्या अनुषंगाने चर्चा होणे अपेक्षित असते. परंतु 16 कोटी रुपयांच्या मागण्यांवर विचार व्यक्त करीत असताना जवळपास अंदाजपत्रकीय अधिवेशनात जशी चर्चा होते तशीच चर्चा सविस्तरपणे येथे करण्याचा प्रयत्न केला गेला. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला त्यांचे मी प्रथम आभार मानतो. गेले काही दिवस विशेष करुन महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या 50 व्या वर्षात, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात ही चर्चा झाली. आर्थिक पाहणी अहवालात जेव्हापासून हा विषय आला त्यावेळेपासून जणू काही जलसंपदा विभागामार्फत राज्यात फार मोठे विचित्र काही घडले असा आभास निर्माण करण्याचाही प्रयत्न झाला. माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत तेव्हा मला एका गोष्टीचा खुलासा येथे करणे आवश्यक आहे. याचे कारण देखील जलसंपदा विभागाच्या कारभाराच्या बाबतीत सखोल माहिती घेऊन काही आवश्यक पावले उचलावयाची असतील अथवा धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तर तसे करण्यात येईल असे त्यांनी सांगितले आहे.

ही गोष्ट खरी आहे की, माननीय राज्यपालांनी घटनेच्या 371 व्या कलमानुसार राज्यातील असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने सिंचनाचा अनुशेष निर्मुलनासंबंधीचा निर्णय 10 वर्षापूर्वी घेतला. त्यानुसार निधीचे समन्यायी वाटप करीत असताना मोठ्या प्रमाणात निधी निर्माण झाला हे आपणा सर्वांना माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्नोत्तराच्या निमित्ताने राज्यात केवळ 0.1 टक्के इतकीच सिंचन क्षमता निर्माण झाल्याबाबत चर्चा केली. गेल्या काही दिवसांपासून असेही पसरविण्यात येत आहे गेल्या 10 वर्षात सिंचनावर 71 हजार कोटी रुपयांचा खर्च झाला पण त्यातून फारशी सिंचन क्षमता निर्माण झाली नाही, असे वातावरण निर्माण करण्याचेही प्रयत्न झ ाले. पण आर्थिक पाहणी अहवालात गेल्या 10 वर्षात 71 हजार कोटी रु. सिंचनावर खर्च झाला

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .......

असे कोठेही म्हटलेले नाही. या सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील 11 कोटी जनतेच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की, रु. 71 हजार कोटी हा खर्च सन 1951 सालापासून झालेला आहे. मागील 10 वर्षात सिंचनावर जो खर्च झाला ती रक्कम रु. 41 हजार कोटी एवढीच आहे. त्यात योजनांतर्गत व योजनेतर असे दोन्ही भाग अंतर्भूत आहेत. त्याचे विश्लेषण करताना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, योजनेतर खर्चात रु. 20 हजार कोटी एवढी रक्कम खर्च झालेली आहे. पण मी या निमित्ताने असे सांगू इच्छितो की, या 20 हजार कोटीमध्ये, म्हणजेच योजनेतर खर्चात वेतन व अन्य बाबींवरील खर्चाचाही समावेश आहे. पण काही वेळा राजकारणाच्या हेतूसाठी असे काही बोलावे लागते आणि त्यातून काही तरी प्रश्न कसे निर्माण होऊ शकतात असा प्रयत्न केला जाऊ शकतो. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांना एक पत्र दिले आहे की, श्वेत पत्रिका काढत असताना त्यात काय काय गोष्टी अंतर्भूत असाव्यात. याबाबत मी असे स्पष्ट करु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री यांनी श्वेत पत्रिकेसंबंधी बाब वारंवार स्पष्ट केलेले आहे. तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सुध्दा स्पष्ट भूमिका घेतली आहे. जलसंपदा विभागाचा मंत्री म्हणून मी देखील वारंवार सांगत आहे की जलसंपदा विभागासंबंधीची श्वेत पत्रिका निश्चितपणे काढण्यात येईल, यात दूमत असण्याचे कारण नाही. त्यात गेल्या 10 वर्षातील सिंचनाची परिस्थिती तसेच मागील 50 वर्षात सिंचनाच्या बाबतीत राज्याने जी वाटचाल केली आहे याचा समोवश असेल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

राज्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढत असतांना कृषी मालावर आधारित असलेल्या राज्याची अर्थव्यवस्था अधिक चांगल्या पध्दतीने विकसित करता येईल यासाठी राज्य शासनाने भर दिलेला आहे. गेल्या अनेक वर्षामध्ये शासनाने केलेल्या कामांची माहिती व श्वेतपत्रिकेच्या अनुषंगाने काढण्यात आलेली माहिती जनतेपुढे निश्चिपणे आणली जाणार आहे यामध्ये दुमत असण्याचे काहीही कारण नाही.

सभापती महोदय, युती शासनाच्या काळात वेगवेगळया महामंडळाची निर्मिती करण्यात आली होती व त्यावेळी काही अधिकार सुध्दा माननीय राज्यपाल महोदयांना देण्याचा प्रयत्न झाला होता. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशावरून संपूर्ण गोष्टीची अंमलबजावणी करण्यात आली होती. वैधानिक विकास मंडळ निर्माण करण्यासाठी माननीय श्री. शरद पवार साहेबांनी पुढाकार घेतला होता तसाच पुढाकार घेण्याचा राज्याचे माननीय माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी नागपूरच्या बैठकीत निर्णय घेतला गेला होता. दिल्या गेलेल्या निधीचे समन्यायी वाटप करतांना अनुशेष निर्मूलनाचा कार्यक्रम गेल्या 10 वर्षापासून हाती घेतला गेला व त्यामुळे विदर्भात सिंचनासाठी एकंदर किती निधी दिला गेला याची माहिती आपल्याला मिळू शकेल.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्दा उपस्थित केला असल्यामुळे मी सांगू इच्छितो की, गेल्या 10 वर्षात राज्य शासनाने सिंचनाचे क्षेत्र 10.56 लक्ष हेक्टर निर्माण केले आहे. पूर्वी सिंचनाचे क्षेत्र व सिंचित क्षेत्रामध्ये तफावत होती परंतु ही तफावत नष्ट करण्यासाठी गेल्या 10 वर्षामध्ये राज्य शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. गेल्या 10 वर्षात 12.47 लक्ष हेक्टरने सिंचित क्षेत्रात वाढ झालेली आहे. सन 2001 मध्ये 17.08 लक्ष सिंचित क्षेत्र होते व गेल्या 10 वर्षात सिंचनाचे क्षेत्र 10 लक्ष हेक्टरने वाढलेले आहे. राज्यामध्ये कृषी मालाचे उत्पादन वाढण्यासाठी शासनाने फार मोठे काम केलेले आहे. एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे की, परवा माननीय उप मुख्यमंत्री बोलत असतांना त्यांच्या वाक्याचा विपर्यास केला गेला होता. गेल्या 10 वर्षात पाण्याची उपलब्धता केली जात असतांना पिण्याच्या पाण्यासाठी आपल्याला मोठया प्रमाणात पाणी आरक्षित करावे लागत आहे.

सभापती पिंजाळ प्रकल्प तसेच मुमरी प्रकल्पाचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. भातसा धरणाच्या बाबतीत सुध्दा या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते परंतु त्यावर

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

मी नंतर विचार व्यक्त करणार आहे. गेल्या 10 वर्षात वाढलेले नागरीकरण मोठया प्रमाणात वाढलेले आहे. 60 वर्षानंतर माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली पाण्याचा क्रम ठरविला गेला. अगोदर पिण्याच्या पाण्याला अग्रक्रम देण्यात आला होता व त्यांनतर उद्योगाला व शेवटी शेतीच्या पाण्याला अग्रक्रम दिला जात होता. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने पाण्याचा अग्रक्रम ठरविला गेला व त्यामध्ये पहिल्यांदा पिण्याच्या पाण्याला अग्रक्रम देण्यात आला व त्यांनतर शेतीला व शेवटी उद्योगाला पाणी देण्याचा अग्रक्रम ठरविण्यात आला.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असल्यामुळे महानगर पालिका, नगर पालिका, मोठया लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती, कमी लोक संख्या असलेल्या ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा करण्यासाठी जलाशयातील पाण्याचा वापर करण्याची भूमिका आपल्याला घ्यावी लागली आहे.

सभापती महोदय, नैसर्गिक स्त्रोतामुळे मिळणारे पाणी व शाश्वत पाणी यामध्ये फार तफावत आहे. टँकर मुक्तीची घोषणा झाल्यानंतरही आजही गावा-गावात, तालुक्या-तालुक्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. अशा वेळेला शाश्वत पिण्याच्या पाण्याच्या योजना करावयाच्या असतील तर धरण व ज्या नद्या बारमाही वाहतात अशा ठिकाणच्या जलाशयाचा साठा पिण्याच्या पाण्यासाठी मोठया प्रमाणात उपलब्ध करुन द्यावा लागत आहे.

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून आपण उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणात वाटचाल केलेली आहे. आपल्या राज्यात मोठया प्रमाणात उद्योग येत आहेत व अशा वेळी उद्योगांना आपल्याला पाणी द्यावे लागत आहे.

सभापती महोदय, 10 वर्षापूर्वी आपण पहिल्यांदाच "भारनियमन" या शब्दाला सामोरे गेलो होतो व त्याच्या अगोदर राज्यातील जनतेला "भारनियमन" हा शब्द माहीत नव्हता. 1995 मध्ये आपले राज्य विजेच्या क्षेत्रात अग्रेसर होते. शेजारच्या राज्याला जेव्हा विजेचा तुटवडा पडत होता त्यावेळेस आपल्या राज्यातून शेजारच्या राज्यांना विजेचा पुरवठा केला जात असे. परंतु आपल्या राज्यात वीज कमी तयार झाल्याबरोबर आपल्या राज्याला "भारनियमना"सारख्या शब्दाला सामोरे जावे लागले.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

सभापती महोदय, खाजगी विजेचे प्रकल्प घेतले पाहिजेत, राज्य सरकारचे विजेचे प्रकल्प घेतले गेले पाहिजेत असा निर्णय त्या कालखंडात झाला व जलाशयातील साठलेले पाणी एका बाजूला पिण्याच्या पाण्यासाठी व दुसऱ्या बाजूला विजेच्या निर्मितीसाठी देण्याची वेळ आपल्यावर आली.

सभापती महोदय, राज्याचे 10 लक्ष हेक्टरने सिंचनाचे क्षेत्र वाढलेले आहे. परंतु त्याच बरोबर जितके पाणी आम्ही पिण्यासाठी दिले, उद्योगासाठी दिले त्या पाण्यातून नोशनल आकडेवारी काढण्याचा प्रयत्न केला तर जवळपास तेवढेच पाणी शेतीला उपलब्ध करुन दिले असते एवढया पाण्याचा साठा शासनाने केलेला आहे. यासंदर्भात श्वेतपत्रिकेत उल्लेख येईलच परंतु चितळे समितीने दिलेला अहवाल, कृषी खाते काढत असलेली आकडेवारी त्यांच्या पध्दतीने योग्य आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ जुन्नरे.. 07:20

श्री.सुनील तटकरे...

आमच्या विभागाची आकडेवारी देखील योग्य पद्धतीची आहे. म्हणूनच या संबंधी कृषी विभाग, पाणी पुरवठा विभाग, महसूल विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यामध्ये सुसूत्रता आणली जाईल. आर्थिक पाहणी अहवालामध्ये वेगवेगळी आकडेवारी येते. आर्थिक पाहणी अहवाल हे सरकारचे डॉक्युमेंट आहे. त्यामध्ये विसंगती असता कामा नये हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे बरोबर आहे. वेगवेगळ्या विभागामार्फत देण्यात येणारी माहिती ही सुसंगत असली पाहिजे. यासंबंधी जे प्रश्न असतील ते प्रश्न सोडविण्यासंबंधी नियोजन विभागाच्या मार्फत प्रयत्न केले पाहिजेत, अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना केली आहे. त्याचा देखील निश्चितपणाने विचार केला जाईल.

51 जल विद्युत प्रकल्पाद्वारे आपण 3578 मेगावॉट क्षमतेची वीज निर्मिती केली आहे. आशिया खंडामध्ये सर्वात प्रथम कोयना जलाशयामध्ये दोनदा लेक टॅपींग करण्यात आले. त्याद्वारे 1000 मेगावॉट वीज निर्मिती करण्याचा निर्णय झाला. युती सरकारच्या काळात पहिल्यांदा लेक टॅपींग झाले. दुसरा लेक टॅपींगचा अत्यंत चांगला प्रयोग अभियांत्रिकी ज्ञानाचा उपयोग करत करण्यात आला. जलसंपदा विभागामार्फत जणू काही सर्व वाईटच झालेले आहे असा आभास निर्माण केला जातो. त्यावेळी महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या गोष्टी देखील घडलेल्या आहेत. ती गोष्ट देखील राज्याच्या कानाकोपऱ्यात जाणे आवश्यक आहे. कोयना लेक टॅपींगच्या माध्यमातून आम्ही हे दाखविले की, ज्या उन्हाळ्यामध्ये विजेची मागणी जास्त असते त्यावेळीच आम्ही वीज निर्मिती सुरू केली. सांगली, सातारामध्ये दुष्काळी परिस्थिती असताना सुद्धा कोयना लेक टॅपींगच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचा सुद्धा आवर्जून उल्लेख मी या चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

घाटघर प्रकल्प 250 मेगावॉट स्थापित क्षमतेचा आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी रोलर,कॉम्पॅक्टर कॉंक्रीटचा भारतात प्रथमच वापर झाला. घाटघर प्रकल्प ठाणे जिल्ह्यात आहे. त्यातून आज आपण वीज निर्मिती करीत आहोत. देशामधील एक नवीन प्रयोग येथे करण्यात आला. त्यातून आपण चांगल्या प्रकारची वीज निर्मिती करीत आहोत. कोलग्राऊंड बांधकामाचे तंत्रज्ञान विकसित केले असून जवळपास 34 प्रकल्पांमध्ये त्याचा वापर केला आहे. त्यातून देखील चांगले काम निश्चितपणाने निर्माण झाले आहे. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. मी माननीय मंत्री श्री.अजित पवार यांचे स्वागत एवढ्यासाठी करू इच्छितो की, त्यांनी गेल्या दहा वर्षामध्ये काही धाडसी निर्णय घेतले. मराठवाड्यामध्ये सुद्धा कोल्हापूर टाईपचे बंधारे होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त लोकशाही आघाडीचे सरकार काम करीत होते. त्यावेळी कोल्हापूर टाईप बंधाऱ्याचे रूपांतर बॅरेजमध्ये करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला म्हणून मांजरा, गोदावरीच्या खोऱ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे बॅरेज निर्माण झाले आहेत. दुष्काळी भागामध्ये ऊस लावला जात नव्हता. लातूर, सोलापूर, नगर आणि पुणे जिल्ह्याच्या परिसरामध्ये साखर कारखान्यांची संख्या वाढली आहे. गेल्या दहा वर्षामध्ये मराठवाड्यातील मागासलेल्या भागांमध्ये सिंचनाचा प्रयोग गेल्या योग्य पद्धतीने राबविल्यामुळेच येथील ऊसाच्या क्षेत्रात देखील वाढ झाल्याचे दिसून येत आहे. याचा अर्थ 100 टक्के काम झाले हे मी दांभिकपणाने म्हणणार नाही. चांगले काम करीत असताना नियोजन केले होते. तरी देखील नियोजनात चुका ह्या झालेल्या आहेत याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

ऊसाच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली. कृषी मालाच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाली आहे.. या वाढीचे महत्त्वाचे कारण पाण्याचा साठा हे आहे. पाण्याचा साठा सांभाळण्यासाठी देखील आपण प्रयोग केला. सभापती महोदय, आपण देखील मराठवाडा विभागातून आलेला आहात. मी जलसंपदा खात्याचा मंत्री या नात्याने सर्वेक्षण केले. आजही मराठवाड्यामध्ये आपल्याला नवीन प्रकल्प हातामध्ये घ्यायचा असेल तर पाण्याच्या उपलब्धतेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असते. त्या शिवाय नवीन प्रकल्प हातामध्ये घेता येत नाहीत. आज मराठवाड्याच्या वाट्याला आम्ही हक्काचे 19 टीएमसी पाणी उपलब्ध करून दिलेले आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या आदेशाला अधीन राहूनच आम्ही हे सर्व वाटप करीत आहोत. मराठवाडा विकास महामंडळ, गोदावरी सिंचन महामंडळ, कृष्णा खोरे महामंडळ, उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळ, विदर्भ विकास महामंडळ या सर्वांना मदत करण्याची भूमिका या पुढच्या कालखंडामध्ये घेतली जाईल. महाराष्ट्र हे सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर असलेले राज्य आहे. ते आणखी पुढे नेण्यासंबंधी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

..3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आपण स्थापन केले. त्याद्वारे 4.72 लक्ष हेक्टर क्षेत्रावर 1375 पाणी वाटप संस्था निर्माण केल्या. या माध्यमातून सिंचनाचे लाभ क्षेत्र आणि प्रत्यक्षात सिंचित होणारे क्षेत्र याच्यामधील तफावत कमी करण्याच्या दृष्टिकोनातून काही जाणीवपूर्वक प्रयत्न देखील निश्चितपणाने झाले.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब यांनी एका बाबीवर बोलत असतांना राज्यात एकूण जल विद्युत प्रकल्प किती आहेत असा प्रश्न उपस्थित केला? त्यांना मी सांगू इच्छितो की, राज्यामध्ये एकूण 34 विद्युतगृह असून त्यामधील 26 विद्युतगृह महाजनको कडे वीज निर्मितीसाठी हस्तांतरित करण्यात आले आहेत. या विद्युतगृहाच्या भाडयांमधून दर वर्षी आपल्याला 320 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. गेल्या वर्षी आपल्याला 328.45 कोटी रुपयांचा महसूल मिळाला. या 26 वीजगृहापैकी जलसंपदा खात्यामार्फत 7 विद्युत गृहांच्या स्थापत्य कामांचे परिशीलन व दुरुस्तीचे काम सुध्दा सुरु आहे. त्याचप्रमाणे खाजगीकरणामधून काही जल विद्युत प्रकल्प सुरु केले आहेत काय असा आपण मघाशी प्रश्न विचारला त्या बाबत शासनाने असा निर्णय घेतला की, 25 मेगावॅटच्या आतील प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या माध्यमातून आपण या कामांना परवानगी दिली आहे. त्यामध्ये दहा प्रकल्प प्रगतिपथावर असून 66 प्रकल्पांना परवानगी दिली आहे. त्या प्रकल्पांच्या माध्यमातून 162 मेगावॅट इतकी स्थापित क्षमता निर्माण होण्याची शक्यता आहे. आज भविष्यकालीन 102 प्रकल्प आहेत.

राज्यामध्ये विभागनिहाय कोणकोणते प्रकल्प आहेत असा आपण मघाशी प्रश्न विचारल. 1978 सालापासून सुरु झालेल्या प्रकल्पांमध्ये कोयना प्रकल्प असेल, भीरा प्रकल्प असेल, भातसा प्रकल्प असेल, सूर्या प्रकल्प असेल, तिल्हारी प्रकल्प असेल, राधानगरी प्रकल्प असेल, कोयना धरण विद्युत गृह असेल, भाटघर प्रकल्प असेल, वीर प्रकल्प असेल, पवना प्रकल्प असेल ही संपूर्ण प्रकल्पांची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. खाजगीकरणाच्या माध्यमातून हे प्रकल्प कोण करीत आहे, कोणत्या कंपन्यामार्फत हे काम केले जात आहे असे आपण विचारले. कोकण विभागामध्ये कृष्णा व्हॅली पॉवर कंपनीमार्फत वीज निर्मिती करण्यासाठी त्यांना सन 2003 मध्ये इरादा पत्र देण्यात आले. सह्याद्री रिनोबसला सन 2003 मध्ये इरादा पत्र दिले असून त्यांचे काम शहापूर येथे सुरु आहे. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी संस्थेला सन 2005 मध्ये पाटगाव जल विद्युत प्रकल्पांतर्गत भुदरगड येथे परवानगी देण्यात आली. स्नेहल हायड्रो पॉवर लिमिटेड या कंपनीला साताऱ्याला, कऱ्हाडच्या परिसरात परवानगी देण्यात आली. त्याचबरोबर महती इलेक्ट्रिकल्स, न्यू एशियन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला 2009 मध्ये परवानगी देण्यात आली. पुण्याच्या परिसरामध्ये समूह सिस्टीम,गौतमी गोदावरी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

कंपनीला 2008 मध्ये परवानगी देण्यात आली. पेंच गावामध्ये एसएमएस विद्युत कंपनीला 2007 मध्ये परवानगी देण्यात आली. पूर्णा जल विद्युत प्रकल्प, चांदूरबाजार, जिल्हा अमरावती यांना आणि मेसर्स खरे अँड तारकुंडे प्रायव्हेट लिमिटेड यांना 24.3.2009 मध्ये परवानगी देण्यात आली. बालाजी पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांना कुंडलिका जल विद्युत प्रकल्पासाठी सन 2006 मध्ये परवानगी देण्यात आली. प्रत्यक्षात त्या ठिकाणी विजेची निर्मिती देखील सुरु आहे. एकन्हा प्रकल्पांतर्गत, नरदळे प्रकल्पांर्गत, आरती इन्फ्रास्ट्रक्चर नागपूर येथे तसेच एस.बी. आणि व्ही.बी. सामंत कंपनीला सिंधुदुर्गमध्ये, डार्सन हायड्रो कंपनीला, उर्ध्व वैतरणा जल विद्युत प्रकल्प,ईगतपुरी नाशिक या ठिकाणी परवानगी देण्यात आली आहे. अशा वेगवेगळया विभागाच्या कंपन्यांना सन 2004, 2005 मध्ये रितसर करारनाम्याव्दारे परवानगी दिली आहे. या विविध प्रकल्पांमधून नेमकी किती विद्युत निर्मिती होत आहे याची सभागृहाला माहिती होण्याकरिता ही सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर निश्चितपणे ठेवतो. त्यामुळे राज्याच्या जल विद्युत निर्मितीमध्ये कोणती व किती मदत झाली याची माहिती मिळेल. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी प्रकल्पांबाबत भूमिका मांडली. माझ्या जिल्ह्यातील माझे परम मित्र माननीय श्री. जयंत प्र. पाटील यांनी देखील काही मुद्दयांबाबत आपली भूमिका मांडली. दोघेही सभागृहात उपस्थित नसले तरी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना माहिती देणे गरजेचे आहे. त्यांच्या अनुपस्थितीबाबत मला काहीही म्हणावयाचे नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मशन आहे. माननीय सदस्य आपल्याला सांगून सभागृहाबाहेर केले आहेत काय?

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे)** : माननीय विरोधी पक्षनेते हे एका दु:खद घटनेच्या संदर्भात बाहेर गेले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री. बाळासाहेब आपटे यांचे निधन झाल्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते त्या ठिकाणी गेले आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या अनुपस्थितीबाबत मी मुद्दा मांडलेला नाही तर त्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत मला खुलासा करावयाचा आहे. आज सकाळी लक्षवेधी सूचनेच्या वेळी जिगाव प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात आली. त्यावेळी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी काही मुद्दे उपस्थित केले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

जीगाव प्रकल्पामध्ये एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे मी मान्य केले आहे असे सांगण्यात आले. मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना विचारु इच्छितो की, सभागृहाच्या इतिवृत्तावर कशा पध्दतीने चुकीची गोष्ट आणली जाते? आवाज मोठा केला म्हणजे आपण खरे बोलत आहोत असे सांगून कधीही आपला खरेपणा लोकांसमोर ठेवता येत नाही हे मला सुध्दा यानिमित्ताने नम्रपणे सांगावयाचे आहे. 1 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असे मी कबूल केले आहे असे त्यांनी सांगितले. म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना विनंती करतो. त्या प्रकल्पावर खर्च झालेली रक्कमच 863 कोटी रुपये इतकी आहे. मी सांगितले की, जरुर अनियमितता झाली आहे.वडनेरे समितीचा अहवाल आला आहे आणि कार्यकारी अभियंत्यांना निलंबित करण्याची घोषणा आजच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून केली याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, याबाबतीत वाढीव दर देण्यात आले, त्यांना कमी दराने पेमेंट अदा केले जाईल. जेणेकरुन सरकारचे नुकसान होणार नाही आणि कामही त्याच दर्जाचे होईल. कारण जीगावचा प्रकल्प विदर्भ, बुलढाणा या भागांच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वपूर्ण आहे. अडीच लाख हेक्टर सिंचनाची क्षमता निर्माण करणारा असा हा प्रकल्प जर आम्ही मर्यादित कालावधीमध्ये पूर्ण करु शकलो तर बुलढाणा, वाशिमच्या सर्व परिसरामध्ये आज जी स्थिती निर्माण झालेली आहे अशा वेळी तेथील शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून हा महत्वपूर्ण प्रकल्प आपल्याला निश्चितपणे उपयोगात आणता येऊ शकेल. म्हणून मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले ते चुकीचे होते. मी सकाळी जे उत्तर दिले त्यामध्ये अशा प्रकारची कोणतीही कबूली देण्यात आलेली नाही. मघाशी मी उभे राहून त्याबाबत उत्तर देण्याचा प्रयन केला. परंतु मी आता उत्तराच्या सविस्तर भाषणामध्ये त्याबाबत सांगू इच्छितो.

सभापती महोदय, याठिकाणी त्यांनी दुसरा महत्वाचा मुद्दा मांडला आणि तो म्हणजे तिल्लारी विद्युत जल प्रकल्पाच्या कामाची रक्कम फार मोठ्या प्रमाणात वाढली. त्यांनी पूर्वी अशा प्रकारची तक्रारही केली होती. एकदा मी त्याबाबतीत त्यांची मुलाखत सुध्दा कुठेतरी वाचली. तिल्लारी जलविद्युत प्रकल्प हा दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील पश्चिमेकडे वाहणाऱ्या तिलारी नदीमध्ये करण्यात आला. या जल विद्युत प्रकल्पाची निर्मिती 1987 मध्ये झाली. मला त्यांना हे सांगावयाचे होते की, गेल्या दोन-चार वर्षात जे काही झालेले आहे ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

1987 मध्ये झालेले आहे. 1972 मध्ये मूळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आणि त्यावेळी या कामाची रक्कम 9.12 कोटी इतकी होती. त्यानंतर 1976 मध्ये प्रथमच 20 कोटी 74 लाख रुपये किंमतीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली. 1981 मध्ये व्दितीय प्रशासकीय मान्यता मिळाली. सन्माननीय सदस्यांनी माजी माननीय मुख्यमंत्री श्री.ए.आर.अंतुले साहेबांचा उल्लेख केला आणि तसा उल्लेख कोणत्या अर्थाने केला हे मला माहिती नाही, कारण तो भाग अर्धवटच राहिला. त्या वेळी माननीय श्री.ए.आर.अंतुलेसाहेब माननीय मुख्यमंत्री असताना कदाचित 43 कोटी 36 लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली. 1972-73 मध्ये या प्रकल्पाचे काम सुरु झाले आणि 1986 मध्ये हे काम पूर्ण झाले. या प्रकल्पावर झालेला खर्च 73 कोटी 38 लाख रुपयांचा आहे.त्यामध्ये कोणत्याही पध्दतीची आगाऊ रक्कम देण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी 700 कोटी रुपयांचा आकडा कुठून काढला हे मला माहिती नाही. कदाचित त्यांना ब्रिफींग करणाऱ्यांनी एखादे शुन्य वाढवून दिले असेल आणि त्यामुळे त्यांना काहीतरी वाटले असेल मला त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही.

सभापती महोदय, तिल्लारी जल विद्युत प्रकल्प टप्पा-2 ज्याला पूर्वीच्या कालखंडामध्ये मान्यता मिळाली आणि मंत्रिमंडळाने 2009 मध्ये 295 कोटी रुपयांच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून एकंदरीत त्या प्रकल्पावर आतापर्यंत 222 कोटी रुपये खर्च झाला आहे. पण त्या दिवशी जणूकाही आज मंत्री 100 कोटी रुपयांचा चेक लिहीणारच आहेत असा आभास चार-आठ दिवसापूर्वी निर्माण करण्यात आला. आता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कोण असते हे सर्वांना माहिती आहे कारण आपण आमदार म्हणून वेगवेगळया भागामध्ये काम करीत असतो.दोन-अडीच-तीन वर्षापूर्वी सरकारने निर्णय घेतला की,कोणत्याही कामाला मोबलायझेशन ॲडव्हान्स द्यावयाचा नाही. त्यामुळे गेल्या दोन-अडीच वर्षामध्ये कोणत्याही ठेकेदाराला एक फुटकी कवडी सुध्दा ॲडव्हान्स म्हणून दिलेली नाही हे सुध्दा आज सभागृहाच्या रेकॉर्डवर जनतेच्या माहितीसाठी मी नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो.या प्रकल्पाच्या बाबतीत सुध्दा काहीतरी अवास्तव खर्च झालेला आहे असे भासविण्याचा एक प्रयत्न करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय,संबंधितांनी पिंजाळ प्रकल्पाच्या बाबतीत माहिती दिली. या प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षणाचे काम 1981 मध्ये झाले. त्यावेळी 23 हजार 600 हेक्टर सिंचनाचे लाभक्षेत्र होणार होते. आता जी रक्कम भरली. त्याबाबत मी सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना सांगू

श्री.सुनील तटकरे . . . .

इच्छितो की, एन.पी.व्ही.ची रक्कम भरली हे आपल्यालाही सगळयांना माहिती आहे. पण याठिकाणी ही रक्कम जणूकाही ठेकेदारालाच दिली अशा प्रकारचा आभास निर्माण करण्याचा दहा दिवसापूर्वी प्रयत्न करण्यात आला. वन विभागाकडे मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन, माननीय राज्यपाल महोदयांची मान्यता घेऊन रक्कम भरली.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

पिंजाळ प्रकल्पाच्या बाबतीत अद्याप कोणतीही निविदा निश्चित झालेली नाही. एमएमआरडीएच्या अंतर्गत हा पिंजाळ प्रकल्प कार्यान्वित करावयाचा आहे.

सभापती महोदय, मुंब्री प्रकल्प 1982 मध्ये प्रस्तावित करण्यात आला. त्यामध्ये सुध्दा वनजमीन आहे. केंद्र शासनाच्या वन आणि पर्यावरण विभागाने 2.3.2009 रोजी तत्वत: मान्यता दिलेली आहे आणि वन जमिनीची नेट प्रोजेक्ट व्हॅल्यू यासाठी 44.88 कोटी रुपयांची आवश्यकता होती. त्या एनपीव्हीच्या बाबतीत 4.7.2012 ला ही एनपीव्हीची रक्कम धनादेशाव्दारे भरण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आणि ही बाब निर्देशाच्या बाहेर ठेवण्यासाठी माननीय राज्यपाल महोदयांनी सुध्दा मान्यता दिलेली आहे. वन विभागाकडे जे पैसे भरले गेले त्या बाबतीत असाही आभास निर्माण करण्याचा प्रयत्न झाला की, हे पैसे कोठे तरी ठेकेदारांना दिलेले आहेत. पण ते पूर्णपणे चुकीचे आणि निराधार आहे हे मी आपल्या मार्फत सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तिसरा मुद्दा नरडवे प्रकल्पाच्या बाबतीत सांगितला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हा प्रकल्प सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांच्या कणकवली तालुक्यातील आहे. हा प्रकल्प केव्हा सुरु झाला हे त्यांनाही माहीत आहे. या प्रकल्पाला 1989 साली 32 कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर 1997 साली 1993-1994 च्या दरसूचीनुसार 102 कोटी रुपयांची प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर 22.4.1999 ला 1997-1998 च्या दरसूचीनुसार 189.190 कोटी रुपयांची व्दितीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली आणि त्यानंतर 2007 मध्ये 2005-2006 च्या दरसूचीप्रमाणे एकंदरीत 446.70 कोटी रुपयांची तृतीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली. हे काम टर्न की पध्दतीने 1999-2000 च्या करारनाम्यानुसार मे. आर.ए.नायक अँड सन्स यांच्यामार्फत सन 2001 पासून प्रगतिपथावर आहे. यामध्ये प्रामुख्याने मुख्य धरण, सांडवा, सिंचन तथा विद्युत विमोचक, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे इत्यादी कामांचा समावेश आहे. मुख्य धरणाचे काम 60 टक्के पूर्ण झालेले आहे. 14 कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे 72 टक्के काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत या प्रकल्पावर एकंदर 321 कोटी रुपये खर्च झालेला आहे. यामध्ये कोणतीही रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्यात आलेली नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

सभापती महोदय, या ठिकाणी कोरले सातर्डी प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. या प्रकल्पाला 121 कोटी रुपयांची मान्यता पूर्वीच्या कालखंडामध्ये देण्यात आली. त्यामध्ये धरणाचे काम पूर्ण झालेले आहे. ते काम पूर्ण केले जात असतानाच आता या प्रकल्पाची किंमत 721 कोटी रुपयांपर्यंत गेलेली आहे असे या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न झाला. या प्रकल्पाला 1998 साली 54 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली. या प्रकल्पाला 2000-2001 मध्ये प्रथम सुधारित मान्यता 94 कोटी रुपयांची मिळाली. व्दितीय सुधारित मान्यता 121 कोटी रुपयांची मिळाली. या प्रकल्पावर भूसंपादनासह एकंदरीत खर्च 95.54 कोटी रुपये झालेला आहे. आता या प्रकल्पाच्या बाबतीत जो नवीन प्रस्ताव येत आहे तो 321 कोटी रुपयांचा आहे. तो प्रस्ताव येत असताना सीडी वर्कचे डिझायनिंग आणि इतर काही बाबतीमध्ये इतरही काही गोष्टी तपासून निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, काही धोरणात्मक निर्णय घेण्याची आणि नियोजन करण्याची आवश्यकता आहे. राज्यात सुरु असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जवळपास 75 हजार कोटी रुपये लागणार आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर या संदर्भात चर्चा झाली. ज्यावेळी आम्ही आमच्या विभागाचे सादरीकरण मंत्रिमंडळासमोर केले त्यावेळी एकत्रितपणे माहिती देऊन काही भविष्यकालीन नियोजन करण्याची आवश्यकता आहे. 75 टक्के ते 100 टक्के पूर्ण झालेले प्रकल्प आपण पूर्ण करु शकतो का, 50 ते 75 टक्के पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत काय होऊ शकते, शून्य ते 50 टक्के पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत आपल्याला नेमकी काय भूमिका घ्यावी लागेल या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांच्या आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने, मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चितपणे प्राधान्यक्रम ठरविण्याची आवश्यकता आहे. नियोजनातील काही गोष्टींमुळे आणि आपापल्या परिसरामध्ये नव्याने निवडून आलेले विधानसभा सदस्य असतील, विधान परिषद सदस्य असतील, संसद सदस्य असतील किंवा गरजेनुसार ज्या ज्या वेळी मागणी होते त्या त्या वेळेला काही प्रकल्प आपल्याला मंजूर करावे लागतात. त्यातून काही व्यस्त प्रमाण निर्माण झाले. कारण निधीची उपलब्धता आणि प्रकल्पाची किंमत यामध्ये तफावत आहे. प्रकल्प रेंगाळण्याची

...3...

RDB

श्री. सुनील तटकरे ...

सुध्दा काही कारणे आहेत. प्रशासकीय मान्यता 30-40 वर्षापूर्वी दिली गेली आणि आज प्रत्यक्षात प्रकल्प सुरु करीत असताना आताच्या दरसूचीप्रमाणे जर आपण प्रकल्प सुरु करावयास गेलो तर त्या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली पहावयास मिळते. भूसंपादनाच्या किंमतीमध्ये वाढ झाली.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी गोसिखूर्द प्रकल्पाचा उल्लेख केला होता. हा विषय या बाबीमध्ये समाविष्ट नाही. परंतु या प्रकल्पाचा उल्लेख केला असल्यामुळे मी सविस्तरपणे उत्तर देऊ शकणार नाही पण त्याबाबत निश्चितपणे उत्तर देईन. त्या प्रकल्पातील 3 गावाचे पुनर्वसन करावयाचे आहे. त्यांना शासनाने एकदा पॅकेज दिले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी गोसिखूर्द प्रकल्पग्रस्तांचे केवळ पुनर्वसन करण्यासाठी पॅकेज देण्याचा प्रयत्न केला होता. या वर्षात मंजूर झालेला निधी हा केवळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठीच खर्च करण्याचे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी ठरविले असल्यामुळे त्यादृष्टीने नियोजन केले जात आहे. जेणे करुन राहिलेली कामे पूर्ण करता येतील. एवढ्या मोठ्या प्रकल्पामुळे जो काही जलाशयाचा साठा निर्माण झालेला आहे त्याचे पाणी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्याचे नियोजन केले जाणार आहे. यापूर्वी काही अधिकाऱ्यांकडून चुका झाल्या असतील, काम करीत असताना वाढीव दर दिले गेले असतील त्याची चौकशी वडनेरे समितीमार्फत किंवा मेंढेगिरी समितीमार्फत केलेली आहे. त्या समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई केली जाईल.

पुढील कालावधीमध्ये मंत्रिमंडळासमोर श्वेतपत्रिका सादर केल्यानंतर जलसंपदा विभागाचा प्रमुख या नात्याने काही निर्णय घेण्याचे मी ठरविलेले आहे. प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ होत असताना आम्ही काही सूचना दिलेल्या आहेत. अलीकडच्या काळात काही महत्वपूर्ण सूचना दिलेल्या आहेत. प्रकल्पाच्या खर्चात बचत करीत असताना नवीन गोष्टीचा अंतर्भाव करावयाचा झ ाला तर सी.डी.ओ.कडून डिझाईन मान्य केल्याशिवाय प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करता येणार नाही. सविस्तर सर्वेक्षण, अन्वेषण व संकल्पना केल्यानंतरच प्रशासकीय मान्यतेसाठी मूळ प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीमार्फत छाननी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक ती जमीन ताब्यात आल्याशिवाय निविदा प्रक्रिया सुरु न करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करीत आहोत. हा निर्णय कदाचित कटू वाटण्याची शक्यता आहे. पण मूळ धरणाच्या लाभक्षेत्रासाठी जमीन मिळू शकते. प्रकल्पाच्या कामाला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरुवात करावी. प्रकल्पासाठी लागणारी जमीन भूसंपादन कायद्यानुसार संपादित करता येईल. असा त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींचा आग्रह असतो. त्या दृष्टीकोनातून शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.

ई-निविदा प्रणालीमार्फत निविदा भरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारांना मोबिलायझेशन ॲडव्हान्स व मशिनरी ॲडव्हान्स देण्याची तरतूद करु नये अशी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. अन्य काही सुधारणा व सुरु असलेल्या कामांचे नियोजन करीत असताना राज्यपालांनी दिलेल्या निधीचा योग्य विनियोग करण्याचे काम निश्चितपणे केले जाईल. माननीय मुख्यमंत्री हे केंद्र सरकारमध्ये होते. त्यावेळी त्यांनी आणि आता माननीय श्री.शरद पवार साहेब, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब, माननीय श्री.विलासराव देशमुख साहेब, माननीय श्री.प्रफुल्ल पटेल साहेब त्यांच्यामार्फत राज्याने अधिक निधी मिळविला आहे. देशात महाराष्ट्र असे एकमेव राज्य आहे की, ज्या राज्याने केंद्राकडून या कामासाठी अधिक निधी मिळवलेला आहे. त्याचाही फायदा विदर्भातील प्रकल्पांना झाला आहे, मराठवाड्यातील काही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी झाला आहे. गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांना झाला आहे. आज काही वेळा असा प्रश्न चर्चेला येतो. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सगळीकडे सुबत्ता नाही. काही तालुके कायम दुष्काळी आहेत. मराठवाड्यामध्ये अवर्षणप्रवण तालुके आहेत. कोकणामध्ये काही तालुक्यात पावसाच्या पाण्याची चिंता नाही. काही ठिकाणी पिकांच्या उत्पादनामध्ये भौगोलिक परिस्थितीनुसार फरक आहे. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करीत पडलेल्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग करीत अधिक प्रभावीपणे काम कसे करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे.

आपल्याकडे पूर्व वाहिनी व पश्चिम वाहिनी नद्या आहेत. पूर्व वाहिनी नद्यांचे पाणी तामीळनाडूपर्यंत जाते. कृष्णा लवादामार्फत दिलेले पाणी कर्नाटक, आंध्र प्रदेश किंवा चेन्नई सारख्या शहरापर्यंत जाते. पण पश्चिम वाहिनी नद्यांच्या परिसरातील मतदार संघातून मी, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, अनिल तटकरे, सुभाष चव्हाण, दिवाकर रावते निवडून येतात. आपल्या कडे पडलेल्या पावसाचे पाणी प्रचंड वेगाने अरबी समुद्रामध्ये जाऊन मिळते. त्याचा उपयोग होऊ शकतो काय, नद्या जोड प्रकल्पातून तापी खोऱ्यात, गोदावरी खोऱ्यात पाणी सोडता येईल यासाठी नियोजन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनीत तटकरे...

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोयना प्रकल्पातील 67 टीएमसी पाणी वाया जाते असे म्हटले होते. त्या दृष्टीकोनातून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केलेली आहे. यासाठी युओवाय प्रसिध्द केलेला आहे. त्यासंबंधी शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल. जलसंपदा विभागामध्ये सारे काही चुकीचे कामकाज सुरु आहे असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, ज्या प्रकल्पांचा दाखला देण्यात आला त्या प्रकल्पांची सविस्तर माहिती मी दिलेली आहे.

जल विद्युत प्रकल्पाद्वारे अधिक जल विद्युत निर्माण केली जाईल. माझ्या विभागाच्या बाब क्र.81 ते 85 अशा एकूण 16 कोटी 6 लक्ष 36 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने एकमताने मंजुरी द्यावी अशी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि येथेच थांबतो.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 07:45

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 104 ते 110 अशा 37 कोटी 88 लाख 81 हजार रुपयाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.परशुराम उपरकर, केशवराव मानकर, मोहन जोशी आणि अन्य काही सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन अनेक उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी कोकणातील मच्छीमार बांधवांच्या बोटींसाठी रॉकेल उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली. त्यांना अवश्य रॉकेल उपलब्ध करुन देता येईल परंतु ते सबसिडीचे न देता व्हॉईट रॉकेल उपलब्ध करुन देता येईल. कारण सबसिडीचे रॉकेल हे फक्त स्वयंपाक आणि दिवाबत्तीसाठी दिले जाते. तेव्हा मच्छीमार बांधवांनी तशा प्रकारचा अर्ज जिल्हा पुरवठा अधिका-यांकडे दिला तर त्यांना व्हाईट रॉकेल उपलब्ध करुन देता येईल.

सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी गोडाऊनच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले. मी सांगू इच्छितो की, सद्य:स्थितीत राज्यामध्ये 1031 गोडाऊन आहेत. त्याची 5 लाख 66 हजार मे.टन इतकी साठवण क्षमता आहे. आपण मागील 25-30 वर्षामध्ये 5 लाख 66 हजार मे.टनाची केवळ 1031 गोदामेच बांधू शकलो. आपल्या देशाचे कृषीमंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांनी शेतीक्षेत्राच्या बाबतीत जी काही पावले उचलली त्यामुळे सबंध देशामध्ये अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होत आहे. परिणामी अनेक राज्यामध्ये धान्य साठवून ठेवण्याची अडचण निर्माण झालेली आहे. अन्नधान्य साठविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गोदामे बांधायला पाहिजे होती ती आपण बांधू शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. आता एका वर्षामध्ये नाबार्डच्या माध्यमातून 500 कोटी रुपये घेऊन महाराष्ट्रामध्ये 5.65 लाख मे.टन क्षमतेची 584 गोदामे बांधण्याचे काम हाती घेतलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी 18 गोदामांचा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, ही 18 गोदामे सन 2012-2013मध्ये घेण्यात आलेली आहेत. ज्या ज्या तालुक्यामध्ये शासकीय जमीन उपलब्ध आहे त्या त्या ठिकाणी गोदामे बांधण्याचे काम आम्ही हाती घेतलेले आहे. आतापर्यन्त नाबार्डकडून 500 कोटी रुपयापैकी 100 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. गोदामे बांधण्याचे काम जलद गतीने चालू आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी मूल येथील गोदामाबाबत प्रश्न उपस्थित केला. तेथील गोदाम हे राज्य वखार महामंडळाचे आहे. चंद्रपूरमध्ये 23 ठिकाणी 15400 मे.टन क्षमतेची गोदामे बांधण्याचे काम हाती घेतलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचे निश्चितच पालन केले जाईल. तेव्हा अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 104 ते 110 वरील 37 कोटी 88 लाख 81 हजार रुपयाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये 11 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. या चर्चेमध्ये काही सन्माननीय सदस्यांनी उपयुक्त सूचना केल्या तसेच काही सन्माननीय सदस्यांनी आरोप देखील केले.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग हा स्वतंत्र विभाग स्थापन झाल्यानंतर सुखथनकर समितीच्या शिफारशीनुसार आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात या विभागास 1993 पासून पैसे देण्यास सुरुवात झाली. या वर्षी म्हणजे 2012-2013 या वर्षामध्ये आदिवासी विभागासाठी 2005 कोटीचे बजेट मिळालेले आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..

या बजेटची विभागणी कशी होते हे आपण समजून घेतले तर पुढील गोष्टी समजून घेणे सोपे जाईल. आपण 60 टक्के नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी देतो. या वर्षीच्या बजेटमध्ये 2 हजार 296 कोटी 20 लाख रुपये इतका नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी दिला आहे. आदिवासी उपयोजनेमध्ये हा सर्व खर्च होत असतो. शिल्लक राहिलेल्या 40 टक्के नियतव्यय जवळपास 13-14 खात्यांना देतो. त्यानंतर शिक्षणासाठी खर्च करतो. या वर्षी आपण शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर दिलेला आहे. राज्यामध्ये 552 शासकीय आश्रमशाळा तर 556 अनुदानित आश्रमशाळा आहेत. 444 कोटी रुपये आश्रमशाळांच्या बांधकामासाठी दिले असून तीन वर्षाचा कार्यक्रम घेतलेला आहे. आपण अनुदानित आश्रमशाळेंवर तास आणलेले आहेत त्या आश्रमशाळांची माहिती घेतलेली आहे. आश्रमशाळांमध्ये ज्या त्रुटी आढळून आल्या त्या दूर करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विचारले की, आमच्या विभागातील आश्रमशाळांबाबत काय निर्णय घेणार आहात ? मी त्या बाबत सांगू इच्छितो की, त्या शाळांना तीन वेळा संधी दिलेली आहे. आपण गेल्या वर्षी सर्वेक्षण केले त्यावेळी काही त्रुटी आढळून आल्या. तेव्हा त्या संस्थेची परवानगी रद्द केली. त्यांची परवानगी रद्द केल्यानंतर त्यांना अपील करण्याचा अधिकार होता. आश्रमशाळेची मान्यता रद्द करणे हा आमचा उद्देश नाही तर आश्रमशाळेमध्ये सुधारणा व्हावी असा आमचा उद्देश आहे. ज्या आश्रमशाळांमध्ये सुधारणा दिसून आली त्यांना पुन्हा परवानगी दिलेली आहे. काही आश्रमशाळांना वारंवार सांगूनही त्यांच्यात सुधारणा झालेली नाही. आता आम्ही त्यांना शेवटची संधी देणार आहोत. त्यानंतरही सुधारणा झाली नाही तर मग त्या आश्रमशाळा स्थगित ठेवणार आहोत.

सभापती महोदय, शिष्यवृत्तीच्या संदर्भात देखील चांगले काम केलेले आहे. परंतु कोणतीही चांगली गोष्ट झालीच नाही अशा प्रकारची चर्चा करणे बरोबर नाही. आता शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. शासकीय आश्रमशाळा आणि अनुदानित आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये जवळपास साडेपाच लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर प्रथम या विभागाचा अभ्यास केला. लोकसंख्येच्या प्रमाणात साडेतेरा लाख विद्यार्थी शाळेत असायला पाहिजे परंतु आदिवासींची फक्त साडेआठ लाख मुले शिकत होती. तेव्हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..

आम्ही मागील दोन-अडीच वर्षात सातत्याने गावागावात फिरुन जी मुले शाळेत येत नव्हती त्यांना शाळेत आणण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे आम्ही शाळेतील गळतीचे प्रमाण खूप कमी केलेले आहे. आमच्या प्रयत्नामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या 18 लाखांवर आलेली आहे. या विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान सुरु केलेले आहे. पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हजार ते दीड हजार रुपये देण्यात येतात. ही रक्कम जास्त नाही. परंतु मुले शाळेत जायला लागल्यामुळे आईवडिलांना पैसे मिळू लागले. त्यामुळे आईवडील छोट्या छोट्या कामांसाठी मुलांना घरी ठेवून घेत होते तसे प्रकार आता बंद झालेले आहेत. त्यामुळे आदिवासी मुले मोठ्या प्रमाणावर शाळेत येऊ लागली ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे जवळपास 483 वसतिगृहे आहेत. आश्रमशाळा उभारण्यासाठी आपल्याला जमिनी मिळत नव्हत्या म्हणून आपण प्रकल्प अधिकाऱ्यांना रेडीरेकनरप्रमाणे जमिनी घेण्याचे अधिकार दिले. रेडीरेकनरपेक्षा जास्त किंमत असेल तर ते अधिकार ए.टी.सी.ना दिले व त्यापेक्षा आणखी जास्त किंमत असेल तर ते अधिकार आयुक्तांना दिले आणि जमिनीची किंमत दुप्पट असेल तर त्याबाबत सरकारने निर्णय घ्यावा असा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाचा चांगला फायदा झालेला आहे. या निर्णयामुळे आम्ही मोठ्या प्रमाणावर जमिनी घेऊ शकलो. आपणास जमिनी मिळाल्यामुळे आश्रमशाळांच्या बांधकामास मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. तशाच प्रकारे आपण वसतिगृहांबाबत देखील चांगला निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी चर्चा सुरु होती की, वसतिगृहामध्ये गुंड तयार होतात. ही मंत्रिमंडळात चर्चा झाली नव्हती. ही चर्चा बाहेर झाली. आश्रमशाळा इतक्या वाईट आहेत काय ? या आश्रमशाळांमध्ये काही शिकविले जात नाही काय ? मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या आश्रमशाळांमधून आतापर्यंत 5 मंत्री, 26 आमदार, 1 खासदार, 552 डॉक्टर्स, 1003 इंजिनिअर्स, 143 वकील, 143 केंद्र व राज्य सरकारमध्ये काम करणारे प्रशासकीय अधिकारी, आय.ए.एस. आणि आय.पी.एस. अधिकारी झालेले आहेत. माझ्याकडे ही सर्व यादी आहे. आपण अशाप्रकारे आदिवासी मुलांना मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. माझ्याकडे या विभागाचा कार्यभार आल्यानंतर मी त्यामध्ये खूप लक्ष घातले.

सभापती महोदय, शाळेत शिक्षक हजर नसतात ही गोष्ट सत्य आहे.

यानंतर श्री.गिते..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

सभापती महोदय, राज्यातील आश्रमशाळा जंगलामध्ये जास्त प्रमाणात आहेत. आश्रमशाळांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे की, या पुढे नवीन आश्रमशाळा सुरु करावयाच्या असतील किंवा बंद पडलेल्या आश्रमशाळा सुरु करावयाच्या असतील, त्या शहरात, तालुक्यात आणि जिल्हयांच्या ठिकाणीच सुरु करावयाच्या. या पुढे जंगलात आश्रमशाळा सुरु करावयाच्या नाहीत असा निर्णय शासनाने नुकताच घेतलेला आहे.

सभापती महोदय, मी अनेक आश्रमशाळांना भेटी दिल्या. शिक्षक शाळेत आल्यानंतर शाळा सुरु होत असते, शिक्षक गेल्यानंतर शाळा बंद होते. शिक्षक ज्या दिवशी शाळेत येत नाहीत, त्या दिवशी शाळेस सुटी असते. या परिस्थितीची तपासणी कोण करणार यासाठी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांसाठी बायोमेट्रीक पध्दत अंमलात आणली आहे. महाराष्ट्रातील आश्रमशाळांना बायोमेट्रीक पध्दत सुरु करणारा हा एकमेव विभाग आहे. आश्रमशाळांमधील शिक्षकांना तीन वेळा बायोमेट्रीक पध्दत अवलंबिण्याची सक्ती करण्यात आलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : माझ्याकडे आदिवासी विकास विभाग आल्यापासून मी आश्रमशाळांना भेटी देतो. आश्रमशाळा कधी सुरु होते आणि कधी बंद होते इत्यादी विषयी माननीय मंत्री महोदय माहिती देत आहेत. सन्माननीय डॉ.विजयकुमार गावीत या विभागाचे पूर्वी मंत्री होते, त्यांनी या विभागासाठी काहीच केले नाही असा साधारणत: त्याचा अर्थ निघू शकतो.

श्री.बबनराव पाचपुते : मी माननीय डॉ.विजयकुमार गावीत साहेबांना देखील काही ठिकाणी सोबत घेऊन गेलो आहे, त्यामुळे काही अडचण नाही. आश्रमशाळातील शिक्षकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रीक पध्दत सुरु करण्यात आली आहे.

सभापती महोदय, अनुदानित आश्रमशाळामध्ये 300 विद्यार्थी पटावर दाखविले जातात, परंतु प्रत्यक्षात त्या आश्रमशाळेत 70 विद्यार्थी उपस्थित असतात. या आश्रमशाळा संचालकांना मात्र 300 विद्यार्थ्यांचे अनुदान देण्यात आले आहे. आता आश्रमशाळांमध्ये बायोमेट्रीक पध्दत सुरु केली असल्यामुळे विद्यार्थी उपस्थितीचा प्रश्न निकाली निघाला आहे.

सभापती महोदय, आश्रमशाळांच्या निकालाच्या बाबतीत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला गेला. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, आदिवासी आश्रमशाळांमधील इयत्ता 12 वी चा निकाल या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

वर्षी 75 टक्के लागलेला आहे. इयत्ता 12 वी पर्यंत अनुदानित आश्रमशाळांचा निकाल 71 टक्के लागला आहे आणि एकलव्य आश्रमशाळांचा निकाल 100 टक्के लागलेला आहे. या आश्रमशाळांमधील 122 विद्यार्थी डिस्टीक्शनमध्ये आलेले आहेत. प्रथम श्रेणीत 48 आणि दुस-या श्रेणीत 100 विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. आश्रमशाळांमध्ये शिक्षण देण्याचे काम उत्तम प्रकारे चालले आहे ही गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो आहे.

सभापती महोदय, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी 122 वसतिगृहाच्या बांधकामांना सुरुवात केलेली आहे. आश्रमशाळांसाठी 211 वसतिगृहांची बांधकामे सुरु केली आहेत, या वसतिगृहांच्या बांधकामासाठी 30 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. वसतिगृहे आणि आश्रमशाळांसाठी भूसंपादनाचे काम केले आहे, त्या भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी तसेच वसतिगृहे दुरुस्ती यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी रस्त्याच्या बांधकामा संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले. आदिवासी विभागात तसेच आश्रमशाळांमध्ये जाण्यासाठी रस्ते नाहीत. या बाबतीत मी कोणाला दोष देणार नाही. हा विभाग माझ्याकडे आला त्यावेळी रस्त्यांच्या कामांना मोठ्या प्रमाणात परवानगी दिलेली होती तसेच काही रस्त्यांच्या कामांच्या वर्क ऑर्डर देखील दिल्या होत्या. आम्ही यामध्ये विभाग पाडले. रस्त्याच्या कामांसाठी 3200 कोटी रुपयांचे बजेट दिले तरी रस्त्यांची कामे पूर्ण होणार नाहीत. ज्या ठिकाणी रस्त्यांची 100 टक्के कामे झाली आहेत, त्यांना त्या कामांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. नव्वद टक्के, ऐंशी टक्के अशा पध्दतीने निधीचे वाटप केले आहे. या वर्षापासून 50 टक्के नवीन रस्त्यांची कामे हाती घेण्याचे ठरविले आहे. 50 टक्के निधी नवीन रस्त्यांच्या कामांना देण्यास सुरुवात झाली. त्यामुळे नवीन रस्त्याच्या कामांना अडचण येणार नाही.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागात खरेदी संदर्भात खूप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे अशा प्रकारचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. माझ्याकडे खरेदी संदर्भातील तक्ता उपलब्ध आहे. आदिवासी विकास विभागामध्ये खरेदी झालेली आहे, आयुक्त, समाजकल्याण विभागात खरेदी झालेली आहे, महिला बालविकास विभागात खरेदी झालेली आहे.

3...

श्री.बबनराव पाचपुते...

महिला व बालकल्याण विभाग,नाशिक या ठिकाणी खरेदी झालेली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, खरेदी संदर्भात सर्वात कमी दर आदिवासी विकास विभागाचे आहेत. गहू प्रति क्विंटल 1800 रुपये दराने खरेदी केला आहे. धान्याची वाहतूक, कर आणि धान्य शाळेत पोच करण्याचा दर 1875 रुपये एवढा आहे. समाजकल्याण विभागाचा हा दर 2200 रुपये एवढा आहे. महिला व बालविकास विभागाचा यासंबंधीचा दर 2175 रुपये एवढा आहे. आदिवासी विकास विभागात तांदूळ खरेदी 2200 रुपयाने केली आहे. समाजकल्याण विभागाने 3000 रुपये दराने तांदूळ खरेदी केला आहे आणि महिला व बालविकास विभागाने 3100 रुपये प्रमाणे तांदूळ खरेदी केला आहे. मी ही माहिती एवढयासाठी सांगतो आहे की, आदिवासी विभागामध्ये सर्व काही चुकीचे चालले आहे अशा प्रकारची माहिती आपण सभागृहात देत आहात, त्यामुळे मला खरेदी संदर्भातील माहिती सभागृहात सांगावी लागते आहे.

सभापती महोदय, ज्या अनुदानित आश्रमशाळा आहेत, त्यांच्याकडे कोणी पाहिले नाही, त्या शाळांची दुरुस्तीची कामे आमच्या विभागाने केलेली आहेत. त्या ठिकाणी शिक्षणाची व्यवस्था चांगल्या प्रकारे केलेली आहे. पूर्वी आश्रमशाळांमध्ये 9 लाख एवढे विद्यार्थी येत होते, आता 18 लाख विद्यार्थी आश्रमशाळांच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. ही काही सुधारणा नाही काय असा सवाल मला विरोधी पक्षाच्या सदस्यांना करावयाचा आहे.

सभापती महोदय, ब्लॅकेट खरेदीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मी ब्लॅंकेट वाटप करण्याचा निर्णय घेतला. ही खरेदी का केली त्यासंबंधी मागच्या वेळी कारण सांगितले होते. माझ्याकडे पूर्वी वन विभाग होता. त्यावेळी मी धाडणी येथील खारीगाव येथे गेलो होतो. त्या ठिकाणी अंथरुणाचे वाटप केले जात होते, लोक आनंदाने ते साहित्य स्वीकारीत होते. मी वन विभागाने आपणास काय दिले आहे अशी विचारणा केली असता आम्हाला वन विभागाकडून लाकूड देण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले.

यानंतर श्री. कानडे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

घरात शेड असते. त्याभोवती शेकोटी करुन हे आदिवासी झोपलेले असतात. जास्त थंडी असते त्या खारेगावात आम्ही गेलो. तेथील ब्लँकेट सर्वांना दिलेली आहेत. प्रायोगिक तत्वावर ही योजना सुरु केलेली आहे. ब्लँकेट देण्याचा निर्णय झाला. टेंडर काढून ही ब्लँकेट द्यावयाची होती. चांगल्या कंपनीची देण्यास तयार आहोत. तुम्हांला असे करता येणार नाही असे सांगितले. रेडीरेकनरप्रमाणे दर द्यावे लागतील आणि तशा पध्दतीने खरेदी केलेली आहे. 78 ते 800 प्रमाणे खरेदी केलेली आहे. मीच खरेदी केलेली आहे. सामाजिक न्याय विभागाने 44 कोटींची खरेदी केलेली आहे. हीच ब्लँकेट खरेदी केलेली आहेत. या ब्लँकेटचे नमुने सगळया प्रकल्प अधिकाऱ्यांकडे पाठविले. अशा प्रकारची ब्लँकेट आली तरच खरेदी करा असे सांगितले. यासंदर्भात मी काल फोन देखील केला होता. ब्लँकेटची चौकशी करण्यासाठी काही लोकांना पाठविले आणि चौकशीचा रिपोर्ट सुध्दा माझ याकडे आलेला आहे. त्यांनी सांगितले की तुम्ही आर.सी.ची ब्लँकेट खरेदी करण्यास सांगितले तीच आमची मंजूर झालेली आहेत. असा रिपोर्ट आहे. काही करायचे नाही आणि करायचे म्हटले तर दृष्टिकोन चुकीचा ठेवायचा असे जर करीत राहिले तर अडचण होण्याची शक्यता आहे हे मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

वनहक्क कायद्याच्या संदर्भात याठिकाणी उल्लेख करण्यात आला. वनहक्क कायद्याच्या संदर्भात खूप मोठे काम आम्ही केलेले आहे. आपण खूप मागे होतो. साडेतीन लाख लोकांनी मागणी केली असून 98 टक्के काम आपण पूर्ण केलेले आहे. 6 लाख 59 हजार एक जमिनीचे वाटप केलेले आहे. 7/12 चे उतारे द्यावयाचे राहिलेले आहेत. त्याची कारणे आहेत. अनेक लोकांनी परत परत मागणी केलेली आहे. लोकांचे अर्ज स्वत:हून शासनाने मागवून घेतलेले आहेत.

अपील करु नका. सेतूमध्ये अर्ज देतो असे सांगितले. माननीय मुख्यमंत्र्यांकडे याबाबतीत दोन वेळा बैठक झाली. सगळयांना जमीन द्यावयाची म्हटली तर वन शिल्लक राहणार नाही. माझ्याकडे सुध्दा काही वर्षे हे खाते होते. वन विभागाचा कायदा आल्यानंतर उपग्रहाद्वारे सर्व जमिनीची मोजणी करुन ठेवलेली आहे. जेथे अतिक्रमण नाही तेथे जमिनीची मागणी आहे. त्यासाठी निकष वापरल्यामुळे त्यांचे अर्ज कमी झालेले आहेत. वनहक्क कायदा पूर्णपणे राज्यामध्ये उत्तम प्रकारे राबविला जात आहे. देशामध्ये आपल्या राज्याचा तिसरा नंबर आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ...

आदिवासींच्या इंग्रजी शाळेच्या संदर्भात सदनात चर्चा झाली. नवीन प्रकल्प सोलापूर, कळमनुरी, पुसद, भंडारा आणि धुळे या 5 ठिकाणी केलेले आहेत. यासाठी लागणारे 147 कर्मचारी वाढवून घेतलेले आहेत. काम वाढलेले आहे. सर्व पैसे आदिवासी खात्याला द्यावयाचे आहेत. पैसे आदिवासी विकास विभाग खर्च करीत नाही. आमच्याकडे कुठलीही यंत्रणा नाही. यंत्रणा नसल्यामुळे दुसऱ्या विभागाकडून खर्च करुन घ्यावे लागतात. इंदिरा आवास योजना आहे त्याला पैसे द्यावे लागतात. गृहनिर्माण योजना आहे त्याला पैसे द्यावे लागतात. शिक्षण विभागाला पैसे द्यावे लागतात. नगरविकास, कामगार कल्याण, महिला बालविकास, जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा, ग्रामीण विद्युतीकरण, अपारंपारिक ऊर्जा, रस्ते, पूल, पीकसंवर्धन, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, सामाजिक वनीकरण, सहकार, ग्रामविकास, आरोग्य केंद्रांचे बांधकाम, शाळेच्या इमारतीचे बांधकाम, मृदसंधारण वनीकरण इ.विभागाला पैसे द्यावे लागतात. माननीय सदस्यांनी सांगितले की, आदिवासी विभागाला एवढा पैसा मिळतो तो जातो कुठे?

आदिवासींना आतापर्यंत सगळया पैशांचे वाटप झाले असते तर ते सोन्याच्या गाडीतून फिरले असते असे माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जे तुमच्या खात्याचे नाही ते कृपा करुन पटलावर आणू नका. मागील काळात डॉ.गावीत साहेब आदिवासी विकास खात्याचे मंत्री होते. त्यावेळेला डॉ. मुंदडाताई सुध्दा होत्या. आमच्याकडे फक्त पैसा देण्याचा अधिकार आहे. आमच्याकडे कुठलीही यंत्रणा नाही असे आता मंत्रीमहोदयांनी सांगितले. करणारी यंत्रणा दुसरी आहे.

श्री. बबनराव पाचपुते : यासंदर्भात मी स्वत: लक्ष घातलेले आहे. त्या त्या खात्यांना आम्ही पैसेही देतो. पूर्वी पैसे देत होतो. पण आता मी पैसे देताना कशासाठी खर्च करणार आहात ? कुठे खर्च करणार आहात ? किती खर्च करणार आहात ? खर्च कुठे झाला याची माहिती घेण्यास सुरुवात केल्यामुळे मोठया प्रमाणावर चांगल्या पध्दतीने पैसा खर्च होत आहे. याचा फायदाही आदिवासींना मोठया प्रमाणात होत आहे. 1993-94 पासून पैसे मिळालेले आहेत. कोणत्या वर्षी किती नियतव्यय मिळाला याचीसुध्दा माहिती माझ्याकडे आहे.

नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .....

यापैकी 98 टक्के रक्कम आपण खर्च केलेली आहे. शासनाने बजेटमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला तरी सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागांना अर्थसंकल्पात कपात करु नये असा निर्णय देखील शासनाने घेतलेला आहे, त्याचा या विभागांना फायदा होईल. तसेच होस्टेलचे बांधकाम करण्यासाठी शासनाने जमिनी घेतल्या असल्याने व त्यासाठी तरतूद असल्यानेच हे बांधकाम करण्यासाठी आपण प्रयत्न करु शकलो. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी होस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलांना मिळणाऱ्या भत्याच्या रकमेत वाढ करण्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आपण या मुलांसाठी 400 रुपये, 600 रुपये आणि 800 रुपये असा नवीन भत्ता देण्यास सुरुवात केली आहे. तसेच सर्पदंश झाल्यामुळे जी मुले दगावली त्याची चौकशी करुन जर यात शाळेची चूक असल्याचे लक्षात आले तर त्या शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल असाही निर्णय शासनाने घेतला आहे. घरकुल योजनेसाठी शासनाने 250 कोटीची तरतूद केली असून त्यातून आदिवासींसाठी ही योजना राबविण्यात येईल. एवढे बोलून अन्य ज्या ज्या सूचना केल्या त्यांचाही विचार करण्यात येईल असे आश्वासन देऊन या विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान (वस्त्रोद्योग व अल्पसंख्यांक मंत्री) : महोदय, वस्त्रोद्योग व अल्पसंख्यांक विभागाच्या अनुक्रमे बाब क्र. 147, 148 तसेच 165 व 169 च्या अनुषंगाने ज्या सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले त्यांना मी प्रथम धन्यवाद देऊ इच्छितो.

महोदय, या मागण्यांवर बोलत असताना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, केंद्र शासनाने वस्त्रोद्योग विभागाने राज्यात टेक्स्टाईल पार्क्स उभे करण्यास मंजुरी दिलेली आहे ती मंजुरी बिगर कापूस क्षेत्रातच दिली. याबाबत मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, केंद्र शासनाने सन 2006-07 पासून एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजना सुरु केली असून त्या योजनेच्या माध्यमातून आपल्या राज्यात ही मंजुरी केंद्र शासनाने दिलेली आहे. त्यात कापूस उत्पादक जिल्हे धुळे, बीड, अमरावती, सोलापूर, धुळे, ठाणे, लातूर या भागाचा समावेश आहे. या योजनेच्या माध्यमातून कापूस उत्पादक क्षेत्रासाठी जास्तीत जास्त 40 कोटी रुपये दिले पाहिजे अशी परिस्थिती आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, ठाणे आणि सोलापूर भागात कापूस पिकत नाही, त्यामुळे त्या जिल्ह्यांमध्ये टेक्स्टाईल पार्कचा संबंध येत नाही. तसेच या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करतो की, महाराष्ट्र शासनाने वस्त्रोद्योग धोरणाच्या अनुषंगाने सभागृहातच सुतोवाच केले होते तेव्हा मराठवाडा व विदर्भात कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात होतो असा कौतुकाने उल्लेख केला होता. पण सूत गिरण्या मात्र पश्चिम महाराष्ट्र व इचलकरंजी सारख्या भागात जातात. म्हणून जेथे कापूस पिकतो तेथेच टेक्स्टाईल पार्क निर्माण करावेत ही धोरणात्मक भूमिका सरकारने त्यावेळी घेतली. प्रश्न असा आहे की, हा निर्णय मंत्रिमंडळाच्या एकूण पाच बैठकांमध्ये चर्चा करुन झालेला आहे व कापूस धोरणासह त्या निर्णयाला मान्यता मिळाली. त्याचे कारण मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम आणि माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी अशी भूमिका घेतली होती की, कोणत्याही परिस्थितीत कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात टेक्स्टाईल पार्क निर्माण झाला पाहिजेत. त्यावेळेस मराठ्यातील आमदारांनी हट्ट धरला होता की असे करता येणार नाही. कारण विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशचा अधिकार अशा प्रकारे हिरावून घेणे योग्य नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान : सन्माननीय सदस्यांना थोडा गैरसमज झालेला दिसतो. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्याचे जे नवीन वस्त्रोद्योग धोरण आहे त्या धोरणाच्या माध्यमातून यासंदर्भातील निर्णय झालेला नाही. केंद्रशासनाने सन 2006-2007 पासून संपूर्ण देशासाठी योजना राबविली असून केंद्र शासनाच्या योजनेच्या माध्यमातून या राज्याच्या 14 जिल्हयांमध्ये टेक्सटाईल्स पार्क तयार करण्यात आले असून यासंदर्भातील माहिती मी सभागृहाला दिलेलीच आहे. या योजनेमध्ये केंद्र शासनाचा जास्तीत जास्त 40 कोटी व राज्य शासनाचा जास्तीत जास्त 9 कोटी रुपयांचा वाटा राहणार आहे. वस्त्रोद्योगाचे धोरण विदर्भ, मराठवाडा व खानदेशसाठी असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. पाशा पटेल, कपिल पाटील, मोहन जोशी व सुभाष चव्हाण यांनी अल्पसंख्यांक समाजाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. अल्पसंख्याक विभागाने अल्पसंख्यांक समाजाला शिक्षणाच्या क्षेत्रात आणण्यासाठी, रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी, आयटीआय सुरु करण्यासाठी, पॉलिटेक्नीक कॉलेजेस सुरु करण्यासाठी काम केलेले आहे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप वेळेवर मिळत नाही, या वर्षीची स्कॉलरशिप दुसऱ्या वर्षी दिली जाते असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी उपस्थित केला असून त्यांना मी सांगू इच्छितो की, विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये डायरेक्ट स्कॉलरशीपचे पैसे जमा करण्यासाठी ही योजना असून ही योजना तंत्र व उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून राबवली जात आहे. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जर काही त्रुटी असेल तर स्कॉलरशीपचे पैसे शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिले जाण्याची व्यवस्था करण्याबाबत तसेच सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना त्या वर्षाची स्कॉलरशिप त्याच वर्षी दिली गेली गेली पाहिजे अशा प्रकारची सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाला करण्यात येईल. 25 हजार रुपयांची रक्कम 50 हजार रुपये करण्याचा विचार विभागाच्या विचाराधीन असून त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना अल्पसंख्यांक मुलींना ज्या सायकलीचे वाटप केले जाणार आहे त्या स्टँडर्ड कंपनीच्या असल्या पाहिजेत असा उल्लेख



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान ....

केलेला आहे. अल्पसंख्याक मुलींना सायकलीचे वाटप निविदेद्वारा करण्यात येईल तसेच या सायकली स्टँडर्ड कंपनीच्या असतील हे मी मुद्दाम या ठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी 15 कलमी कार्यक्रमाच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. 15 कलमी कार्यक्रम अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी लागू करण्याचा निर्णय झालेला आहे. यासंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून मुख्य सचिव यासंदर्भात स्वत: आढावा घेत असतात तसेच आमच्या विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव सुध्दा आढावा घेत असतात. 15 कलमी कार्यक्रमाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसिम खान.....

अशा प्रकारे या राज्यातील अल्पसंख्याकाचा विकास व्हावा असे शासनाचे मत आहे. अल्पसंख्याक विद्यार्थी शिक्षणामध्ये पुढे यावेत, तसेच बेरोजगार युवतकांना रोजगार मिळावा म्हणून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकासमहामंडळा मार्फत 250 कोटी रूपयांचे भागभांडवल देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आली आहे. अल्पसंख्याक समाजातील सर्व लोकांना न्याय मिळाला पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे. मी आपल्या माध्यमातून वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 147, 148 तसेच अल्पसंख्याक विकास विभागाच्या बाब क्रमांक 165 ते 169 च्या अनुक्रमे एकूण 57 कोटी 16 लाख 98 हजार रूपयांच्या व 51 कोटी 1000, कोटी रूपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या मागणी क्रमांक डी-4, डी-6 व डी-9 सभागृहाने मंजूर करावी अशी मी आपल्या मार्फत विंनती करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी ज्या पोल्ट्री बंद पडलेल्या आहेत, अवसायानात गेलेल्या आहेत त्यांच्या जागेची विक्री करण्यात यावी अशा प्रकारची मागणी केली आहे. त्यासंबंधातील कार्यवाही करण्याचे काम सुरू झालेले आहे. अवसायानात 28 संस्था आहेत. त्यांच्यावर कारवाई सुरू झालेली आहे. त्यांनी येथे हैद्राबाद येथून येणाऱ्या अंड्यांवर कर लावता येईल काय, असा देखील प्रश्न मांडला आहे. तसा कर आपल्याला लावता येणार नाही. आपल्या राज्यामध्ये अंडी उत्पादन होण्याकरिता अनेक योजना राबविल्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी पर्सिसन नेटधारकांसंबंधी प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंबंधातील याचिका सुप्रीम कोर्टामध्ये प्रलंबित आहे. 12 नॉटीकल मैलाच्या आत मासेमारी करण्यासाठी प्रतिबंध कसा करता येईल याबाबत डॉ.सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यासगटाचा अहवाल प्राप्त झालेला असून त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयामध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करू व तो प्रश्न सोडविण्यात येईल. तसेच सवलतीच्या दराने मच्छीमारांना डिझेलचा पुरवठा करण्यात यावा, अशी देखील मागणी करण्यात आली आहे. केंद्र शासनाला बाजार भावाप्रमाणे डिझेल पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले आहे. मच्छीमारांच्या विनंती नुसार पुन्हा एकदा केंद्र शासनाला याबाबत फेर विनंती करण्यात येईल. MCDC अंतर्गत नौका बांधणी अर्थसहाय्याकरिता चालू वर्षी 42 कोटी रूपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये आहे. याद्वारे 199 लोकांना टप्प्याटप्प्याने सर्व अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यासंबंधी देखील येथे विचार मांडण्यात आला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यासंबंधी जे सूत्र आहे त्यामध्ये बदल करावा लागेल. सध्याच्या सूत्रा नुसार आपल्याला मत्स्य दुष्काळ जाहीर करता येत नाही. कारण 103 टक्के मत्स्य व्यवसायामध्ये वाढ झालेली आहे म्हणून मी विनंती करतो की, आमच्या विभागाच्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात.

......

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये व फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये व फलोत्पादन विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असतांना माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केले त्या बाबत मी सांगू इच्छितो की, जे. जे. हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी विभाग आपण सुरु करीत आहोत. यापूर्वी आपल्याकडे दहा सुपर स्पेशालिटी विभाग होते, त्यामध्ये अजून सहा सुपर स्पेशालिटी विभाग सुरु करुन एकूण 16 विभाग सुरु करण्यासाठी 20 मजली इमारत बांधण्यासाठी आपण तरतूद केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जनतेला चांगल्या प्रकारची सुविधा मिळेल. या कामासाठी टेंडर काढण्यात आले असून त्याला अंतिम स्वरुप देण्याचे काम सुरु आहे, टेंडर फायनल झाल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात येईल.

सभापती महोदय, पोद्दार आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये दुरुस्तीची कामे करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे एम.सी.आय. च्या निकषाप्रमाणे नवीन पदे निर्माण करण्याची गरज होती. त्या प्रमाणे एम.सी.आय. च्या निकषाप्रमाणे 351 पदे भरण्यात आली असून 14 मेडिकल कॉलेजमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात येईल. त्याचप्रमाणे आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये दूरध्वनी, वीज व पाणी यांची देयके देण्यासाठी मागील वर्षी कमी तरतूद करण्यात आली होती. या वेळी आपण अधिकची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे पोस्ट ग्रॅज्युएटच्या सीट मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. त्या करिता  निवास व्यवस्था करावी लागते आणि पगार द्यावा लागतो त्यांच्या करिता शिष्यवृत्ती आणि विद्या वेतन यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे अन्न व औषधी द्रव्ये प्रयोगशाळेचे नूतनीकरण करण्यात येत असून त्या ठिकाणी चांगली सेवा देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी फलोत्पादन विभागाच्या मागण्यांवर बोलत असतांना आंबा, काजू इत्यादी पिकांसाठी किती निधी देण्यात येईल असे विचारले होते. त्या संदर्भात मंत्रिमंडळापुढे लवकरच प्रस्ताव नेण्यात येईल. त्याचप्रमाणे केळी या पिकावर करपा रोग पडतो त्यासाठी पॅकेज मंजूर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आंबा, काजू, केळी इत्यादी पिकांच्या बाबतीत विमा काढल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी इतर ठिकाणी असलेले लायब्ररीयन आणि मेडिकल कॉलेजमधील लायब्ररीयनमध्ये तफावत असल्याचे सांगितले. ही तफावत दूर करण्यासाठी एक कमिटी असून त्या कमिटीकडे जाऊन ती दूर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी काही मशिन्स धूळ खात पडल्याचे व ते बंद असल्याचे सांगितले. सदरची मशिन्स लवकर कसे दुरुस्त करता येईल यासाठी मदत केली जाईल. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी डॉ. इनामदार हे व्हिजिटींग कन्सल्टंट म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. डॉ. इनामदार हे पेमेंट बेसिसवर काम करीत आहेत. त्यांचा व्हिजिटींग कालावधी संपल्यामुळे व मधल्या काळात ते बाहेर गेल्यामुळे त्यांना पुन्हा सेवेमध्ये घेण्याकरिता त्यांनी अर्ज करणे आवश्यक होते. त्यांनी केलेला अर्ज आमच्यापर्यन्त पोहोचला नव्हता. या बाबत त्यांच्याकडून दूरध्वनीवर माहिती घेतल्यानंतर त्यांना पुन्हा सेवेत घेण्याचे आदेश देण्यात आले व आता ते काम करीत आहेत. सभापती महोदय, अशाप्रकारे वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये व फलोत्पादन विभागाच्या मागणी क्रमांक 76, 77, 78, 129 ते 134 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. डी. पी. सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील बाब क्रमांक 149 ते 158 मध्ये एकूण 392 कोटी 6 लक्ष 95 हजार रुपयांच्या मागण्यांवरील चर्चेत माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, अरुण गुजराथी, विक्रम काळे, डॉ. दीपक सावंत, माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, हेमंत टकले, रामनाथ मोते, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री. मोहन जोशी, केशवराव मानकर यांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाच्या पेपर फुटीसंदर्भात माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आग्रही भूमिका मांडली आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

पेपर फुटीच्या प्रकरणामध्ये आवश्यक असलेली कारवाई विद्यापीठाने केली आहे. त्यामध्ये चार प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये पेपर फुटी होणे ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब असून त्या संदर्भात सभागृहामध्ये वेळोवेळी चर्चा करण्यात आली आहे. या संदर्भात 11 जून रोजी मुख्य सचिवांनी सर्व कुलगुरु आणि संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेतली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत . . . .

या बैठकीमध्ये असे ठरविण्यात आले की, विद्यापीठाच्या परीक्षा आय.टी.वर आधारित ऑन लाईन कशा करता येतील यासाठी सचिव,आय.टी.यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमावी. त्याप्रमाणे सदर कमिटी नेमलेली आहे आणि त्यांनी या बाबत लवकरात लवकर विशेष अंमलबजावणी करावयाची आहे आणि त्यासाठी एक पध्दती देखील विकसित करावयाची आहे. तसेच पेपर फुटीसारखे प्रकार घडू नयेत म्हणून एक समान पध्दतीची तजवीज करणे याबाबत विशेष काम करण्याचे ठरलेले आहे. त्याचप्रमाणे 2013-2014 च्या शैक्षणिक वर्षापासून कदाचित ऑन लाईन परीक्षा घेण्याचा आमचा मानस आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा मांडण्यात आला होता की, नऊ प्र-कुलगुरू यांच्या नियुक्त्या करावयाच्या असून ही बाब पेंडींग आहे. यासंदर्भात सन्माननीय कुलपती साहेबांकडे कुलगुरु यांच्या नावाच्या शिफारशी करुन उरलेली जी नऊ विद्यापीठे आहेत त्याठिकाणी सुध्दा प्र-कुलगुरु यांची लवकरात लवकर नियुक्ती करण्यात येईल यादृष्टीने आम्ही विशेष लक्ष देऊ.

तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी फी-प्रतिपूर्ती संबंधात उशीर होतो हा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबतीत सांगावयाचे तर आपले प्रवेश देण्याचे काम पूर्ण होण्या साठी सप्टेंबर, ऑक्टोबर महिना उजाडतो आणि याबाबतीत डिसेंबरमध्ये मागणी केली जाते आणि त्याचे वाटप मार्च महिन्यामध्ये होते. त्याच प्रमाणे निश्चित प्रवेश संख्या न कळल्यामुळे जी तरतूद केलेली असते, ती कमी पडते. मग अशा वेळी आपल्याला पुरवणी मागण्या कराव्या लागतात हे मी या निमिताने सांगू इच्छितो. पण तरी सुध्दा लवकरात लवकर फी-प्रतिपूर्ती कशी करुन देता येईल याकडे विभागाचे जरुर लक्ष राहील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेबांनी आय.टी.आय.ची वाढती मागणी पाहून आपल्याला राज्यामध्ये जास्तीत जास्त आय.टी.आय.कसे सुरु करता येतील याकडे लक्ष वेधले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यातील 358 तालुक्यात जवळजवळ 416 आय.टी.आय. कार्यरत आहेत. त्यामुळे प्रत्येक तालुक्याला एका पेक्षा जास्त आय.टी.आय. आहेत आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये तर आम्ही दुसरी नाही तर तिसरी शिफ्ट देखील सुरु केलेली आहे आणि इतर क्षेत्रामध्ये दुसरी शिफ्ट सुरु केलेली आहे.जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आय.टी.आय.मध्ये प्रवेश घेता येईल अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी सांगतले होते, त्याअनुषंगाने कारवाई सुरु आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत . . . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.त्यांनी असे सांगितले की, नांदेड येथील जॉईंट डायरेक्टर यांच्या ऑफीसमधील कर्मचाऱ्यांचे अजून पगार झालेले नाही.मात्र मी त्यांना सांगू इच्छितो की,आजच बिले पास झाली असून संबंधित प्राध्यापकांच्या खात्यामध्ये वेतन जमा झालेले आहे.तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सहा टक्के डी.ए.चा डिफरन्स देण्याच्या बाबतीत सांगितले आहे आणि आजच्या बाब क्र.152 मधील 252 कोटीमध्ये ही बाब सुध्दा अंतर्भूत आहे.त्यामुळे याबाबतीत देखील विचार करण्यात आलेला आहे.तसेच त्यांनी अत्यंत महत्वाचे सांगितले की,सुधारित वेतन आयोगानुसार अतिरिक्त खर्चाच्या 80 टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्याचा जो प्रस्ताव आहे तो आम्ही केंद्र शासनाकडे सादर केला आहे.पण अजून त्यासाठी मंजूरी मिळालेली नाही. याबाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन सुध्दा केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, लवकरात लवकर ही रक्कम प्राप्त करुन घेण्याच्या बाबतीत आम्ही सगळेजण प्रयत्नशील आहोत.

सभापती महोदय, 1991 ते 2000 या कालावधीच्या बाबतीत जे नेट-सेट झालेले नाहीत. त्यांच्या बाबतीत देखील मुद्दा मांडण्यात आला आहे. त्याबाबतीत आपण निर्णय घेतलेला आहे की, विद्यापिठाने संबंधितांना ज्या दिवसापासून रुजू होण्यासाठी आदेश दिलेले आहेत, त्याच दिवसापासून त्यांना एक्झम्शन देण्याचा निर्णय देखील आपण घेतलेला आहे आणि याबाबतीत लवकरात लवकर जी.आर.निर्गमित करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी एक मुद्दा मांडला होता की, ए.आय.सी.टी.ने 125 संस्थांची मान्यता काढून घेतली आहे.परंतु मी सांगू इच्छितो की, या 125 संस्था कोणत्याही विहित प्राधिकरणाच्या बॉडीची मान्यता नसलेल्या होत्या. त्या विड्रॉ केलेल्या नाहीत. त्यामुळे या संस्थांची मान्यता विड्रॉ करण्यात आली असे म्हणणे चुकीचे राहील. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यामध्ये अन्-ऑथराईज् इन्स्टीट्युशन्स आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी सांगितले की, एम.सी.ए.,एम.बी.ए.च्या बोगस इन्स्टीट्युट पुण्यामध्ये आढळून आल्या आहेत.याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, अन्-अथॉराईज्ड इन्स्टीट्युशनला प्रतिबंध करण्यासाठी शासनाकडून ॲक्ट तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यामुळे अन्-ॲथॉराईज्ड इन्स्टीट्युशनच्या बाबतीत हा ॲक्ट कार्यान्वित करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल साहेबांनी अशी....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत . . . .

विनंती केली होती की, खाजगी पॉलिटेक्नीक कॉलेजला बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देता येईल काय ?

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत .....

या संदर्भात सकारात्मक काही करता येईल का याचा जरुर विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी महत्वाचा विषय उपस्थित केला होता. पॉलिटेक्निकच्या संदर्भात सामान्य गणित या दुय्यम दर्जाचा गणित विषयाबाबत त्यांनी मुद्दा उपस्थित केला. मी सांगू इच्छितो की, जे विद्यार्थी गणितामध्ये अतिशय कच्चे आहेत त्यांचे पुढील शिक्षण थांबू नये यासाठी सामान्य गणित हा विषय सुरु केला होता. या दृष्टीकोनातून अकरावी आर्टस् आणि कॉमर्स या शाखेमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य गणित हा विषय देण्यात आला होता. खरे म्हणजे सामान्य गणित घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावी सायन्सला सुध्दा प्रवेश दिला जात नाही. डिप्लोमामध्ये गणित हा विषय हायर लेव्हलचा असतो. अशा परिस्थितीत या विद्यार्थ्यांना जर आपण त्या ठिकाणी प्रवेश दिला तर त्यांना डिप्लोमा उत्तीर्ण होण्यामध्ये किंवा तेथील गणित विषयात उत्तीर्ण होण्यामध्ये अडचणी येऊ शकतात. म्हणून सामान्य गणित घेतलेल्या विद्यार्थ्यांना डिप्लोमासाठी आपण प्रवेश देत नाही. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना दिले जाणारे विद्यावेतन वाढविण्यात यावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय विसंगत उत्तर देत आहेत. त्यांच्याच विभागाचे परिपत्रक आहे. त्यांच्याच विभागाने मान्यता दिलेली आहे की, 71 नंबरमध्ये आणि 74 नंबरमध्ये काही फरक नाही. त्यांना प्रवेश द्यावा असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे 18 नोव्हेंबर, 2011 चे परिपत्रक आहे. आपल्याच विभागाचे परिपत्रक असताना आपण सांगत आहात की प्रवेश देता येत नाही. आपल्या विभागाच्या परिपत्रकाच्या विसंगत असे उत्तर माननीय मंत्री महोदय देत आहेत. त्याला माझा आक्षेप आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या परिपत्रकाचा उल्लेख केला ते परिपत्रक मी जरुर तपासून पाहीन परंतु प्राथमिक गणित ज्यांनी घेतलेले आहे त्यांना डिप्लोमाला देता येत नाही असा निर्णय झालेला आहे. तरी सुध्दा असे काही परिपत्रक असेल तर ती बाब तपासून सन्माननीय सदस्यांना त्याबाबत कळविण्यात येईल. सन्माननीय सदस्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत .....

श्री. रामनाथ मोते यांनी अशी सूचना केली की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिले जाणारे विद्यावेतन वाढविण्यात यावे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना 40 रुपये विद्यावेतन देण्यात येते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी 500 रुपये आणि 600 रुपये विद्यावेतन केलेले आहे हे आपल्याला माहीत असेल. अनुसूचित जमातीच्या धर्तीवर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन वाढवून देण्याच्या संदर्भात 15 जूनला सामाजिक न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांचे विद्यावेतन जास्तीत जास्त कसे वाढविता येईल या बाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी एक विषय मांडला होता. खाजगी तंत्रनिकेतनसाठी त्यांनी अनेक सूचना केलेल्या आहेत. त्या संदर्भात मी त्यांना विनंती करतो की, आपण जरुर माझ्याशी संपर्क साधावा. वैयक्तिक पातळीवर जरुर या संदर्भात आपण बैठक घेऊ आणि त्या संदर्भात काय मार्ग काढता येईल या बाबत जरुर विचार करु.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या 392 कोटी 6 लाख 95 हजार रुपयांच्या बाब क्रमांक 149 ते 158 अशा ज्या 10 पुरवणी मागण्या सादर केलेल्या आहेत त्यांना मान्यता द्यावी.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ( जलसंधारण व परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, जलसंधारण आणि परिवहन विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे. या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, दिवाकर रावते, सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई या सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन चांगल्या पध्दतीच्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी असा उल्लेख केला होता की, चोपडा, यावल आणि रावेर या तालुक्यातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणावर खाली गेलेली आहे. त्यामुळे ज्या पध्दतीने 15 तालुक्यांमध्ये आपण 15 कोटी रुपयांप्रमाणे निधी दिलेला त्या पध्दतीने या भागामध्ये सुध्दा तरतूद करावी. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मागण्या मंजूर करण्याची विनंती करण्याबाबत सांगत आहेत.

सभापती महोदय, जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 103 मध्ये नमूद केलेल्या 150 कोटी रुपयांच्या पुरवणी मागणीला मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो. त्याचप्रमाणे परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 18 यामध्ये नमूद केलेल्या 30 लक्ष रुपयांच्या पुरवणी मागणीस मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन, शालेय शिक्षण व महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1 ते 10, शालेय शिक्षण विभागाची बाब क्र.52 आणि महिला व बालविकास विभागाची बाब क्र.159 यावरील पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करते आणि माझे उत्तराचे भाषण येथेच संपविते.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.संजय देवतळे ( सांस्कृतिक कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 163 वरील मागणी सभागृहाला सादर करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मराठी मालिकांचा उल्लेख केला होता. शासनाने त्यासंबंधी मराठी मालिकांना 1 वर्षासाठी भाड्यात 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. चित्रपट तयार होण्यासाठी 3-4 वर्षे लागतात. पण मालिका एका वर्षात तयार होऊ शकते. तसेच मालिकांना चॅनेल्स सुध्दा मदत करीत असतात त्यामुळे मराठी मालिकांना एक वर्षे ही सवलत दिलेली आहे.

सभापती महोदय, वृध्द कलाकारांना मानधन देण्यासाठी या पुरवणी मागणीत तरतूद केलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.गंगाधरबुवा व्यास यांना मानधन मिळाले नाही असे म्हटले होते. परंतु त्यांनाही मंजूर मानधनातून मानधन मिळू शकेल.

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी महाराष्ट्र राज्याने चित्रपट महोत्सवाचा उल्लेख केला होता. यासाठी 1 कोटी 3 लाखाची मागणी केलेली आहे. या वर्षी भारतीय चित्रपट सृष्टी 100 व्या वर्षात पदार्पण करीत असल्यामुळे वर्षभर कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. त्याचा शुभारंभ पुरवणी मागण्यांत काही रकमेची तरतूद करुन केलेला आहे. तसेच पुरस्कारांची रक्कम 11 लाखांवरुन 32 लाख रुपयांपर्यंत वाढविलेली आहे.

बाब क्र.163 व 164 या पुरवणी मागण्या मंजूर कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि येथेच थांबतो.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मराठी भाषा विभाग व नगरविकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

नगरविकास विभागाच्या 3 पुरवणी मागण्या आहेत. 81 कोटी 71 लाख 46 हजार रुपये किंमतीच्या या मागण्या आहेत. एल.बी.टी.संबंधी महानगरपालिकांना स्टॅम्प डयूटीवरील 1 टक्का अनुदान देण्यात येत आहे. तसेच दलित वस्ती योजनांतर्गत नगरपरिषद क्षेत्रात सोईसुविधा पुरविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून निधी प्राप्त झालेला आहे. त्यासाठी ही तरतूद केलेली आहे आणि तिसरी मागणी सिंहस्थ कुंभ मेळ्यासाठी करण्यात आलेली आहे. नाशिक जिल्हाधिकाऱ्यांकडून कुंभ मेळ्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार केले जात आहे. त्याची तरतूद मुख्य अर्थसंकल्पामध्ये करण्यात येईल. या वर्षाच्या अर्थसंकल्पात त्र्यंबकेश्वरकरिता 52 कोटी रुपयांची तरतूद केली होती. पण या पुरवणी मागण्याच्या माध्यमातून नाशिक महानगरपालिकेसाठी टोकन ग्रँट म्हणून 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

दलित वस्ती योजना लोकवस्तीच्या निकषावर आधारित आहे. त्यासाठी 372 कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. आता अतिरिक्त निधी सामाजिक न्याय विभागाकडून प्राप्त झ ाल्यामुळे ही तरतूद केली आहे.

त्याचबरोबर एल.बी.टी.द्वारे 1 टक्का अतिरिक्त अनुदान स्टॅम्प डयूटीमधून अनुदान जमा करण्यात येते. सुरुवातीला त्याची रक्कम देण्यात आली होती. आता फरकाची रक्कम देण्यात येत आहे. एल.बी.टी.संबंधी या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. या संदर्भात अतिशय विचारांती शासनाने महानगरपालिकांमध्ये जकातीऐवजी एल.बी.टी.लागू करण्याचा निर्णय घेतला होता. सन 2010-11 आणि सन 2011-12 या वर्षात 7 महागरपालिकांमध्ये आणि आता आणखी 7 महानगरपालिकांमध्ये एल.बी.टी.लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जकात रद्द करण्यासंबंधी हा महत्वाचा निर्णय आहे.

सभापती महोदय, अतिक्रमणे यासंबंधी सभागृहात चर्चा करण्यात आली आहे. नागरी प्रशासनाचे जे कायदे आहेत त्यात सुधारणा केलेले विधेयक राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी प्रलंबित होते. ते विधेयक आता मंजूर झालेले आहे. त्यामुळे नगरपालिकेमध्ये वैयक्तिकरित्या मुख्याधिकाऱ्यांना आणि महानगरपालिकेमध्ये निर्देशित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याचा कायदा मंजूर झाला होता. त्याची आता अंमलबजावणी सुरु होत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 08:40

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातून जिल्हास्तरावर डीपीडीसीच्या माध्यमातून भरपूर पैसे दिले जात आहेत. तसेच 13व्या वित्त आयोगाकडूनही महानगरपालिका आणि नगरपालिकांना स्वच्छता निर्माण करण्याकरिता स्वच्छतागृहांसाठी पैसे दिले जात आहेत. नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. 10 कोटी रुपया पेक्षा कमी किंमतीच्या नागरी पायाभूत सुविधा ह्या जिल्हा योजनेतून दिल्या जातात आणि मोठ्या स्वरुपाच्या नागरी पायाभूत सुविधा ह्या स्वर्णजयंती नगरोत्थान कार्यक्रमामधून दिल्या जातात. गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये जवळ जवळ 2400 कोटी रुपये किंमतीच्या 24 प्रकल्पांना राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. तेव्हा नगरविकास विभागाच्या 81 कोटी 71 लाख 46 हजार रुपयाच्या मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

मराठी भाषा विभागाच्या मागण्यांमध्ये 71 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये भाषा संचालनालयाकरिता काही तरतूद केलेली आहे, राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकरिता आणि मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाकरिता तरतूद केलेली आहे. हा नवीन विभाग झालेला आहे. त्याचे काम अधिक मजबुतीने करण्याकरिता प्रयत्न सुरु आहेत. या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : सन 2012-2013च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक.

**L. A. BILL NO. XV OF 2012**

(A BILL TO REGULATE AND PROMOTE THE CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER OF FLATS ON THE OWNERSHIP BASIS IN THE STATE OF MAHARASHTRA AND TO ESTABLISH THE HOUSING REGULATORY AUTHORITY AND HOUSING APPELLATE TRIBUNAL AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 15, महाराष्ट्र राज्यात मालकी तत्वावरील सदनिकांचे बांधकाम, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याकरिता व त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गृहनिर्माण नियामक प्राधिकरणाची व गृहनिर्माण अपील न्यायाधिकरणाची स्थापना करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012चे वि.स.वि.क्रमांक 15, महाराष्ट्र राज्यात मालकी तत्वावरील सदनिकांचे बांधकाम, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याकरिता व त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गृहनिर्माण नियामक प्राधिकरणाची व गृहनिर्माण अपील न्यायाधिकरणाची स्थापना करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आता रात्रीचे 8 वाजून 44 मिनिटे झालेली आहेत. या विधेयकावर चर्चा करण्याची सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. तसेच माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी देखील या विधेयकाच्या संदर्भात आपणास विनंती केलेली आहे. ते आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 08:40

**उप सभापती** : लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपल्यानंतर हे विधेयक चर्चेसाठी घेण्याचे ठरले होते. परंतु माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे हे मला येऊन भेटले. त्यांनी मला सांगितले की, "खासदार श्री. बाळ आपटे यांचे निधन झाल्यामुळे मी तिकडे जाऊन लवकर येतो." ते अद्याप आलेले नाहीत. त्यांच्यासाठी हे विधेयक थांबविणे योग्य वाटत नाही.

श्री. दिवाकर रावते : खासदार श्री. बाळ आपटे यांचे निधन झाल्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते हे तिकडे गेले असून अजून पर्यन्त ते आलेले नाहीत. त्यांनी आपणास या विधेयकाच्या बाबतीत विनंती केलेली आहे.हे महत्वाचे विधेयक आहे. या विधेयकाच्या संदर्भात त्यांना काही महत्वाच्या गोष्टी सभागृहामध्ये मांडावयाच्या आहेत. त्यामुळे उद्याच्या कामकाजामध्ये हे विधेयक प्राधान्याने घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे. पुरवणी मागण्यावरील चर्चेला माननीय जलसंपदा मंत्र्यांनी एखाद्या प्रस्तावाला उत्तर देतात त्याप्रमाणे उत्तर दिले. न विचारलेल्या मुद्यांच्या बाबतीत देखील त्यांनी उत्तर दिले. आम्ही काहीही न बोलता त्यांचे उत्तर ऐकले.

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, विधान सभा में पास होने के बाद अब यह बिल विधान परिषद में चर्चा के लिए आया है. इस बिल को पास करने के लिए अभी 8.30 बजे तक हम यहां पर बैठे हुए हैं. महाराष्ट्र राज्य की दृष्टि से एक क्रांतिकारी बिल यहां पर लाया गया है. पूरा ट्रॉन्जेक्शन पारदर्शी बनाने की कोशिश इस बिल के माध्यम से हमारी सरकार कर रही है. मुझे नहीं लगता कि इस बिल को पास करने में किसी भी माननीय सदस्य को कोई आपत्ति होगी. यदि माननीय सदस्य इस बिल पर ज्यादा चर्चा करना चाहते हैं तो हम लोग भी इस चर्चा के लिए तैयार हैं. परन्तु मेरा अनुरोध है कि यह बिल यहां पर अभी पास किया जाना चाहिए.

( इसके बाद श्री अजित शिगम )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांशी चर्चा करण्याचा मी देखील प्रयत्न केला. त्यांच्या काही सूचना आहेत. काल विधानसभा सभागृहात हे विधेयक मंजूर करण्यात आले. हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते आणि संयुक्त समितीमध्ये त्यावर सविस्तर चर्चा होऊन एकमताने ते विधेयक मंजूर केलेले आहे. तेव्हा या विधेयकावर फार चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे नाही. या विधेयकावर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. तेव्हा आपण सांगितल्याप्रमाणे या विधेयकावरील चर्चेस आपण सुरुवात करु या. फार तर हे विधेयक ऑन लेग ठेवून उद्या फक्त माननीय विरोधी पक्ष नेते त्यावर भाषण करतील. त्यांच्या सूचना घेऊन आपण हे विधेयक मंजूर करुन घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडून आल्यामुळे ते मंजूर करण्याची नैतिक जबाबदारी सभागृहाची आहेच. आपणास ती नाकारता येत नाही. या विधेयकाला उप सूचना देण्याचा विषय नाही. हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. मला त्या विधेयकावर बोलता येणार नाही. मला देखील या विधेयकावर खूप बोलायचे होते. परंतु आपली विनंती मान्य करुन मी माझी डिसेंट नोट मागे घेतली. या विधेयकावर काही सन्माननीय सदस्यांना मते मांडावयाची असल्यास आपण त्यांना संधी द्यावी अशी विनंती आहे. आता रात्रीचे 8 वाजून 45 मिनिटे झालेली आहेत. श्री.बाळ आपटे यांचे निधन झाले. तिकडे माननीय विरोधी पक्ष नेते गेले आहेत. ते मला म्हणाले की, या विधेयकावर मला थोडे बोलायचे आहे. आपण सांगत आहात की, माननीय विरोधी पक्ष नेते उद्या या विधेयकावर बोलतील. तेव्हा आपण हे विधेयक उद्याच्या कामकाजपत्रिकेवर दाखवावे. आम्ही आपणास सहकार्य करतो ना ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर किती सन्माननीय सदस्य बोलणार आहेत हे निश्चित समजल्यावर आपणास ठरविता येईल. आता आपण विधेयकावरील चर्चा सुरु करु. ज्या सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे ते बोलतील आणि ते विधेयक ऑन लेग ठेवून त्यावर उद्या माननीय विरोधी पक्ष नेते बोलतील.

**उप सभापती** : आता सभागृहात उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांपैकी किती सदस्यांना या विधेयकावर बोलायचे आहे ? उद्या फक्त माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी देण्यात येणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आताच विधेयकावर बोलावे असे आपण कृपा करुन सांगू नका. आम्ही सरकारला सहकार्य करतो. आपणास आमची विनंती अमान्य असेल तर आपण हे विधेयक मंजूर करावे, त्यास माझी काही हरकत नाही. मी आपणास इतकी विनंती केली. आम्हाला हे विधेयक नामंजूर करायचे नाही. या विधेयकावर काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असेल तर आपण त्यांना बोलण्याची संधी का नाकारता हे मला कळत नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आपल्या सारख्या ज्येष्ठ सदस्यांनी सांगितल्यानंतर मी आपला नेहमीच सन्मान केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील आपली विनंती मान्य केलेली आहे. तेव्हा हे विधेयक उद्या घेण्यात येईल.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण हे विधेयक उद्या घेत आहोत. परंतु हे विधेयक केव्हा घेणार आहोत हे देखील सांगावे.

यानंतर श्री.गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर ताबडतोबीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 15-महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन वविकास) विधेयक,2012 चर्चेला घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या बुधवार, दिनांक 18 जुलै, 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत अर्धा तास चर्चेच्या सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 08 वाजून 51 मिनिटांनी, बुधवार,दिनांक 18 जुलै, 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही